विश्वासराऊ-प्रशस्ति

व

सेनासमसहस्त्री

पवार-विजय

★

संपादक व अनुवादक
कृष्णाजी गंगाधर कवचाळे
देवास सीनियर.

★

इसवी सन १९३३

183

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार
यांना
प्रेमादरपूर्वक भेट.

म.वि. गुजर
१३२१ कसबा पेठ
स्मृतिसंगम
पुणे ११

स्नेहांकित

[signature]

विश्वासराऊ - प्रशस्ति

व

सेनासप्तसहस्त्री

पवार - विजय

अर्थात्

सुपें (जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्रराज्य) येथील पवार घराण्यांतील पुरुषांचीं आणि संस्थान देवास थोरल्या पातीच्या पवार राजघराण्यांतील पुरुषांचीं भाटांनीं हिंदींत गाइलेलीं

ऐतिहासिक

वीर - गीतें

[भावानुवाद व टीपासह]

भाग १ व २

संपादक व अनुवादक

कृष्णाजी गंगाधर कवचाळे

(देवास थोरली पाती)

इसवी सन १९६३ किंमत ६ रुपये

– प्रकाशक –
कृष्णाजी गंगाधर कवचाळे
देवास सिनियर

☆

☆

– मुद्रक –
व. शं. भोसले
लोकसेवक प्रेस, १८७८ सी,
लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

भाग १

विश्वासराऊ - प्रशस्ति

अर्थात्

सुपें (जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्रराज्य) येथील
पवार घराण्यांतील पुरुषांचीं भाटांनीं
हिंदींत गाइलेलीं

वीर - गीतें

(भावानुवाद व टीपांसह)

" पुँवार बंस हिन्दुवान भान । "

संपादक
कृष्णाजी गंगाधर कवचाळे

सन १९६३ इ.

प्रथमावृत्ति इ. स. १९४२

दुसऱ्या आवृत्तीप्रित्यर्थ
आत्मनिवेदन

प्रस्तुत पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति प्रकाशित करतांना मनाला मोठा आनंद होत आहे. महत्प्रयासानें मिळालेलीं ह्यांतील वीर-गीतें इतिहासलेखकांना व तज्ञांना मान्य होऊन तीं विषय विवेचनांत यथोचितपणें प्रमाणादाखल किंवा पुष्टीस्तव उद्धृत होऊं लागलीं आहेत, हें पाहून श्रम सार्थकीं लागल्याचें समाधानहि मला होत आहे, हें येथें नमूद करण्यास मला विशेष अभिमान वाटतो.

सदर आवृत्तींत, पहिल्या आवृत्तीमधील अवांतर व उपरांत उपलब्ध झालेल्या वीर-गीतांचें परिशिष्ट (अ) गाळून त्यांतील दोन्हीं वीर-गीतें पुस्तकांत यथास्थानीं समाविष्ट करून घेणें व सर्वसाधारण दुरूस्ती करणें यापलिकडे मजकुराच्या बाबतींत कांहींच फेरफार केलेले नाहींत.

श्रीमंत जगदेवराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज पवार, सी. आय्. ई. विश्वासराव, सेनाधुरंधर हे ता. २८-१-१९६० रोजीं निधन पावल्यानंतर या दोन्ही परंपरेचा वारसा देवास थोरली पातीचे विद्यमान महाराज श्रीमंत कर्नल कृष्णाजीराव पवार सेनासप्तसहस्री यांच्याकडे ओघानेंच आल्यामुळें

" विश्वासराऊ प्रशस्ति " व " सेनासप्तसहस्त्री पवार विजय " ही हिंदी वीर–गीतें आतां अनुक्रमें भाग १ व भाग २ यानुसार प्रस्तुत आवृत्तींत छापली जात असून, हे भाग १ व २ श्रीमंत महाराजसाहेबांनाच प्रेमादरपूर्वक अर्पण करीत आहोत.

१०, समाधान
कृष्णपुरा, देवास सि.
दि. ४।४।१९६३

– कृ. गं. कवचाळे

आत्मकथन

महाराष्ट्राच्या इतिहासांत 'स्वराज्या' पासून तों 'साम्राज्या'-पर्यंत मराठ्यांची सत्ता नेऊन पोहोंचविण्याच्या कामीं ज्या क्षत्रिय मराठा कुळांनी आपल्या पिढ्यान्‌पिढ्या खर्ची घातल्या त्यांत पवारांच्या कुळाची गणना अग्रेसरत्वानें केली जाते. मुसलमान–पूर्व काळांत उत्तर हिंदुस्थानामध्यें राजपुताना व मावळा ह्या भागांत पवारांचें अत्यंत बलिष्ठ असें अधिराज्य कित्येक शतकें नांदलें होतें. त्या कुळाच्या एका शाखेंत जन्म पावलेल्या व मलिकंबराच्या वेळीं महाराष्ट्रांत येऊन वसलेल्या साबूसिंग नामक वीर पुरुषास पुढें श्री शिवछत्रपतींनीं स्वराज्यो–दयकाळीं आपल्या पदरीं अगत्यानें ठेवून घेतलें. तेव्हांपासून तों सन १८१८ मध्यें मराठी साम्राज्य अस्तंगत होईपर्यंत ह्या कुळांतील अनेक पुरुषांनीं युक्त असलेल्या ७ पिढ्यांनीं महाराष्ट्राची पूर्ण क्षत्रिय बाण्यानें अखंड सेवा करून 'विश्वासराव', 'सेनाधुरंधर', 'सेनासप्तसहस्री', 'सेनाबारासहस्री' अशा यथार्थ मानांच्या पदव्या आणि सरंजाम प्राप्त करून घेतले. त्याबद्दलची बरीच विस्तृत व तितकीच महत्त्वाची माहिती अलीकडे उजेडांत

आली आहे व येत आहे. ह्याच पवार घराण्याची एक प्रमुख शाखा असलेल्या संस्थान देवास थोरल्या पातीच्या 'सेनासप्तसहस्त्री' घराण्यांतील मराठेशाहींत प्रखर पराक्रम गाजविणाऱ्या पुरुषांचीं त्यांच्या समीपवर्ती व समकालीन भाटांनीं गाइलेलीं जुनीं हिंदी वीर-गीतें एकत्र करून त्यांचा एक संग्रह 'सेनासप्तसहस्त्री पवार-विजय' ह्या नांवानें मी पूर्वी वाचकांस सादर केला आहे, त्या संग्रहांतील वीर-गीतांच्या अगोदरचीं भाटांचीं हिंदी वीर-गीतें संकलित करून तीं मराठी भावार्थासह या पुस्तकद्वारें आज वाचकांपुढें ठेवित आहे.

प्रस्तुत वीर-गीत-संग्रहांत साबूसिंह, कृष्णाजी, बुबाजी, रायाजी, केरोजी व काळोजी या पवार कुलोत्पन्न वीरांच्या पराक्रमाचें व स्वराज्यसेवेचें यथोचित वर्णन पाला, ठाकुरसी, भावसिंग व कनिराम या भाट-कवींनीं केलेलें आहे. या भाटांचें घराणें संस्थान देवास थोरल्या पातीच्या पवार सरकारांचें पिढीजात आश्रित असून त्याची वंशावळ पुढें दिली आहे.

हीं वीर-गीतें 'सेनासप्तसहस्त्री पवार-विजयां' तील वीर-गीतांबरोबरच, सदर भाट घराण्यांतील किसनलाल भाट याचेकडून मला प्राप्त झालीं. तीं सर्व एकत्रच प्रसिद्ध करावींत असा पूर्वी मनोदय होता; परंतु श्रीमंत पहिले तुकोजीराव पवार, सेनासप्त-सहस्त्री, यांच्यापासून देवास थोरल्या पातीच्या घराण्याची शाखा स्वतंत्र होत असल्यानें त्यांची व त्यांच्या वंशजांचीं वीर-गीतें पृथक्‌च प्रकाशित करण्याचें ठरवून तीं 'सेनासप्तसहस्त्री पवार-विजय' ह्या पुस्तकद्वारें प्रकाशित केलीं व आतां श्रीमंत पहिले

तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्री, यांच्यापासून वरच्या पिढींचीं वीर-गीतें आज या पुस्तकद्वारें प्रकाशित करित आहे.

ह्या पुस्तकांतील वीर-गीताच्या प्रधान नायकांचा वंश म्हणजे आज वर्तमान संस्थानिक मराठा पवारांची ज्येष्ठ शाखा असलेले सुपें (जिल्हा अहमदनगर इलाखा मुंबई) येथील 'विश्वासराव' पवार घराणें होय. सबब त्या घराण्यांतील विद्यमान पुरुष श्रीमंत जगदेवराव पवार, विश्वासराव, सेना–धुरंधर, सी. आय्. ई., यांस हा वीर-गीतांचा संग्रह आजच्या शुभ दिनीं सादर समर्पण करित आहे.

या पुस्तकाच्या कामीं इंदूर येथील डेली कॉलेजचे प्रो. श्यामलाल शर्मा, बी. ए., देवासचे पं. लक्ष्मीनारायण शुक्ल व श्रीयुत रघुनाथ कृष्ण अत्रे आणि पुण्याचे इतिहास संशोधक व संस्थान देवास थोरली पाती–पवार घराण्याच्या इतिहासाचे लेखक श्रीयुत मा. वि. गुजर, बी. ए., ह्यांनीं जें निरनिराळ्या प्रकारें साह्य केलें, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

शेवटीं अत्यंत कृतज्ञतापूर्वक एका गोष्टीचा उल्लेख केल्या-वांचून हें आत्मकथन मला पूर्ण करतां येत नाहीं. समस्त मराठा पवार कुळांस विद्वत्ता, राजकारणपटुता, प्रजावत्सलता व वीर वृत्ति या थोर गुणसमुच्चयामुळें भूषणभूत असलेले देवास थोरल्या पातीचे अधिपति श्रीमंत सरकार कर्नल सर विक्रमसिंहराव पवार, सेनासप्तसहस्री, के. सी. एस्. आय्., बी. ए., यांनीं आजवर पवार घराण्याच्या उज्वल इतिहासाच्या प्रकाशनकार्यांत निरनिराळ्या लेखकांस मोठ्या आनंदानें जें

प्रोत्साहन दिलें आहे त्याचा लाभ सुदैवानें मलाही झाला आहे व याही प्रसंगीं महाराजांनीं मला तसें उपकृत करून ठेविलें आहे, सबब त्याबद्दल मी येथें महाराजांविषयीं मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करून त्यांचें व समस्त राजकुटुंबियांचें शुभचिंतन करित हें आत्मकथन पूर्ण करितों.

देवास थोरली पाती
वर्ष प्रतिपदा, शके १८६४

– कृ. गं. कवचाळे



श्रीमंत जगदेवराव ऊर्फ भाऊसाहेब महाराज पवार,
सी. आय्. ई., 'विश्वासराव', 'सेनाधुरंधर'.

जन्म :
ता. ९ एप्रिल १८९१

निधन :
ता. २८ जानेवारी १९६०

समर्पण

मराठ्यांच्या तेजस्वी इतिहासांत
उज्ज्वल साम्राज्यसेवा व उत्कृष्ट रणनैपुण्य
गाजवून
‘विश्वासराव’ व ‘सेनाधुरंधर’
ह्या महनीय पदद्वयानें
चिरस्मरणीय होऊन राहिलेल्या
व
विद्यमान समस्त **क्षत्रिय-मराठा पवार**
कुळांची ज्येष्ठ शाखा असलेल्या
सुपें [जिल्हा अहमदनगर] येथील
पवार घराण्यास सांप्रत भूषणभूत असलेले
श्रीमंत जगदेवराव ऊर्फ **भाऊसाहेब महाराज पवार**
सी. आय्. ई., ‘विश्वासराव’, ‘सेनाधुरंधर’,
यांना त्यांच्याच पराक्रमी पूर्वजांचीं हीं
वीर – गीतें
सादर समर्पण करितों.

नम्र सेवक,
कृ. गं. कवचाळे.

अनुक्रमणिका

(भाग १ लां)

(भाग २ रा)

प्रथम तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री

विषय पृष्ठ

प्रथम कृष्णाजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री

द्वितीय तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री

परिशिष्ट

'विश्वासराऊ'–प्रशस्ति

१ पवार – वंश

दोहा

करि बन्दन सुख के सदन, गौरीनन्द गनेस ।
कथूँ सुजस पुँव्वार–कुल, बर दे बुद्धि–बिसेस ॥१॥

रोला

मालव धरनी माँह, धार नगर रजधानी ।
वीर तखत पुँव्वार, कीरत जगदेव कहानी ॥

गौरीनन्द=पार्वतीपुत्र. 'नंदन' ऐवजीं 'नंद' हा पुत्रार्थी शब्द हिंदींत बराच प्रचलित आहे. बुद्धि–बिसेस = प्रतिभा.

१ सुखाचें माहेरघर असणाऱ्या हे पार्वती–पुत्रा गणराया, तुला नमस्कार करितो. पवार कुळाची सत्कीर्ति मी निवेदन करित आहे, त्यासाठीं मला प्रतिभेचा आशिर्वाद दे.

२ मालव भूमींत धार ही राजधानी असून (तेथें) पराक्रमी पवारांचें सिंहासन आहे. जगदेवाची (कालिकेस शिरदान करण्याची) कहाणी त्या ठिकाणीं प्रसिद्ध आहे.

बिक्रमसा नरबीर, नगर उज्जेणि मैं नामी ।
मुञ्ज अरू नृप भोज, चतुर्दस-बिद्या-ज्ञानी ॥२॥

दोहा

जन्म लियो भरतरी जहां, देस भयो चहुँ दण्ड ।
गुरु गोरख सिर कर धर्‍यो, अमर नाम अखण्ड ॥३॥

पृथ्वी ठावी उज्जेणिपुर, धरा ठावि गढ़ धार ।
कुल बर्णूं पुरु राय को, पुहमी बड़ा पुँवार ॥४॥

चतुर्दस बिद्या=चतुर्दश विद्या म्हणजे चतुर्वेद, षडंगें, अष्टादश पुराणें, मीमांसा न्याय व धर्मशास्त्र ह्यांचें ज्ञान. पुहमि=पृथ्वी.

२ विक्रमासारखा (पवार घराण्यांतील) पराक्रमी पुरुष उज्जयिनी नगरींत विख्यात होऊन गेला, (तसेंच) चौदा विद्यांचे ज्ञाते असे राजा मुंज व भोजही (येथें मालव भूमींत पवार वंशामध्यें) होऊन गेले.

३ भर्तृहरीसारख्या राजानें (ह्या पवार कुळांत येथें) जन्म घेतला. चाऱ्ही देशांत त्याची सत्ता गाजली. गुरु गोरखनाथानें त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याचें नांव चिरंजीव केलें.

४ जगांत उज्जयिनी नगरी प्रसिद्ध आहे, (तसेंच) किल्ले धारही भूतलावर विख्यात आहे. (तेथील) पुरुरायाच्या वंशाचें मी वर्णन करितों. (पुरुरायाचा वंश) पवार पृथ्वीवर श्रेष्ठ होय.

जिण घर में लियो जनम, कृष्ण भूप कुल मोड़ ।
धारा-धर ये मालवे, ठावा ठावा ठोड़ ॥५॥
कृष्णा के साबू कुँवर, जन्म्यो भड जो धार ।
कियो राज केता दिवस, सुभट बाँके सिरदार ॥६॥
मुगलन दाटयो मालवो, जुद्ध करी जबरेल ।
भिड़ियो शत्रुआँ संग भड, खागा फागा खेल ॥७॥

कुल मोड=कुलशिरोमणि. ठोड़=माहित असणें.

५ ज्या घराण्यांत कुलशिरोमणि कृष्णसिंह (किसनसिंह) राजानें जन्म घेतला तें धाराधिपति (पवार घराणें) माळव्यांत ठिकठिकाणीं प्रसिद्ध आहे.

भड=वीर. बाँका=बहादूर.

६ ज्या वीराचा जन्म धारेस झाला तो कृष्णसिंहाचा पुत्र साबूसिंह ह्यानें माळव्यांत कित्येक वर्षें अधिकार गाजविला. तो वीर मोठा बहादूर सरदार होता.

जबरेल = जबरदस्त, घोर. खागा फागा खेल = उत्तर हिंदुस्थानांतील लोकांत शिमग्यामध्यें निरनिराळीं सोंगें घेऊन निरनिराळे खेळ खेळण्याचा प्रघात आहे, त्यांत तलवारीचे मनास येईल तसे आडवेतिडवे हातही खेळतात, त्यास अनुसरून कवीनें येथें 'खागा फागा खेल' असें वर्णन केलें आहे. चांगलाच रणरंग माजविला हा त्याचा इत्यर्थ आहे.

७ मोंगलांनीं घोर संग्राम करून माळव्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली त्यावेळीं वीर साबूसिंहानें शत्रूला टक्कर देऊन चांगलाच रणरंग माजविला.

म्लेच्छासू जो मरद, अड़ियो खूब अपार।
पग छूटा साबू पग, धरा छूटी गड़ धार ॥८॥
बचिया सू भड़ ले बली, साबू चतुर सुजान।
दिल सोची दक्खन दिसा, पाधर कियो पयान ॥९॥
मिलियो सिव महाराज से; जका सतारा जाय।
साबू को सम्मान कर, आदर करी लिवाय ॥१०॥

८ (त्या) साबूसिंहाचें पाय (अखेरीस तेथें) टिकले नाहींत. त्या वीर गडयानें म्लेंच्छांना चांगलाच प्रतिकार केला; परंतु किल्ले धारची भूमि त्याच्या हातांतून गेली.

पाधर = सरळ.

९ (तेव्हां) सुज्ञ व धोरणी साबूसिंहानें (लढाईंतून) वांचलेल्या आपल्या बलिष्ठ वीरांना बरोबर घेऊन दक्षिण दिशेस जाण्याचा मनांत विचार केला (व त्याप्रमाणें तिकडे) सरळ प्रयाण केलें.×

१० सातार्‍यास जाऊन त्यानें शिवाजी महाराजांची भेट घेतली. (महाराजांनीं) साबूसिंहाचा सत्कार करून त्यास प्रेमानें सन्निध ठेवून घेतलें ❋

× साबूसिंहाचा धारेस जन्म होणें, त्यानें तेथें अधिकार चालविणें व तेथूनच पुढें त्याचें दक्षिणेंत प्रयाण होणें ह्याविषयीं अद्याप इतरत्र माहिती उपलब्ध झालेली नाहीं.

❋ ही गोष्ट सन १६५१ नंतरची असावी. कारण शिवाजी महाराजांनीं सातारा सन १६५१ मध्यें प्रथम जिंकला, असें इतिहास सांगतो.

सूपो ग्राम पटा सहित, जद सोप्यो जागीर ।
गढ़ी बाँधि रजधानी करि, बसियो साबू बीर ॥११॥
साबू के सुत कृष्णसी, सूपो जन्म्यो सोय ।
कृष्णनन्द बूबा कुँवर, जखे पाटवी जोय ॥१२॥
ता लघु भ्राता राय केहर, जखे सुभट जग जोय ।
बसियो सूपो नगर बिच, हंसियत छोटी होय ॥१३॥

११ (पुढें शिवाजी महाराजांनी) जेव्हां सुपें गांव वतनासह जहागीर म्हणून दिलें तेव्हां वीर साबूसिंहानें त्यास आपल्या जहागिरीचें मुख्य गांव करून व गढी × बांधून तेथें वास्तव्य केलें.

पाटवी=वडील मुलगा, युवराज. जखे=पहा.

१२ साबूसिंहाचा पुत्र कृष्णसिंह (कृष्णाजी) सुप्यास जन्मला. पहा, ह्या कृष्णाजीचा ज्येष्ठ पुत्र बुबाजी होय.

१३ जग ज्यांना उत्तम वीर म्हणून समजते ते रायाजी व केरोजी * हे त्या (बुबाजीचे) कनिष्ठ बंधु होत. (बुबाजीनें) सुपें

× सुपें येथील गढी साबूसिंहाचा पुत्र कृष्णाजी ह्याच्या आमदानींत बांधली गेली अशी खात्रीयुक्त माहिती मिळते; तथापि ह्या ठिकाणच्या उल्लेखानुसार त्या गढीच्या बांधकामाची सुरुवात साबूसिंहाच्या हातून झाली, असें मानतां येईल.

* केरोजी हा शिवाजी महाराजांच्या पदरीं शिलेदार होता (सभासदः शि. च. पृ. ९८).

कृष्णाजी, बुबाजी व केरोजी यांची शिवाजी महाराजांच्या पदरच्या नामांकित पुरुषांत गणना होत असे (चिटणीसः शिव छ. च. पृ. ३१३.)

बूबा के सुत दो बली, काल्हू संभ केवाय ।
कुल बिच दोय करामती, सूपो नगर सुहाय ॥१४॥

बूबा सुत ये बीर बल, अग्र भाग धरि आय ।
कीन्हो काल्हू संभ को, सेनापति शाहू राय ॥१५॥

छप्पय

काल्हू के सुत चार, कृष्णा तकू करामती ।
जीवा जशा जोधार, माना अद्भुत गुण-मती ॥
संभा के सुत तीण्ह, ऊदल जग जाणि अनोखो ।
अनन्दराव उन्मत्त, चतुर जगदेव सुचोखो ॥

नगरांतच वास्तव्य केलें. त्यावेळीं (पवारांचें) उत्पन्न बेताबाताचेंच होतें.

१४ बुबाजीला दोन वीर पुत्र होते. त्यांचीं नांवें काळोजी व संभाजी होत. (पवार) कुळांत ते दोघेही पराक्रमी होऊन गेले. त्यांच्यामुळें सुपें नगरास शोभा आली.

१५ बुबाजीचे हे बलवान पराक्रमी पुत्र (शौर्य गाजवून) पुढें आले, (तेव्हां त्या) काळोजीस व संभाजीस छत्रपति शाहू महाराजांनीं मुलुखगिरीसाठीं सेना बाळगण्याची आज्ञा केली.

चोखा=शुद्ध, खरा.

१६ काळोजीचे पुत्र चौघे. (त्यांतील) कृष्णाजी व तुकोजी हे जसे पराक्रमी होते तसे जिवाजी योद्धा आणि मानाजी विलक्षण

कनीराम कहे सातों कुँवर, पुरुराय वंश चकवे पृथी।
गौरव प्रताप दिन दिन प्रत, दुगुन होत एक एक गुण-मती ॥१६॥

बुद्धिवान् व गुणवान् असे होते. संभाजीचे पुत्र तिघे. (त्यापैकीं) उदाजी हा जगांत (पराक्रमामध्यें) विरळाच दिसून येणारा होता. आनंदराव निर्भीड होता व जगदेव खरा हुषार होता. (भाट) कनिराम म्हणतो, पृथ्वीवर चक्रवर्ति म्हणून असलेल्या पुरुरायाच्या वंशाच्या ह्या सातही पुत्रांचा पराक्रम व सन्मान दिवसेंदिवस द्विगुणित होत होता. गुण व बुद्धि * ह्यांत ते एकापेक्षां एक अधिक होते.

---

* 'मती 'चा पुल्लिंगी 'वान् ' असा अर्थ होत नाहीं म्हणून येथें त्याचा अर्थ बुद्धि असा करण्यांत आला आहे.

२ साबूसिंह पवार यांचा कल्याणच्या लढाईंतील पराक्रम

भुजङ्गप्रयात

गजानन्द आनन्द के आप दाता।
देओ बुद्धि विद्या सुनो टेर त्राता।
सरूसत्ति माता को सीस नमाऊं।
कराँ जोड के मात का ध्यान ध्याऊँ ॥१॥

देओ युक्ति अम्बे सुभं काव्य चाहूं।
पुँवारों के वंशों का जस गान गाऊं।
सिवा छत्रपत्ती सतारा के राजा।
चलै फौज लैके बड़े बीर गाजा ॥२॥

टेर= प्रार्थना.

१ हे गजानना, तूं आनंदाचा दाता आहेस. हे उद्धारका, माझी प्रार्थना ऐक आणि मला बुद्धि व ज्ञान दे. माता सरस्वतीस मी शिरसावंदन करितो व हात जोडून (त्या) मातेची ध्यानधारणा करितो.

२ हे माते, मी शुभ काव्य रचूं इच्छितों, त्यासाठीं मला प्रतिभा दे. पवारांच्या वंशाचें यशगान मला गावयाचें आहे. साताऱ्याचे

चली बावनी फौज सिवराज चालै ।
कलेजें मुगलान के साल सालै ।
दहके दिल्ली पातशा नींद माँही ।
छितीनाथ सिवराज की फौज आई ॥३॥

कल्यान से दूत ने खब्र दीधी ।
चढ़ाई सुबेदार ने अब्र कीधी ।

राजे श्री शिव छत्रपती * मोठे नामांकित वीर होत. ते फौजफाटा घेऊन निघाले.

बावनी फौज = जवानमर्दाची फौज. साल = कांटा.
दहके = दचके.

३ शिवाजी महाराज निघाले व शूर जवानमर्दांची सेना निघाली कीं, मोंगलांच्या काळजाला कांटेंच बोंचूं लागत (आणि) दिल्लीचा बादशहाही छत्रपति शिवाजी राजाची फौज (आपल्यावर चालून) आली आहे असा भास होऊन झोंपेंतून दचकून जागा होई.

* शिवाजी महाराजांनीं सातारा सन १६५१ मध्यें जिंकिला व त्यानंतर लौकरच छत्रपती पद धारण केलें. ह्या छत्रपती पदाचा प्रथमोल्लेख सन १६५९ मधील अज्ञानदासकृत अफझुलखानवधाच्या पोवाडयांत आलेला असला तरी तें पद शिवाजी महाराजांनीं त्याच्या आगोदर धारण केलें होतें, असें रियासतकार सरदेसाईंनीं म्हटलें आहे. (शककर्ता शिवाजी पृ. ७३) आमचे प्रस्तुत वीर-गीत अज्ञानदासाच्या वरील पोवाडयाच्या थोडें अगोदरचें असल्यानें अर्थात् तें रियासतकारांच्या सदर मतास पुष्टि देणारें आहे.

ये बात सिवराज को लागि ऐसी ।
पड़ी सोर के गंज में आग जैसी ॥४॥

हुवो हुक्म बीरान मारू बजावो ।
सभी शूर सामन्त सेना सजावो ।
महामत्त हाथी पै हौदा कसावो ।
चढ़ौ बेगि बीरान तुर्याँ सजावो ॥५॥

कहूँ पीठ कुंभी चढ़े बीर बँके ।
कहूँ हैवरा पै चढ़े सूर हँके ।

सोर = बारुद. गंज = कोठार

४ (मोंगल) सुभेदार आतां चालून आला आहे, अशी बातमी कल्याणहून हेरानें कळविली. ही बातमी शिवाजी महाराजांच्या अंतःकरणाला अशी लागली कीं, (ते क्रोधानें अतिशय भडकले) जणू काय, दारूच्या कोठारालाच आग लागली !

मारू = एक राग विशेष. हा राग श्रीरागाचा पुत्र मानला जातो व तो युद्धाच्या वेळीं वाजविला जात असतो. तुर्या = घोडा

५ (लगेच) आज्ञा झाली कीं, वीरांनो, मारू राग वाजवा. सर्व शूर सरदारांनो, आपापल्या फौजा तयार करा. मगनमस्त अशा हत्तींवर हौदे बांधा. शूरांनो, घोडे कसून लौकर स्वार व्हा.

कहूँ धूमधामक फर्सा धरीय्या ।
कहूँ कुंथ कट्टयार बर्च्छी लरीय्या ॥ ६ ॥

तुपक तोप ले रू गदा काँख धारे ।
कहूँ मुद्गलाँ चक्र बिन्नोट बारे ।
कहूँ सूल त्रीसूल रू ढाल लीन्हें ।
कहूँ गुप्ति किर्पाण को साथ कीन्हें ॥७॥

कहूँ छूरि चक्कू रु जंजाल अच्छे ।
कहूँ पेशकब्जाँ कहूँ शेरबच्चे ।

कुंभी = हस्ती
फर्सा = परशु
हैवर (हयवर) = उत्तम घोडा
कुंथ = भाला

६ कोठें बहाद्दर वीर हत्तींच्या पाठींवर आरूढ झाले, तर कोठें शूर हुंकार ध्वनि करीत उत्तमोत्तम घोडयांवर स्वार झाले. कोठें [कोणी] धूमधडाक्यानें परशु घेतले आणि कोठें [कोणी] भाले, कटयारी, बच्छर्या धारण केल्या.

तुपक = बंदुक
रू (अरु) = आणि
बिन्नोट = बनेटी, एक शस्त्र विशेष

७ कोठें [कोणी] तोफा, बंदुका घेतल्या [तर] कोठें [कोणी] गदा काखेंत मारल्या. कोठें [कोणी] मुग्दल, चक्र, बनेटी घेतल्या आणि कोठें [कोणी] शूळ, त्रिशूळ व ढाली धारण केल्या. [तसेंच] कोठें [कोणी] गुप्त्या व कृपाण बरोबर घेतले.

जमैय्याँ गुरुंजाँ कहू गुर्द धारे।
सजे बीर सामन्त जुध में सिधारे ॥८॥
कल्यान पहूँचे सभी बीर जाई।
मुगल्लान की फौज उत तेज आई।
हकारै बकारै उभै सैन ढाड़ी।
बकै मार मारौ उभै सैन गाढ़ी ॥९॥
साबूसिंह पुँव्वार ने तेग सांधी।
कटक फाड दीन्ही अरू जाल फाँधी।

जंजाल = एक शस्त्र विशेष
पेशकब्ज = कटयार
शेरबच्चा = तमंचा
जमैय्या = जंबिया, सुरा
गुरंज = एक शस्त्र विशेष
गुर्द (र्दा) = लोखंडी सोटा

८ कोठें (कोणी) मोठ्या सुऱ्या, चाकू व जंजाल घेतले. कोठें (कोणी) कटयारी (तर) कोठें (कोणी) तमंचे घेतले. कोठें (कोणी) जंबिये, गुरंजे (आणि) कोठें कोणी गुर्दा घेतल्या. (अशाप्रकारें शिवाजी महाराजांचे सर्व) सरदार व सैनिक सज्ज होऊन युद्धार्थ निघाले.

गाढ़ी = दृढ, दटून.

९ सर्व वीर कल्याणला जाऊन पोहोंचले तितक्यांत मोंगलांची फौजहि तेथें धांवून आली. उभय पक्षांचें सैन्य समोरासमोर उभें राहून हुंकारध्वनि व रणकल्लोळ करूं लागले. (आणि) ‘ हाणा मारा ’ म्हणून ओरडूं लागले. उभय पक्षांची सेना (लढाईसाठीं निश्चयानें) दटून उभी होती.

सुबौ शस्त्रधारी खड़ो फौज आगे ।
न को पीठ फेरे न कोई भि भागे ॥१०॥

साबूसिंह पुँव्वार कहे मार मारो ।
गहो शस्त्र ऊको धरत्ती पछारो ।
ये बैन सूबो सुने है बिगारे ।
मुगलान की फौज सामे हँकारे ॥११॥

कहूँ शस्त्र साँधे कहूँ तेग काढ़े ।
कहूँ ढाल मांडे फिरी आइ आड़े ।

तेग = तलवार   कटक = वेढा, घेरा   को = कोणी

१० साबुसिंह पवारानेंही तरवार धारण केली व [शत्रूचा] वेढा फोडून [त्याच्यावर] घाला घातला. सशस्त्र (मोंगल) सुभेदार आपल्या फौजेच्या पुढें उभा होता. [उभय पक्षांकडील] कोणी पाठ फिरवीत नव्हतें किंवा कोणी पळ काढित नव्हतें.

गह = धरणें   ऊको = त्यास   बैन = बोल, गोष्ट.
बिगारे = लढाईस तयार केलें.

११ (आपल्या सैनिकांत अधिक वीरश्री उत्पन्न करण्याकरितां) साबूसिंह पवार ओरडून म्हणूं लागला "मारा, मारा, शस्त्र उगारा आणि शत्रूला जमीनदोस्त करा." ही बातमी ऐकतांच सुभेदारानेंहि उत्तेजन देऊन आपली मोंगल फौज [शत्रूच्या] तोंडावर चालविली.

कहूँ तुपक चलावैं कहूँ तीर मारे ।
कहूँ मल्ल जुद्धा करी के पछारे ॥१२॥

कहूँ कुंथ मारे हणे हैं दुधारे ।
कहूँ फेंफरा मुण्ड खर्बूज फारे ।
कहूँ गुर्द बर्छी गदा को चलावैं ।
कहूँ लैं बनेटी बिनोटैं हिलावैं ॥१३॥

कहूँ सीस फट्टे कहूँ टांग टुट्टे ।
कहूँ शस्त्र अस्त्राँ गहीं केश जुट्टे ।

१२ कोठें [शत्रूवर कोणी] शस्त्रें रोंखूं लागले [तर] कोठें [कोणी] तलवारी उपसूं लागले. कोठें [कोणी] आडवे येऊन ढालीचे हात फिरवूं लागले. [तर] कोठें [कोणी] बंदुका सोडूं लागले. कोठें [कोणी] तीर मारूं लागले [तर] कोठें [कोणी] प्रत्यक्ष मल्लयुद्धच करून [शत्रूला] जमिनीवर लोळवूं लागले.

दुधार=दोन धारेची तलवार. फेंफरा=फुफ्फुस. गुर्द=गुडदा, लोखंडी सोटा. बनेटी=लेजिमसारखें परंतु थोडें निराळें हत्यार.

१३ कोठें [कोणी] भाले मारूं लागले [तर] कोठें [कोणी] दुधारी तलवारी हाणूं लागले. कोठें [कोणी] शत्रूचीं शिरें व फुफ्फुसें खर्बूजांसारखे चिरूं लागले. कोठें [कोणी] गुडदे, बच्छर्चा, गदा चालवूं लागले [तर] कोठें [कोणी] बनेटी व बिनोटांचे हात दाखवूं लागले.

साबूसिंह मुग्लान की फौज मारी ।
परे टुक टुका भगे होय हारी ॥१४॥

सुलेमान सूबो भग्यो जीव लैके ।
हजारों मुगल्लान के प्रान दैके ।
सिवाजी। साबूसिंह की धन्न माता ।
पाला कवी प्रेमशूं जस सुणाता ॥१५॥

जुटना = एकत्रित होणें, गुंतागुंत होणें.

१४ कोठें [कोणाचीं] शिरें फांटली, [तर] कोठें [कोणाच्या] टांगा तुटल्या. कोठें [कोणाच्या] डोईवरचे केशसंभार शस्त्रांत गुंतून गेले. साबूसिंहानें मोंगलांच्या फौजेचा पराभव केला. एकेक वीर पटापट जमिनीवर [मृत होऊन] पडूं लागले [व] उरलेल्यांनीं हार खाऊन यःपलायन केलें.

१५ हजारो मोंगल [सैनिकांचे] बळी देऊन सुभेदार सुलेमान [शेवटीं] जीव घेऊन पळाला. शिवाजी महाराज व साबूसिंह ह्यांच्या माता (अशा वीर पुत्रांना जन्म देऊन) कृतकृत्य झाल्या. पाला कवि त्यांची ही कीर्ति प्रेमानें ऐकवित आहे.

३ पवारांची कर्नाटकांतील कामगिरी.

मनहरण

छत्रपति संभा हू की पूना रजधानी बड़ी ।
वाके नरपाल यह मराठन में भारी है ।
अपने पराक्रम औ प्रखर कृपान हू ते ।
देश बड़े दक्खन में धरनी पसारी है ॥
संकित थी सारी हिन्द याकी इस बीरता पै ।
धीरता सिवा की यानै जब्बर संभारी है
हाय क्रूर काल करवाल भयो दक्खन को ।
स्वर्गगामी संभा कियो कवी के सवारी है ॥१॥

१ पुणें ही छत्रपति संभाजीची मोठी राजधानी होय. तेथील राजे हे मराठ्यांत श्रेष्ठ आहेत. त्यांनीं आपल्या प्रखर तरवारीनें व पराक्रमानें दक्षिणेंत आपलें विशाल राज्य पसरविलें आहे. सारें हिंदुस्थान त्यांच्या [संभाजी महाराजांच्या] पराक्रमाविषयीं संदेहांत

---

* पुण्याशीं श्रीशिवाजी महाराजांच्या घराण्याचा संबंध एकोजीच्या वेळेपासून आलेला असल्यामुळें ह्या दूरस्थ माळव्यांतील भाट-कवीनें पुणें हें मराठ्यांच्या राजधानीचें शहर मानलें असावें असें दिसतें.

दोहा

वीर धीर दानी प्रबल, सबल शत्रु को साल ।
संभा सुत छांड्यो यहाँ, राजाराम नृपाल ॥२॥

मनहरण

पूना के सिंघासन पै बैठत ही राजाराम ।
राजबाग हाथ लीन्ही संभा की बनाई है ।
साम दाम भेद ह्व तै काम को संचाल कीन्हों ।
पुरखन को पथ लीन्हो पाय भलपाई है ॥

होतें. (परंतु) त्यांनीं शिवाजी महाराजांची वीरता खूपच सांभाळली. हाय ! दख्खनसाठीं क्रूर (औरंगजेब बादशहा) कृतांताच्या (हातांतील) तलवार बनला. त्यानें स्वारी करून संभाजी महाराजांस स्वर्गास पाठविलें.

साल = कांटा.

२ पराक्रमी, धैर्यशाली, दानी, शक्तिसंपन्न व बलिष्ट अशा शत्रूला कांट्याप्रमाणें सलणारे संभाजी महाराज आपल्या पुत्रास व राजाराम महाराजांस सोडून गेले.

मानमरजादा= मानमर्यादा, मानमरातब जनाई है = बहाल केल्या.

३ पुण्याच्या सिंहासनावर बसतांच राजाराम महाराजांनीं,[पूर्वी] संभाजी महाराजांनीं निर्मिलेलीं,राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं व

बड़े बड़े बीरन को पास में बुलायो उन ।
मानमरजादा जादा उन पै जनाई है ।
चारों बर्ण धर्म जहाँ चैन तै चलन लगे ।
मुगलन को दगो पर फिर भी दिखाई है ।

दोहा

सनै सनै करने लगे, देस माँहि उत्पात ।
तुरकन की गड़बड़ मची, करनाटक में आत ॥४॥
बढ़त बढ़त इतनी बढ़ी गड़बड़ मुगलन अब्ब ।
संका बूडन की भई, दक्खन देस सरब्ब ॥५॥

सामदाम [दंड] भेदानें त्यांनीं [राज्याचें] काम चालविलें. पूर्वजांचा मार्ग त्यांनीं अनुसरला म्हणून त्यांस भलेपणा मिळाला. मोठमोठ्या वीरांना जवळ बोलावून त्यांनीं त्यांस अधिक मानमरातब बहाल केले. हिंदु धर्माचे चारी वर्ण तेथें सुखानें नांदूं लागले; परंतु मोंगलांची फंदफितुरी पुनःही तेथें दिसून येऊं लागली.

४ क्रमाक्रमानें ते तुर्क लोक देशांत उपद्रव माजवूं लागले. त्यांनीं गडबड माजविल्यामुळें राजाराम महाराज कर्नाटकांत निघून आले.

बूडन = बुडण्याची सरब्ब = सर्व

५ वाढतांवाढतां मोंगलांची गडबड आतां एवढी वाढली कीं, आतां दक्षिण देश सर्व बुडतो कीं काय ? असें वाटूं लागलें.

मन में राजाराम के, आवत जात बिचार ।
किहि भाँतिन सों घटत भो तुरकन को बिसतार ॥६॥

तरक एक मनमें भई, बैठत ही विस्माय ।
अपनै निज विस्वासियाँ, लिये भेज बुलवाय ॥७॥

कृष्णा वरभट सुभट के, पुत्र हते त्रय वीर ।
बूबाजी राया अरू, केरोजी रणधीर ॥८॥

मनहरण

स्विा के पराक्रम को जानत जगत आज ।
याकै रणकौसल सों देस बलवन्त है ।
ऐसे रणधीर साथ तीनों भ्रात संग रहै ।
ठाम ठाम जूटे जंग आज भी जनंत है ॥

६ मुसलमानांचा विस्तार कोणत्या प्रकारें मोडून टाकावा याविषयीं राजाराम महाराजांच्या मनांत सारखे विचार घोळूं लागले.

७ हतबुद्ध होऊन बसले असतां त्यांच्या मनांत एक विचार उद्भवला [व त्याप्रमाणें त्यांनीं] आपल्या विश्वासू सरदारांना निरोप पाठवून बोलाविलें.

८ वीरोत्तमांत वीरश्रेष्ठ असलेल्या कृष्णाजींना बुबाजी, रायाजी व केरोजी असे तीन लढवय्ये वीर पुत्र होते.

९ [सारें]जग आज शिवाजी महाराजांचा पराक्रम ओळखत आहे. त्यांच्याच रणांगणांतील पराक्रमामुळें देश समर्थ झाला आहे. अशा

ताके स्वर्ग जात फिर संभा के सहाय भये ।
कीन्हो विसवास काज साथ में अनंत है ।
आज महाराज भये राजाराम राजिव से ।
परी इन बीरन पै नजर दिगंत है ॥९॥

दोहा

खबर भई इण भ्रात को, बुलवाये अब पास ।
दई सुना घरभेद की, सब बातन निज आस ॥१०॥

मनहरण

पूना पति राजाराम पुँवार बुलाये पास ।
तीण्हों इण भ्रातन को कहके सुनाई है ।

रणशूरांच्या सान्निध्यांत हे तिघेही बंधु समरांगणावर बरोबर रहात होते. त्यांनीं ठिकठिकाणीं लढाया मारल्या व आजही ते पराक्रम गाजवित आहेत. शिवाजी महाराज स्वर्गीं गेल्यावर ते [तिघे बंधु] संभाजी राजांचे साह्यक बनले. त्यांनीं त्यांच्या-जवळ अनेक विश्वासाचीं कामेंही बजाविलीं. आज कमलपुष्पा-प्रमाणें [शोभासंपन्न] असे राजाराम महाराज गादीवर आले आहेत. त्यांचीही ह्या वीर [त्रया] वर अलौकिक [कृपा] दृष्टि आहे.

२० ह्या [तिघां] बंधूना कळलें कीं, सर्व घरभेदीपणाच्या गोष्टी भरवंशानें सांगण्यासाठीं [राजाराम महाराजांनीं] आतां आपणांस जवळ बोलाविलें आहे.

दुवन=दुश्मन.

११ पुण्याचे अधिपति राजाराम महाराजांनीं पवारांना जवळ

तात परतात हू के साथी तुम संगर के ।
बाँधव बिपाति आज देस बढ़ी आई है ॥
जानत हो रंग ढंग जंग के करन तुम ।
पूरे बिसवासी खास हमरे कहाई है ॥
केवल भरोसे मोहिं पूरन तुम्हारे पर ।
कौन जुक्ति हू तें कहो दुवन दलाई है ॥११॥
इतनी सुनत बात तीन्हों बंधु बोल उठे ।
नाथ हम पायक हैं पायन तुफेल के ।
पीढ़ी दर पीढ़िन के सेवक तिहारे हम ।
एतो कहाँ हम पै धऱ्यो है भार मेल के ॥

बोलाविलें व त्या तिघां भावांना उद्देशून ते म्हणाले [तुम्हीं पवार] आपले वडील व आजे ह्यांच्या वेळेपासून लढायांत साह्यक राहिला आहांत. बंधूनो, आज आपल्या देशांत संकटांवर संकटें ओढवलेलीं आहेत. तुम्हीं युद्धकलेंत प्रवीण आहांत व आमचे खास विश्वासांतले म्हणविले जातां, त्यामुळें केवळ तुमच्यावरच आमचा पूर्ण भरंवसा आहे. सांगा, कोणत्या युक्तीनें शत्रूचा नाश करतां येईल ?

पायक = पाईक, दास. तुफेल = द्वारें, कारण.
तिहारे = तुमचे. एतो = यासाठीं

१२ एवढी गोष्ट ऐकतांच तिन्ही बंधु एकदम ह्मणाले, हे स्वामी, आम्हीं आपल्या चरणाचे दास आहोंत. आम्हीं आपले पिढीजात सेवक आहोंत. यासाठीं तर कोठें [आपण] आमच्यावर भार टाकलेला

जीवित हैं जे ते हम दक्खन दटावें कोऊ।
हमको हटावें यह काज नहीं खेल के।
बाजैंगे निसंक यहाँ नगारन मराठन के।
झेलियेंगे घाव उर सत्रुन के सेल के॥१२॥

रोला

राजी राजाराम, हुवे वचन सुण बाँधवाँ।
सरसले सबैं काय, दुवन दक्खन दाटवाँ॥१३॥

दोहा

सबल सहायक और भी, राजाराम बुलाय।
वे भी भड बाँका हता, सुण आये हरषाय॥१४॥

आहे. जोंपर्यंत आम्हीं जिवंत आहोंत तोंपर्यंत दक्षिणेला कोण हरवू शकतो! आम्हांस हरविणें हें काम कांहीं [पोर] खेळ म्हणून नाहीं. येथें मराठ्यांचे नगारे निःशंकपणें वाजत राहतील. शत्रूच्या भाल्यांचे घांव आम्हीं आमच्या उरावर [खुशाल] झेलूं.

सरसले = सर करणें, जिंकणें काय = कायम, निश्चित

१३ त्या [पवार] बंधूंचें बोलणें ऐकून राजाराम महाराज प्रसन्न झाले. दक्षिण काबीज करण्याकरितां आलेल्या शत्रूला जिंकण्याचें सर्व निश्चित झालें.

१४ आणखीही प्रबळ साह्यक राजाराम महाराजांनीं बोलाविले. ते वीरही बिकट होते. आज्ञा पावतांच ते आनंदानें आले.

नीराजी प्रहलाद औ, रामचंद्र हडमंत ।
संकराजी नारायन औ, परसराम त्रंबक ॥१५॥
घोरपडे संतायजी धन्नाजी जादव ।
राजाराम सहाय व्हैं, मिली आये बाँधव ॥१६॥

मनहरण

कर के सलाह सब सूर सरदारन ने ।
राजाराम हू ते अब बिनती कराई है ।
दुवन दटावन में देर न तनिक करो ।
देर करिबे में नहिं अपनी भलाई है ।
कृष्णाजी पुँवार हू के पुत्र अब बोल उठे ।
कर्नाटक में शत्रु आज उद्धं मचाई है ।
वाही देस बीच आज सैन की पयान करै ।
कौन जाने कल और कौनसी बिताई है ॥१७॥

१५–१६ नीराजी प्रल्हाद व रामचंद्र हनुमंत, शंकराजी नारायण व परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे सगळे [देश] बंधु राजाराम महाराजांच्या साह्यासाठीं एकत्रित झाले.

उद्धं=उदम, उपद्रव वाही=तेच पयान=प्रयाण

१७ सर्व शूर सरदारांनीं विचार करून आतां राजाराम महाराजांस विनंति केली कीं, शत्रूचा मोड करण्यांत यत्किंचित्‌हि विलंब करूं नये. विलंब करण्यांत आपलें हित नाहीं. कृष्णाजी पवारांचे

रोला

सुण कर राजाराम, कुपित भयो मुगलान सो ।
सैन सजी तम्माम, करनाटक को चालिवो ॥१८॥

तोटक

करनाटक को अब सैन चली ।
चतुरंगनि भार सू भूमि हली ।
गज बाज भि साथ अनैक चलै ।
फहरात निशानन धम्मि हलै ॥१९॥

पुत्र (बुवाजी, रायाजी व केरोजी) आतां म्हणाले, कर्नाटकांत शत्रूनें आज धामधूम माजविली आहे. कोणास ठाऊक उद्यां काय होईल, म्हणून आजच त्या देशांत आपलें सैन्य पाठवूंया.

१८ [हें] ऐकून राजाराम महाराज मोंगलावर संतापले. कर्नाटकाकडे जाण्यास तमाम फौज तयार झाली.

चतुरंगनी=हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांनीं युक्त असलेली सेना.
बाज=घोडा. फहरात=फडकत. धम्मि (धाम) = देश.

१९ कर्नाटकाकडे आतां फौज चालली. त्या चतुरंगिनी सेनेच्या भारामुळें पृथ्वी कंपायमान् झाली. बरोबर हत्ती व घोडेही पुष्कळ निघाले. निशाणें फडकूं लागलीं तसा देश चलायमान् झाला.

उमड़ी घुमड़ी सब सैन चली।
करनाटक पै अब आ हमली।
मन मोद मुगलन भुम्मि मिली।
पर फौज मराठन आ उछली ॥२०॥

मनहरण

तीन्हों इन वीरन ने भाग तय कीन्हें तहाँ।
तीन आनी सैन की तय्यार कारवाई है।
एक भाग बूबा निज सैन को सजाय ठाडो।
राया अरु केरो दुव भाग को दबाई है॥
मध्य घेर मुगलन को मन में कुपित होय।
बाज जिमि झपटें वह वीरता दिखाई है।
एक ही हमलन में म्लेच्छन उड़ाये मानो।
रूई पिंज पिंजरन तूल को उडाई है ॥२१॥

उमडी घुमडी—त्वरित गतीनें

२० त्वरित गतीनें सारी सेना चालत होती. आतां ती कर्नाटकांत येऊन थडकली. कर्नाटक भूमि जिंकली म्हणून मोंगल मनांत आनंद मानीत होते; परंतु मराठ्यांची फौज (आतां एकदम) तेथें उसळून आली.

तय—निश्चित. आनी = बाजू दुव—दोन.
बाज—पक्षी विशेष. जिमि = ज्या प्रकारें.

२१ बुबाजी, रायाजी व केरोजी ह्या तिघांनीं तेथें (आपल्या)

दोहा

वाही बखत उण जुद्ध में, एक घटी यह बात ।
रसद औरंगजेब की, रसद लिये इत आत ॥२२॥
यह औरंग दक्खन लड़त, यहाँ बढ़ावत राज ।
बरस बीस पच्चीस भो, सऱ्यो न वाको काज ॥२३॥
आवत याके काज थो, उत्तर दिस सो खान ।
दक्खन दिस बैठो यहाँ, खातो रहत अजान ॥२४॥

सैन्याचें भाग करण्याचें टरविलें. तीन्ही बाजूंस सैन्याची सिद्धता केली गेली. एका बाजूस बुवाजी आपलें सैन्य सज्ज करून उभा राहिला आणि दुसऱ्या दोन बाजू रायाजी व केरोजी ह्यांनी दाबून धरल्या. मनांत संतापून त्यांनीं मोंगलांना मध्यभागीं घेरलें व बाज पक्षाप्रमाणें (एकदम) झडप घालून आपली वीरता प्रकट केली. पिंजाऱ्यानें पिंजनावर तेव्हांच कापूस पिंजून टांकावा तद्वत् एकाच हल्ल्यांत त्यांनीं मोंगलांची दाणादाण उडवून टाकली.

२२ ह्याच वेळीं त्या युद्धांत एक गोष्ट अशी घडून आली कीं, औरंगजेबाची एक फौज रसद घेऊन इकडे आली.

२३ येथें आपलें राज्य वाढविण्यासाठीं हा औरंगजेब दक्षिणेंत लढत होता. वीसपंचवीसांपेक्षां जास्त वर्षें लोटलीं तरी त्याचें कार्य तडीस गेलें नाहीं.

२४ ह्या कार्यासाठीं उत्तरेंतून (झुल्फिकर) खान आला होता; परंतु येथें दक्षिणेंत तो बेफिकीरीनें खात बसला होता.

मिली रसद सेना सहित, औरंग की इत आय।
झगड़ा बिच फेटैं पडी, घोरपडे संताय ॥२५॥

घोरपडे फेटैं पड़ी, रसद समूची आय।
धिरीगो संता उण झगड, बूवा करी सहाय ॥२६॥

लूट लई सब रसद को, मार भगाई सैन।
राजी राजाराम भो, मन मान्यो बहु चैन ॥२७॥

मनहरण

कर्नाटक जीत्यो अरू मुगलन को मेल्यो मान।
बराड खानदेस जा हमला कराई है।

फेंटना=तिंबणें.

२५ इकडे सैन्यासह येत असलेल्या औरंगजेबाच्या रसदेची गांठ पडली व चकमक उडाली तींत संताजी घोरपड्यानें शत्रूची चांगली कणिक तिंबली.

२६ संताजी घोरपड्यानें (शत्रूची कणिक) तिंबून रसद सगळी मिळविली खरी; परंतु त्या लढाईंत तो घेरला गेला, त्यावेळीं बुबाजी पवारानें त्याला सहाय्य करून वांचविलें.

भो (भयो)=झाला.

२७ शत्रु सैन्याला पिटाळून लावून (बुबाजीनें) सर्व रसद लुटून घेतली त्यामुळें राजाराम महाराज प्रसन्न झाले. त्यांनीं मनांत मोठा संतोष मानला.

मेल्यो=(धुळीला) मिळविला. जौहर=पराक्रम.

२८ मराठ्यांनीं कर्नाटक जिंकिला व मोंगलांचा गर्व धुळीला

तीन्हों इण भ्रातन ने जौहर दिखायो पूरो।
अपनी कृपाण धाक धरनी चलाई है॥
जै ते बिसवास काज राजाराम सोंपे सब।
स्वामी भक्त भाव हू ते सब ही कराई है।
प्रसन्न भयो पूना पति बूबा अरु केरो पर।
पदवी दिराई यह जग में सुनाई है॥२८॥
राजी होय राजाराम बूबा को प्रसन्न कर्‍यो।
'बिसवासराऊ' हू की पदवी दिराई है।
'सेना बारा सहस्त्री' हू केरो को खिताब दीन्हो।
कीन्हो बहुमान आदि रुतबा बडाई है॥

मिळविला.* तसेंच (पुढें) वऱ्हाड खानदेशावर जाऊन हल्ले केले. ह्या तिघां बंधूंनीं आपला प्रखर पराक्रम पुरता दाखविला व आपल्या तरवारीच्या दराऱ्यानें पृथ्वीला हलवून सोडलें. यासाठीं विश्वासाचीं सर्व कामें राजाराम महाराजांनीं त्यांच्यावर सोंपविलीं व त्यांनींही तीं सर्व स्वामिनिष्ठभावानें पार पाडलीं. बुबाजी आणि केरोजी ह्यांच्यावर पुण्याचे स्वामी (राजाराम महाराज) खूष झाले (व त्याबद्दल त्यांनीं) त्यांस किताब बहाल केले, ही गोष्ट जगजाहीर झाली.

रुतबा=दर्जा.

२९ राजाराम महाराजांनीं आनंदानें 'विश्वासराऊ'चा किताब

* कर्नाटकांतील स्वराज्यकालीन मुलुख जिंकला असा येथें भाव असावा.

याके हुण मान माहिं जग में बिख्यात भये ।
आज लग जाणे यह जाहिर दिखाई है ।
कर्नाटक जुद्ध भयो तुर्कन मराठन में ।
जाकी जंग रचना ठाकुरसी रचाई है ॥२९॥

देऊन बुबाजीस संतुष्ट केलें (व तसेंच) केरोजीस 'सेनाबारासहस्री'चा किताब दिला. (याप्रमाणें) बहुमान आदि देऊन त्यांचा दर्जा वाढविला. ह्यांचा हा झालेला सत्कार जगांत सर्वश्रुत झाला व आजपावेतोंही तो प्रसिद्ध असल्याचें दिसून येंत आहे. मुसलमान व मराठे ह्यांच्यांत कर्नाटकचें हें युद्ध झालें. त्या युद्धाचें हें गीत ठाकुरसीनें रचिलें आहे.

४ बुबाजी पवार यांचा पराक्रम

(१)

दोहा

पुँवार वंस पिरथी बडा, दियो दान जिण सीस ।
कंकाली भाटण कथण, अमर नाम अवनीस ॥१॥

आबूपत आलोकपत, दूजी उज्जेणि धार ।
साख पेतिशाँ ऊपरे, पिरथी बड़ा पुँवार ॥२॥

१ पवार वंश जगांत मोठा आहे. त्यांतील राजा (जगदेवानें) कंकाली भाटणीच्या आज्ञेवरून शिरदान करून आपलें नांव अमर केलें आहे.

पत (पत्तन, पट्टन)=नगर. आलोकपत=चंद्रनगर अर्थात् चंद्रावती.

२ आबूची राजधानी चंद्रावती (ही पवारांची पहिली राजधानी होय). ह्यानंतर (त्यांच्या) दुसऱ्या राजधान्या (म्हटल्या म्हणजे) उज्जयिनी व धार होत. पस्तिसांवर शाखा असलेला हा पवार वंश जगांत मोठा आहे.

पद्धरी

भयो कृष्णाजी सुभट पुँवार । बजो सो छत्रपती सरदार ॥३॥
सिवाजी छत्रपती महाराज । कियो जिण दक्खनमें चहुँ राज ॥४॥
दिवी जिण्हि सूपा की जागीर । जाणली कृष्णाजी बलबीर ॥५॥
दियो गढ़ ग्राम रचो परकोट । कियो सिव बीजापुर पै चोट ॥६॥
जहाँ अफझल समेत फझल । लड़े सिवराज महाबल मल्ल ॥७॥
तहाँ रहे कृष्णाजी परचंड । लड़े मारु पिंगलो संग बरबंड ॥८॥

परकोट (परिकोट) = कोणत्याही किल्ल्याच्या किंवा स्थानाच्या संरक्षणार्थ चारी बाजूंनीं उभारलेला तट.

३–८ छत्रपतीचे सरदार * म्हणून गाजलेले कृष्णाजी हे पवारांच्या कुळांत श्रेष्ठ वीर होऊन गेले. छत्रपति शिवाजी महाराजांनीं दक्षिणेंत चहुं दिशीं राज्य केलें. कृष्णाजी आतां कर्तबगार वीर झालेले पाहून त्यांजकडे त्यांनीं (त्याची वडिलार्जित) सुप्याची जहागीर सोंपविली. ह्या दिलेल्या गांवांत कृष्णाजींनीं गढी बांधिली व चौफेर तट रचिले (पुढें) शिवाजी महाराजांनीं विजापुरावर हल्ला चढविला. जेथें (प्रतापगडावर) अफझुलखान हा (आपला पुत्र) फाझलखान ह्याच्यासह आला असतां महा बलवान् शिवाजी राजे त्याच्याशीं झुंझले, तेथें वीरश्रेष्ठ मोरोपंत पिंगळे ह्यांच्याबरोबर राहून प्रखर पराक्रमी कृष्णाजी पवारही लढले.

* चिटणीस : शि. छ. च. पृ. ३११

पछारे छत्रपती अफझल्ल । रहे हैं कृष्णाजी बलमल्ल ॥९॥
महा रणधीर महा बलबीर । महा नृप धीर महा गंभीर ॥१०॥
भये उणके सुततीण्ह प्रसिद्ध । बुबा राया केरू रू रणसिद्ध ॥११॥
जहाँ सिवराज लड़े महाराज । तहाँ ये तीण्ह सजे हैं साज ॥१२॥
चले जब कर्नाटक सिवराज । लड़े रण तीण्हों पुत्र दराज ॥१३॥
भये वरबीर मरट्ठ परास्त । भये सब वैभव भूमि हरास्त ॥१४॥
तबै इण लीन्ह मरट्ठ हि पच्छ । लडे बहु भट्टन लच्छन लच्छ ॥१५॥

दराज = पुत्रार्थी चिरंजीव अथवा दीर्घायु व्यक्ति.

९–१५ छत्रपतींनीं अफझुलखानास ठार केलें (त्यावेळीं त्यांच्या सेवेंत) मल्लाप्रमाणें शक्तिसंपन्न महान् योद्धा महान् बलिष्ठ वीर, महान् धैर्यशाली व महान् गंभीर असे कृष्णाजी राजे * होते. लढाईसाठीं तत्पर असलेले बुबाजी, रायाजी व केरोजी हे त्यांचे तीन पुत्र नांवलौकिकास चढले. जेथेंजेथें शिवाजी महाराज लढले तेथेंतेथें ह्या तिघांनींही रणवेष चढविले होते (अर्थात ते लढले होते). शिवाजी महाराजांनीं जेव्हां कर्नाटकावर स्वारी केली तेव्हां (कृष्णाजीचे) हे तिन्ही चिरंजीव (त्या मोहिमेंत) शौर्यानें लढले होते; (परंतु छत्रपति संभाजी महाराजांच्या वधानंतर) वीरश्रेष्ठ मराठे पराभव पावले. त्यांचें ऐश्वर्य व राज्य सर्व लयाला जाऊं लागलें. त्या (आणीबाणीच्या) प्रसंगीं हे (तिघे) वीर मराठ्यांचा पक्ष घेऊन लढले व त्यांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ करून सोडली.

* मुसलमानी अमदानींत बलाढ्य सरदारांना हा किताब लाविला जात असे.

भये तब भूपति राजाराम । नये हकदारन साजे काम ॥१६॥
सहायक होइन छत्रपतीन । कियो मरहट्ठन वीर अधीन ॥१७॥
कियो अति विक्रम भाव बिसेस । नमे पद में बहु आन नरेस ॥१८॥
जहाँ हैं खानदेस करनाट । तहाँ मरहट्ठन जुद्ध विराट ॥१९॥
भयो सब खानदेस जलमल्ल । बुबाजि को धरियो रन में मुगल्ल ॥२०॥
पड्यो पिंजरा बिच जीवित सेर । चुण्यो ते जीवित गढ़ आसेर ॥२१॥

दोहा

कबहुँ न तजो पुँवार हट्ट, मरहट्ठन सिरताज ।
ठाकुरसी कविराज के, बूबाजी महाराज ॥२२॥

जलमल्ल=खंडित.

१६–२१ तेव्हां राजाराम महाराज राजे झाले. त्यांनीं नवीन अधिकारी मंडळ निवडलें व त्यामुळें राज्यकारभाराला पुनः शोभा आली. छत्रपतींना सहाय्यक होण्यासाठीं कित्येक मराठे वीर अधीन करून घेण्यांत आले. कित्येक राजेही विशेष भक्तीनें छत्रपतींना शरण आले व त्यांनीं मोठा पराक्रम गाजविला. ज्या ठिकाणीं खानदेश व कर्नाटक आहेत त्या ठिकाणीं मराठ्यांनीं प्रचंड युद्ध केलें. सर्व खानदेश खंडित झाला. लढाईंत मोंगलांनीं बुबाजीस धरलें. जिवंत वाघ पिंजऱ्यांत अडकावा (तसा तो वीर बुबाजी मोंगलांच्या जाळ्यांत अडकला.) शेवटीं त्यास आशिरगडावर भिंतींत जिवंत चिणून मारण्यांत आलें.

२२ पवारांनीं मराठ्यांचे शिरताज असलेल्या छत्रपतींचा पक्ष

हुए प्रसन्न कविराज पै, दियो अधिक सनमान ।
बूबाजी को जस भयो, चहूँ दिसा परमान ॥२३॥

कधींच सोडला नाहीं. ठाकुरसी कविराजाचे (मालक) बुबाजी पवारही त्याचप्रमाणें वागले.

२३ ते ह्या ठाकुरसी कविराजांवर खुश झाले व त्यांनीं त्याचा अधिक सत्कार केला. त्या बुबाजींचा जयजयकार चाऱ्ही दिशांस साक्षीभूत आहे.

——०——

५ बुबाजी पवार यांचा पराक्रम

(२)

दोहा

कई जुद्ध औरंग कियो, दक्खन पै चित देर ।
पुँवार न देवें पेंड भर, फौजा देवी फेर ॥१॥

सोरठा

बूबो बडो तू वीर, धवल ढाल सेवा घरा ।
सुभटाँ खाग सुधीर, मुँगलाँ को गढ़ मोडनो ॥२॥

१ दक्षिणेवर मन ठेवून औरंगजेब बादशहानें बऱ्याच लढाया केल्या; (परंतु) पवारांनीं उलट त्याच्या फौजा परतवून लावून त्यास पेंडभरही जमीन मिळूं दिली नाहीं.

२ हे बुबाजी, तूं मोठा शूर आहेस. (छत्रपति) शिवाजी महाराजांच्या घराण्याच्या (संरक्षणासाठीं) तूं निःसंदेह ढाल होऊन राहिला आहेस. हे वीरोत्तमा, मोगलांच्या किल्ल्यांचा पाडाव करण्यांत तुझी तलवार मोठी खंबीर आहे.

दाटे दक्खन देस, गंगथडी रु बरार गढ़ ।
बापू चढ़ती बेस , खानदेस दाट्यो खऱ्यो ॥३॥

पद्धरी

करी मुगलन की फौज करूर । गहणा थाट चढ़िया गरूर ॥४॥
मारका बहादर मुसलमान । जखे जोरदार जाणत जहान ॥५॥
महीपती मुगल पठान माँह । नहिं मरण जुद्ध में शंक नाह ॥६॥
एरानी हबसी मिर्झा अनैक । कहुँ सेख सय्यद मेवाती कैक ॥७॥
हय फौज माँह बारह हजार । सजे सहस बीस पैदल शुमार ॥८॥

बापू=राजपुतांत वडील मुलास ‘बापू’ म्हणत असतात त्यास अनुलक्षून,

३ तुझी छाप दक्षिणेवर, गोदावरीच्या प्रदेशांत व वऱ्हाडांत बसली आहे (आणि) खानदेशांत तर हे बापू, तुझ्या वाढत्या पराक्रमाचा दरारा खराखरा बसला आहे.

करूर=कडवी. जखे=पहाणें, समजणें. जहान=जग.

४-८ गर्वपूर्ण अशी मोंगलांची कडवी फौज थाटामाटानें निघाली आहे. ज्यांना जग जोरदार समजते ते मुसलमान शत्रूचा मोड करण्यांत बहाद्दर आहेत. बादशाही (फौजेंत) लढाईत मरणाची पर्वा न करणारे असे मोंगल व पठाण आहेत. (तसेंच) इराणी, हबशी व मिर्झाही पुष्कळ आहेत (आणि) कोठेंकोठें शेख सय्यद व मेवातीही बरेच आहेत. त्या फौजेंत बारा हजार घोडेस्वार आहेत व सुमारें वीस हजार पायदळही सज्ज आहे.

दाटी खानदेस बहुत बरार । रोकी आइ कर गंगथड रार ॥ ९ ॥
जिण्ह फौज माहिं एका अनेक । भग जात फेंक भैंसा जुँ एक ॥१०॥
छत्रपती सतारे राजाराम । जिण्ह फौज तणो बेरुके नाम ॥११॥
बूबो पुँवार बलसिन्धु आप । जिण्ह देख सभै सत्रु खाय त्राप ॥१२॥
भीम ते बली बर्णू है विसेस । जिण्ह सुणत नाम डरे दसूँ देस ॥१३॥
केरूजी करण से बली जाण । पुँवार बंस हिन्दुवान भान ॥१४॥
रायाजी पुँवार अर्जून रूप । सत्रुन को साल भूपन को भूप ॥१५॥
भोसला परसोजी परसराम । अरि कंपत है जिण्ह सुनत नाम ॥१६॥

रार=लढाई.

९–१६ त्यांनीं खानदेश व वऱ्हाडवर खूप वचक बसविला आहे आणि आतां गोदावरीच्या तट प्रदेशीं येतांच ते लढाईसाठीं थांबले आहेत (इकडे) एखाद्या रेड्यालाही उचलून फेंकून पळावयास लावणारे असे एकापेक्षां एक बलवान वीर ज्या फौजेंत आहेत त्या साताऱ्याच्या छत्रपति राजाराम महाराजांच्या फौजेनें आपली कीर्ति बेधडक सर्वत्र पसरविली आहे. ज्याला पाहून साऱ्या शत्रूंना भीतीनें धडकी भरते अशा हे बुबाजी पवार, तूं सामर्थ्याचा सागर आहेस. तुझें नांव ऐकून दाही दिशा भयभीत होतात ह्यासाठीं तुझें मी विशेषत्वानें भीमासारखा बलवान् म्हणून वर्णन करितो. पवार वंश हिंदुमध्यें सूर्यासारखा तेजस्वी आहे व त्यांत केरोजी जणूं काय, कर्णाप्रमाणें बलिष्ठ आहे. (तसेंच) शत्रूंना भाल्यासारखा सलणारा व सरदारांचा सरदार असलेला रायाजी पवार अर्जुनासारखा शूर आहे. ज्याचें नांव ऐकून शत्रू भीतीनें कांपू लागतात तो परसोजी

धन्नाजी जाद्‌व द्रोण समान। खल सुनत नाम छोडे गुमान ॥१७॥
घोरपडा संता साथ के वीर। बहादुर बिसेस दाता रु धीर ॥१८॥
मरेठा मुगलान मँडियो मेल। होली के दिन जो खांडा खेल ॥१९॥
भिड़ पड़े अड़ पड़े सभी सूर। लैके माला अप्सरा हूर ॥२०॥
बेहूँ तरफ बीर भये निसंक। लड़ रहे सूर माने न संक ॥२१॥

तोटक

महा बीर मरेठन फौज लड़े।
पग पग्ग लथापत लुत्थ पड़े।

भोंसले परशुरामासारखा पराक्रमी आहे.

१७–२१ ज्यांचें नांव ऐकून दुष्ट [शत्रु] आपला गर्व विसरतात तो धनाजी जाधव द्रोणासारखा वीर आहे. हे वरील सर्व वीर विशेष पराक्रमी, उदार व गंभीर अशा संताजी घोरपड्याबरोबर राहिलेले होत. मराठे मुसलमानांचा अशा प्रकारें जोडीतोडीचा मेळ जुळला (व) होळीच्या दिवशीं जसा खांडांचा खेळ खेळण्यांत येतो तसा रणरंग माजला. सर्वच शूर होते. ते एकमेकाशीं खडाजंगीनें लढले. स्वर्गांतून अप्सरा विजयमाळा घेऊन उभ्या राहिल्या. दोन्ही पक्षांकडील वीरांना विजयाबद्दल आत्मविश्वास वाटत होता. ते बहाद्दर वीर कशाचीही पर्वा न करतां लढत होते.

लुत्थ [लोथ] = शव, प्रेत.

२२ महा पराक्रमी मराठ्यांची फौज लढूं लागली. पावलों–पावलीं रक्तानें माखलेलीं प्रेतें पडूं लागलीं. बुबाजी आपल्या फौजेला

बुबोराव कहे तुम बीर सुणो ।
मुगलानन फौज झुंझार हणो ॥२२॥
केरोजि लपक के तीर हणै।
मारो फौज मुगलन के बुझणै ।
महाभारत जू सब बीर लड़े ।
उडि टुक्क बेरंगन शत्रु झडे ॥२३॥
हमला करि हाथिन पै हपटै ।
खेंचि खागन घोडन पै झपटै ।
बेहुँ मारहुँ मारहुँ फौज करै ।
बेहुँ हार न मानै न कोउ हरै ॥२४॥

उत्तेजन देत म्हणूं लागले "हे वीरांनो, ऐका. मोंगलांची फौज लढवय्यी असली तरी तिला मारा, ठोका."

२३ केरोजी उसळून बाण सोडूं लागले. त्यांच्या मारामुळें मोंगलांची फौज हताश होऊं लागली. महाभारतीय युद्धांतील वीरांप्रमाणें सर्व मराठी वीर लढले त्यामुळें शत्रूकडील सैनिकांची घाबरगुंडी उडून त्यांस त्यांच्या रंगाचा बेरंग होतो कीं काय, असें वाटूं लागलें.

खाग=खड्ग.

२४ मराठे शत्रूकडच्या हत्तींवरील सैनिकांवर चाल करून त्यांच्याशीं भिडलें व तलवारी उपसून घोडदळावर धांवून गेले. दोन्ही पक्षांकडील फौज 'मारा मारा' म्हणून गर्जना करूं लागली.

छप्पय

वख्त दैव बलवान, मिटते नहीं मिटाई ।
भावी को नहिं जतन, करा लाख चतुराई ॥
महिरावन गहि राम, लखन घेर लै आयो ।
पिरथिराज पकडि पतसाह, तोख जडी कैद करायो ॥
इण भाँति बूबा को पकड, मुगलन कैद कियो ।
गढ़ की दीवाल में जीवित, अखिर वाको चुण दियो ॥२५॥

सोरठा

पलट्यो नहीं पुँवार, मारियो पाछे ही मरद
बुवा रंग सो वार, कवि ठाकुरसी यूँ भणे ॥२६॥

कोणी हार मानीना व कोणी भय खाईना.

२५ काळ व दैव बलवान् होत. त्यांना मिटवूं गेलें तरी ते मिटावयाचे नाहींत. लाख चतुराई करा, भविष्य कोणाच्याही हातीं येत नाहीं. ह्यानेंच रामलक्ष्मणाला महिरावणाच्या घरीं घेरून आणविलें व खुषीनें पृथ्वीराजाला बादशहाकडून कैद करविलें. तसेंच येथेंही होऊन बुबाजीला मोंगलांनीं धरून कैद केलें व शेवटीं किल्ल्याच्या (आशिरगडीं) भितींत जिवंत चिणून ठार मारलें !

२६ बुबाजी पवाराला आपल्याकडे वळविण्याचा मोंगलांनीं प्रयत्न केला; पण तो वळला नाहीं, म्हणून त्या मर्दाला नंतर ठार मारण्यांत आलें. कवि ठाकुरसी असें म्हणतों कीं “ हे बुबाजी, तूं शतशः धन्य आहेस ! ”

६ काळोजी पवार यांचें यशोवर्णन

दोहा

फौजी झंडा फहरहे, घुरे त्रमांगल गाह ।
औरंगशाह के ऊपरे, रूठ्यो कालूराव ॥ १ ॥
दिल्ली दिसा से दौड़ि कर, आये साह औरंग ।
मुगलन सेना बेमुदत, सजे सुभट सब संग ॥ २ ॥
कालू लै चढ़ियो कटक, धर निजाम धर दाट ।
कीधाँ मुँगलौं की कतल, सुभट कियो सम्राट ॥ ३ ॥

त्रमांगल=नगारा. गाह=गंभीर.

१ फौजी झेंडा फडफडत आहे. गंभीर आवाजांत नगारा दुमदुमत आहे. काळोजी पवार औरंगजेबावर संतापलेले आहेत.

२ दिल्लीकडून औरंगजेब बादशाह धांवून आलेला आहे. मोगलांची सेना अगणित असून तिच्याबरोबर सर्व उत्तमोत्तम वीर सुसज्ज होऊन आले आहेत.

कटक=फौज.

३ काळोजी फौज घेऊन निजाम (फेरोजजंगा) वर चालून गेले

मोतियदाम

सजे दल साह कि सम्मुख आय । भड़ाभड़ि पेंच के हाथ बताय ।
रुपे इत कालु झुँझार सुराड । अड्यो अरि सैन पै बज्र किवाड ॥४॥

भिड़े भड तेग़न तोल भुजाल । जुड़े दल साह सज्यो इन्द्रजाल ।
बखेरिय संभ बने बबरेल । झेली खग तुर्कन की ज़बरेल ॥५॥

व त्यांनीं त्यास वेढा देऊन चांगला मार दिला, मोंगलांची कत्तल उडविली, म्हणून त्यांस छत्रपतींनीं आपले सेनापति नेमिलें (अर्थात् स्वतंत्र पथक ठेविण्याची परवानगी दिली).

४ बादशाहाचें सैन्य लढाईसाठीं पुढें आलें व त्यानें एकामागून एक पेंचाचे हात दाखविलें तों इकडे बहाद्दर लढवय्या अशा काळोजी पवारांनीं वज्रासारख्या अभेद्य असलेल्या दरवाजाप्रमाणें समोर येऊन त्या शत्रुसेनेस अडवून धरिलें.

५ भुजंगाप्रमाणें असलेल्या तरवारी धारण करून वीर (मराठे) लढूं लागले. बादशहाचें सैन्यही लढाईस भिडलें. त्यावेळी जणूं इंद्रजालाप्रमाणें अद्भूत अशी लढाई झाली. बकऱ्यांप्रमाणें असलेल्या शत्रुसेनेंत (त्याच समयीं काळोजीबरोबर असलेले) त्यांचे धाकटे बंधू संभाजी पवार सिंहाप्रमाणें शोभले. तुर्कांची भयंकर तलवार त्यांनीं झेलली (अर्थात् शत्रूची मात्रा चालूं दिली नाहीं).

दोहा

नर्मदा घाटे नालछे, उतरी सेना आय ।
अडियल भड उदमादिया, घोडा, सेल घुमाय ॥६॥

कूच करी काल्लू कटक, माँडू कियो मुकाम ।
जबर मरेठा जोरवर, साहु जशा सिरसाम ॥७॥

साहदुला अब्दुल्ल सो, सूबेदार सुभट्ट ।
दिल्लीपति को सुभट्ट है, माँडू गढ़ में ठट्ट ॥८॥

जुडिया सूबा जोरवर, माँडू गढ़ रणबीर ।
अड़िया उदल काल्लू इत, ध्वज राजा चाढ़ि धीर ॥९॥

अडियल=अडणारा अर्थात् विरोध करणारा. सेल=भाला.

६ शत्रूला विरोध करणारे वीर्योन्मत्त मराठे वीर घोडा व भाला फिरवित पुढें निघाले आणि नर्मदेच्या घाटांतून त्यांची सेना नालछ्यास येऊन उतरली.

७ काळोजीच्या सैन्यानें पुढें कूच करून मांडव येथें तळ दिला. धन्य आहे मराठ्यांची कीं त्यांना शाहू * सारखा छत्रपती मुगुटमणि (म्हणून मिळाला) आहे.

८ शाहदुल्ला अब्दुल्लासारखे उत्तम लढवय्ये सुभेदार ह्यावेळीं दिल्लीपतीचे नामी बहादूर वीर म्हणून मांडव येथें दटलेले होते.

९ मांडवगडाचा तो जोरदार सुभेदार मराठ्यांशीं भिडला.

* महाराणी ताराबाईचे पुत्र शिवाजी.

जीत करी मुगलान ते, कीन्ही म्लेच्छ कतल्ल ।
कीन्हो गढ़ माँड्डू कबज, हडुमत करी हमल्ल ॥१०॥

रोप्यो झंडो राजव्या, बीराँ माँड्डू बीच ।
बिजै करी माँड्डू बली, सुभटां लीयो खींच ॥११॥

कीधो साहू महाराज ने, अबल भरोंसो आप ।
काल्हू सेनापति कियो, देखी उग्र प्रताप ॥१२॥

काळोजी व उदाजींनीं त्यास तेथें टक्कर दिली व त्यांनीं आपल्या राजाचा (भगवा) झेंडा मोठ्या धैर्यानें तेथें फडकविला.

१० मोंगलांना जिंकून यवनांची कत्तल उडविली व हनुमंतानें लंकेवर केलेल्या हल्ल्याप्रमाणें मांडवगडावर हल्ला करून तो हस्तगत केला.

११ मांडवगड मजबूत होता तरी ह्या वीरांनीं तो शत्रूकडून जिंकून घेतला व त्या मांडवगडांत आपल्या राजाचा झेंडा रोंवून दिला.

१२ छत्रपति शाहू * महाराजांनीं काळोजींना पहिल्या दर्जाचा विश्वासू मानून व त्यांचा प्रखर पराक्रम पाहून त्यांस सेनेचे अधिकारी केलें.

* छत्रपति संभाजी महाराजांचे पुत्र.

कालू कर लीन्हो कब्ज, बंकट धरा बराड ।
मारी दल मुगलान की, रोपी अनहद राड ॥१३॥

दुर्मिळ सवैया

गहेर आवाज त्रंबाळ घुरे, साहुराज सुसंगम बीर बली ।
अगवानि चहूँ के कालु अडे, बजरंग सु भारत धीर बली ।
खग झाटन म्लेच्छन पै झणके, चपला घन चंचल तेज चली ।
नृप कालु कि कीरत बीरत की, चहुँ ओर हिलोर दे हिन्द हली ॥१४॥

बंकट = बिकट. रोपी = निश्चित केली. राड = लढाई.

१३ काळोजींनीं जिंकण्यास बिकट असा वऱ्हाडचा मुलुखही काबिज केला व बेहद्द लढाई करून मोंगलांच्या फौजेस हरविलें.

त्रंबाळ = नगारा. ओर = बाजू, दिशा.

१४ डंक्याचा गंभीर आवाज निनादून सांगत आहे कीं, शाहूराजांजवळ योद्धे व बलवान लोक ह्यांचा चांगला संग्रह आहे. त्यांत भारतीय शूर व बलिष्ठ वीर बजरंगाप्रमाणें काळोजी पवार चाऱ्ही दिशांस पुढें आहेत. ढगांत जशी चपळ वीज चमकावी तसें यवनांवर वार करतांना खणखणत असलेलें काळोजींचें खड्ग चमकतें. राजे काळोजींची कीर्ति खरी वीरत्वाची. तिच्या लाटा हिंद देशांत चाऱ्ही बाजूंस हेलावून राहिल्या आहेत.

७ छत्रपति शाहू महाराजांचें सेना–वर्णन

छंद (?)

त्रै ज्ञानी त्रै राज, सेतुबंध फहरी दुहाई ।
काबूल और खुरासान, भेंट उत्तर से आई ॥
झाडखंड लैं दंड, गौंड नागपुर धाये ।
खानदेस बैराट, मालवे पै आये ॥
कहत सेत बानेतराव, और कौन तोसू अडे ।
दसूँ दिसा दलहले, बजत बंब साहु चढे ॥१॥

दुहाई=द्वाही. झाडखंड=देशविशेष. बैराट (विराट)=वऱ्हाड.

१ त्रय ज्ञानी त्रय राजा (अशा शाहू छत्रपती) ची द्वाही सेतुबंध रामेश्वरपावेतों फिरली. उत्तरेकडून (थेट) काबूल कंदाहारपासून नजराणे येऊं लागले. झाडखंड, गोंडवन व नागपूरकडून खंडण्या येऊं लागल्या. खानदेश, वऱ्हाडावरून (हे विजयी मराठे) माळव्यावर आले. बाणेतराव म्हणतो शाहूराजाशीं कोण झगडूं शकतो? त्याच्या विजयध्वनीनें दाही दिशा कापूं लागल्या आहेत.

कपि गुजरात सामक उंडी, दिल्लीपति शंक मानी ।
शाह खुमान की पूरब, और पच्छिम भूपाल सब ॥
दंड भरे कहाँ लों करूं, तारीफ करवाल की ।
सीवा के सपूत-पूत, लेवें मुजरा भूप-भूप ॥
दक्खन का धीर, बाजी राखी हिंदुआन की ।
पंच लाख उमराव, दश लाख ताजी है ।
काली पीठ ढालन के, तेज बीर खेत के ।
झुँझार मीरखान को मार लियो, ते बड़े खान को तोड़ दियो ।

ताजी=घोडा. खेत (क्षेत्र)=रणक्षेत्र. चकवे=चक्रवर्ति.

२ कपि (?) गुजरात व उंडी (?) चे सामंत राजे आणि दिल्लीपति बादशहा तुला भितात. पूर्वेकडील शहा खुमान व पश्चिमेकडील सर्व राजे तुला खंडण्या देतात. तुझ्या तलवारीची मी कोठवर प्रशंसा करूं.

शिवाजी महाराजांच्या सुपुत्राचा पुत्र व राजांचा राजा असा तूं सर्वांचे मुजरे घेत आहेस. दक्षिणचा तूं आधारस्तंभ आहेस. हिंदूंची तूंच बाजी राखलीस.

तुझ्या पदरीं पांच लाख उमराव व दहा लाख घोडेस्वार आहेत. रणांत लढणाऱ्या तुझ्या तेजस्वी वीरांच्या पाठी ढालींमुळें काळ्या आहेत.

वीर मीरखानाला तूं पराजित केलेंस व खानखानालाही मोडिलेंस. बादशहा नजरनजराणे पाठवितो ते हे नामोहरम झालेले मोंगल लोक तुला अर्पण करितात.

मुगल हुए पाजी है, बादशाह पठावे भेट लावे ।
दसू दिसा दक्खन के, साहू से सभी दल राजी है ।
बडे बडे उमराव, मुजरा करत आवे ।
साहू राजा भेटवे को, सभी सेन राजी है ।
साहू का दल जोर चढ़े, दक्खन खलबल पड़े ।
खुराशान देहली, आगरे उछाव करे ।
धाक बाजीराव की, रावन में बाजीराव ।
खड्ग मारे खंडेराव, क्रोड लाख ऊमराव ।
फौज साहू राज की, आगोडी मल्हारराव ।

दख्खनच्या दाही दिशांची सर्व सेना शाहू राजांवर खूष आहे. मोठमोठे उमराव मुजरा करित येत आहेत. शाहूराजांच्या दर्शनानें सारी सेना आनंदित होत आहे.

शाहूराजांच्या सैन्याला त्वेष आला कीं दख्खन देश खवळून जातो. खुरासान, दिल्ली, आग्र्याचाही थरकांप होऊं लागतो.

बाजीरावांचा दरारा जबर. सर्व सरदारांत श्रेष्ठ असा बाजीरावच होय. तसेंच लाखोकरोडो उमरावांत एकच तलवार-बहादर असा खंडेराव दाभाडे होय.

शाहू राजांच्या फौजेच्या आघाडीस मल्हारराव होळकर असावयाचे. स्वारीवर चालले असतांना व मोगलांची फौज रणांत

हांक धाक हनूमान, चलत वीर मारत फौज मुँगलान की ।
राणोजी सैंधिया बड़ी ढाल, कालोजी संभाजी पुँवार ।
पीलूजी जादवराव, ऐसे सेनापती ।
क्रोड दल ऊमराव, फौज साहू राज की ।
साहू राजा छत्रपति, चकवे सतारा-पति ।
कहे कवि भावसिंग, अचल रहो छत्रपाट ।
परसराम अवतार हुवे, जैसी तेग राज की ।
हिंदुन की हद बाँध गये, एक दोय से न होने की ॥२॥

मारीत असतांना हनुमंताप्रमाणें त्यांचे हुंकार ध्वनि व वचक असावयाचा. राणोजी शिंदे मोठे ढालीप्रमाणें संरक्षक होते तसेंच काळोजी पवार, संभाजी पवार, पिलाजी जाधवराव असे सेनापती व कोटयवधि उमराव शाहू राजांच्या सेनेंत होते.

साताऱ्याचे अधिपति शाहूराजे हे सार्वभौम छत्रपति होत. कवि भावसिंह म्हणतो ह्या राजाचे छत्रचामर चिरकाल राहोत. परशुरामानें अवतार घेऊन जसा शत्रूचा निःपात केला तशी ह्या राजाची तलवार गाजो. हिंदूच्या सामर्थ्याची हद्द त्यानें दाखवून दिली. ही गोष्ट एकदोघांच्यानें होणारी नाहीं !

---o---

[भाग २ रा]

सेनासप्तसहस्री

पवार – विजय

अर्थात्

संस्थान देवास थोरली पातीच्या पवार

राजघराण्यांतील पुरुषांचीं

भाटांनीं हिंदींत गाइलेलीं

ऐतिहासिक

वीर – गीतें

(भावानुवाद व टीपांसह)

“ रण में पग पाछे धरे, लाजे गोत पुँवार। ”

संपादक व अनुवादक

कृष्णाजी गंगाधर कवचाळे

सन १९६२ इ.

(प्रथमावृत्ति सन १९४३ इ.)

भूमिका

[मूळ 'सेनासप्तसहस्त्री पवार–विजया' ला जोडलेली.]

उत्तरी भारत एवं मालवा के १८ वीं शताब्दी के इतिहास सम्बन्धी जो जो सामग्री अब तक हमें प्राप्त हुई है वह या तो मराठी और फारसी में है या युरोपीय भाषाओं में ही कुछ मसाला हमें मिलता है। यह एक बड़ी आश्चर्यजनक बात है कि हमें प्रान्तीय आधुनिक भारतीय भाषाओं में विशेष सामग्री प्राप्त नहीं हुई है। परन्तु इस अभाव का यह मतलब नहीं है कि उन दिनों की ऐसी कोई सामग्री मिल ही नहीं सकती है। उस ओर अब तक कोई प्रयत्न नहीं किया गया है। ग्वालियर के सरदार फालके एवं हिन्दी के सुविज्ञात लेखक भास्कर रामचन्द्र भालेरावजीने इस ओर कुछ कदम बढाया था किन्तु वे निजी प्रयत्न मात्र थे एवं उनका कार्यक्षेत्र बहुत विस्तृत नहीं था। पुनः अनेकानेक कारणों से अब तक हमें इन संग्रह-कर्ताओं की खोजों का पूरा पूरा परिणाम भी ज्ञात नहीं हो पाया है। यही कारण था कि दो वर्ष पहिले अपने ग्रन्थ "मालवा में युगान्तर" में ऐतिहासिक सामग्री सम्बन्धी विवेचना करते समय मैंने लिखा था, "इस काल की प्रान्तीय महत्त्व की आन्तरिक घटनाओं आदि पर अधिक प्रकाश डालने के लिए यह अत्यावश्यक है कि स्थानीय सामग्री की खोज की जावे; इस क्षेत्र में अब तक कोई भी खोज नहीं हुई है, एवं अब भी यह आशा की जाती है कि इन क्षेत्र में खोज करने से

बहुत कुछ नई सामग्री प्राप्त हो सकेगी। ......स्थानीय सामग्री के इसी अभाव के कारण ही इतिहासकार अठारहवीं शताब्दी के मध्यकाल में मालवा प्रान्त की आर्थिक परिस्थिति तथा सांस्कृतिक प्रवृत्तियों का निश्चित रूप से पूरा पूरा वर्णन नहीं कर सकता है।" (पृष्ट ३९१)। इस उल्लेख में मैंने जिस सामग्री की ओर निर्देश किया है वह दो प्रकार की हो सकती है। पहले प्रकार के अन्तर्गत आते हैं उस काल के लिखे हुए समकालीन पत्र, कागज़ात, वाक़या, स्याहा, हिसाब किताब के काग़ज, फरमान हुक्मनामे, सनदें, दान-पत्र, शिलालेख आदि। दूसरी प्रकार की सामग्री विशेषतया साहित्यिक ही होगी। प्रत्येक समय भूतकालीन या निकट भूत की घटनाओं को जानने, उनका वर्णन करने या भविष्य की पीढियों की जानकारी के लिए ग्रन्थों की रचना होती रही है। इन ग्रन्थों ने क्रम-बद्ध इतिहास, निजी संस्मरण या डायरी, चरित्र आदि अनेकानेक स्वरूप धारण किए हैं। ऐसे ग्रन्थों की रचना गद्य और पद्य दोनों में होती है। पद्य में तो विशेषतया अपने आश्रयदाता या आदर्श पुरुष की प्रशंसा या उनके कार्यों के वर्णनों की ओर ही ध्यान दिया जाता था। हमें इस प्रकार के अनेकों ग्रन्थ फारसी भाषा में मिलते हैं परन्तु हिन्दी भाषा में लिखे गए ग्रन्थों की संख्या अंगुलियों पर गिनी जा सकती है। लाल कृत 'छत्रप्रकाश', यदुनाथ कवि कृत 'खाण्डेराय रासो' (अप्रकाशित), सूदन कृत 'सुजान चारित', पद्माकर रचित 'हिम्मत बिरुदावली' आदि ग्रन्थ ही विशेष रूप से उल्लेखनीय हैं। सम्भव है कि अधिक खोज होने पर इस प्रकार के अनेक अज्ञात ग्रन्थ प्रकाश में

आजावेंगे । मेरा विश्वास है कि राजपूतानें और मालवे में ऐसी खोज के लिए बहुत बड़ा क्षेत्र है ।

मुझे यह देख कर बहुत हर्ष होता है कि मालवा में कहीं कहीं इस ओर कुछ कार्य करने का प्रयत्न किया जा रहा है। ऐसे ही प्रयत्नों का प्रारम्भिक फल आज पुस्तकाकार प्रकाशित होकर साधारण पाठकों के सम्मुख रखा जाने वाला है ।

जिन तीन मराठे घरानों ने मालवे में स्थायी रूप से अपना स्थान बना लिया उनमें पवारों का विशेष स्थान रहा है। धार घराने के उदाजी पवार कई वर्षों तक मालवा में एकमात्र मरहठा सरदार रहे थे और बाद में जब होल्कर और सिन्धिया मालवा पर अधिकार कर वहाँ शासन-प्रबन्ध करने के लिए भेजे गए, तब पेशवा नें पवार घराने के अन्य प्रमुख व्यक्तियों को भी मालवा में भेज दिया। यद्यपि ये पवार वीर आक्रमणकारी मरहठा सेनाओं के साथ पहिले भी मालवा में आते रहे थे, किन्तु सन् १७३१ ई० के बाद ही उन्हें मालवा में कुछ हिस्सा मिला। इन्ही में से तुकोजी पवार ने आगे चलकर देवास राज्य (बड़ी पाती) की स्थापना की। यह अन्दाज लगाना कठिन नहीं है कि एक बार मालवा में बस जाने के बाद, यद्यपि उनका दक्षिण से सम्बन्ध बना रहा, तथापि उन्होंने यह आवश्यक समझा कि मालवा में अपने अधिकार को सुदृढ बनावें और अपना प्रभाव अधिक फैलावें । वह व्यक्तिगत वीरता का युग था और वीरों की वीर–गाथाएँ कहने वालो की मालवा में तब भी कोई कमी न थी। यों तो उत्तरी

भारत के कुछ भाट घरानोंका इस पवार घराने के साथ १७ वीं शताब्दी से ही कुछ सम्बन्ध चला आरहा था, परन्तु इधर जब ये पवार मालवा में आबसे तब तो अपने आश्रयदाताओं के पास वे भाट भी आपहुँचे और उनकी वीरता की कहानियों को फैलाने लगे।

ऐसे ही एक भाट घराने के लोगों ने समय समय पर अपने आश्रयदाताओं की प्रशंसा में एवं उनके वीरोचित कार्यो के वर्णनार्थ काव्यों की रचना की थी। ऐसे ही काव्यों को अन्धकार में से निकाल कर प्रकाशित किया जा रहा है। इन काव्यों में कहाँ तक ऐतिहासिक सत्यता का निर्वाह किया गया है, किस हद तक कवि ने अपने आश्रयदाता की प्रशंसा में अत्युक्ति से काम लिया है आदि प्रश्नों का उत्तर देने के लिए अत्यावश्यक होगा कि इतिहास का विद्यार्थी इन काव्यों की पूरी पूरी जाँच करे। ऊपरी दृष्टि से देखने पर उनमें काफी ज्ञात ऐतिहासिक घटनाओं का उल्लेख मिलता है। इन ऐतिहासिक काव्यों का ठीक ठीक ऐतिहासिक महत्व पूरी जाँच–पड़ताल के बाद ही निर्धारित किया जा सकता है।

परन्तु इस काव्यसंग्रह का महत्व केवल ऐतिहासिक दृष्टि से ही नहीं है किन्तु भाषा–विज्ञान के विद्यार्थियों के लिए भी उसमें काफी मसाला है। ये काव्य समकालीन बताये जाते हैं एवं जिस विशिष्ट भाषा में ये काव्य लिखे गए हैं वह अध्ययन की वस्तु होगी। इस काव्य में हमें खड़ी बोली का बहुत कुछ प्रारम्भिक

स्वरूप देखने को मिलता है। इस प्रकार की विशिष्ट भाषा के प्रयोग का एक खासा कारण हो सकता है। कवि का आश्रयदाता सुदूर दक्षिण का निवासी था और न वह अन्य देशीय भाषाओं का विद्वान ही था। उन दिनों सारे उत्तरी भारत में डिंगल के अतिरिक्त ब्रज भाषा ही एकमात्र काव्य की भाषा समझी जाती थी। परन्तु कवि का आश्रयदाता ब्रज भाषा से पूर्णतया अपरिचित था। एवं कवि के लिए यह आवश्यक होगया कि वह ऐसी सुबोध भाषा में अपने काव्य की रचना करे जो उसके आश्रयदाता तथा आश्रयदाता के सहकारियों की समझ में आसके। तत्कालीन मराठी पत्रों एवं डिंगल भाषा पर फारसी का बहुत प्रभाव था, एवं फारसी से प्रभावान्वित बोल-चाल की हिन्दी ही काव्य का एकमात्र माध्यम हो सकती थी। मेरा विश्वास है कि इन सब प्रश्नों पर हिन्दी भाषा के इतिहासकार एवं भाषा-विज्ञान के विद्यार्थी बहुत कुछ प्रकाश डाल सकेंगे। उनके मत से इन काव्यों के रचना काल को निश्चित करने में भी बहुत मदद मिलेगी।

इन काव्यों को पाठकों तक पहुँचा कर सम्पादक एवं प्रकाशक ने जो महत्कार्य किया है उसके लिए वे धन्यवाद के पात्र हैं। मैं जानता हूँ कि इन प्राचीन काव्यों को एकत्रित कर प्रकाशित करने में मेरे पुराने सहपाठी एवं मित्र, हिज हायनेस महाराजा विक्रमसिंहराव, बी० ए०, देवास (बड़ी पांती) नरेश का बहुत हाथ रहा है, एवं हिन्दी भाषा-भाषी उनके अनुग्रहित हैं। मैं यही प्रार्थना करूंगा कि अन्य नरेश, एवं इतिहास या

साहित्य के प्रेमी सज्जन भी इस कार्य के लिए प्रयत्नशील होवें। वे स्वयं यश प्राप्त करेंगे और अपने प्रान्त के प्राचीन अज्ञात इतिहास को प्रकाश में लाकर प्रान्त की भावी पीढ़ी के धन्यवाद के पात्र भी होंगे।

रघुबीर निवास,
सीतामऊ
१० अगस्त १९४०.

रघुबीरसिंह

परिचय

[मूळ 'सेनासप्तसहस्त्री पवार–विजया' ला जोडलेला.]

संसार के साहित्य में इतिहास का आसन बहुत ऊँचा है; क्योंकि इसके अभाव में मनुष्य जाति उन्नति करने में समर्थ नहीं हो पाती। वास्तव में विचार कर देखा जाय तो देशों, जातियों तथा राष्ट्रों को सजीव रखने तथा उनको उन्नति के पथ पर अग्रसर करने के लिए इतिहास से बढ़कर कोई अमोघ साधन नहीं है। अतीत की गौरव पूर्ण घटनाएँ मनुष्य मात्र एवं राष्ट्रों में संजीवन शक्ति का संचार करती है और भविष्य के लिए उत्तम पथ निर्माण करने में अपूर्व शक्ति रखती है। इसी कारण संसार के समस्त देशों में वीर–गाथाओं का स्थान सर्वोपरि रहा है। यही वीर पूजा की आधार शिला मानी गई है। ऐसे ही 'गीत' जीवन व्यवहार में परमोपयोगी सिद्ध हुए हैं और मनुष्य मात्र की जिव्हा को सदा सर्वदा अलंकृत करते रहे हैं। इन्हीं के कारण उत्तम उत्तम प्रातः स्मरणीय चरित्रों का प्रादुर्भाव हुआ है। वेदों में भी 'वीरो अस्माकं कुले प्रजायताम्' की सद्भावना बारम्बार प्रकट की गई है और इसी कारण "एक वीरा च कौसल्या" की अजर–अमर कीर्ति हुई। इसी दृष्टिकोण से वाल्मीकि सदृश महान् आत्माओं ने 'रामचरित्' का प्रकाशन किया और व्यास ने 'महाभारत' की रचना की।

इस वीर–प्रसविनी भूमि में विशेषतः मध्यकाल के अन्तिम भाग में महाराष्ट्र वीरों ने अपनी धवल ध्वजा देश भर में सर्वत्र

फहराई और सात्विक देश-प्रेम तथा आदर्श पराक्रम द्वारा कमनीय कीर्ति संपादन की।

भारत के ऐसे ही समुज्ज्वल रत्नों में देवास सीनियर के सर्वगुणागर परम उजागर पूर्वजों की गणना गौरव पूर्वक की गई है। इस प्रख्यात पवार (परमार) राज घराने के प्रतिभाशाली नरेशों ने 'मालव चक्रवर्ति' होकर अपनी पुण्य प्रभा को देश भर में फैलाया और वे अपने तेजस्वी शौर्य द्वारा अपूर्व पुण्य प्रतिष्ठा के भाजन हुए। आज इस देश में कौन ऐसा होगा कि जिसने महा पराक्रमी एवं कीर्तिशाली विक्रम, भर्तृहरि, मुंज, भोज, जगदेव आदि पुण्यश्लोक नरेशों के गुण गान करके अपनी रसना को वास्तविक रस प्रदान करते हुए कृतार्थ न किया हो!

दैवात् इस प्रख्यात कुल की कीर्ति का भविष्य महाराष्ट्र देश से हुआ और इन वीरों ने हिन्दु-कुल-दिवाकर श्री छत्रपति शिवाजी महाराज को धर्म राज्य स्थापन करने में पूर्ण सहयोग देना अपना कर्तव्य कार्य समझा और मराठा साम्राज्य के विस्तार कार्य में अपनी वीरता भली भाँति प्रकट की, जो इतिहास में सुश्राव्य शब्दों में वर्णित है। ऐसी ही योद्धाओं के वीर चरित्रों के कारण 'मर-हटा' शब्द सार्थक हुआ।

श्रीमन्त प्रथम तुकोजीराव, प्रथम कृष्णाजीराव और दूसरे तुकोजीराव इस समुज्ज्वल राजघराने के त्रिरत्न होगए हैं, जिनकी ओजस्वी प्रतिभा, प्रचंड पराक्रम, अपार शौर्य और सामयिक यशगान उनके समकालीन भाटों ने किया है।

अतीत काल से ही महा समर में वीरत्व पूर्ण ओजस्वी वाणी द्वारा वीरों को उत्साहित एवं उत्तेजित करना इन स्वयं योद्धा भाट कवियों का कर्तव्य चला आरहा है और इस निमित्त इन भाटों को राज दरबारों द्वारा लाख–करोड़ 'पसाव' के रूप में विपुल धन तथा जागीरें प्राप्त होती रही हैं। महामहिम वीरों के पराक्रम को स्वयं देखने और वर्णन करने के कारण इन भाटों के शब्दों का बड़ा ऐतिहासिक महत्त्व है। इनमें बहुत से सुशिक्षित और आशुकवि भी पाये जाते हैं और उनकी रचनाओं में वास्तविक सजीव वर्णन मिलता है

देवास सीनियर के परम प्रतिष्ठित क्षत्रियकुलावतंस परमार [पवार] राज घराना भी मूलतः उत्तर भारतीय होने के कारण वह प्राचीन समय से ही इन भाटों को परम्परागत आश्रय देकर पुरानी प्रथा का पालन निरन्तर करता आरहा है। इस राज घराने के आश्रित भाट कुल में किशनलाल विद्यमान है। ये भाट केवल इस राज घराने के ही नहीं प्रत्युत अहमदनगर जिलान्तर्गत सूपा ग्राम निवासी पवार घराने की समस्त शाखाओं के आश्रित हैं और लगभग ३५० वर्ष से देवास सीनियर के आलोट तहसील के तालोद ग्राम में रह रहे हैं। ये छाछर गौत्र के बडवा हैं। इनके पूर्वज नरूजी और कनीराम ने दोहा, सोरठा, छप्पय, पद्धरी, कुण्डलिया, तोटक, भुजङ्गप्रयात, मत्तगयन्द और मनहरण आदि छन्दों में अपने समय के देवास सीनियर के यशस्वी नरेशों का वीरत्व सच्चे और योग्य शब्दों में वीरोचित भाव में वर्णन किया है, जो इन पृष्ठों में समन्वित है।

इस 'सेनासप्तसहस्त्री पवार-विजय' के संकलन तथा संपादन का श्रेय श्रीयुत कृष्णाजी गंगाधर कवचाले को है, जिन्होंने प्रशंसनीय परिश्रम उठाकर किशनलाल से इन पदों को प्राप्त कर यथोचित रूप में उपस्थित करके हिन्दी साहित्य सेवा के साथ साथ स्वामी सेवा का भी सुयश उपार्जन करने का सौभाग्य प्राप्त किया है।

ऐतिहासिक दृष्टि से तो इस पुस्तक का महत्त्व विशेष है ही, क्योंकि इसमें वर्णित घटनाओं का इतिहास प्रत्यक्ष साक्षी है। इसमें वर्णित बातों में अतिरंजना अथवा कल्पना का सर्वथा अभाव है। साहित्य की दृष्टि से इस पुस्तक की पर्याप्त महिमा है। इसमें प्रयुक्त छन्दों में प्रायः यथार्थता है। शद्ब सौष्ठव और रचना वैचित्र्य योग्य मात्रा में हैं। वीर रस के इस काव्य में विशिष्ट अलंकारों का अच्छा प्रयोग किया गया है ओर पठन-पाठ की दृष्टि से भी यह सामयिक तथा उपयोगी सिद्ध हो सक्ता है! मुझे आशा है कि इस रचना का इतिहास एवं हिन्दी काव्य के क्षेत्र में योग्य सन्मान होगा और ऐसे वीर-काव्यों के अन्वेषण, संकलन और संपादन को सम्यक् प्रोत्साहन मिलेगा, जिससे अतीत के गर्त में विलीन भारत माता के वीर पुत्रों की चिरस्मरणीय गुण गरिमा का प्रकाशन एवं चिरवाञ्छित हिन्दी भाषा के साहित्य का यथोचित विस्तार होता रहेगा।

मेरा यह परम सौभाग्य है कि इस वीर-स्मृति द्वारा, धीर वीर प्रकृति, श्री तथा सरस्वती के समान भाजन, क्षत्रियवंशावतंस,

पराक्रमी, विक्रम और यशस्वी भोज के सुयोग्य वंशज, वीरोचित सौम्य, सरल चरित्र, इतिहास मर्मज्ञ, आदर्श प्रजा-वत्सल, हिज हायनेस श्रीमंत विक्रमसिंहराव पवार, नाना साहब महाराज, बी. ए., सेनासप्तसहस्त्री, महाराजा साहब के परिचय का अनुपम लाभ प्राप्त हुआ। श्रीमंत ने अपने वीर पूर्वजों के प्राचीन वीर-काव्य को प्रकाशित होने को प्रोत्साहन दिया है, वह सर्वथा सराहनीय है।

व्यतिकरितदिगंताः श्वेतमानैर्यशोभिः।
सुकृतविलसितानां स्थानमूर्जस्वलानाम्॥
अकलितमहिमानः केतनं मंगलानां।
कथमपि भुवनेऽस्मिंस्तादृशः संभवंति ॥१॥

श्रीमंत के सर्वथा अनुरूप ही है।

करुणावरुणालय जगन्नियन्ता जगदीश जगदाधार से मेरी प्रार्थना है कि वह श्रीमंत को सुख संपन्न दीर्घायु प्रदान करे और

तिष्ठत्यादधाति पूर्व दिग्भागे इन्द्रो देवता इन्द्र प्रसादा-द्राज्याभिवृद्धनमश्नुते।

तंदक्षिणाः परिवंहन्ति दक्षिण दिग्भागे यमो देवता यमप्रसादादायुष्याभिवृद्धनमश्नुते।

तंप्रत्यंचमा वर्तयन्ति प्रतीची दिग्भागे वरुणो देवता वरुण प्रसादात् पुत्र पौत्राभिवृद्धनमश्नुते।

तमुदीची तिष्ठत्युपावहन्त्युदीची दिग्भागे कुबेरो देवता कुबेर प्रसादात् धनधान्याभिवृद्धनमश्नुते।

सर्व दिग्भागे ब्रह्मा देवता ब्राह्मणा प्रसादात् शत्रुक्षयं मिश्रोर्क्षजमश्नुते॥

श्रीमंत तथा श्रीमंत के वंशजों को सदा सर्वदा अनुयायी रहे। शुभमस्तु।

होल्कर कॉलेज,
इन्दौर

श्रीनिवास चतुर्वेदी

आत्म-निवेदन

आज प्रिय वाचकांस एक नाविन्यपूर्ण साहित्यिक भेट सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. गेल्या २०-२२ वर्षापासून माळव्याचा महत्वपूर्ण असा प्राचीन-अर्वाचीन इतिहास उजेडांत आणण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न करीत असून आतांपावेतों तत्संबंधीं जेवढी माहिती प्राप्त झाली त्यांतील कांहीं स्वतंत्र पुस्तकरूपांत व कांहीं निरनिराळ्या नियतकालिकांतून स्फुट लेखांच्या द्वारें प्रसिद्ध करण्यांत आली आहे. ह्या माझ्या माळ-व्याच्या इतिहासप्रेमामुळेंच आज ही आणखी एक निराळीच अपूर्व भेट वाचकांस सादर करण्याचा योग मला लाभत आहे.

सुमारें २ वर्षांपूर्वी पुण्याचे माझे मित्र श्रीयुत मा. वि. गुजर, बी. ए., ह्यांनीं " संस्थान देवास-थोरली पाती पवार घराण्याचा इतिहास " हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. सदर ग्रंथासाठीं माळ-व्यांतून जेवढी ऐतिहासिक माहिती मिळूं शकेल तेवढी त्यांस मिळवून देण्याच्या उद्योगांत असतांना सहज १५-१६ वर्षांपूर्वी देवास संस्थानच्या अलोट महालांतील एका गृहस्थाच्या तोंडून ऐकलेलें " कालु मरेठा दक्खनवाला " हे एक हिंदी वीर-गीतही त्यांस मिळवून देण्याचें माझ्या मनांत आलें व लगेंच तें मिळवि-ण्याचें मी योजिलें. ह्या वीर-गीतांत संस्थान देवास थोरल्या पातीचे संस्थापक प्रथम तुकोजीराव पवार, सेनासप्तहस्री, ह्यांचे वडील काळोजी पवार, विश्वासराऊ, ह्यांनीं माळव्यांतील मराठ्यांच्या आरंभिक स्वाऱ्यांत स्वतःचा जो दरारा इकडील

लोकांवर बसविला होता त्याचें सुंदर वर्णन केलेलें होतें, म्हणून तें वीर-गीत मिळविण्यासाठीं मी मुद्दाम अलोटला गेलों व तेथें त्याचा शोध चालविला. अलोटपासून जवळच असलेल्या ताळोद नामक गांवीं महाराष्ट्रीय पवार घराण्याचें एक जुनें आश्रित भाट घराणें कित्येक वर्षांपासून नांदत असल्याचें मला समजलें, तेव्हां मी त्या घराण्यांतील किसनलाल भाट ह्याचा शोध काढून त्यास ताळोद गांवाहून लागलेच समक्ष बोलाविलें आणि काळोजी पवारांच्या उपर्युक्त वीर-गीताविषयीं त्याच्याजवळ गोष्ट काढली, तों किसनलाल ह्यानें आपल्या पूर्वजांनीं पवार घराण्यांतील पुरुषांवर रचिलेलीं कांहीं वीर-गीतें आपल्या संग्रहीं असल्याचें सांगितलें व दुसरे दिवशीं आपल्या गांवाहून एक पोथी आणून तींत लिहिलेलीं वीर-गीतें मला दाखविलीं. हीं वीर-गीतें भाटांच्या जुन्या लिपींत लिहिलेलीं असल्यानें मी तीं किसनलाल ह्याजकडून वाचून घेतलीं. त्यांत सुपें येथील ‘ विश्वासराऊ ’ पवार घराण्याच्या व देवास थोरली पाती येथील ‘ सेनासप्तसहस्री ’ पवार घराण्याच्या पुरुषांचीं वीरश्रीयुक्त अशीं गीतें मला बरींच आढळलीं. ह्याशिवाय आपली एक जुनी पोथी सुमारें शें-सवाशें वर्षांपूर्वीं आपल्या एका भाऊबंदानें मारवाडांत चोरून नेली असून तींतही कांहीं वीर-गीतें असावींत, असें किसनलाल ह्यानें सांगितलें. सबब शक्य झाल्यास तींही वीर-गीतें मिळवावींत म्हणून मी लगेंच किसनलाल ह्यास त्या कामासाठीं युक्तीनें प्रवृत्त केलें. त्याप्रमाणें पुढें किसनलाल ह्यानें मारवाडांत जाऊन तेथून युक्तिप्रयुक्तीनें आपल्या भाऊबंदाजवळ असलेल्या जुन्या पोथींतून

३-४ वीर-गीतें नकलवून आणून मला दिलीं. ह्याप्रमाणें एकंदर १९ वीर-गीतें मीं किसनलाल ह्याजकडून मिळविलीं. ह्यापैकीं ७ वीर-गीतें पवारांचे मूळ पुरुष साबूसिंग, त्यांचे चिरंजीव कृष्णाजी, नातु बुबाजी, रायाजी व केरोजी आणि पणतु काळोजी ह्यांच्या पराक्रमासंबंधीं असून बाकीचीं १२ वीर-गीतें देवास थोरल्या पातीच्या 'सेनासप्तसहस्री' पवार घराण्यांतील प्रथम तुकोजीराव, त्यांचे पुत्र प्रथम कृष्णाजीराव व नातु द्वितीय तुकोजीराव ह्यांच्या पराक्रमासंबंधीं होतीं. सबब सुप्याच्या 'विश्वासराऊ' पवार घराण्याचीं ७ वीर-गीतें 'विश्वासराऊ-प्रशस्ति' ह्या नांवानें स्वतंत्र पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावींत व बाकीच्या देवास थोरली पाती येथील 'सेनासप्तसहस्री' पवार घराण्याच्या १२ वीर-गीतांचा निराळाच संग्रह प्रकाशित करावा असें मी ठरविलें. त्याप्रमाणें सन १९४० च्या ऑगष्टमध्यें 'सेनासप्तसहस्री पवार-विजय' ह्या वीर-गीतांचा संग्रह विषयविवरण व ऐतिहासिक टीपा देऊन तो मी प्रथम हिंदी वाचकांस सादर केला. ह्या पुस्तकास सुविख्यात इतिहास-पंडित व सीतामहू संस्थानचे युवराज श्रीमंत रघुवीरसिंहजी, एम्. ए., एल्‌एल्. बी., डी. लिट्., ह्यांनीं 'भूमिका' लिहिली असून होळकर कॉलेज इंदूरचे प्रोफेसर व प्रसिद्ध हिंदी साहित्यिक श्रीयुत श्रीनिवास चतुर्वेदी, एम्. ए., ह्यांनीं 'परिचय' लिहिलेला आहे. सदरहु 'भूमिका' व 'परिचय' ह्या पुस्तकासही जसेच्या तसे जोडण्यांत आले आहेत. त्यांवरून ह्या पुस्तकांत ग्रथित केलेल्या वीर-गीतांविषयीं हिंदींतील इतिहासतज्ञ व साहित्यिक अशा दोघां पंडितप्रवरांचे अभिप्राय सर्वांस कळून येतील. 'विश्वासराऊ-प्रशस्ति' हें पुस्तक मीं गेल्या वर्ष-प्रतिपदेस

(ता. १७ मार्च १९४२) मराठी भावानुवाद व टीपा ह्यांसह प्रसिद्ध केलें आहे.

'सेनासप्तसहस्री पवार-विजयां'तील हीं वीर-गीतें मराठशाहीचे प्रमुख घटक असलेल्या देवास थोरल्या पातीच्या पवार घराण्याचीं असल्यामुळें व त्यांत इतिहासही बराच ग्रथित असल्यामुळें त्यांचा लाभ घेण्याची उत्कंठा मराठी वाचकांस असणें साहजिक आहे, म्हणूनच हा प्रयत्न मुद्दाम त्यांच्यासाठीं करण्यांत आला आहे.

आज महाराष्ट्रांत व बृहन्महाराष्ट्रांत गाजत असलेलें विविध-शाखान्वित मराठा पवार घराणें मूळचें उत्तर-भारतीय क्षत्रिय राजपूत होय. हें घराणें फार प्राचीन असून पराक्रमांत, ऐश्वर्यांत व विस्तारांत अत्यंत थोर असल्याचें इतिहासांत प्रसिद्धच आहे. 'पृथ्वीतणां पुंवार' म्हणजे सारी पृथ्वी पवारांची ह्या सर्वश्रुत असलेल्या उक्तीवरून पवारांचें शौर्यबळ, अधिकारबळ सहज कळून येतें ! इ. स. च्या ९ व्या शतकापासून तों १३ व्या शतकापावेतों ह्या पवारांचें माळव्यांत एक अति बलिष्ठ असें अधिराज्य नांदलें होतें. पुढें तेथें मुसलमानांचें प्राबल्य सारखे वाढू लागल्यामुळें साहजिकच पवारांच्या त्या अधिराज्याला धक्का बसला; तथापि तशा प्रतिकूल काळांतही स्वाभिमानपूर्वक वसत असलेल्या तेथील ह्या पवार घराण्याच्या एका शाखेंतील साबूसिंग नांवाचा एक साहसी व पराक्रमी पुरुष मुसलमानी सत्तेपुढें न वांकतां दक्षिणेंत निघून गेला. त्यावेळीं दक्षिणेंत मलिकंबराच्या प्रोत्साहनानें अनेक पराक्रमी हिंदु सरदार पुढें

येत होते. तेव्हां स्वतःच्या पराक्रमावर आपलेंही भाग्य तिकडे काढण्याच्या हेतूनें साबूसिंगानें आपल्या लहानशा फौजेनिशी अहमदनगरच्या भागांत जाऊन तळ दिला. पुढें त्याच्या शौर्य-साहसाची ख्याति श्रीशिवाजी महाराजांच्या कानांवर गेली तेव्हां त्यांनीं त्यास सुपें (जि० अहमदनगर) गांवाच्या पाटीलकीचें वंशपरंपरागत वतन देऊन आपल्या पदरीं ठेवून घेतलें. तेव्हांपासून–अर्थात् स्वराज्योदयापासून–तों मराठी साम्राज्याच्या अस्तापर्यंत साबूसिंगानें व त्याच्या वंशजांनीं छत्रपतींच्या सेवेंत कधींच अंतर पडूं न देतां आपल्या प्रबल प्रतापानें 'विश्वासराऊ', 'सेनाधुरंधर', 'सेनासप्तसहस्त्री', 'सेनाबारासहस्त्री' अशा यथार्थ मानाच्या पदव्या व सरंजाम मिळवून इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें. त्याची साद्यंत हकीगत श्री. गुजर ह्यांनीं मराठी वाचकांस सादर केलीच आहे. अस्तु.

भारतवर्षांत अति प्राचीन काळापासून वैतालिक, मागध आदि बंदिजन पदरीं बाळगण्याची प्रथा राजे लोकांत चालत आलेली आहे. भाट, चारण हेही अशाच बंदिजनांपैकीं असून त्यांस परंपरागत दरबारीं राखण्याची प्रथा रजपूत राजांमध्यें अद्यापिही प्रचलित आहे. वंशविस्ताराची नोंद करणें, रणोत्साह निर्माण करणारीं रसभरित वीर-गीतें रचणें व सदोदित मालकाचें अभीष्ट-चिंतन करीत राहणें हीं ह्या लोकांचीं मुख्य कामें होत. पूर्वीं ह्या लोकांना मोठा मान असे. स्वतः राजा त्यांचा आदर राखी व त्यांस नेहमीं धनदौलत देऊन त्यांचा यथोचित गौरव करी. पवार हे मूळचे उत्तर-भारतीय रजपूत असल्यानें सदर प्रथेचें पालन त्यांच्या

हातूनही होणें साहजिक होय. असें दिसून येते कीं, मागें सांगितलेलें अलोट महालांतील ताळोद गांवचें भाट घराणें हें केवळ देवास थोरल्या पातीचेंच नव्हें, तर सुपें येथील पवार घराण्याच्या जेवढ्या शाखोपशाखा आहेत त्या सर्वांचेंच एकमेव आश्रित घराणें आहे. हें घराणें मागधवंशी असून त्याचें गोत्र छाछर होय. उदेपूर संस्थानांतील जावळ महालांत असलेलें पाडल्या हें ह्या घराण्याचें मूळ गांव. ह्या घराण्याचा वंशवृक्ष अन्यत्र दिलेला आहे. त्यांतील पुरुषांचें सुपें व देवास (थोरली पाती) येथील पवार राजघराण्यांतील पुरुषांबरोबरचें समसामयिकत्त्व दानपत्रें, सनदा व इतर कागदपत्रें वगैरेवरून जें दिसून येतें तें येणेंप्रमाणें होय:—

पवार घराण्यांतील पुरुष	**भाट घराण्यांतील पुरुष**
साबूसिंग **कृष्णाजी**	**पालाजी**
बुबाजी **काळोजी**	**ठाकुरसी**
काळोजी	**भावसिंग**
प्रथम तुकोजीराव	**नरू**
प्रथम कृष्णाजीराव	**नरू, दीपाजी**
द्वितीय तुकोजीराव **रुक्मांगदराव** **द्वितीय कृष्णाजीराव**	**कान्हा** **ऊंकारजी** **काळोजी**
तृतीय तुकोजीराव **विक्रमसिंहराव (विद्यमाप)**	**किसनलाल (विद्यमान)**

भाट घराण्यांतील वरील पुरुषापैकीं ज्या ज्या भाटांचीं वीर-गीतें अद्यापपर्यंत उपलब्ध झालीं आहेत त्यांत नरू व कान्हा ह्यांची

वीर-गीतें अधिक असून त्या दोघांच्या रचनेंतील वैशिष्टय तज्ञांस कळून येण्यासारखें आहे. प्रस्तुत ग्रंथांत (परिशिष्टासमवेत) नरूचीं १० वीर-गीतें असून कनिरामाचीं ३ आहेत आणि दीपाजीचें १ आहे. दीपाजीचें वीर-गीत (सिप्री-सिरोंज संग्राम) हें मूळ हिंदी 'सेनासप्तसहस्त्री पवार-विजय' प्रसिद्ध झाल्यानंतर उपलब्ध झाल्यामुळे तें ह्या पुस्तकांत परिशिष्ट (अ) मध्यें देण्यांत आलें आहे.

वीर-गीतें म्हणजे पोवाडे होत. हे पोवाडे रचतांना भाट, चारण किंवा शाहीर ह्यांनीं आपल्या स्वामीचीं स्तुतिस्तोत्रें जरी क्वचित् प्रसंगीं अतिरंजित केलेलीं असलीं तरी त्यांत प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा विश्वस्तपणें ऐकिलेल्या विशिष्ट वर्णनीय घटनांचें ओजस्वी वाणीनें वर्णन केलेलें असतें, म्हणूनच ह्या पोवाडे ऊर्फ वीर-गीतांना ऐतिहासिकदृष्टयाही महत्त्व दिलें जात असतें. पूर्वींच्या लढाईच्या काळांत तर ह्या गीतांचा उपयोग रणोत्साह निर्माण करण्याच्या कामीं फार होत असे, त्यामुळें त्या काळीं आपल्या राज्यरक्षणासाठीं सदा कटिबद्ध रहावें लागत असलेल्या लहानमोठचा सर्व राजांना सैन्य आणि शस्त्र ह्यांबरोबर भाट, चारण व शाहीर ह्यांनाही अगत्यपूर्वक जवळ बाळगावें लागत असे. त्या काळीं उत्तरेंतील भाटचारणांकडून आपल्या आश्रयदात्यांच्या कीर्तिसंकीर्तनार्थ रचिले गेलेल्या ग्रंथांची संख्या विपुल असून त्यांत प्रत्यक्ष घडलेल्या अनेक सामरिक प्रसंगांचें यथार्थसुंदर वर्णन पुष्कळ ठिकाणीं आढळतें, त्यामुळें साहजिकच त्यांच्या ग्रंथांस ऐतिहासिक मूल्य प्राप्त झालेलें आहे. आज प्रसिद्ध होत असलेलीं ह्या ग्रंथांतील सामरिक वीर-गीतेंही तशींच असून त्यांतील एकदोन

सोडून बाकीचीं सर्व 'चक्षुर्वैसत्यं' ह्या प्रामाण्याचीं आहेत व तीं प्रसंग घडून आल्यावर लागलेंच रचिलीं गेलेलीं असल्यानें त्यांत बारीकसारीक गोष्टीही समाविष्ट झालेल्या आहेत.

काव्य, इतिहास व भाषा ह्या तिन्ही दृष्टींनीं पोवाडे ऊर्फ वीर-गीतांचें महत्त्व विद्वानाकडून मापलें जात असतें, त्याप्रमाणें आमच्या ह्या पुस्तकांतील वीर-गीतांकडे पाहतां तीं विद्वानांच्या परीक्षेंत उतरतील अशी पूर्ण खात्री आहे. काव्याच्या दृष्टीनें नरू कवीच्या रचनेंतील ओजस्विता व प्रगल्भता कोणासही सहज मोहून टाकणारी असून ऐतिहासिकता तर वर्णित घटना प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून वर्णिलेल्या असल्यामुळें निःसंदेहच आहेत. त्यांतील व्यक्तिनिर्देश, स्थलनिर्देश व घटनाकथन तर इतके तपशीलवार आहेत कीं ते पाहून इतिहास-संशोधक तत्काल तल्लीनच होईल! खडर्याचें वीर-गीत सोडलें तर कनिरामाच्या बाबतींतही असेंच म्हणतां येईल; तथापि नरू कवीची प्रतिभा त्यापेक्षां विशेष प्रखर, प्रगल्भ व प्रसादपूर्ण होती असें केव्हांही म्हणावें लागेल! उत्तेजक प्रसंग, धांवती रचना, तडफदार भाषा व हृदयग्राही भावव्यंजना ह्यांवरच वीर-गीतांची गोडी व परिणामकारकता अवलंबून असते आणि हाच अनुभव प्रस्तुत पुस्तकांतील वीर-गीतांवरून वाचकांस आल्याशिवाय राहणार नाहीं.

ह्या पुस्तकांतील वीर-गीतांची भाषा म्हणजे हिंदी खडी बोली होय. मराठ्यांचें वर्चस्व जसजसें उत्तर हिंदुस्थानांत वृद्धिगत होऊं लागलें तसतसें मराठ्यांना समजेल अशी नवीन वळणाची सोपी हिंदी भाषा हळुहळू प्रचारांत येऊं लागली, तिलाच खडी बोली

असें नांव मिळालें. ह्या खडया बोलींत डिंगल, अवधी, मैथिली, बुंदेलखंडी, माळवी, गुजराथी, अरबी, फार्शी आदि निरनिराळया भाषांतील सर्वसाधारणपणें प्रचलित असलेले शद्ब व तसेंच अव्ययें व विभक्तिप्रत्ययही आपलेपणानें मिसळून गेलेले आढळतात. पवारांच्या पदरच्या भाटांनीं आपल्या वीर–गीतांकरितां हीव भाषा अंगिकारलेली होती. तोकू (पृ. ८), शिवगण जशाये (पृ. ९), बुंदेलखंड बचाई (पृ. १३), मोहिं (पृ. १३), नायक जू (पृ. २७), भारत जू (पृ. २८), तुर्कन की गारी है (पृ. ३४) मुख सराह प्रभु लीन (पृ. ७२), हिय महँ (पृ. ९१), भाखन (पृ. ११६), जाको फल (पृ. १४३), नीति गुन सागर हतो (पृ. १४४), रार रची भोपाल री (पृ. १६३), एम, केम (पृ. १६७), न्हाटो (पृ. १७१) वगैरे उदाहरणांवरून ह्या संमिश्रित भाषेची कल्पना वाचकांस सहज होईल.

हिंदी भाषेंत मात्रा किंवा गणनिर्बंध पाळतांना कवितेमध्यें विभक्तिप्रत्यय सोडून देण्याचा जुना प्रघात आहे, उदाहरणार्थ तुळसीदासाच्या रामायणाकडेच पाहूं गेलें तर

को न सुसंग बड़ापन पाया ।

किंवा

ते हि क्षण मध्य राम धनु तोरा ।

अशीं विभक्तिप्रत्ययरहित रचनेचीं उदाहरणें आपणांस पुष्कळ सांपडतील. पहिल्या उदाहरणांत कौ म्हणजे किसने व सुसंग म्हणजे सुसंग से बडापन पाया नहीं ? असा अर्थ ग्रथित असून दुसऱ्या

उदाहरणांत ते ही क्षण में राम ने धनु को मध्य में से तोडा असा अर्थ ग्रथित आहे. अशा प्रकारच्या रचनेचीं उदाहरणें ह्याही पुस्तकांत वाचकांस कांहीं ठिकाणीं आढळतील. जसें ' जयसिंग खीचीवर आक्रमण ' ह्या वीर-गीतांत

जैसिंग जीति लियो प्रबल जोर ।

(पद्यांक ५)

असें म्हटलें आहे. तेथें जैसिंग ने जीती लियो; उसका जोर प्रबल था, असा वास्तविक अर्थ आहे; परंतु इतिहास विदित नसल्यास अशा प्रकारच्या विभक्तिप्रत्ययरहित रचनेमुळें प्रबल जोर होते हुए भी जैसिंग जीत लिया गया, असा त्याचा अर्थ सहज कोणी करील तर त्यांत आश्चर्य नाहीं! अस्तु. ह्या पुस्तकांतील वीर-गीतें इतिहासाला धरूनच रचिलीं गेलेलीं असल्यामुळें विभक्ति-प्रत्ययाभावींही त्यांचा भावार्थ कळणें तेवढेसें अवघड होत नाहीं.

भाट-कवि हे अगोदरच अ-पढिक, साधे पंडित व त्यांतून पुनः आशु-कवि. त्यामुळें त्यांच्या रचनेंत छंद शास्त्राच्या दृष्टीनें कांहीं चुका असल्या व पांडित्याचें तितकेसें तेज नसलें तरी कल्पनेचें लाघव आणि कलेचें लालित्य मात्र त्यांत हमखास आढळून येतें. पुढें देण्यांत येणाऱ्या कांहीं उताऱ्यावरून ह्या पुस्तकांतील नरू व कनिराम ह्यांच्याही रचनेंतील वरील गुण वाचकांच्या निदर्शनास येतील:—

दोन्हों दल सागर में गागर गरक भई,
गागर गरक भई तुर्कन की गारी है ॥

– नरू (पृ. ३४)

पाकर खबर यह पेशवा नृपाल हूँ के,
मानों पाँव पूँछ कारे नाग पै लगायो है।
मानों सोर गंजन में आग को लगाइ याकी,
मानों आज शिवजी ने त्रिनेत्र खुलायो है॥

– नरू (पृ. ६१–६२)

इहि भाँति चलीं चतुरंगिनियों,
बर पेशव दुल्लह को घर यों॥

– नरू (पृ. ६६)

तुर्कन की सेनन को तितर बितर कीन्ही,
मानों मृग झुंडन को केहरी खदाई है॥

– कनिराम (पृ. १४१)

ऐसे कह बीर चल्यो म्लेच्छन पै गर्ज कर।
रावन की लंक पर हंक हनुमान की॥

– कनिराम (पृ. १५९)

बीरभद्र अजारि पै, चक्रव्यूह अभिमन्यु आयो।
कंस ऊपर श्रीकृष्ण, लंक दाहिन कपि धायो।
रावण ऊपर श्रीराम, द्रोण पांडव की सेना।
छत्री पै रेणु कुंवर, रति–पति क्रोध त्रिनेना।
तकुराव तेम कोप्यो तबै, सहस बाजि पर चढ़ि चल्यो।
बावनी साथ बहु बीर ले, जैसिंग भूपतें जा मिल्यो॥

– कनिराम (पृ. १६९-७०)

नरू, दीपाजी व कनिराम ह्या तिघांनींही आपल्या पूर्वकालीन व समकालीन भाटांनीं उपयोगांत आणिलेल्या दोटा, सोरठा, छप्पय, पद्धरी, कुंडलिया, तोटक, भुजंगप्रयात, मत्तगयंद, मोतियदाम, मनहरण आदि छंदांमध्येंच आपल्याही वीर-गीतांची रचना केलेली आहे त्यावरून त्यांचें रसानुकूल छंदरचनेंतील प्राविण्यही उत्तम रीतीनें दिसून येतें.

आतां ह्या वीर-गीतांविषयीं आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. आजपावेतों आपण भूषण, मतिराम व तत्सम आणखी एकदोन हिंदी भाटांनीं रचिलेले पोवाडे सोडून आपल्याच मराठे शाहिरांनीं रचिलेले आपल्या प्रतापी मराठे वीरांचे पोवाडे वाचत व ऐकत आलों आहोंत; परंतु स्वकीयांपेक्षां परकीयांकडून होणारा गौरव हा केव्हांही महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीनें पाहूं जातां स्वकीय शाहिरांपेक्षां परकीय भाटांनीं गाईलेले मराठे वीरांचे पोवाडे (वीर-गीतें) हे महत्त्वाचेच ठरतील. राजपुतान्यावर आपला बचक बसविणारे महादजी शिंदे, मल्हारराव होळकर व यशवंतराव होळकर ह्यांचीं व त्यांतूनही विशेषतः यशवंतराव होळकरांचीं तत्रस्थ भाटांनीं गाइलेलीं स्फुट हिंदी वीर-गीतें आजपावेतों आपणांस उपलब्ध झालेलीं आहेत परंतु ती अल्पसंख्य आणि निव्वळ शौर्यवर्णनपरच. इतिहासाचें पुरतें अधिष्ठान देऊन तीं प्रायः रचिलेलीं नाहींत. पण आज ह्या पुस्तकद्वारें वाचकांपुढें ठेवित असलेलीं हिंदी वीर-गीतें तशीं नाहींत. तीं इतिहासावर अधिष्ठित असून त्यांतला तपशील किती महत्त्वपूर्ण व इत्थंभूत आहे, हें वाचकांच्या प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं ! हीं वीर-गीतें

म्हणजे एका अर्थी देवास थोरल्या पातीच्या प्रतापशाली पवारांचा पद्यमय इतिहासच होय, असें म्हटलें तर तें वावगें होणार नाहीं.

ह्या पुस्तकांतील वीर-गीतांचे रचयिते नरू, दीपाजी व करनिराम ह्यांचे काळ कळण्यास उपयोगी असे त्यांच्या घराण्याच्या जुन्या पोथीमधील दानांसंबंधींचे निवडक उतारे तसेंच किसनलाल भाटाजवळून मिळालेले व देवास थोरल्या पातीच्या दप्तरखान्यांत सांपडलेले ह्या घराण्यांतील पुरुषांचीं कांहीं वृत्तिपत्रें, सनदा व इतर कागदपत्रें वाचकांच्या माहितीसाठीं मुद्दाम परिशिष्ट (इ) मध्यें देण्यांत आलेलीं आहेत.

ह्या पुस्तकांत मुद्रण-दोष पुष्कळ आहेत व त्यांत 'कंसां'ची भर तर बरीच आहे. त्यामुळें जे दोष वाचकांच्या सहज लक्षांत येऊन अर्थहानि घडवून आणणारे नाहींत ते वगळून बाकीच्यांचा खुलासा शुद्धि-पत्रांत केलेला आहे.

शेवटीं ह्या पुस्तकाच्या कामीं ज्या मंडळीनें परोपरीनें साह्य केलें त्यांचे येथें आभार मानणें जरूर आहे. असे आभार मानतांना वास्तविक ज्यानें मला हीं मूळ वीर-गीतें मिळवून दिलीं त्या किसनलाल भाटाचे आभार प्रथम मानणें युक्त होईल. ह्यानंतर 'भूमिके' बद्दल श्रीमंत महाराजकुमार रघुवीरसिंहजी, एम्. ए., एल्एल्. बी., डी. लिट्. व 'परिचया'बद्दल कै. प्रो. श्रीनिवास चतुर्वेदी, एम्. ए., आणि इतर प्रकारच्या निरनिराळ्या साह्याबद्दल प्रो. श्यामलाल शर्मा, बी. ए., इंदूर, श्री. मा. वि. गुजर, बी. ए., पुणें, पं. लक्ष्मीनारायण शुक्ल, देवास व श्री. रघुनाथ कृष्ण अत्रे, देवास वगैरे मंडळीचेही मी आनंदानें आभार मानतो.

शेवटीं ज्यांच्या कृपाछत्राखालीं सुखानंदानें साहित्यसेवा यथाशक्ति बजावित आहे त्या थोर श्रीमंत सरकार कर्नल सर विक्रमसिंहराव ऊर्फ नानासाहेब महाराज पवार, सेनासप्तसहस्त्री, के. सी. एस्. आय्., बी. ए. महाराजासाहेब बहादुर, देवास थोरली पाती, ह्यांचे आभार मानून हें 'आत्म-निवेदन' पूर्ण करितों.

देवास थोरली पाती
ता. ३०-३-४३ इ.

कृ. गं. कवचाळे

श्रीमंत विक्रमसिंहराव महाराज पवार, बी. ए., सेनासप्तसहस्त्री,
महाराजासाहेब बहादुर संस्थान देवास (थोरली पाती)



जन्म : १९४०

फाल्गुन व. शके १८३१.

समर्पण

भारतीय इतिहासास अलंकृत करणाऱ्या

महान् तेजस्वी अशा मराठी साम्राज्याच्या विस्तार–कार्यार्थ

संस्थान देवास थोरल्या पातीच्या पवार राजघराण्यांतील

ज्या पराक्रमी वीरांनीं आपली वीरता प्रकट केली

त्यांचें हें ओजस्वी

यश – गान

त्यांचेच विद्यमान गुणैश्वर्यशाली वंशज

श्रीमंत सरकार कर्नल सर **विक्रमसिंहराव महाराज पवार,**

सेनासप्तसहस्त्री, के. सी. एस्. आय्., बी. ए.,

महाराजासाहेबबहादुर, संस्थान देवास थोरली पाती,

ह्यांस

सादर समर्पण.

महाराजांचा नम्र सेवक,


कृष्णाजी गंगाधर कवचाळे

प्रथम तुकोजीराव पवार,

सेनासप्तसहस्री,

ह्यांचीं

वीर-गीतें



श्रीमंत प्रथम तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री.

१ जरीपटका

(सन १७२६-१७३१ इ.)

दोहा

पिरथी बड़ा पुँवार घर, पिरथी पुँवारा तार ।
आबूगढ़ को बैसणो, दूजि उज्जेणि धार ॥ १ ॥

तोटक

यह आदित वंश पुँवार बने,
बहु पुण्य पराक्रम ताहि गने ।

१. जगांत पवारांचें घराणें थोर. पवारांनीं जगाला तारलें. आबूगडचें (त्यांचें मूळ) वास्तव्य. (त्यानंतर त्यांचीं) दुसरीं (वास्तव्यस्थानें म्हटलीं म्हणजे) उज्जयिनी व धार * होत.

२. हे पवार सूर्यवंशी आहेत. त्यांनीं अनेक पुण्य, पराक्रमाचीं कृत्यें केलीं. शत्रूंच्या निर्दालनासाठीं (ते यज्ञकुंडांतून) प्रगट

---

* पूर्वीच्या काळीं पवारांचा व धारेचा अन्योन्य संबंध अंग व छाया ह्या न्यायानें चालत आला होता. ह्यासंबंधांत खालील दोहा प्रसिद्ध आहे:

जहाँ पुँवार तहाँ धार, और धार तहाँ पुँवार ।
धार विना पुँवार नहीं, नहीं पुँवार विना धार ॥

स्वतः पवार राजेही धारेविषयीं किती आत्मीयता बाळगीत असत हें भाटाच्या पुढें दिलेल्या दोह्याच्या पंक्तीवरून दिसून येतें:—

धारा भीतर हूँ बशूँ, मझबे भीतर धार ।

ह्या धारेच्या प्राचीन पवार घराण्यांतीलच एक पुरुष सार्बूसिंग दक्षिणेंत गेले आणि त्यांचा वंश तिकडे विस्तार पावून पराक्रमामुळें नांवलौकिकास व

प्रगटे परमारहुँ मार करे,
तिणते परमारहुँ नाम धरे ॥ २ ॥
तब दुष्टन कूँ तिन दण्ड दिये,
हर सङ्कट सब कुँ बचाय लिये ।
इण वंश में वीर व धीर भये,
कइ ग्यानि सुजानि सुभानि रहे ॥ ३ ॥
नृप विक्रम कूँ सब वीर गने,
सुख देइ संसार कु दुःख हने ।

झाले * (व त्याप्रमाणें ते शत्रूचें) निर्दालन करतात (म्हणून) त्यांस (पर=शत्रु, मार=मारणारे असें) नांव दिलें गेलें.

३. त्या (पूर्व) काळीं त्यांनीं दुष्टांना साम, दाम, दंडानें शासन केलें (व) संकटें निवारून सर्वांना रक्षिलें. ह्या वंशांत पराक्रमी व धैर्यशाली (पुरुष) होऊन गेले. (तसेंच) कित्येक सुज्ञ व स्वाभिमानीही होऊन गेले.

४. (त्यांच्यापैकीं) विक्रमादित्य राजाला सर्वजण वीर मानतात. (त्यानें) संकटें निवारून जगाला सुख दिलें. गरिबांना दुःखी

वैभवास चढला. त्या वंशांतील हल्लींचें वडील राजघराणें म्हणजे देवास थोरल्या पातीचें पवार घराणें असून मधलें घराणें देवास धाकट्या पातीचें व कनिष्ट घराणें धारचें होय.

* शत्रूचा निःपात करण्याकरितां वसिष्ठ ऋषींनीं आपल्या मंत्र-प्रभावानें अर्बुद पर्वतावरील यज्ञकुंडांतून परमारांच्या मूळ पुरुषास निर्माण केल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे.

दुखि देख के दीनन दुःख हरे,
निज कष्ट सहे उपकार करे ॥४॥

नृप भर्तृहरी विद्वान भये,
जिण पुत्र तिया सब त्याग करे।

अनुराग तजी प्रभु पागि रहे,
वह पार संसार से अम्र जिये ॥५॥

जगदेव सुदानि च कौन भये,
जगदंब कंकालि कुँ शीश दिये।

पाहून (त्यानें त्यांचीं) दुःखें निवारण केलीं (व) स्वतः कष्ट सोसून (जगावर) उपकार केले.

५. ज्यानें (आपले) पुत्र, राण्या (आदि) सर्वांचा त्याग केला तो भर्तृहरि राजा (ह्या परमार कुळांत) विद्वान् होऊन गेला. मायामोह सोडून तो ईश्वरचरणीं तल्लीन राहिला (व शेवटीं) संसार तरून जाऊन अमर होऊन बसला!

७. (ह्याच परमार कुळांतील) जगदेवाएवढा मोठा उदार असा कोण होऊन गेला? (त्या जगदेवानें) कंकालीचें रूप धारण करणाऱ्या जगदंबेला (आपलें) शिर अर्पण केलें. * (शिर तर

* ह्यासंबंधांत अशी दंतकथा प्रसिद्ध आहे कीं, जगदेवाचा जयसिंग म्हणून एक बलिष्ट शत्रु होता. त्यास भैरवाचें इष्ट होतें, म्हणून जयसिंगास जिंकण्याकरितां जगदेव हा आपली कुलदेवता जगदंबा ऊर्फ कालिका हिला अनन्य भावानें शरण गेला. तेव्हां कालिकेनें त्याचें सत्त्व पाहण्याकरितां कंकाली

कर उंगलि काटि दई न किसे,
जगदेव बराबर मानु जिसे ॥६॥

बहु ग्रन्थन में इतिहासन में,
परसिद्ध हि शास्त्र प्रकाशन में ।

परिपूरण पण्डित भोज नृपाल,
हुए जो चहुँ वेदिक बुद्धि कृपाल ॥७॥

पद्धरी

रसा-पति शिव सतारा के राय ।
मुगलन को मार धरम बचाय ॥

राहूंच द्या पण नुसती) करांगुली (देखील कोणी आपल्या देवतेला) कांपून दिलेली नाहीं कीं तेवढ्यावरूनसुद्धां मी त्याला जगदेवाच्या बरोबरीचा मानूं शकेन !

७ चारही वेदज्ञ–विद्वानांचा पुरस्कर्ता असलेला (परमार कुळांतील) भोजराजा अनेक ग्रंथांत, इतिहासांत व विख्यात अशा शास्त्रांत प्रसिद्ध आहे.

८ (छत्रपति) शिवाजी राजे हे साताऱ्याचे अधिपति

भाटणीचें रूप घेतलें व जगदेवाजवळ त्याच्या स्वतःचें शिर मागितलें. जगदेवानें तें तात्काळ कापून दिलें ! त्याबरोबर कालिका प्रसन्न झाली व तिनें जगदेवास उठवून त्याचे ईप्सित पूर्ण केलें.

अस कारण जगदेव सीस कंकालि हि अप्यौं ।

– बैताल.

छत्रपति शिवाजी हिन्दुन भान ।
होते नहिं सेवा होति तुरकान ॥ ८ ॥

शाहु कृपापात्र काळू लघु भ्रात ।
संभ ये बीर संसार विख्यात ॥
काळू के पुत्र बिचोट बहु बीर ।
तक्कुजि पुँवार महा रणधीर ॥ ९ ॥

होते. § (त्यांनीं) मोंगलांना मारून (हिंदु) धर्माचें रक्षण केलें. (लोक म्हणतात) शिवाजी महाराज हिंदु धर्माचे सूर्य होत. ते (अवतरले) नसते तर (सर्वांनाच) यवनांची सेवा करावी लागली असती.

९-११ शाहू महाराजांच्या कृपेला पात्र असलेले काळोजी व (त्यांचे) कनिष्ठ बंधु संभाजी हे (पवार कुळांतील) जगप्रसिद्ध वीर होत. काळोजींचे मधले (दुसरे) चिरंजीव तुकोजीराव पवार

§ वास्तविक सातारा ही छत्रपतीची राजधानी, जिंजीहून राजाराम महाराज महाराष्ट्रांत परत आल्यावर, इ. स. १६९८ मध्यें झाली, तोंपावेतों रायगड व नंतर जिंजी ह्या दोनच ठिकाणीं छत्रपतींची राजधानी होती. तेव्हां अशा स्थितींत शिवाजी महाराजांना साताऱ्याचे अधिपति म्हणून कवीनें कसें म्हटलें आहे, हें कळत नाहीं. भूषण कवीनेंही पण आपल्या ' शिवा-बावनीं 'त असेंच म्हटलें आहे:---

दिल्ली दुलहिन भई सहर सितारे की ।
* * *
बाजत नगारे ये सितारे गढवारे के ।

संभ के सुत उदा-आनन्दराव।
मारे मुगलान किये बहु धाव॥
सजे बहु सेन चढ़े बहु बीर।
हय दश सहस्त्र सजे रणधीर॥१०॥
सतरा सै संमत् ब्यॉंसी के साल।
धर मालव ऊपर आय भुआल॥११॥

कुण्डलिया

सारंगपुर आये सबै, करण विजय को काम।
गिरधर बहादुर लई गड़, राजो जुद्ध संग्राम।

हे महा पराक्रमी आहेत. संभाजींचे पुत्र उदाजीराव व आनंदराव ह्यांनीं पुष्कळ स्वाऱ्या करून मोगलांना पराजित केलें. (त्यांच्याजवळ) मोठी सुसज्जित सेना, पुष्कळसे उत्तम योद्धे व दहा हजार सुसज्जित घोडेस्वारही आहेत. वि. सं. १७८२ (इ. स. १७२५) ¶ मध्यें हे राजे * माळव्यावर चालून आले.

१२ (हे) सर्व (वीर) सारंगपुर फत्ते करण्याच्या हेतूनें आले. (त्यावेळीं) सारंगपुरचा किल्ला (मोंगल सुभेदार गिरिधर

¶ रघुवीरसिंहः 'मालवा में युगान्तर' पृ. १७६–७७. गुजर: 'संस्थान देवास–थोरली पाती–पवार घराण्याचा इतिहास' पृ. ४१–४२.

* दक्षिणेंत मुख्यमुख्य मराठा घराण्यांतील कर्तबगार पुरुषास 'राजा' ही पदवी इ. स. ७०० इतक्या जुन्या काळापासून चालू होती (वैद्य: 'श्रीशिवाजी महाराज' पृ. ३) त्यास अनुसरून कवीनें येथें योजिलेली भुआल (राजा) ही पदवी होय.

राजो जुद्ध संग्राम, भिड़े वीर बहु बंका ।
मुगलन कुँ दियो मार, कछु मानी नहिं शंका ।
भारी दिये भगाई, सूबेदार करि शीधो ।
वाहि तेग बिकराल, कब्जो सारंगपुर कीधो ॥१२॥

सोरठा

अनन्द मार्‍यो गयो, उठे बीरता बताय के ।
खरणी बाँधी खरी, महिपति जुद्ध मचाय के ॥१३॥

दोही

खरणी सारंगपुर करि खरी, पीछे गये पलट्ट ।
तक्कूराव रह्यो अकेलो, आयो सँमत उलट्ट ॥१४॥

बहादर ह्याच्या ताब्यांत होता. (तेथें) घनघोर लढाई झाली. (त्या घनघोर लढाईंत बहाद्दर वीर खूप झुंजले. (मराठ्यांनीं) खुल्या दिलानें लढून मोंगलांना पराजित केलें (व) त्यांस अगदीं 'यः पलाय' करावयास लावलें ! (तसेंच) सुभेदारालाही सरळ केलें ! त्यांची तलवार भीषण होय ! तिनें सारंगपुर हस्तगत केलें.

१३ (ह्या लढाईंत) आनंदराम * मारला गेला. (मराठा) सरदारांनीं भयंकर रणकंदन माजवून व पराक्रम गाजवून खंडणी निश्चित केली.

१४ (नंतर) सारंगपुरास खंडणी वसूल करून (मराठे माळव्यांतून) परत गेले, (मात्र) तुकोजीराव पवार एकटेच मागें

* हा गिरधर बहादराचा एक नातेवाईक होता.

दोहा

कोटे खरणी लेन कू, तक्कुराव तब जात।
मारग में चँदेल मिल्यो, हद्द बताये हाथ ॥१५॥

भुजङ्गप्रयात

इते कोप के राव चँदेल ठाड़ो,
मिल्यो आज तोकू तकू बीर गाढ़ो।

राहिले (तों) संवत् पालटण्याचा [अर्थात् नवें वर्ष लागण्याचा] समय आला.

१५ ह्यावेळीं तुकोजीराव कोटचास खंडणी वसूल करण्या-साठीं निघाले. मार्गांत चंदेल राण्याशीं त्यांची गांठ पडली. (त्या दोघांनींही एकमेकांस आपल्या) बाहुबलाची पराकाष्टा करून दाखविली !

१६ चंदेल राणा संतप्त होऊन तेथें उभा राहिला. (तुकोजीराव त्यास म्हणालें) "तूं बहाद्दर वीर असशील पण आज ह्या तुकोजी-

---

* उत्तर हिंदुस्थानांत संवत् बदलण्याच्या २-३ प्रथा रूढ आहेत, त्या पैकीं माळव्यांत सर्वसाधारणपणें तो आपल्या ७ महिने अगोदर चैत्र (मार्च) महिन्यांत बदलत असतो. तेव्हां नवीन संवत् सुरू होण्याचा समय आल्याच्या ह्या येथें कवीनें केलेल्या निर्देशावरून सारंगपूरच्या लढाईचा काळ काढतां येण्यासारखा आहे. सन १७२५ च्या ऑक्टोबर (आश्विन) महिन्यांत दसरा झाल्यावर मराठी फौजा माळव्यांत जाण्यास निघून सन १७२६ च्या मार्च-एप्रिल (फाल्गुन-चैत्र) पावेतों त्या माळव्यांतच राहिल्या होत्या. (रघुबीरसिंह: मा. यु. पृ. १७६-१७७) तेव्हां तो काळ ह्या दरम्यानचा होता, म्हणजे मार्च १७२६ च्या सुमारास ही लढाई झाली, हें स्पष्ट होतें.

धरा मालवे पै कऱ्यो भोत धावा,
अबे दुष्ट तू ठीक अब हाथ आवा ॥१६॥

पुरी पाँच हज्जार है फौज मेरी,
सभी फौज मारूँ लऊँ जान तेरी।
सुनेरी करी पीठ हौदा कसाये,
सभी सेन के वीर शिवगण जशाये ॥१७॥

कहुँ अश्व बोले कहूँ वीर डोले,
जरीपट्ट नीशाण कहूँ तेग तोले।
नगारा घुरे फौज में सिन्धु लागे,
खड़े तोप तल्वार ले वीर आगे ॥१८॥

उभै बावने वीर हुँकार मारे,
कहूँ शूर सामंत पुहुमी पछारे ॥१९॥

रावाशीं तुझी गांठ आहे. आतांपर्यंत तूं माळव्याच्या मुलुखावर बरेच हल्ले केलेस. अरे दुष्टा, आतां तूं चांगला हातीं आला आहेस.

१७ "माझी फौज पुरती पांच हजार आहे. तुझी सारी फौज कांपून काढतो (व) तुला ठार करतो." (चंदेल राण्याच्या सैन्यांतील) हत्तींच्या पाठींवर सैन्याचे हौदे कसलेले होते (व त्याचे) सर्व सैनिक शंकराच्या गणांसारखे (भयानक) दिसत होते.

१८-१९ कोठें अश्व खिंकाळत होते (तर) कोठें वीर (अभिमानानें) डोलत होते. जरीपटक्याचें निशाण (फडफडत होते). कोठें [वीरांनीं] तलवारी उभारलेल्या होत्या. समुद्रासारख्या

दोहा

बाजीराव हुकुम दियो, धवल तकू ढिग धाय ।
आनन्द-सुत ते आखियो, जशवन्त राव कु जाय ॥२०॥

जशवन्त चढ़ियो जोर शूँ, हिय में बहु हर्षाय ।
कोटा के मिलियो कने, धयि मिलियो दोउ आय ॥२१॥

रोक तकू इत राखिये, उतते जशवन्त आय ।
व्याकुल चँदेल भयो बिच, गयो भाग बेगाय ॥२२॥

(पसरलेल्या) फौजेंत नगारे वाजू लागले. (सारे) वीर तोफ, तलवार घेऊन (लढण्यासाठीं उत्सुकतेनें) समोर उभे राहिले. उभय (पक्षांचे) शूर वीर जोरानें हुंकार ध्वनि करीत होते व कोठें म्हणत होतें कीं, ह्या सरदाराला (आतां आम्हीं) जमिनीवर लोळवूं.

२० बाजीराव (पेशवे) ह्यांनीं आज्ञा केली कीं, वीर तुकोजीराव (माळव्यांत एकटे असल्यानें) त्यांच्या मदतीसाठीं धांवून जावें. (तेव्हां) आनंदराव (पवार ह्यांनीं आपले) पुत्र यशवंतराव ह्यांस येऊन सांगितलें कीं, तुम्ही (तुकोजीरावांकडे) जा.

२१ यशवंतराव उत्साहित झाले. मनांत (त्यांना) फार आनंद झाला. वेगानें चालत जाऊन (ते) कोटयाजवळ (ज्या ठिकाणीं तुकोजीराव व चंदेल हे) दोघे होते (तेथें) येऊन दाखल झाले.

२२ इकडे तुकोजीरावांनीं (चंदेल्याला) अडवून धरले होतें (तोंच) तिकडून यशवंतराव (तेथें) येऊन थडकले (त्यामुळें) चंदेल

छप्पय

गज गहनो उतराइ, हेम चाँदि का हुद्दा।
जरिपट लियो निशाण, चँवर चौघडिया सुद्धा॥

घड़ी छड़ी चपड़ाश, छत्र ताहि मर्तब लीन्हा।
सब लूट्यो सामान, डेरा नृप उतहि कीन्हा॥

सब सौंप राव जशवन्त कू, भेंट सितारे भेज दियो।
छत्रपति देख राजी भयो, राजन बिचै तारीफ कियो॥२३॥

त्या उभयतांच्या दरम्यान सांपडून घाबरानिबरा झाला (व) सर्व सोडून पळून गेला.

२३ (तेव्हां चंदेल्याची फौज तुकोजीरावांनीं लुटली.) हत्तींचे अलंकार (व) सोन्याचांदीचे हौदे काढून घेतले. चंवरीचौघडद्या-सुद्धां जरीपटक्याचें निशाण घेतलें. घडी, छडी, चपरास, छत्र (व इतर) मरातब हीं त्यांचीं (सर्व राजचिन्हेंही) घेतलीं (व इतरही) सर्व वस्तु लुटल्या (आणि) तेथेंच त्यांनीं (आपल्या सैन्याचा तळ दिला. (नंतर) सारी (लूट तुकोजीरावांनीं) यशवंतरावांच्या हातीं सोंपवून ती भेट म्हणून साताऱ्यास पाठवून (छत्रपतींना अर्पण केली).* तें पाहून छत्रपति प्रसन्न झाले (व त्यांनीं सर्व) सरदारांसमोर (तुकोजीरावांची) प्रशंसा केली.

* अत्रे: 'गणेगांवकर पवारघराण्याची बखर' पृ. १०.

दोहा

सुबेदार सजि के सबै, महमद खान मरद ।
इलाहबाद ते आवियो, गढ़ से उड़ै गिरद ॥२४॥

खटक्यो आई बुँदेलखंड, छत्रसाल पर जाइ ।
झट अब तज दे राज कू, नृप अब बचसी नाहिं ॥२५॥

वृद्ध उमर कैसे बने, लड़नो अब ललकार ।
पेशवा कु अर्जि पेश की, बाजीराव उबार ॥२६॥

२४ पराक्रमी (मोंगल) सुभेदार महंमदखान (बंगष हा) सर्व प्रकारें सुसज्जित होऊन अलाहाबादेहून निघाला. (मार्गांत त्याच्या सैन्याच्या हल्ल्यांनीं उध्वस्त होणाऱ्या) किल्ल्यांची धूळ उडत होती.

२५ बुंदेलखंडांत येऊन (तो) थडकला * (व) छत्रसालावर चालून जाऊन (त्यास त्यानें निरोप पाठविला कीं,) 'हे राजा, तूं आतां चटकन् (आपलें) राज्य सोडून दे. (कारण माझ्यापुढें तुझा) आतां टिकाव लागणार नाहीं.

२६ (छत्रसाल) वयोवृद्ध झाला असल्यामुळें (त्याला) आतां आव्हान देऊन (शत्रूबरोबर) लढणें कसें शक्य होतें ? (त्यानें) पेशव्यांस विनंतिपत्र पाठविलें (कीं,) 'बाजीराव, (माझें) संरक्षण कर.

---

* सन १७२७–२९ चा प्रसंग.

गज को ग्राहन घेरियो, महमद घेऱ्यो मोहिं ।
कृपा प्रभू तापर करी, महिपति तारहुँ मोहिं ॥२७॥

छप्पय

बाजीराव खत बाच, खत तक्कूराव लिखायो ।
तक्कूराव चलि तुरत, फौज के सामिल आयो ॥
जुद्ध करी कोप के तहाँ, मिया को मार भगायो ।
बुँदेलखंड बचाई, राजन को राज रखायो ॥

२७ 'मगरानें गजेंद्राला वेढिलें होतें [तद्वत्] महंमदखानानें मला वेढिलें आहे. देवानें त्याच्यावर कृपा केली [तशी] हे राजा, [तूं माझ्यावर कृपा करून] मला [ह्या संकटांतून] वांच व.

२८ बाजीरावांनीं [तें] पत्र वाचून तुकोजीरावांना पत्र लिहविलें, [त्यामुळें] तुकोजीराव ताबडतोब येऊन मराठ्यांच्या सैन्यांत सामील झाले. तेथें [बुंदेलखंडांत] त्यांनीं आवेशानें * लढून महंमद बंगषाला पिटाळून लाविलें. [अशा प्रकारें] बुंदेलखंडाचें रक्षण करून छत्रसालाचें राज्य कायम राखिलें, [ते व्हां] छत्रसाल राजानें आनंदित होऊन 'तुम्हीं मला जीवदान दिलें आहे' [असें म्हणून मराठ्यांना] अडीच लक्ष उत्पन्नाचा एक परगणा अर्पण केला.

* येथें 'कोप' शब्दाचा अर्थ आवेश (रणावेश) होय. 'कोप' चा असा अर्थ अन्यत्रही आढळतो, उदाहरणार्थ:—

कोप्यो समर श्रीराम । —तुलसीदास.

नृप छत्रसाल होकर खुशी, जीवदान तुम मुँहिं दियो ।
अढ़ाई लाख की उपज को, परगना एक अर्पण कियो ॥२८॥

दोहा

बाबुराव कू उन बखत, हुकुम दियो हुजूर ।
तकूराव कू लाय तू, प्रण को कर दूँ पूर ॥२९॥

पद्धरी

तकूराव गयो दरबार माँहिं ।
छत्रपति शाहु दोउ मिल्यो ताँहिं ॥
निज कंठ लगाई तारीफ कीन्ह ।
चौघडिया जरीपट हाति दीन्ह ॥३०॥
महि मर्तब सब दीन्हीं नृपाल ।
कीन्ही तारीफ होकर कृपाल ॥

२९ [ह्यानंतर] छत्रपति शाहू महाराजांनीं बाबुराव [राम अत्रे] ह्यांस आज्ञा केली [कीं], तुम्ही जाऊन तुकोजीरावांस घेऊन यावें [म्हणजे त्यांच्या पराक्रमाबद्दल त्यांचा गौरव करण्याविषयींचा आमचा] संकल्प [आम्ही] पूर्ण करून घेऊं.

३० तुकोजीराव छत्रपतींच्या दरबारीं गेले. तेथें [ते व] छत्रपति शाहू महाराज ह्या दोघांच्याही भेटी झाल्या. [छत्रपतींनीं] अलिंगन देऊन [तुकोजीरावांची] प्रशंसा केली [व] त्यांस चौघडा, जरीपटका [आणि] हत्ती बक्षिस दिले.

३१ [तसेंच] तुकोजीरावांस [छत्रपति शाहू महाराजांनीं] जहा-

शाहु तकु रानी बहिन कीन्ह।
चूड़ी में उन्हें एक ग्राम दीन्ह ॥३१॥

नरु कवि कहे तुहि धन्य मात
नृप तेगे सुजश बण्यों न जात ॥३२॥

गीर* व सर्व मानमरातब दिले व कृपावंत होऊन त्यांची प्रशंसा केली. (त्याशिवाय) तुकोजीरावांच्या पत्नी (सावित्रीबाई) ह्यांनाही शाहू महाराजांनीं वहीण मानून (चोळी) बांगडीसाठीं एक गांव इनाम दिला. ×

३२ नरू कवि म्हणतो ' हे राजा (तुकोजीराव), तुझी माता धन्य होय. तुझें सुयश वर्णन करणें दुरापास्त आहे !

---

* अर्थात् देवासचा सरंजामी मुलुख.

× गणेगांव (जि. पुणें) येथें त्यासंबंधींचें उत्पन्न अद्याप चालूं आहे.

२ पालखेड-संग्राम

(सन १७२८ ई.)

दोहा

अलि निजाम की अक्क ने, इक दिन लह्यो बिचार ।
मरहट्टन-खट-सुबन सों, लहैं चौथ इणबार ॥१॥

तब निजाम निज सेन में, दियो हुकुम करवाय ।
चन्द्रसेन जादव कहो, कोल्हापुर संभाय ॥२॥

१ एके दिवशीं अलि निजामच्या [निजाम उलमुल्काच्या] अकलेनें विचार केला कीं, [दक्षिणेंतील] सहा सुभ्यांची * चौथ मराठ्यांना वसूल करूं देऊं नये.

२ तेव्हां निजामानें आपल्या सैन्यांत [त्याप्रमाणें] हुकुम सोडले [व] चंद्रसेन जाधव [आणि] कोल्हापुरचे संभाजी महाराज ह्यांसही [तसें] कळविण्यास सांगितलें.

---

* खानदेश, वऱ्हाड, हैदराबाद, बेदर, विजापूर व कर्नाटक ह्या दक्षिणेंतील ६ सुभ्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याच्या सनदा बादशहापासून बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनीं मिळविल्या होत्या, त्याची अंमलबजावणी मात्र पहिले बाजीराव पेशवे ह्यांनीं पेशवाईपदावर आल्यानंतर नेटानें सुरूं केली. (बेहरे: 'पहिले बाजीराव पेशवे', पृ. ८९).

सोरठा

संभाजी महाराज, कोल्हापुर वाले कहो।
चन्द्रसेन चलि आव, जादव जुगत विचार के॥ ३॥

पद्धरी

कहत निजाम तुम सुनो शूर।
संभाजी राज चढ़ते नूर॥
जादव चंद्रसेन ही नाम।
तुम करो फौज तैयार तमाम॥

३ तुम्हीं दोघे मनसुबा योजून निघून या [असें निजामानें] कोल्हापुरकर संभाजी महाराज व चंद्रसेन जाधव ह्यांना कळविण्यास सांगितलें.

४ [त्या संदेशांत] निजामानें [गौरवून] म्हटलें होतें [कीं], ' हे संभाजी राजे, तुम्ही वर्धिष्णु भास्कर आहांत. हे चंद्रसेन जाधव, [तुमचें] नांव [मोठें] आहे. तुम्ही आपली संपूर्ण सेना सज्ज करा. *

* शाहू महाराजांचा उच्छेद करण्यास संभाजी महाराजांस निजामानें चंद्रसेन जाधवामार्फत प्रवृत्त केलें होतें. (सरदेसाई: मराठी रियासत म. वि. १ पृ. १८४–८५)

शाहू शिशोद से करो बेर ।
  निज राज काज करते न देर ॥
लूटी तमाम निज देश जाय ।
  सेना समेत दई भगाय ॥ ५ ॥
यह सुनत बीर मारू बजाय ।
  भैरवी सिंधवी राग गाय ॥

५ आपल्या राजकारणांत विलंब न करतां शाहू शिसोद्याशीं¶ युद्ध पुकारा. [तो] आपला तमाम मुलुख लुटून राहिला आहे [तेव्हां] त्यास फौजेसह पिटाळून लावा.

६ [निजामाचा] हा आदेश ऐकून सैनिक लोक मारू*

¶ छत्रपति शिवाजी महाराजांचें घराणें उदेपुरच्या शिसोदे राज-घराण्याची एक शाखा असल्याचें सर्वश्रुतच आहे, त्यास उद्देशून पण मुद्दाम असूया बुद्धीनें छत्रपति ही मुसलमानांना सलणारी पदवी न उच्चारतां निजामानें ह्या प्रसंगीं शाहू महाराजांस शाहू शिसोदे असें म्हटलें आहे. शिवाय ह्यांत शाहू महाराजांस कमी मानून कोल्हापूरकर संभाजी महा-राजांस वर चढवून त्यांनें खुषामत केलेलीही दिसते, हेंही येथें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

* युद्धाच्या वेळीं वाजविला जाणारा व श्रीरागाचा पुत्र मानण्यांत येणारा हा एक राग.

भेरि नफीरि बाजे सहनाई । मारू राग सुभट सुखदाई ॥
— तुळसीदास.

सैयद समर्थ भूप अली, अकबर दल चलत,
बजाय मारू दुंदुभी धुकान की ॥
— गुमान मिश्र.

फिर करी तुरत तोपाँ तयार।
असमान-मंजिल-लुकमानगार ॥ ६ ॥

दोहा

सजे सेन शूरा सुभट, हय गज सैस हजार।
प्यादल संग में पाँच सै, ऊंट दमामी लार ॥ ७ ॥
लूट सब करने लगे, भगे लोग बेगाय।
हाँक-धाक सब दुर भई, बूझी बाजीराय ॥ ८ ॥

राग वाजवूं लागले [व] भैरवी $ [आणि] सिंधवी ¶ राग आळवूं लागले. नंतर गगनचुंबित वाडे सहज गिळंकृत करणाऱ्या अशा तोफा त्यांनीं तेव्हांच तयार केल्या.

७ घोडे हत्तींवरील सैन्य दहा * हजार [तसेंच] पायदळ पांचशें [व] लहान नगारे लादलेले उंट [अशी शत्रूकडील ती] लढवय्या वीरांची सेना सिद्ध झाली.

८ [मराठ्यांच्या राज्यांत शिरून ती] सर्व सेना लूटमार करूं लागली [त्यामुळें सर्व] लोक घरदार सोडून पळाले. सर्वत्र हलकल्लोळ माजला. [ही बातमी] बाजीरावांना समजली.

$ एक रागिणी. ही भैरव रागाची व कांहींच्या मतें मालव रागाची सहधर्मिणी होय. परंतु हनुमंताच्या मतें ही संपूर्ण जातीची रागिणी आहे.

¶ एक रागिणी जी आभिरी व आशावरी ह्यांच्या मिश्रणानें तयार होते.

* सैस= शेष. सांकेतिकार्थ आठ होय.

मोतियदाम

भगे अब लोग सबै भय खाय,
गये दरबार के बीच समाय।
करें मिलि कूकई हूक अपार,
सुनी शाहूराज सबै सरदार ॥ ९॥

करो अब जुद्ध सबै मिली शूर,
दियो फरमाय बजाय के तूर।

९ आतां भयभीत होऊन सर्व लोक पळाले [व शाहू महाराजांच्या] दरबारीं येऊन गोळा झाले. [त्यांनीं आपलें दुःख-निवेदनार्थ जो] हाहाकार केला त्यास पारावार नव्हता! शाहू महाराज व सर्व सरदार ह्यांनीं [तो] ऐकला.

१० [लागलेच शाहू महाराजांनीं] रणदुंदुभि वाजवून आज्ञा केली * कीं, सर्व वीरांनीं [सरदारांनीं] मिळून आतां [शत्रूबरोबर] युद्ध करावें, हें समजतांच पुण्यपत्तनेश्वर [पुण्याचे अधिपति] बाजीरावही लगेच शाहू महाराजांपाशीं येऊन दाखल झाले.

---

* अर्थात् छत्रपति शाहू महाराजांनीं आपल्या सर्व सरदारांस आज्ञापत्रें पाठविलीं (वाडः छत्रपति शाहू महाराज–रोजनिशी ले. २०) असा मूलार्थ.

राणोजी शिंद्यांनीं सर्व सरदारांस लढाईस सज्ज होऊन येण्यासाठीं पत्रें लिहिलीं होतीं त्यांत तुकोजीराव पवार ह्यांना आणण्यासाठीं माणसें पाठविलीं होतीं. (पेशवे दप्तर पु. १० ले. ४१)

सुनी बाजीराव हि पुन्न नरेश,
 हुए शाहुराज के आ झठ पेश ॥१०॥

दियो तब सेन कु हुक्म सुनाय,
 करो मिलि जुद्ध तणी सब राय ।
सेनापति राणुजि सैंधिय राय,
 लई सब शास्त्र हि फौज बनाय ॥११॥

हुल्कर मालव राय मल्हार,
 लियो निज संग हि जोध अपार ।
उदाजी आनंद राव अजीत,
 लियो किशनेस नरेश हि रीत ॥१२॥

११ (त्यांनीं) मग सैन्यास हुकूम दिला कीं एकत्र होऊन, (एकदम शत्रूशीं) लढाई करा. (त्याप्रमाणें) सर्वांनीं निश्चय केला सेनापति राणोजी शिंद्यांनीं सर्व शस्त्रास्त्रांसह सेना सिद्ध केली.

१२ मालवपति * मल्हारराव होळकर ह्यांनीं आपले अगणित योद्धे बरोबर घेतले. (तसेंच) रीतीप्रमाणें अजिक्य असे उदाजीराव, आनंदराव (व) कृष्णाजीराव (ह्या पवार) सरदारांनाही (पण) बरोबर घेतले.

---

* ह्या विशेषणावरून माळव्यांत ह्यावेळीं मल्हारराव होळकरांचें, जास्त वर्चस्व असावें, असें दिसतें.

तकूजी नृप माल्हाजि पुँवार,
पाँचो भड़ फौज लियो सब लार।
रायाजी जादव जोड़ जरूर,
सर लष्कर दावल सेन हि पूर ॥१३॥

हुए संग ले सरदार समेत,
मिले रणबँब बजावत खेत।
हुए असवार हि पाँच हजार,
लड़े रण-खेत बजे तलवार ॥१४॥

दुहुँ दल माचिय बहुत हि कीच,
लड़े भड़ गिद्ध सियाल हि खींच।

१३ सरदार तुकोजीराव व मालोजीराव (हेही बरोबर झाले. ह्या एकंदर) पांच पवार वीरांनीं सर्व फौजफांटा बरोबर घेतला. आवश्यक अशी रायाजी जाधवाची जोड (व) दावलजी सरलष्कराची अफाट सेनाही (त्यांच्या समागमें) होती.

१४ युद्धगीतें रणवाद्यांवर वाजवीत येणाऱ्या सर्व सरदारांना (बाजीराव पेशवे ह्यांनीं) बरोबर घेतलें. पांच हजार घोडदळ तयार झालें. रणक्षेत्रावर (ते) लढूं लागले. तलवारींचा खणखणाट होऊं लागला.

१५ दोन्हीं पक्षांकडील सैंनिकांच्या (प्रेतांचा) मोठा खच पडला. (तीं) प्रेतें, खेंचतांना गिधाड व कोल्हेही भांडूं लागले!

उठे असमान हि गिद्ध अपार,
झटक्कत लेइ उठाइ अहार ॥१५॥

मिले इत चन्द्रसेन हि आय,
संभा महाराज लियो दल भाय ।
भिड़े दुहुँ बीच हि बीच अभंग,
बजे तलवार मचे बहु जंग ॥१६॥

तुपाँ घनघोर बरच्छि कटार,
फटक्क हि कुंजर पिंजर टार ।

[शिवाय] आकाशांतही असंख्य गिधाडें उडूं लागलीं [व तीं] एकदम झडप मारून आपलें खाद्य उचलून नेऊं लागलीं.

१६ संभाजी महाराज दळभार घेऊन आले [तों त्यांस] तेथें चंद्रसेन जाधव येऊन मिळाला. [ते] दोघेही लढाईच्या ऐन मध्यभागीं शिरून न डगमगतां लढूं लागले. तलवार खणखणूं लागली [व] लढाई भयंकर जुंपली.

१७ घनघोर तोफा, वच्छर्या, कटचारी [चालल्या]. उत्तमोत्तम हत्ती, घोडे सैरावैरा दौडूं लागले. रणक्षेत्रांत लढतांलढतां कित्येक शिरें कांपलीं गेलीं [व तीं] मटकावत भैरव देव तृप्त झाले. ×

× अशा प्रकारचें वर्णन अन्यत्रही आढळतें. उदाहरणार्थ–

तत्तत्पताकिनीपालकपालकृतकुण्डले ।
भैरवीभिस्समं भूरिमत्ते भैरव मण्डले ।।८५।। शिवभारत, अ १२

लड़े रण खेत कटे कई शीश,
मटकत धाय हि भैरव ईश ॥१७॥

दोहा

शाहू मरहट मुलक पै, दियो हुकुम कर दंभ ।
चन्द्रसेन जादव बली, कोल्हापुर-पति संभ ॥१८॥

चन्द्रसेन संभा चढ़े, लूटन शाहू राज ।
खबर परी पति-पेशवा, मुगल न आवे बाज ॥१९॥

हुकुम हुओ पति पेशवा, राणो सेंध्या राज ।
अखिल फौज=पति आपने, करहु इकट्ठे आज ॥२०॥

१८ निजामानें घमेंडींत येऊन कोल्हापुरच्या संभाजी राजांस व प्रतापी चंद्रसेन जाधवास शाहू महाराजांच्या मराठी मुलुखावर [चालून जाण्यास] सांगितलें होतें.

१९ [व त्याप्रमाणें] संभाजी राजे [व] चंद्रसेन ह्यांनीं शाहू महाराजांचें राज्य लुटण्याकरितां हल्ला चढविला. [आतां] मोंगल सहजासहजीं स्वस्थ बसत नाहींत, हें बाजीराव पेशवे ह्यांना कळून चुकलें.

२० बाजीराव पेशव्यांचा सरदार राणोजी शिंद्यांस हुकुम झाला कीं, आज [उद्यांत] आपले सर्व सेनापति एकत्रित करा.

* पेशवे दफ्तर, पु. १० ले. ४१

एवज़ एवज़ खान को, भज्यो मरहठ पास ।
ले विशाल चतुरंगिनी, चाल्यो करन बिनास ॥२८॥

आवत सेन निजाम की, हिय बिच कऱ्यो बिचार ।
राव तकू लिखि भेजियो, पति–सितार पै सार ॥२९॥

मनहरण

बाजीराव पेशवा पै लिख के पठायो दूत,
हिम्मत न हारियेगा पुहुमि हिलाय दूँ ।
मुगलन की बात कहाँ मरट्ठन बिनास करे,
आप के प्रताप हू को जग में जमाय दूँ ॥

बहादरानें निजामाला बातमी कळविली (कीं आपली) तमाम फौज कांपली गेली.

२८ (तेव्हां कुंवरबहादराच्याऐवजीं दुसरा सरदार) ऐवजखान ह्याला (निजामानें) मराठ्यांवर चालून जाण्यास पाठविलें. विशाल चतुरंगिनी सेना बरोबर घेऊन (ऐवजखान मराठ्यांचा) नाश करण्याकरितां निघाला.

२९ निजामाची सेना येत आहे (हें पाहून) मनांत विचार करून तुकोजीराव (पवार) ह्यांनीं छत्रपतींना पत्र लिहून पाठविलें, त्याचा मतितार्थ असा होता:–

३० ‘बाजीराव पेशव्यांना दूताच्या हातीं पत्र लिहून पाठविलें आहे कीं, हिंमत हरूं नका. (मी) पृथ्वी हलवून सोडीन !

करके कृपा जो आप सहस्त्र बीर और भेजें,
निजामी सेन सारी मैं मिट्टी में मिलाय दूँ।
प्रबल प्रतापी राव तक्कूजी तनिक ओर,
दीन्हो निरदेश यह जाहिर कराय दूँ ॥३०॥

दोहा

खबर सुनत भेजी तुरत, सेना एक हजार।
बाजीराव खुद चढ़ि चल्यो, करि निजाम पर वार ॥३१॥
वार करन बरहानपुर, चढ़ियो बाजीराव।
चाल चली शतरंज की, यह सैनिक को दाव ॥३२॥

मोंगलांची काय मजाल आहे कीं ते मराठ्यांचा नाश करतील ! आपला (मराठ्यांचा) प्रताप (मी) जगांत प्रस्थापित करून देईन.' (ह्याशिवाय) प्रबळ प्रराक्रमी अशा तुकोजीरावांनीं (त्या पत्रांत) आणखीं थोडें काय निर्दिष्ट केलें होतें, तेंही [मी=कवि] सांगतों. (त्यांनीं) लिहिलें होतें कीं, 'कृपा करून आपण आणखी एक हजार वीर पाठवाल तर निजामाची सारी फौज मी धुळीला मिळवून देईन !*

३१ (तुकोजीरावांकडील) बातमी ऐकतांच (बाजीरावांनीं) ताबडतोब एक हजार फौज (त्यांच्या मदतीसाठीं) पाठवून दिली (व) स्वतः बाजीरावही निजामावर हल्ला करण्यास निघाले.

३२ बऱ्हाणपुरावर हल्ला करण्याकरितां बाजीराव चालले.

* पेशवे दप्तर-पु. १० ले. ४६

भय बताय बरहानपुर पुहुँच्यो, गढ़ गुजरात।
इत निजाम आयो मदद, मिल्यो न रातो रात ॥३३॥
पायो नहिं पति-पेशवा, चिढ़ियो मन नीजाम।
जानि चलाकी चढ़ि चल्यो, पूना करन संग्राम ॥३४॥

मनहरण

शाहू महाराज सुनी आवत निजाम चढ़,
देख वाको क्रोध मन कायरता लायदी।

बुद्धिबळांतली जशी चाल असते तसा (हा) फौजी डाव होता !

३३ बऱ्हाणपुरावर (चाल करण्याची) भीति घालून (ते) गढ गुजराथमध्यें पोहोंचले.× (त्यांचा डाव न कळल्यामुळें) निजाम रात्रींच्या रात्रीं (बऱ्हाणपुरला आपल्या लोकांच्या) मदतीसाठीं (धांवून) आला (पण त्यास बाजीराव तेथें) भेटले नाहींत.

३४ बाजीराव पेशवे न भेटल्यामुळें निजाम मनांत चिडला (व बाजीरावांची ही) हुलकावणी ओळखून (सूड घेण्याकरितां तो) पुण्यावर हल्ला करण्यास निघाला. (अर्थात् ही त्याची उलट चाल होती.)

३५ निजाम (पुण्यावर चाल करून) येत आहे हें ऐकून (व) त्याचा राग पाहून शाहू महाराज मनांत भयभीत झाले. त्यांच्याजवळ

× गुजर : सं. दे. थो. पा. प. घ. इ. पृ. ४६

साहित न पास वाके सेना को समूचो संग,
यासौं उन वीरवर धीरजता ढायदी ॥
ईश्वर ने ऐसी करी बीच हूँ में बूड़ी नाव,
मन की उमंग सारी मन में रखाय दी ।
तक्कूजी पुँवार हूँ ने तुरत कसारी घाट,
मुगलन की सेना ठौर ठाम पै डटाय दी ॥३५॥

दोहा

रायाजाधव जुरि पऱ्यो, मदद तकूजीराव ।
दोन्हों मिलि दलने दुवन लगिग बीर उम्हाव ॥३६॥

(लढाईचीं) साधनें नव्हतीं (व) पुरता सेनासंघही नव्हता, त्यामुळेंच त्या वीरश्रेष्ठ (शाहू महाराजांनीं) धीर सोडला; (परंतु) ईश्वरानें (ह्यावेळीं) असें घडवून आणलें कीं निजामाच्या आशेची) नौका अर्ध्या मार्गांतच बुडवून दिली व (त्याचा) चेव मनांतल्या मनांत जिरवून टांकला. तुकोजीराव पवारांनीं (जाऊन) कसारी घाटांत मोंगलांच्या फौजेला जागच्या जागींच अडवून धरलें.*

३६ रायाजी जाधव हे तुकोजीरावांच्या मदतीसाठीं येऊन मिळालें, (तेव्हां ते) दोघेही वीर मिळून शत्रूचा नायनाट करण्यास उत्साहित झाले.

* पुरंदरे दफ्तर भा. ३ ले. १७६

मनहरण

बाजीराव पेशवा को पाकर हुकुम इन,
भेज दीन्हें दूत अब आवन चढ़ाई है।
मल्हारराव हुल्कर औ उदाजी पुँवार औ,
कृष्णाजी, तक्कूजी अरु आनन्द भी पाई है॥
माल्लूजी पुँवार और जाद्व रायाजी और,
दावलजी लष्कर को इत्तला मिलाई है।
मेटन में ठठ्ठ आज मुगलन के बीर सारे,
होकर सजग इन मंडली बनाई है॥२१॥
पाकर सजग फौज पेशवा की प्यारी इत,
उत भी दुधारी तलवार दिखलाई है।

२१ बाजीराव पेशव्यांचा हुकुम मिळतांच (राणोजी शिंद्यांनीं) आतां लढाईचा प्रसंग आला आहे (हें कळविण्यासाठीं सर्वांकडे) दूत पाठवून दिले. मल्हारराव होळकर, उदाजीराव पवार कृष्णाजीराव पवार [विश्वासराव], तुकोजीराव पवार व आनंदराव पवार ह्यांनाही (खबर) मिळाली. मालोजी पवार, रायाजी जाधव व दावलजी सोमवंशी [सरलष्कर] ह्यांनाही निरोप पोहोंचला. मोंगलांच्या सर्व सैन्याचा (अर्थात् निजाम व त्याच्या पक्षाच्या सर्व वीरांचा) नायनाट करण्याकरितां तयार होऊन ही सर्व मंडळी आज एकत्र झाली आहे.

२२ इकडे पेशव्यांची ती प्रिय सेना (युद्धासाठीं) सज्ज

बहादुर कुंवर को दीन्हो है निजाम हुक्म,
मरहठ मिटाओ आज अपनी भलाई है ॥

वीरन को वीरवर वीर थो बहादुर यों,
आकर अटक गयो कंटक की खाई ।
कृष्णाजी तक्कूजी वाको जमराम से दिखाये,
धाये ललकार भूखे बाघ से दिखाये हैं ॥२२॥

दोन्हों ओर वीरन की चन्द्रहास चाली उत,
हैकर उताली अब काली सी दिखाई है ।
खाय खाय खप्पर को शोणित भरन लागी,
डकर करन लागी डिंडिमी बजाई है ॥

झालेली पाहून तिकडे (शत्रूकडूनही आपली) दुधारी तलवार बाहेर काढली गेली. निजामानें कुंवरबहादुराला हुकुम दिला (कीं), मराठयांचा आज नायनाट करा, त्यांतच आपलें हित आहे. तसा वीर कुंवरबहादुर (साऱ्या) वीरांत श्रेष्ठ वीर होता; (परंतु तो) कांटाच्या दरींत (अडकावें तसा तेथें) येऊन अडकला. त्याला कृष्णाजीराव (व) तुकोजीराव (पवार) हे यमराजासारखे दिसले (व) त्यांच्या गंभीर गर्जना भुकेलेल्या वाघासारख्या वाटल्या.

२३ तिकडे (रणक्षेत्रावर) दोन्ही पक्षांच्या वीरांच्या तलवारी चालल्या. काली देवता आतां उतावीळ दिसूं लागली. तिला खायखाय सुटली. मृत्तिका पात्र रक्तानें (भराभर) भरून (तें ती सारखी पिऊं लागली), ढेंकरा देऊं लागली व

जुत्थन पै जुत्थ जुत्थ लुत्थन पै लुत्थ लुत्थ,
मुगलन मरट्ठन की लुत्थन लुनाई है।
जीरण सी माला देखि शिवजी उताला भये,
लेकर नवल माला शृंगी को बजाई है॥२३॥

दोन्हों ओर वीरन की लुत्थन परन लागी,
अधिक गुड़न लागी मुगलन निजाम की।
कृष्णाजी तक्कूजी हूँ की झाट नहीं झेल सक्यो,
कुँवर बहादुर गयो भाग तज ठाम की॥
दूतन खबर दीन्ही नायक जू भाग गये,
हृदय दहल उठ्यो बात बदनाम की।
कोप करि पूरो आज भेजत विशाल फौज,
मरट्ठन ते हारिबे में बात है हराम की॥२४॥

(हर्षभरानें) डिंडिमी वाजवूं लागली. झुंडीवर झुंडी, प्रेतांवर प्रेतें आदळूं लागून मोंगल व मराठेवीर कांपले जाऊन त्यांच्या प्रेतांच्या राशी पडूं लागल्या. (ह्या वेळीं रणभूमीवर शिरांचा खच पडलेला होता त्यामुळें) शंकर आपल्या गळ्यांतील रुंडमाळा जीर्ण झालेली पाहून उतावीळ झाले व (ती टांकून देऊन) त्यांनीं (रणभूमीवरील शिरांची) नवीन रुंडमाळा धारण करून शृंगी फुंकली.

२४ दोन्ही पक्षांकडील वीरांचीं प्रेतें पडूं लागलीं, (त्यांत) अधिक प्रेतें निजामाकडील मोंगल वीरांचीच पडूं लागलीं. कृष्णाजीराव (व) तुकोरजीव (पवार) ह्यांच्या तलवारीचा मारा सहन करणें

दोहा

इत निजाम उत पेशवो, दोउ मचायो जंग ।
भड़ सेना भारत जू, अड़िये भले अभंग ॥२५॥
पकड़ खाँगा पेशवो, नीचो कियो निजाम ।
हाँक हुई सब देश में, पड़ पड़ भगे तमाम ॥२६॥
बचे सो भागे प्राण ले, दी दी खबर निजाम ।
कुँवर बहादुर यूँ कह्यो, कट गई फौज तमाम ॥२७॥

अशक्य झाल्यामुळें कुंवरबहादुर दटून (लढण्याऐवजीं) पळून गेला. (आपल्या) सेनापतीनें पळ काढला ही बातमी दूतांनीं (निजामाला) दिली. ही दुर्लौकिकाची गोष्ट (असल्यानें निजामाचें) अंतःकरण एकदम थरथरलें. (त्यानें) संतप्तपूर्ण होऊन (व) मराठ्यांकडून पराजित होणें ही नामुष्कीची गोष्ट होय, (असें समजून मराठ्यांवर चालून जाण्यासाठीं) लागलीच मोठी फौज पाठविली.

२५ इकडे निजाम (अर्थात् निजामाची सेना) व तिकडे पेशवे (अर्थात् मराठ्यांची सेना) ह्यां दोघांत लढाई जुंपली. भारतीय युद्धाच्या वेळच्या (उभय पक्षांप्रमाणें) हे दोन्ही पक्षांचे वीर हटातटानें लढले.

२६ पेशव्यांनीं तलवार धरून निजामाचा पाडाव केला. देशभर (त्यांचा) दरारा बसला (व) तमाम (शत्रु) पटापट पळून गेले.

२७ वांचले ते प्राण घेऊन पळाले. (त्यांच्याकडून) कुंवर–

गंग किनारे प्रथम थो, पालखेड ढिग आय ।
भयो जंग जब्बर अबै, मरहट तुर्कन पाय ॥३७॥

मनहरण

परिगो निजाम फंद तक्कूजी पुँवार हूँ के,
लेन बदले में आज देन पऱ्यो भारी है ।
भाग चल्यो भय पाय पालखेड घायल ज्यो,
पालखेड ग्राम हूँ में घटना घटारी है ॥

३७ (निजाम) गंगेच्या * (गोदावरीच्या) किनाऱ्याला प्रथम होता (तो) पालखेडजवळ पोहोंचला. (तेथें) आतां मराठ्यांची तुर्कांशीं $ (मुसलमानांशीं) गांठ पडून भयंकर रणधुमाळी माजली.

३८ निजाम तुकोजीराव पवारांच्या जाळ्यांत सांपडला. (मोबदला) घेण्याच्याऐवजीं मोबदला देणेंच आज (त्यास) भारी झालें. तो भीतीनें पळत सुटला (आणि) घायाळ होऊन पालखेडला जों आला तों (त्या) पालखेड गांवीं घटना घडून आली. आज (त्या ठिकाणीं) बाजीराव पेशव्यांशीं त्याची

---

* गंगा म्हणजे गोदावरी. दक्षिणेंत गोदावरीला गंगा म्हणण्याचा प्रघात आहे.

पश्चिमवाही गोदा प्रतिमूळ गंगा । — परशराम (लावणी).

$ तुर्क (तुरुख=तुरुक) हा शब्द मुसलमानांस पूर्वी सर्रास लावीत असत. तो थोडा निंदाव्यंजक आहे. (साने : चिटणीस विरचित शिवछत्रपति चरित्र पृ. २५९)

बाजीराव पेशवा सों भई मुठभेड़ आज,
दोन्हों वर वीरन ने वीरता निकारी है।
दोन्हों दल सागर में गागर गरक भई,
गागर गरक भई तुर्कन की गारी है ॥३८॥

दोहा

घिरिगो वीरन फंद में, अलि निजाम अब आय।
याको वर्णन करत में, रचि तोटक मैं लाय ॥३९॥

तोटक

इत तें पति राव पुँवार चढ़्यो,
उत तें पति पेशव भी उमड्यो।

हातघाईची लढाई झाली. दोघेही वीरश्रेष्ठ आपला पराक्रम प्रकट करण्यास सिद्ध झाले. दोन्ही पक्षांच्या सैन्य-सागरांत (विजयाशेची) घागर डुबक्या घेऊं लागली व (शेवटीं ती) घागर बुडाली. तुर्कांची नामुष्की झाली. (अर्थात् ते पराजित झाले). ¶

३९ आतां निजाम (मराठा) वीरांच्या जाळ्यांत येऊन अडकला (त्यावेळचें) त्याचें वर्णन मी (कवि) तोटक वृत्तांत रचून (पुढें ठेवितों).

४० इकडून तुकोजीराव पवारांनीं हल्ला चढविला. तिकडून

¶ ता. २५-२-१७२८.

इन दोउन के दल सागर में,
इन दोउन के वर बागर में ॥४०॥

इन दोउन के रचि डावन में,
इन दोउन के रिपु खावन में।
इन दोउन के तपि तेजन में,
इन दोउन के बहु ओजन में ॥४१॥
इन दोउन के वरबागर में,
इन दोउन के रणसागर में।
इन दोउन के नयनागर में,
इन दोउन के गुण आगर में ॥४२॥
इन दोउन के वरवीरन में,
इन दोउन के रणधीरन में।

बाजीराव पेशवेही आवेशानें चालून आले, ह्या दोघांच्या सेना-समुद्रांत–ह्या दोघांच्या मजबूत जाळयांत––

४१ ह्या दोघांनीं रचिलेल्या डावांत – ह्या दोघांनीं केलेल्या शत्रूच्या नि:पातांत – ह्या दोघांच्या प्रखर तेजांत – ह्या दोघांच्या बलाधिक्यांत––

४२ ह्या दोघांच्या मजबूत जाळयांत – ह्या दोघांच्या युद्ध-सागरांत–ह्या दोघांच्या नितिनिपुणतेंत--ह्या दोघांच्या गुणसमूहांत–

४३ ह्या दोघांच्या थोर पराक्रमांत–ह्या दोघांच्या रणकौशल्यांत

निजआम पड़्यो अब फंदन में,
इन वीरन के वर वृंदन में ॥४३॥

दुविधानन में अब आनि पऱ्यो,
तुरकानन को मन मोद मऱ्यो।
दुहुँ ओरन तें अब झाट उड़ी,
दुहुँ ओरन तें अब फाग उड़ी, ॥४४॥

दुहुँ ओरन तें अब तोप दगी,
दुहुँ ओरन तें अब आग जगी।
अब आग मुगलन पै बरसी,
ततकालन में उनको झुलसी ॥४५॥

(व) ह्या दोघां वीरांच्या थोर समूहांत आतां निजाम येऊन अडकला.

४४ आतां तो (इकडे जाऊं कीं तिकडे जाऊं अशा) मनाच्या द्विधा अवस्थेंत सांपडला. (त्याच्या) तुर्की फौजेच्या मनांतील आनंद मावळला. आतां दोन्ही पक्षांत खडाजंगीची लढाई सुरूं झाली. आतां दोन्ही पक्ष बेफामपणें लढूं लागून रक्तरंजित होऊं लागले.

४५ दोन्ही पक्षांकडून आतां तोफा डागल्या गेल्या. दोन्ही पक्षांनीं आतां आगीचा कल्लोळ उडविला. आतां आगीचा मोंगलांवर वर्षाव होऊं लागला व (तिनें) तत्काळ त्यांस होरपळून काढलें.

रुँड मुण्डन तें पुहुमी पटगी,
छण में सब गर्व गयो सटकी।
इत बाजियराव बड़ो बरबंड,
तप तेज प्रताप लसे नवखंड ॥४६॥

उत राव तकूजी बड़ो वरवीर,
लसियो मरहट्ठन में रणधीर।
दुर्गति म्लेंच्छन की बहु कीन्ह,
सब माल रु बित्त लिये उन छीन्ह ॥४७॥

पग आन पऱ्यो निज़आम पती,
निज प्रेमन सौं करके भगती।
अपने कर सौं लिख दीन्ह अबै,
न करूं तुम्ह से हरकत्त कबै ॥४८॥

४६ [त्यांचीं] मुंडकी [व] धडें जमिनीवर पडूं लागलीं. क्षणांत [त्यांचा] सारा गर्व पार पळाला. [ज्यांच्या] प्रखर तेजानें [व] पराक्रमानें नव खंड पृथ्वि झळकूं लागली [ते] मोठे बलवान् बाजीराव पेशवे इकडे होते, [तर]

४७ तिकडे मराठ्यांत रणशूर [म्हणून] चमकलेले वीरश्रेष्ठ तुकोजीराव [पवार] होते. [त्या दोघांनीं] यवनांची मोठी दुर्दशा उडवून दिली [व त्यांची] सर्व मालमत्ता हिसकावून घेतली.

४८ निजाम आपण होऊन प्रेमभावानें विनवून शरण आला.

अब संधिय की चरचान करी,
प्रभु पेशव ने य मंजूर करी।
यह काम तकूजि को तेज रह्यो,
तरवारन के बल बीर बढ्यो ॥४९॥

पति-पुन्नय ने धनवाद दियो,
उनको अपने अहसान लियो।
अब पेशव के उर मान बढ्यो,
निज वीरन में उन नाम दढ्यो ॥५०॥

दोहा

गंगा जी के तीर पर पालखेड़ को जुद्ध।
जहँा तकूजीराव को, भयो विमल जश शुद्ध ॥५१॥

[व त्यानें] स्वतःच्या हातानें लिहून दिलें कीं, [ह्यापुढें मी] कधींही तुमच्याशीं विरोध करणार नाहीं.

४९ आतां तहाची वांटाघाट सुरू झाली [व] बाजीराव पेशव्यांनीं ती मान्य केली. [ह्या लढाईंतील] तुकोजीरावांची [निजामाला खालीं पाडण्याची] ही कामगिरी मोठीच राहिली. तलवारीच्या बळावर [तो] बहाद्दर पुढें आला.

५० पुण्याचे स्वामि [बाजीराव पेशवे ह्यांनीं त्यांस] धन्यवाद दिले [व] त्यांस आपले अनुग्रहित केलें. आतां पेशव्यांच्या अंतःकरणांत [तुकोजीरावांविषयीं] आदर वाढला [व त्यांनीं] त्यांचें नांव आपल्या खाशा वीरांमध्यें कायम केलें.

५१ जेथें तुकोजीरावांचें विमल यश शुद्ध झालें तें पालखेडचें

नरू कवी निर्मित कऱ्यो, पालखेड घमसान ।
राव तकुजी चरन पै, धरी मुदित मन मान ॥५२॥

युद्ध (दक्षिण) गंगा (गोदावरी) च्या कांठीं झालें.

५२ नरू कवीनें पालखेडच्या युद्धाचें (हें वर्णन) तयार केलें असून तें ती तुकोजीरावांच्या चरणीं, मनांत प्रफुल्ल होऊन, अर्पण करित आहे.

———

३ बुंदेलखंड–संग्राम

(सन १७२९ इ.)

दोहा

सतरा सै चौरासी अरु, संमत विक्रम जान ।
दादा भीम वकील ने, पत्र दियो फरमान ॥१॥
लूटत तुर्क बुँदेल को, वृद्ध जान छतसाल ।
मरहट सों माँगी मदद, जानि प्रबल महिपाल ॥२॥

१ वि. सं.* १७८४ मध्यें दादो भीम वकिलानें पत्र पाठविलें. [कीं:—]

२ [बुंदेलखंडाचा] राजा छत्रसाल वृद्ध झाला आहे, हें पाहून मुसलमान बुंदेल्यांना लुटूं लागले आहेत, म्हणून [बुंदेल्यांनीं] बलिष्ठ राजे समजून मराठ्यांजवळ मदत मागितली आहे.

---

* उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळया वेळीं विक्रम संवत बदलण्याचे प्रघात आहेत, परंतु महाराष्ट्रांत मात्र तो त्याच्या मागाहून कर्तिकारंभा-पासून बदलण्याचा केवळ एकच प्रघात आहे. ही गोष्ट उत्तर-भारतीय नरू कवीला माहित असल्यानें व बुंदेलखंडाचें हें गजेन्द्रमोक्षाख्यान महाराष्ट्राला विशेष भूषणावह असल्यानें मुद्दाम ह्या ठिकाणीं त्यानें महाराष्ट्रीय वि. सं. च सांगण्याच्या हेतूनें ' संमत विक्रम जान ' असें खुलाशाचें वर्णन केलें आहे. अन्यत्र वि. सं. चा उल्लेख त्यानें केवळ ' संवत ' ह्या शब्दानेंच केला आहे, ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

दादा भीम वकील से, छत्रसाल किय बात ।
यह वकिल थो पेशवा, मरहट्टन मन हाथ ॥३॥

याने लिखि भेज्यो तुरत, सम्मुख बाजीराव ।
चाहत मदद बुँदेल–पति, डगमग डोलत नाव ॥४॥

राखत हमदर्दी अधिक, बीर बृद्ध छतसाल ।
मरहट्टन को मानैं मुकुट, यह बुँदेल--महिपाल ॥५॥

इलाहबाद सूबापति, महमद बंगस खान ।
ध्वंस करन बुँदेल को, आवत करि प्रण जान ॥६॥

३ छत्रसालानें दादो भीम वकिलाशीं बोलणें लाविलें. हा पेशव्यांचा वकील मराठ्यांचा जणुं हातच होता.

४ ह्यानें लागलेंच बाजीराव (पेशव्यां) कडे (पत्र) लिहून पाठविलें कीं, 'बुंदेल–पति (राजा छत्रसाल) मदतीची अपेक्षा करीत असून (त्याच्या परिस्थितीची) नाव (वादळांत सांपडलेल्या नावेप्रमाणें) डगमगून राहिली आहे !

५ 'वृद्ध वीर बुंदेल-राजा छत्रसाल (मराठ्यांविषयीं) अधिक सहानुभूति बाळगून मराठ्यांना (आपला) मुकुट (मणि) च समजतो !

६ 'अलाहाबादचा सुभेदार महंमदखान बंगष बुंदेल्यांचा विध्वंस करण्याची जणुं प्रतिज्ञाच करून येत आहे.

अब लिखियो बुँदेल--पती, अलग पत्र इण भाव ।
जावत लाज बुँदेल की, राखो बाजीराव ॥७॥

मनहरण

बाजीराव पेशवा पै लिखि के पठायो दूत,
बिनती कराई बहु गर्ज कर भारी है ।
प्यारी मम जन्मभूमी सारी हति छारी होत,
अब के उबारीबे में तूँ ही मो अधारी है ॥
आयो शठ महम्मद बंगस मुलक माँहिं,
जैतपुर लूट्यो अब लूट लेत सारी है ॥
वृद्ध वय हूँ को कछु हिय में बिचार कर,
काटियेगा शीघ्र आय आपत्ति हमारी है ॥८॥

७ 'बुंदेल्यांचा लौकिक जात आहे (तो, हे) बाजीराव तुम्ही राखा' अशा आशयाचें निराळें पत्र आतां बुंदेलपतीनें बाजीरावांस लिहिलें.

८ (छत्रसालानें) बाजीराव पेशव्यांस पत्र लिहून ते दूताच्या हातीं पाठविलें. (त्यांत त्यानें) बरीच अगत्यपूर्व विनवणी केली कीं, 'माझ्या सर्व जन्मभूमीची राख रांगोळी होत आहे. ह्यावेळीं रक्षण करण्यास (खरोखर) तूंच काय तो मला आधार आहेस. धूर्त महंमदखान बंगष (माझ्या) मुलखांत आला आहे. (त्यानें) जैतपुर लुटलें (व) आतां तो सर्वच (बुंदेलखंड) लुटूं पहात आहे. (माझ्या) वार्धक्याचा (तूं) मनांत कांहीं विचार कर (व) आमच्यावर आलेल्या संकटाचें सत्वर निवारण कर.

दोहा

ग्रस्यो ग्राह गजराज ने, तैस्यो ग्रस्यो बुंदेल ।
उत बिनती प्रभु पार की, इत बिनती तूँ झेल ॥९॥

दूत गयो दरबार में, लै बिनती छतसाल ।
पाती पढ़कर पेशवा, नैनन कियो निहाल ॥१०॥

९ 'गजेंद्राला नक्रानें ग्रासलें होतें तद्वत् बुंदेले (बंगषा)-कडून ग्रासलें गेलें आहेत. तिकडे (गजेंद्राची) प्रार्थना प्रभूनें पार पाडली, (तशी) इकडे (माझी) प्रार्थना तूं पार पाड.' *

१० छत्रसालाचें प्रार्थना (पत्र) घेऊन दूत (पेशव्यांच्या) दरबारीं गेला. तें (पत्र) मिळतांच पेशव्यांनीं वाचून (त्यावर) कृपादृष्टि टांकली (अर्थात् विनंति मान्य करण्याचें मनांत आणलें.)

---

* छत्रसालानें बाजीरावांस १०० दोह्यांच्या लिहिलेल्या पत्रांत मदतीसाठीं वरील अर्थाचाच लिहिलेला एक दोहा खालीं दिल्याप्रमाणें दोन रूपांत प्रसिद्ध आहे:-

जो गत ग्राह गजेंद्र की, सो गत भई है आज ।
बाजी जात बुंदेल की, राखो बाजी लाज ॥

(सामान्यतः सर्वत्र प्रसिद्ध.)

जो बीती गजराज पै, सो बीती अब आय ।
बाजी जात बुंदेल की, राखो बाजीराय ॥

– चरखारी संस्थानचा इतिहास.

हृदय प्रती छतसाल के, मरहट पूरो मान ।
वर भट बाजीराव ने, कह्यो अबै हिय ठान ॥११॥

मनहरण

भारत में भूल कर भयेंगे न ऐसे बीर,
जैसो छतसाल यो बुँदेलो दिखलात है ।
मुगलन की मर्द गर्द करी डारी सारी सर्द,
अपनी कृपान हूँ की धाक दिखलात है ॥
ज्वानी अब जीर्ण भई पुहुमी वितीर्ण भई,
पुत्रन के पीर नहीं तासों घबरात है ।
चम्पत को लाल महिपाल ढाल हिन्दुन को,
आपनो पवित्र मित्र मदद चाहत है ॥१२॥

११ मराठ्यांच्या अंतःकरणांत छत्रसालाविषयीं पूर्ण आदर होता. वीरश्रेष्ठ बाजीरावांनीं आतां मनांत विचार करून म्हटलें.

१२ 'छत्रसाल बुंदेला हा जसा दिसत आहे तसे वीर भारतवर्षांत चुकूनसुद्धां होणार नाहींत ! [तारुण्यांत त्यानें] मोंगलांची सारी मर्दानगी चांगलीच जिरवून टांकली [असून] आपल्या तलवारीचा दरारा दाखविला आहे. [इकडे त्याचें] तारुण्य आतां लयाला गेलें आहे [व] देश मोठा पडला आहे [तर तिकडे] मुलांचा आधार [त्यास मुळींच] नाहीं ह्यासाठीं [तो] घाबरत आहे. चंपतरायाचा [हा] प्रिय पुत्र [राजा छत्रसाल] हिंदूंची ढाल होय ! [तो आपला] प्रामाणिक मित्र मदतीची अपेक्षा करित आहे.'

दोहा

दूतन को दीन्ही बिदा, कहकर देन सहाय।
आय अबै अपने सुभट, लिये सब हि बुलवाय ॥१३॥
पील्लूजी जादव बली, अरु तक्कूजी राय।
दावल वंशी सोमजी, त्रय भट सुभट बुलाय ॥१४॥
यह तीन्हों त्रय लोक को, तौले निज भुज पान।
ऐसे वर भट सुभट को, सौंपी सेन समान ॥१५॥
कह्यो वीर करनौं मदद, जानौं राज बुँदेल।
महम्मद बंगस को अबै, जाकर देनौं ठेल ॥१६॥

१३ ‘ (आम्हीं) मदत देण्यास येत आहोंत ’ (असें सांगून बाजीरावांनीं छत्रसालाच्या) दूतांना निरोप दिला (व) आतां आपल्या सर्व वीरांना (त्यांनीं) बोलावून घेतलें.

१४ (त्यांत) बलवान् पिलाजी जाधव, तुकोजीराव पवार व दावलजी सोमवंशी (या) तीन श्रेष्ठ नरवीरांना (बाजीरावांनीं मुख्यतः) बोलाविलें.

१५ हे तिन्ही (वीर जणुं) त्रैलोक्याला उचलून धरूं अशी आपल्या बाहु (बला) ची प्रशंसा करीत होते! अशा वीरश्रेष्ठांकडे समसमान सेना सोंपविण्यांत आली.

१६ (बाजीरावांनीं) वीरांना सांगितलें कीं, ‘ मदत करण्यासाठीं (आपणांस) बुंदेल्यांच्या राज्यांत जावयाचें आहे (व) महंमदखान बंगषाला जाऊन आतां टक्कर द्यावयाची आहे. ’

तीन्हों सेना-नायक ने सेन को सजग करि,
तीन पुर नापने को मन में बिचारी है
है के अस्व-रूढ़ गज-रूढ़ रथ-रूढ़ आदि,
धरनी धूजात चले भारी भयकारी है ॥
मरट्ठन मुकुटवर बाजीराव पेशवा भी,
देवन सहाय चल्यो छत्रसाल भारी है ।
राह माँहिं देवगढ़, लछमन खण्डोल हूँ को,
जीत कर खरनी वसूल कीन्ही सारी है ॥१७॥

बुँदेलखंड बाजीराव पहुँच्यो ततछण ही,
मानों गजराज की पुकार कृष्ण धायो है ।

१७ तिन्ही सेनापतींनीं (आपापल्या) सेना तयार करून जणुं काय त्रैलोक्य जिंकण्याचा मनांत विचार केला. अश्वारूढ, गजारूढ, रथारूढ आदि होऊन [ती जबरदस्त मराठी सेना आपल्या पदाघातानें] धरणी कंपायमान् करीत निघाली. [स्वतः] मराठ्यांचे मुकुटवर बाजीराव पेशवेदेखील संकटग्रस्त छत्रसालला मदत करण्यासाठीं निघाले. मार्गांत देवगड येथें (मराठ्यांनीं) लक्ष्मण खंडोळचाला * जिंकून खंडणी चुकती वसूल केली.

१८ बुंदेलखंडांत बाजीराव ताबडतोब पोहोंचले, जणुं काय

* वास्तविक नांव खंडागळे. (पेशवे दफ्तर पु. १३, ले. ३६)
गुजरः सं. दे. थो. पा. प. घ. इ. पृ. ५२

ग्राह बन्यो बंगस छत्रसाल को ग्रसन लाग्यो,
भयो प्रभु पेशवा सो आन के छुडायो है ॥
जैतपुर आदि बड़े बड़े गढ़ जीति लीन्हें,
क्रूर भयो महम्मद जंग जोम आयो है ।
वृद्ध महाराज को निवास थो धमोरा ग्राम,
गयो जहाँ जाय गले बाँह सो मिलायो है ॥१८॥

दोन्हों वर वीरन की भेंट थी अवर्ननीय,
दोन्हों ओर उर तें पयोद प्रेम छायो है ।

गजेंद्राची हांक ऐकून कृष्णच धांवून आला ! बंगष नक्र होऊन छत्रसालाला ग्रासूं लागला, [तेव्हां] पेशव्यांनीं विष्णु होऊन [व तेथें] जाऊन त्याची [छत्रसालाची] सोडवणूक केली. महंमदखानानें जैतपुर * आदि मोठमोठे किल्ले जिंकून घेतले. [त्यामुळें तो] निर्दय बनला [व त्याला] लढाईसाठीं आणखी जोर आला. वृद्ध [छत्रसाल] महाराजाचा मुक्काम धामोरा गांवीं होता. [बाजीराव] तेथें गेले.$ [तेथें] पोहोंचल्यावर [त्या उभयतांनीं एकमेकांस] आलिंगन दिलें.

१९ दोन्ही वीरश्रेष्ठांची भेट अवर्णनीय होती ! दोघांचीं अंतःकरणें प्रेमांबुदांनीं आच्छन्न झालीं आहेत ! दोन्ही राजे आज पूर्ण उल्हासित झाले आहेत ! [व] एक दुसऱ्याच्या सहाय्याला

* पारसनीसः मराठ्यांचे पराक्रम, पृ. ६३–६४

$ ता. १३ मार्च १७२९ रोजीं (गुजरः सं. देवास थो. पा. पवार घराण्याचा इ. पृ. ५३.)

दोन्हों नर-नाह आज पूर्ण हुलसाय गये,
होकर सहाय एक एक हूँ के आयो है ॥
आज छत्रसाल उर आनन्द को पार नहीं,
पेशवा प्रभू सों यह बुँदेल लखायो है ।
कहे कवि नरु तहाँ एक बीर बोल उठ्यो,
बूड़तो बुँदेलखंड आनि के बचायो है ॥१९॥

दोहा

दोउन की सेना तहाँ, आन खड़ी इक थान ।
महमद नाम मिटान मैं, लई तान किरपान ॥२०॥

दोउन की सेना अबै, चली जैतपुर राह ।
बंगस पर्‍यो निचिन्त तहँ, हिय बिच कछू न दाह ॥२१॥

[तेथें] आले आहेत. आज छत्रसालाच्या अंतःकरणांत आनंदाला पारावार नव्हता ! बुंदेल्यांना पेशवे प्रभूप्रमाणें वाटले! नरु कवि म्हणतो [पेशवे आले एवढ्यावरच धीर येऊन] एक वीर तेथें उच्च स्वरानें म्हणतो [पेशव्यांनीं] येऊन बुडता बुंदेलखंड उद्धारला!

२० [बाजीराव व छत्रसाल ह्या] दोघांची सेना तेथें एकत्रित झाली [व त्यांनीं] महंमदखानाचें नांव [निशाणही] न राहूं देण्याकरितां तलवार उपसली.

२१ आतां दोघांची सेना जैतपुरच्या मार्गानें चालली. तेथें बंगष निश्चित पडलेला होता. त्याच्या मनांत कोणताही घोर नव्हता.

महमद को मालुम नहीं, आवै मरहठ जंग।
दूतन दीन्ही खबर तब, भयो हृदय महँ दंग ॥२२॥

भयो भयातुर ही वहाँ, सेना सजग करान।
इतने में दीन्हों तहाँ, चतुरंगिनि डेरा तान ॥२३॥

सजग भई सेना अखिल, महम्मद बँगस खान।
परे नगारन डंक अरू, फरकन लगे निशान ॥२४॥

इत मरहठ बुँदेल की, सेल अनी चमकाय।
चार अनों सेना करी, बीर तकूजी राय ॥२५॥

२२ मराठे लढण्यासाठीं येत आहेत, हें महंमदखानास माहित नव्हतें (त्यामुळें) दूतांनीं खबर दिली तेव्हां (तो) मनांत विस्मित होऊन गेला.

२३ आपल्या सैन्याची तयारी करतांना (तो) भयातुरही झाला. * इतक्यांत (मराठ्यांची) चतुरंगिनी सेना तेथें येऊन तिनें तळ ठोकला.

२४ महंमदखान बंगषाची सर्व सेना तयार झाली. नगारे वाजूं लागले (व) निशाणें फडकूं लागलीं.

२५ येथें मराठे (व) बुंदेले ह्यांचीं भालाग्रें चमकूं लागलीं (व) तुकोजीरावांच्या सल्ल्याप्रमाणें सैन्याच्या चार बिनी तयार करण्यांत आल्या.

* पारसनीस : मराठ्यांचे पराक्रम, पृ. ६७

तोटक

दुहुँ ओरन सेन सजग्ग भई,
दुहुँ ओरन तीर तुपक लई ।
दुहुँ ओरन बाजिन जीन लगैं,
दुहुँ ओर गयंदन हौद लगैं ॥२६॥

दुहुँ ओरन सेनन सोर भयो,
दुहुँ ओरन और विभोर भयो ।
दुहुँ ओरन सेनन सैन भई,
दुहुँ ओरन अब्ब भिडन्त भई ॥२७॥

इक ओरन दावल दावँ दई,
इक ओरन जादव ने सजई ।

२६ दोन्हींकडच्या सेना तयार झाल्या. दोन्हींकडच्यांनीं तीर, बंदुका घेतल्या. दोन्हींकडे घोडयांवर जीन कसले गेले (व) हत्तींवर हौदे बांधले गेले.

२७ दोन्हींकडच्या सैन्यांत गर्जना होऊं लागल्या. दोन्हीं-कडचें (सैन्य) अधिक उल्हसित झाले. दोन्हींकडे सैन्यावर सैन्य लोटूं लागलें. दोन्हींकडून आतां टक्कर सुरूं झाली.

२८ एका बाजूनें दावलजी (सोमवंशी) नें शह दिला. एक बाजू (पिलाजी) जाधवानें सांभाळली. एक बाजू बुंदेल्यांनीं अडविली (व) एका बाजूनें तुकोजीराव (पवार) यांनीं चाल केली.

इक ओर बुँदेलन आड़ लई,
इक ओर तकूजि ने अग्र लई ॥२८॥

दुहुँ ओरन फौज भिड़न्त भई,
दुहुँ ओरन अब्ब लड़न्त भई ।
खग झाटन की अब झाट उड़ी,
अब आँख महम्मद की उघड़ी ॥२९॥

चहुँ ओरन सौं अब सेन घिरी,
अब बात मुगल्लन की बिगरी ।
मरहट्ठ बुँदेलन झाट पड़ी,
तुरकानन बाग अबै उपड़ी ॥३०॥

दोहा

महम्मद को देने मदद, आयो कायम खान ।
पुत्र हतो याको प्रबल, करन लग्यो घमसान ॥३१॥

२९ दोन्ही पक्षांकडील सेना एकमेकांवर तुटून पडल्या. आतां दोन्ही पक्षांकडून खडाजंगीची लढाई सुरू झाली. तलवारींचे घांवांवर घांव पडूं लागले. आतां महंमदखानाचे डोळे उघडले.

३० चाऱ्ही बाजूंनीं आतां सैन्य घेरलें गेलें (त्यामुळें) मोंगलांची गोष्ट आतां बिघडली. मराठे (व) बुंदेले ह्यांचा मारा बसूं लागला (तेव्हां) आतां तुर्कांच्या लगामी ओढल्या जाऊं लागल्या. (अर्थात् ते माघार घेऊं लागले).

३१ महंमदखानाला मदत करण्याकरितां कायमखान आला.

तोटक

अब कायम सों मुठभेड़ भई,
यह झाट बुँदेलन झेल लई।
चहुँ ओरन तें फिर झाट उड़ी,
नहिं कायम संगर सेन गड़ी ॥३२॥

वह भाग गयो भय पाय हि के,
नहिं जीत सक्यो जुध ठान हि के।
पर बाप को प्रान बचाय लियो,
वह मौकह देखि के भाग गयो ॥३३॥

(हा) त्याचा (महंमदखानाचा) प्रबल पुत्र होता. (मदतीला येऊन तो लगेच) लढू लागला.

३२ आतां कायमखानाशीं हातघाईची लढाई (सुरू) झाली. (त्याचा) मारा बुंदेल्यांनीं सहन केला. नंतर पुन्हा चाऱ्ही दिशांस हल्ल्यांवर हल्ले होऊं लागले. लढाईंत कायमखानाची फौज नेटानें लढू शकली नाहीं. *

३३ (शेवटीं) ह्याचा परिणाम असा झाला कीं, तो भिऊनच पळून गेला. धीर धरून (तो) लढाई जिंकू शकला नाहीं; परंतु एवढे झालें कीं (त्यानें) आपल्या बापाचा प्राण वांचविला, (कारण) तो (महंमदखान) संधि पाहून पळून गेला.

---

* पारसनीस : मराठ्यांचे पराक्रम, पृ. ६९-७०

दोहा

लूट लिये सब अस्व गज, मरहठ बीर सुजान ।
होवत ही मुठभेड़ के, भग्यो कायम खान ॥३४॥
कायम सों लड़ने लगे मरहठ औ बुंदेल ।
मौको देख महम्मद भग्यो, गयो जैतपुर पेल ॥३५॥
लड़ने की हिम्मत नहीं, रही महम्मद माँहिं ।
प्रान बचा के भग गयो, घुस्यो जैतगढ़ माँहिं ॥३६॥

मनहरण

दूतन खबर दीन्हीं महम्मद तो भाग गयो,
जैतपुर किल्ले माँहिं प्रान को बचाय के ।

३४ चतुर मराठा वीरांनीं हत्ती, घोडे सर्व लुटून घेतले. हातघाईची लढाई होतांच कायमखानानें पळ काढला.‡

३५ [ज्यावेळीं] कायमखानाशीं मराठे [व] बुंदेले [मिळून] लढूं लागले [त्यावेळीं] संधि पाहून महंमदखान जैतपुरकडे पळून गेला.

३६ महंमदखानामध्यें लढण्याची हिंमत राहिली नाहीं. [तो] प्राण वांचवून पळून गेला [व] जैतपुरच्या किल्ल्यांत शिरला.*

३७ दूतांनीं खबर दिली [कीं], महंमदखान प्राण वांचवून

‡ राजवाडे : मराठ्यांच्या इति. साधनें खं. ३ ले. १४ (ता. २८ एप्रिल १७२९ रोजीं ही लढाई झाली.)

* पारसनीस : मराठ्यांचे पराक्रम, पृ. ६९–७०.

तक्कूजी पुँवार और पीलूजी जादव और,
दावलजी लष्कर को लीन्हें हैं बुलाय के ॥
बाजीराव पेशवा ने सबको सलाह दई,
देवो अब जाय आज किल्लह ढहाय के।
टूटी परो तुर्क पर महम्मद को मार डारो,
छत्रसाल शत्रु हूँ को आज ही हराय के ॥३७॥

दोहा

छत्रसाल बुँदेल-पती, मानी नेक सलाह।
आखिल सेन सामिल भई, देवन बँगस दाह ॥३८॥

मनहरण

चार और हूँ तें सेना टूट परी किल्लह पै,
घोर घमसान भयो जैतपुर रण में।

जैतपुरच्या किल्ल्यांत पळून गेला, [तेव्हां] बाजीरावांनीं तुकोजीराव पवार, पिलाजी जाधव व दावलजी सरलष्कर ह्यांना बोलावून घेतलें [व] सर्वांना सल्ला दिला कीं, आजच जैतपुरच्या किल्ल्यावर स्वारी करून [तो] किल्ला उध्वस्त करून टांका. तुर्कांवर तुटून पडा [व] महमंदखानाला ठार मारा. छत्रसालाच्या ह्या शत्रूला आजच पराजित करा.

३८ बुंदेलराजा छत्रसाल ह्यानेंही ही सल्ला योग्य जाणून ती मान्य केली व बंगषाचा नायनाट करण्यासाठीं सर्व सेना एकत्र झाली.

३९ चाऱ्ही बाजूंनीं किल्ल्यावर सेना तुटून पडली [व] जैतपुरच्या रणभूमीवर भयंकर लढाई झाली. आतां दोन्हींकडील

दोन्हों ओर वीरन की चन्द्रहास चालीं अब,
तड़ातड़ टूट परे एक एक छण में ॥
जैतपुर जंग हूँ तें शोणित सरित चली,
महम्मद को मारन की ठान लई मन में ।
रसद सब बंद करी किलन में जावन की,
पहरे बिठाय दिये ठाँव ठाँव तिन में ॥३९॥

दोहा

कमी जान जलपान की, मरनो महम्मद जान ।
भाग गयो भय पाय के, बचा आपनो प्रान ॥४०॥

वीरांच्या तलवारी चालूं लागल्या [व] एकेक क्षणाला वीर धडाधड पडूं लागले. जैतपूरच्या लढाईंत रक्ताची नदी वाहूं लागली. महंमदखानाला मारण्याचा [मराठे व बुंदेले ह्यांनीं मनांत] निश्चय केला. [त्यांनीं] किल्ल्यांत जाणारी सर्व रसद बंद केली [व] ठिकठिकाणीं पहारे बसवून दिले.

४० पिण्याच्या पाण्याची वाण पडलेली लक्षांत घेऊन [पाण्यावांचून] मरणार असें महंमदखानास वाटलें [म्हणून तो] प्राण वांचविण्यासाठीं भीतीनें पळून गेला. *

* जैतपुरच्या वेढयाचें वर्णन 'गोविंदपंत बुंदेल्यांची बखर' व आर्यव्हिनच्या 'बंगश नवाबखान ऑफ फरुक्काबाद'च्या इतिहासांत अत्यंत हृदयद्रावक असें दिलें आहे.

बैसाख बिदी तेरस दिन भयो घोर घमसान ।
महम्मद भाग्यो हारि के, बिजय मराठन मान ॥४१॥

छत्रसाल संकट कट्यो, घट्यो मुगलन कान ।
दढ्यो पक्ष अब पेशवा, बढ्यो मरठ्ठन मान ॥४२॥

आदर बाजीराव को, कियउ बीर छतसाल ।
महलन में मेहमान करी, भोजन दियो बिसाल ॥४३॥

४१ वैशाख व. १३ च्या दिवशीं * भयंकर लढाई झाली. [तींत] मराठ्यांचा विजय होणार असें पाहून महंमदखान हार खाऊन पळून गेला.||

४२ छत्रसालाचें संकट दूर झालें [व] मोंगलांचा मान कमी झाला. [तसेंच] आतां पेशव्यांचा पक्ष दृढ होऊन मराठ्यांचा मान वाढला.

४३ वीर छत्रसालानें बाजीरावांचा सन्मान केला [व] [आपल्या] महालांत पाहुणचार करून फार मोठी मेजवानी दिली.$

* ता. १५ एप्रिल १७२९.

|| महंमदखान ह्यावेळीं स्त्रीवेष धारण करून पळून गेला अशी आख्यायिका आहे. (पारसनीस: मराठ्यांचे पराक्रम पृ. ७३ टीप)

$ पारसनीस: मराठ्यांचे पराक्रम, पृ. ७३

मनहरण

अढै लाख आमद को पर्गनो नजर कीन्हों,
हय गय गहनें भी साथ में दिराये हैं।
और हूँ अनेक सरदारन को दीन्हीं भेट,
पूरो प्रेम भाव आय यहाँ दरसाये हैं॥
एक गज अच्छो तब तक्कूजी को नजर कीन्हों,
छत्रसाल भेंट लेके अति हुलसाये हैं।

४४ [छत्रसालानें मराठ्यांस] अडीच लक्ष * उत्पन्नाचा एक परगणा भेट दिला [व] हत्ती, घोडे, अलंकारही त्याबरोबर दिले [आणि तसेंच] अनेक सरदारांनाही भेटी दिल्या. त्या समयीं [त्यांच्यांत] पूर्ण प्रेमभाव उत्पन्न झाल्याचें प्रगट झालें. तुकोजीरावांनाही [त्यावेळीं] एक सुंदर हत्ती ¶ भेट करण्यांत आला. छत्रसालानें दिलेली [ती] भेट घेऊन [तुकोजीरा व अत्यंत प्रसन्न

---

* ग्रँट डफच्या मतें ह्यावेळीं बाजीरावांस छत्रसालाकडून मिळालेला मुलुख सव्वादोन लक्षांचा होता (ग्रँट डफ : मराठ्यांची बखर, पृ. १५३); परंतु बेहरे ह्यांच्या मतें तो ३ लक्षांचा होता (पहिले बाजीराव पेशवे पृ. १७२). १८०६ च्या ' एशियाटिक अन्युअल रजिस्टर ' मध्यें पेशव्यांना ३०७६९५३ रुपयांचा मुलुख मिळाल्याचें व गुलसराई संस्थानच्या कागदांतून मिळालेल्या यादींत ४२ लक्षांचा मुलुख मिळाल्याचें उल्लेखिलें आहे; पण ही माहिती छत्रसालाच्या मृत्यूनंतर बाजीरावांस बुंदेलखंडांतून आणखी मुलुख मिळाला तो धरून दिली असावी.

¶ गुजर : सं. देवास थो. पा. पवार घ. इ. सा. पृ. २२

दोन्हों नर-नाहन में पूरन मिलन रही,
होवन जुदाई माँह नैन नीर आयो हैं ॥४४॥

दोहा

करी बीरता प्रगट बहु, तकूराव पुंव्वार।
नरू कवी निर्मित कऱ्यो, रार बुँदेला सार ॥४५॥

झाले. दोन्ही राजांत पूर्ण स्नेहभाव उत्पन्न झाला [त्यामुळें] तेथून निघतांना वियोगदुःखानें उभयतांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

४५ तुकोजीराव पवार ह्यांनीं [ह्या मोहिमेंत] अतिशय पराक्रम प्रकट केला [म्हणून] नरू कवीनें [हा] बुंदेल्यांच्या [अर्थात् बुंदेलखंडाच्या लढाईचा] निष्कर्ष तयार केला आहे.

— - —

४ दिल्लीवर आक्रमण

(सन १७३७ इ.)

दोहा

लेन खिराज कु चलि पऱ्यो, उत्तर हिन्दुस्थान।
सहर सितारा-स्वामि यह, मन में मान गुमान ॥ १ ॥

जीतन चाहे आगरो, कीन्हो दिल्ली धाव।
बाज़ी राखी हिन्द की, बाजी बाजीराव ॥ २ ॥

सुभट महाबलि साथ में, लेकर चल्यो नृपाल।
इनके इतने नाम हैं, आगे देउँ हवाल ॥ ३ ॥

मल्हारराव होल्कर अरु, राणो सेंध्या राव।
सटवोजी जादव बली, पटवेश्वर गोविंदराव ॥ ४ ॥

१ [बाजीराव] उत्तर हिंदुस्थानांत खंडणी वसुलीसाठीं चालले, ह्याचा साताऱ्याचे छत्रपति मनांत अभिमान मानूं लागले.

२ आग्रा जिंकण्याच्या हेतूनें [त्यांनीं] दिल्लीवर स्वारी केली. बाजीराव हे खरोखरच बाजीराव होते ! [त्यांनीं] हिंददेशाची बाजूं [बरोबर] राखिली !

३ राजे [बाजीराव] महाबलवान योद्धे बरोबर घेऊन निघाले. त्यांचीं एवढीं नांवें आहेत. त्याचा हवाला पुढें देतो.

४-५ मल्हारराव होळकर आणि राणोजी शिंदे. [तसेंच]

तकूजी जिवाजी सबल, दोन हुँ सगे सुभ्रात ।
जस्वंतराव पुँवार अरू, चले सबै चढ़ि खाँत ॥ ५ ॥

मनहरण

ओडसा उदैपुर औ दतिया, भदावर में,
ठाम ठाम लेवत खिराज चलि आयो है ।
केते ही नृपालन के कंठन कमान डारी,
केते ही विशाल छेत्र आपनो बढ़ायो है ॥
बाजीराव पेशवा ने आगे बढ़ जावने की,
हिम्मत पसारी और साहस दिखायो है ।
दिल्ली-पति शाह हूँ को होसलो हिलायो मानों,
दावा लेन दिल्ली पर हुकुम पठायो है ॥ ६ ॥

बलवान् सटवोजी जाधव [व] गोविंदराव पटवर्धन, तुकोजीराव [व] जिवाजीराव [पवार] हे दोघे शक्तिसंपन्न सख्खे सद्बंधु आणि यशवंतराव पवार [हे] सर्व [वीर] बरोबर निघाले.

६ ओरछा, उदेपूर, दतिया व भदावर येथें ठिकठिकाणीं खंडणी घेत [बाजीराव पुढें] चालले. कित्येक राजांना त्यांनीं शरण यावयास लाविलें [व] आपलें [विजय] क्षेत्र कितीतरी विस्तृत केलें. [आतां] बाजीराव पेशव्यांनीं [आणखी] पुढें जाण्याची हिंमत बांधली व साहस प्रकट केलें. वचपा घेण्यासाठीं दिल्लीवर [चाल करून] येत असल्याबद्दल जणू काय हुकुमच पाठवून दिल्लीश्वर बादशहाची [त्यांनीं] त्रेधाच उडवून दिली !

दोहा

खबर सुनी पतशाह ने, आयो बाजीराव।
रोकन आगे राह पै, भेजत ये उमराव ॥७॥

मनहरण

अयोध्या-पति सादतखाँ नवाब मीरबक्ष,
    वजीर कमरुद्दीन को चढ़िबे बुलायो है।
जैपुर सवाई राज मारवाड अभैसिंह,
    ऐसे वर वीरन को साथ में लिवायो है॥
पाकर खबर यह पेशवा नृपाल हूँ के,
    मानों पाँव पूँछ कारे नाग पै लगायो है।

७ बाजीराव येत आहेत ही वार्ता ऐकून बादशहानें (त्यांस) मार्गांत रोकण्यासाठीं हे (खालीं लिहिलेले) सरदार पुढें पाठविले.

८ अयोध्येचा अधिपति (वजीर) सादतखान, नबाब मीरबक्षी (खानडौरान व) वजीर कमरुद्दीन ह्यांना (बादशहानें मराठ्यांवर) चालून जाण्यास बोलाविलें. (तसेंच) जयपूरचा राजा सवाई जयसिंग व मारवाडचा अभयसिंग अशा वीर-श्रेष्ठांना मदतीला घेतलें. * ही बातमी पेशवे सरकारला लागतांच जणूं कृष्णसर्पाच्या शेंपटीवर पाय दिला आहे (किंवा) जणूं दारूच्या कोठ्यास आग लाविली आहे

* दिघे: मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा, पृ. ४०, ४१.

मानों सोर गंजन में आग को लगाइ याकी,
मानौं आज शिवजी ने त्रिनेत्र खुलायो है ॥८॥
कोपित प्रचंड ज्वाला पेशवा के ह्रदे उठी,
धधक उठी है मानों बडवाग्नि अनल की।
सैनिक समूहन को सबल हुकुम दीन्हो,
धावा बोला दीन्हों मर्द दिल्ली पै प्रबल की ॥
जल की न थल की न पर्वाह दलदल की,
कूँच कऱ्यो तुर्कन पै साबित सुदल की।
हार गयो हिम्मत यों बाजीराव पेशवा सों,
ठाह परी आज पातशाह के अक्कल की ॥९॥

(अथवा) जणू शंकरानें (आपला) तृतीय नेत्र आज उघडला आहे (असें झालें)!

९ पेशव्यांच्या अंतःकरणांत क्रोधाग्नीची प्रचंड ज्वाला प्रज्वलित झाली (आहे किंवा) जणू अग्नि (वर्गांतील श्रेष्ठ असा) वाडवानलच भडकला (आहे). सर्व सैनिक दळांना सक्त हुकुम दिला गेला कीं, वीरांनो, दिल्लीवर जोराचा हल्ला चढवा. (त्याप्रमाणें मराठ्यांनीं) पाण्याची, जमिनीची (किंवा) दलदलीची पर्वा न करतां (ते) मोंगलावर चालून गेले $ (व आपलें) सैन्य उत्कृष्ट असल्याचें शाबित केलें. ह्याप्रकारें बाजीराव पेशव्यापुढें बादशहा आपली हिंमत हरला. त्याची अक्कल ठिकाण्यावर आली.

$ ह्यावेळीं मराठ्यांनीं वीसवीस कोसांच्या मजला मारल्या होत्या! (पारसनीसः ब्रम्हेंद्रस्वामींचें चरित्र, ले. २७)

दोहा

सुनत आक्रमण सकुचिगो, दिल्ली-पति पतशाह।
सहमि गयो, मुर्झा गयो, लड़न रही नहिं चाह ॥१०॥

मत्तगयन्द

हिम्मत हारि गयो लखिके यह,
बाजियराव की सेन ज्यों आँधी।
भय खाय गयो मुरझाय गयो,
सहमाय गयो दिल आपन राँधी।
खास सेनापति तोपन के इन,
टूटति डोर कु आय के साँधी।
आ तब साहउद्दीनन ने अरु,
मीर हुसेन ने हिम्मत बाँधी ॥११॥

१० दिल्लीपति बादशहा (मराठ्यांच्या) आक्रमणाचें ऐकून भयभीत झाला, उदास झाला (व) लढण्याची (त्यास) उमेदच राहिली नाहीं !

११ बाजीरावांची सेना वादळाप्रमाणें (एकदम जोरानें) जशी येत असल्याचें (बादशहानें) पाहिलें (तशी त्याची) हिंमत खचली. (तो) भयभीत झाला, उदास झाला, घाबरून गेला व मनांतल्या मनांत जळफळून गेला; (परंतु) ह्यावेळीं साहउद्दीनानें (सादुद्दीनखानानें) व मीर हुसेननें (मीर हसनखान कोकानें) येऊन हिंमत बांधली (आणि अशा प्रकारें) तोफखान्यावरील त्या खास सेनापतींनीं ह्या (बादशहाच्या) तुटत्या (अशा) तंतूला येऊन साधलें.

दोहा

नीठ नीठ बैठ्यो, कऱ्यो आतष साहउदीन।
लड़न सेन सामिल करी, मरहट्टन मुख कीन ॥१२॥
अब सुनहूँ दुहुँ ओर की, फौजन के यह फेल।
मरहट्ट मुसलमान के, हैं हैं कैसे मेल ॥१३॥
सटवोजी जादव अरू, तक्कूजी पूँवार।
लड़न चले इक ओर सों, मरहठ अग्र मँझार ॥१४॥
इक ओरन वर वीर यों, चलियो बाजीराव।
सैंधिया हुल्कर हूँ चलैं, करि सुभट्ट मन ताव ॥१५॥

१२ तोपखान्यावरील सेनापति शाहउद्दीनानें (सादुद्दीनानें) बादशहाला कसाबसा धीर दिला (व) लढण्यासाठीं फौज एकत्र करून मराठ्यांना तोंड दिलें. *

१३ दोन्ही पक्षांकडील फौजांनीं जी कामगिरी केली ती आतां ऐकवितो. मराठ्यांनीं मुसलमानांची कशी गांठ घेतली (तें ऐका).

१४ सटवोजी जाधव व तुकोजीराव पवार (हे) एका बाजूनें मराठ्यांच्या आघाडीवर लढावयास निघाले.

१५ एका बाजूनें वीरश्रेष्ठ बाजीराव अशा प्रकारें निघाले कीं, शिंदे, होळकर (आदि) वीरवरांच्याही मनांत चेव येऊन ते (त्यांच्याबरोबर) चालले.

---

* दिघे: मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा पृ. ४३.

कछुक दूर मैदान पर, आन खड़े वर वीर।
दिल्लिय दल आवत लख्यो, लड़न खड़े रणधीर ॥१६॥

तोटक

अब है निकसी यह दिल्लिय सैन,
मनू नव ओढन के मन मैन।
गजराज रु बाज चलें कितने,
दल साज हलें जितने उतने ॥१७॥
ठननं कि गयंदन घंटन है,
हननं कि हयंदन स्यंदन है।
खननंकत आज कृपानन है,
भननंकत सेलन बानन है ॥१८॥

१६ कांहीं अंतरावर मैदानांत (मराठे) वीरवर येऊन उभे राहिले (व) दिल्लीची फौज येत आहे, असें पाहून ते रणशूर लढण्यासाठीं तयार झाले.

१७ आतां ही दिल्लीची फौज (ऐटीनें) निघाली आहे. जणूं काय (एखाद्या) नवोढा स्त्रीचें मन प्रसन्न करण्यासाठीं ती चालली आहे. मोठमोठे हत्ती (व) घोडे कितीतरी चालले. जेवढा दळभार होता तेवढा (सर्व) निघाला.

१८ गजेंद्रां (सारख्या हत्ती) च्या घंटा ठण्ठण् वाजत आहेत, रथांस जुंपलेल्या हयेंद्रा (सारख्या घोडयां) चें खिकाळणें (चालले) आहे, तलवारी आज खणखणत आहेत (व) भाले (आणि) बाण ह्यांचें आवाज होत आहेत.

मरहट्टन आज बिनास चले,
तुरकानन के तन तेज हले।
इहि भाँति चली चतुरंगिनियों,
बर पेशव दुल्लह को घर यों ॥१९॥

मुठभेड़ भई मरहट्टन सों,
मनु गीदड़ शेर के पंजन सों।
दल दिल्लिय पै दल टूटि पऱ्यो,
मनु सागर आज उफान पऱ्यो ॥२०॥

भट भेंट भटाभट भूरि भई,
मनु खेल पटावन चाल नई।

१९ मराठेही आज (मुसलमानांचा) नाश करण्यास निघाले. त्यांच्या पराक्रमामुळें मुसलमानांचें तेज फिक्कें पडूं लागलें, (श्वशुर) गृहीं नवरदेवानें जावें तसें आज पेशवे (दिल्लीस दर्पभरानें आपल्या) चतुरंगिनी सेनेसह निघाले !

२० मराठ्यांची (मुसलमानांशीं) हातघाईची लढाई झाली. जणूं सिंहाच्या पंजांत कोल्हाच सांपडला ! दिल्लीच्या फौजेवर (मराठ्यांची) फौज तुटून पडली. जणूं समुद्राला आज भरतीच आली.

२१ (दोन्हीकडील) वीरांची भयंकर चकमक उडाली. जणूं मल्लयुद्धांतील जोरदार असा नवा 'पटावन' पेंच खेळण्यांत

उलटैं सुलटैं पलटैं कितने,
पलटैं सुलटैं उलटैं कितनें ॥२१॥

नट बाजिय को मनु खेल मच्यो,
जमराजन को नहिं डावँ जच्यो।
मचि फेर रटक्क भटक्क तबैं,
चलि फेर कटक्क कड्‍क्क अबैं ॥२२॥

त्रय ओरन सौं त्रय भूप भिरे,
मुगलानन के अब मत्थ गिरे।
अब कालिय के बहु मुक्ख खिले,
अब डाकिनि साकिनि डावँ चले ॥२३॥

आला. कित्येक उलटे सुलटे झाले (व पुनः त्यांनीं) पलटा घेतला. कित्येक पलटा घेतलेले (परत) सुलटे उलटे झाले.

२२ नटरूपी बाजीरावांनीं मनाप्रमाणें (रण) रंग माजविला. (परंतु) यमराजाला तो खेळ पसंत पडला नाहीं. तेव्हां पुनः हातघाईची लढाई सुरूं झाली (व) पुनः आतां कांपाकांपी चालली.

२३ तिन्ही बाजूंनीं (ते) तिन्ही सरदार तुटून पडले. आतां मोंगलांचीं शिरें खालीं पडूं लागलीं. (त्यामुळें) आतां कलिकेचा चेहरा प्रफुल्लित झाला. आतां डाकिणीसाकिणींचा (प्रेतांवर) ताव सुरूं झाला.

जमराजन को अब जोर चल्यो,
    वर वीरन लेन हियो पिघल्यो ।
पति जैपुर को अब जीव लियो,
    अरु कोक हुसेन कु जख्मि कियो ॥२४॥

अब पातशाहा को धैर्य गयो,
    शत पंच सुवीरन खून लियो ।
दिल टूट गयो सब लूट गयो,
    अब दिल्लिय भाग्य भि फूट गयो ॥२५॥

दोहा

भाग गयो भय पाय के, दिल्लीपति पतशाह ।
मुगल सैन सब सटकगी, कर मुख कारो स्याह ॥२६॥

२४ यमराजाला आतां जोर आला. वीरवरांना गिळंकृत करण्यास त्याचें मन लालचावलें. (मराठ्यानीं) जयपुरचा (सेनापति) राजा (शिवसिंग) यांस ठार मारलें व मीरहुसेन कोका * ह्यांस जखमी केलें.

२५ आतां बादशहाचें धैर्य गेलें. (त्याचे) पांचशें उत्तम योद्धे बळी पडले. त्याचा उत्साह गेला. सर्वस्व लुटलें गेलें (व) आतां दिल्लीचें भाग्यही फुटलें !

२६ भयभीत होऊन दिल्लीपति बादशहा पळून गेला (आणि अपजयानें) तोंड काळेशाह करून सर्व मोंगल सेनाही पळून गेली.

* पारसनीस: ब्रम्हेंद्रस्वामींचें चरित्र, ले. २७

लूट करी सब सैन की, मरहठ बाजीराव ।
थकित सैन सब चलि परी, सुख में देन पड़ाव ॥२७॥
झील सरोवर पै दियो, मरहठ आज मुकाम ।
सुखमा को दुखमा भयो, सुबह होत वह धाम ॥२८॥
कमरुद्दीन वजीर की, दूतन दिय सन्देश ।
मरहठ नाम मिटान को, आवत है दर पेश ॥२९॥
खबर मिलत है गइ सजग, तुरत हि सैन तयार ।
मरहठ तो मुगलान पैं, टूट गये तिणवार ॥३०॥

२७ बाजीरावांच्या मराठा (सैनिकांनीं मोंगलांचें) सर्व सैन्य लुटलें. (मग) थकून गेलेली (मराठ्यांची) सारी सेना तेथून विश्रांतीसाठीं तळ देण्यास निघाली.

२८ झील † सरोवरावर मराठ्यांनीं आज मुक्काम केला; (परंतु) सकाळ होतांच तें सुखाचें स्थान दुःखाचें झालें.

२९ जासुदांनीं बातमी दिली कीं, मराठ्यांचें नांवनिशाणही राहूं न देण्याच्या इराद्यानें वजीर कमरुद्दीन चाल करून येत आहे.

३० बातमी कळतांच (मराठ्यांची) फौज जागी होऊन (लढाईसाठीं) तत्काळ तयार झाली (व) मोंगल येतांच मराठे त्यांच्यावर तुटून पडले.

† पारसनीस : ब्रम्हेंद्रस्वामींचें चरित्र, ले. २७.

मनहरण

आवत वजीर कमरुद्दीन मराठन पै,
ठोर ठाम रोक दीन्हों ह्वैकर उताली है।
मानों मृग झुंडन पै केहरी झपट पर्‍यो,
आकर लपट पर्‍यो कण्ठन फनाली है ॥
बाजीराव पेशवा तो एक ओर जूझ रह्यो,
तकूजी जिवाजी हूँ ने तेगन सँभाली है।
तुर्कन के तोड़ दिल ऐसे रणधीरन ने,
वीरन ने एक भाग कीन्हों पूर्ण खाली है ॥३१॥

चन्द्रहास चाली कुछ मुगल मराठन पै,
झेल नहीं झाट सक्यो आखिर भगायो है।

३१ वजीर कमरुद्दीन मराठ्यांवर चालून येतांच [मराठ्यांनीं] जलदी करून [त्यांस] जागच्या जागींच अडविलें. जणूं सिंहानें हरणांच्या कळपावर झडप घातली [किंवा] नागानें धांवून जाऊन गळाच धरला! बाजीराव पेशवे एका बाजूस लढत होते. [दुसरी बाजू] तुकोजीराव [व] जिवाजीराव [ह्यांनीं आपल्या] तलवारीनें सांभाळली. अशा त्या रणशूरांनीं मुसलमानांचें अंतःकरण भग्न केलें. रणक्षेत्राच्या एका भागाचा [त्या] वीरांनीं धुव्वा उडवून दिला.

३२ मोंगलांवर मराठ्यांची थोडी तलवार चालली. [मोंगल मराठ्यांचा] मारा सहन करूं शकले नाहींत. शेवटीं [त्यांना मराठ्यांनीं] पिटाळून लाविलें. वजीर कमरुद्दिनाची सेना पळून

वजीर कमरुद्दीन की सेन की सटक होत,
अस्व गज लूट ही में इनने लिवायो है ॥
पुँवार-पति मत्थन मँडाई है मुगल जीत,
बाजीराव पेशवा को हिय उमगायो है।
ह्वैकर प्रसन्न भेंट सुन्दर दिरायो गज,
पेशवा ने तकुजी को आदर बढ़ायो है ॥३२॥

दोहा

वर भट बाजीराव ने, राव तुका को मान।
अपने गुरु ब्रम्हेंद्र सों, कह्यो बखान बखान ॥३३॥

जातां [मराठ्यांनीं त्याचे] हत्ती, घोडे लुटींत मिळविले. बाजीराव पेशव्यांच्या मनास आनंद झाला [व त्यांनीं] मोंगलांवरील त्या विजयाचें [श्रेय] पवारेश्वर [तुकोजीराव] ह्यांच्या शिरीं दिलें. [तसेंच] प्रसन्न होऊन एक सुंदर हत्तीही [त्यांस] दिला. [ह्याप्रमाणें] पेशव्यांनीं तुकोजीरावांचा मान वाढविला.

३३ बाजीरावांनीं तुकोजीरावांचा [हा] सन्मान आपले गुरु ब्रम्हेंद्रस्वामी ह्यांचेजवळ प्रशंसा करीत करीत निवेदन केला.*

---

* बाजीरावांनीं ह्यासंबंधीं श्रीब्रम्हेंद्रस्वामींस लिहिलेलें पत्र उपलब्ध नाहीं; परंतु त्यांनीं चिमाजी अप्पांस जयपूरहून ता. ५ एप्रिल १७३७ रोजीं पाठविलेलें पत्र उपलब्ध आहे. (पहा, पारसनीसः ब्रम्हेंद्रस्वामींचें चरित्र, ले. २१)

दिल्लिय दल संग्राम को, नरू कवी रचि दीन ॥
राव तुका अर्पण कऱ्यो, मुख सराह प्रभु लीन ॥३४॥

३४ दिल्लीच्या फौजेबरोबर झालेली [ही] लढाई नरू कवीनें वर्णन केली आहे [व ती त्यानें] तुकोजीराव ह्यांस स्तवून स्वामिभक्तिपूर्वक सादर केली आहे.

— — —

५ वसई–संग्राम

(सन १७३८ – ३९ इ.)

दोहा

हिन्दुन के निज धर्म पै, लगे फिरँग दुख देन।
बढ के औरंगजेब सौं, देन लगे दुख ऐन ॥ १ ॥

लगी खबर यह पेशवा, हिय बिच लागी चोट।
अपने भ्राता धर्म के, दुख भोगैं बिन ओट ॥ २ ॥

इहि कारन सों पेशवा, बहु बढ सोची बात।
बिना युद्ध दुख दूर ना, होवहिगो निज हात ॥ ३ ॥

१ फिरंगी लोक हिंदूंचा त्यांच्या धर्माच्या बाबतींत छळ करूं लागले. औरंगजेबांपेक्षांही ते त्यांना अधिक त्रास देऊं लागले.

२ पेशव्यांना ही बातमी समजली. आपले धर्मबंधु पारावार नाहीं [असें] दुःख भोगीत आहेत [ह्याचा त्यांच्या] अंतःकरणावर आघात झाला.

३ ह्या कारणामुळें पेशव्यांनीं दूरवर विचार करून योजिलें कीं, [फिरंग्याशीं] लढल्याशिवाय आपल्या हातून [आपल्या धर्मबांधवांचें] दुःख [खास] दूर व्हावयाचें नाहीं.

चीमाजी निज भ्रात के, दई सबल संग सेन।
और साथ मल्हार के, करी मदद बहु देन ॥ ४ ॥

रामचंद्र पटवर्धन अरू, खण्डु मानकर जान।
खानविलकर बाघवजी बीवलकर हूँ मान ॥ ५ ॥

भीमराव चिमना प्रबल, जशवन्त राव पुँवार।
तक्कूजी वर भट सुभट, भये साथ लिय भार ॥ ६ ॥

आदि सुभट वर भट सबल, कियउ सकल रण साथ।
वीर अखिल सब सैन के, मिलि मिलि आये पाँथ ॥ ७ ॥

४ आपले बंधु चिमाजी अप्पा ह्यांच्याबरोबर [पेशव्यांनीं] बलिष्ठ सेना दिली व त्यांस चांगली [अर्थात् प्रसंगोचित] मदत करण्याकरितां मल्हारराव [होळकर] ह्यांनाही समागमें दिलें.

५-६ [त्याबरोबर हेंही] ऐका कीं, रामचंद्र [हरि] पटवर्धन, खंडोजी माणकर, वाघोजी खानविलकर, [रामाजी महादेव] बिवलकर, बलवान् चिमणाजी भिमराव [रेटरेकर], यशवंतराव पवार, वीरश्रेष्ठ तुकोजीराव [पवार हेही] पराक्रमी [सरदार आपापला] दळभार घेऊन बरोबर निघाले.

७ [वर सांगितलेल्या] शिवाय पराक्रमी असे दुसरे आणखीही सर्व वीर लढाईसाठीं बरोबर घेतले. तसेंच मार्गांत ठिकठिकाणीं इतर पथकांतील वीरही गोळा होत होत गेले.

कैसे मरहठ वीर थे, कहत नरू कछु छंद ।
सुनहुँ स्वामि मम वंश के, मैं तो हूँ मतिमन्द ॥ ८ ॥

मनहरण

भारत की प्यारी प्रजा फिरंगन हाथ लगी,
देन लगे दुख दूनौं पाय बड़ पाई है ।
आरत ह्वै आय के पुकारत हैं पेशवा पै,
नाथ सब धर्म कर्म लेवत लुटाई है ॥
ऐसी जब आन करी कान में भनक परी,
देर न तनिक करी रोस हिय लाई है ।
हनुमान अंगद से सैन को सजग करी,
भेज दई मानों करी लङ्क पै चढ़ाई है ॥ ९ ॥

८ [ते] मराठे वीर कसे होते हें मी मंदमति आहे तरी कवितेंत वर्णन करितों. माझ्या कुळाचे स्वामी [तुकोजीराव, आपण तें] ऐका.

९ भारतवर्षाची प्रिय प्रजा फिरंग्यांच्या हातांत सांपडली [व ते आपला] वरचष्मा मिरविण्यासाठीं [तिला धर्माच्या बाबतींत] दुप्पट त्रास देऊं लागले. दुःखपीडित होऊन [ती] प्रजा पेशव्यांना आळवूं लागली कीं, '[हे] स्वामी, [फिरंगी] आमचें सर्व धर्मकर्म नष्ट करीत आहेत.' ही गुणगुण जेव्हां पेशव्यांच्या कानावर आली, तेव्हां क्षणही न लागतां त्यांच्या अंतःकरणांत क्रोध उत्पन्न झाला [व त्यांनीं] हनुमान–अंगदासारख्या [पराक्रमी वीरांची] सेना

चीमाजी आपा यह अंगद से जान लेवो,
तकूजी पुँवार यह हनुमान से दिखाई है ।
जामवन्त से मल्हार पटवर्धन से सुग्रीव,
बिवलकर खण्डोजी नल नील से लखाई है ॥

बाजीराव पेशवा को राम के समान मानों,
रावन फिरँग जानों अधर्म पलाई है ।
धर्म-ध्वजा धारिवे को मानों आज पेशवा ने,
रावन पै कीन्ही जनु राम ने चढ़ाई है ॥१०॥

सज्ज केली व ती [फिरंग्यावर] पाठवून दिली. जणूं [त्यांनीं] लंकेवरच स्वारी केली.

१० चिमाजी अप्पा हे अंगदासारखे वाटले. तुकोजीराव पवार हे हनुमानासारखे भासले. मल्हारराव होळकर जांबुवंत [व रामचंद्र] पटवर्धन सुग्रीव, बिवलकर [आणि] खंडोजी माणकर नल–नील ह्यांसारखे दिसले. [अर्थात् ह्या बरोबर] बाजीराव पेशवे रामासारखे मानून फिरंगी हे अधर्मपालक रावणाप्रमाणें मानले गेले. जणूं काय धर्माचा झेंडा कायम राखण्यासाठीं आज रामरूपी [पेशवे] [अर्थात् पेशव्यांची सेना फिरंगीरूपी] रावणावर चालून गेले आहेत.*

* वसई किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण लागल्याची आनंदकारक वार्ता ऐकून एका सरदारानें आपले विचार चिमणाजी अप्पास कळविलें, त्यांत त्यानें 'ज्याप्रकारें वानरांकडून लंका घेविली त्याप्रकारें हे गोष्ट जाहाली' असें म्हटलें आहे. ही नरू कवीची व त्या सरदाराची एकोपमा रावण व फिरंगी या दोघांच्या अधर्मप्रवृत्तीवरूनच सुचली असावी असें वाटते.

दोहा

आदि सुभट मरहठ अखिल, जुरि जुरि आये सेन ।
धर्म–ध्वजा फहरान को, आये यों जश लेन ॥११॥
माहिम के आसरे पै, प्रथम वार उन कीन ।
फतह कियो पहले उसे, पुनह बढ़ाई सैन ॥१२॥

मनहरण

आगे बढ़ सैन हूँ के कीन्हैं चार भाग तहाँ,
चार दिशा हूँ से चाल फिरँगन पै कीन्ही है ।
एक भाग दम्मन किले पै थे मल्हार संग,
नायक फिरँगन सों मुठभेड़ लीन्ही है ॥

११ ह्याशिवाय आणखीही सर्व मराठे वीर आपापली सेना बरोबर घेऊन जुटीजुटीनें आले. धर्मध्वजा फडकाविण्याचें यश (आपण) संपादावें (म्हणून जणूं काय ते) आले होते.

१२ माहिमच्या किल्ल्यावर त्यांनीं पहिला हल्ला चढवून तो (किल्ला) अगोदर जिंकला (आणि तेथून) पुनः सेना पुढें नेली.

१३ पुढें गेल्यावर (त्यांनीं) तेथें सैन्याच्या चार तुकड्या केल्या (व) चाऱ्ही दिशांनीं फिरंग्यांवर चाल केली. एक तुकडी मल्हारराव (होळकरां) बरोबर दमण किल्ल्यावर गेली (व तिनें) फिरंग्यांच्या नायकाशीं (सुभेदाराशीं) हातघाईची लढाई केली. मल्हारराव (होळकर व) यशवंतराव (पवार) ह्यांनीं फिरंग्यांच्या

मल्हार जशवन्त हूँ ने सेनापति मार लीन्हो,
विजय निनाद कर मालमत्त छीन्हो है।
दूजो दल तारापूर किल्ले पर टूट पयो,
घोर संगराम भयो आज भी नवीनो है ॥१३॥

दोहा

कठिन भयो संगर करन, किलो सुदृढ़ सुथान ।
आसपास सागर हतो, मरहठ रुके जुवान ॥१४॥

दलदल सों दल रुकि गयो, दिल टूट्यो मरहट्ट ।
राव तुका की राह सों, गयो सकल बढ़ि थट्ट ॥१५॥

सेनापतीला * ठार केलें (व) विजयघोष करीत मालमत्ता लुटून घेतली. दुसरी (सैन्याची) तुकडी तारापुर किल्ल्यावर तुटून पडली. (तेथें जी) भयंकर रणधुमाळी झाली (ती) आज (देखील) विस्मयजनक वाटते.

१४ तारापुर किल्ला फार बळकट (व) मोकेशीर होता. (त्याच्या) आसपास समुद्र होता. (त्यामुळें तेथें) लढाई करणें कठिण झालें (म्हणून) जवानमर्द मराठे तेथें थबकले.

१५ (तेथील) दलदलीच्या जमिनीमुळें मराठ्यांचें सैन्य थबकलें व मनांत दचकलें; (परंतु) तुकोजीराव (पवार) ह्यांनीं त्यांतूनही मार्ग काढला व त्या मार्गें सर्व सेनासंभार पुढें निघाला.

* ह्याचें नांव काय होतें, हें आम्हांस उपलब्ध झालें नाहीं.

मनहरण

पानी में पयान कीन्हों पार कर सागर को,
तारापुर किल्लह की बुर्ज चढ़ि धाई है।
सुरंग लगाय उन तोड़ दी दिवाल सारी,
सैना सब जावन की राह को कराई है॥
मराठन को जुत्थ सारो किल्ले पै चढ़न लागो,
ताक के फिरँगन ने तोप को दगाई है।
बाजीराव भीम जैसो अग्र थो सबन माँहि,
लागत उछल गयो स्वर्ग में सिधाई है॥१६॥
बाजीराव भीम हूँ के स्वर्ग में पयान होत,
एकदम दिल में निराशता दिखाई है।

१६ (तुकोजीरावांनीं) पाण्यांतून चालत जाऊन समुद्र उल्लंघिला व (व) तारापुरच्या किल्ल्याच्या बुरुजावर जोरानें चाल केली. सुरुंग लावून (त्यांनीं किल्ल्याचा) सारा कोट उडविला (व) सैन्याला आंत जाण्यासाठीं मार्ग करून दिला. मराठ्यांची सारी झुंड किल्ल्यावर चढूं लागली, (हें) पाहून फिरंग्यांनीं (वरून) तोफा डागल्या. (त्यावेळीं) भीमासारखे (पराक्रमी) बाजीराव (रेटरेकर) सर्वांच्या पुढें होतें. (गोळा) लागून (ते) उंच उडाले (व) स्वर्गास गेले. *

१७ बाजी भीमरावानें स्वर्गांत प्रयाण केल्यामुळें (मराठ्यांच्या)

* केळकर : वसईची मोहिम (भा. २) पृ. १३३–३४.

हिम्मत न हारी उन वीरन मराठन ने,
पूरन पराक्रम की पेलता बताई है ॥
सारो उतसाह राव तकूजी पुँवार हूँ को,
दून्हों उन जंग कर बीरता बढ़ाई है ।
एक ही हमल्लन में तारापुर टूट पऱ्यो,
स्वामी निज पेशवा की बिजय कराई है ॥१७॥

दोहा

तारापुर को विजय करि, बढ़े बसई बलवान ।
सुदृढ़ किलो यह थो यहाँ, पहुँचे मरहठ ज्वान ॥१८॥

मनांत एकदम निराशा पसरूं लागली; (परंतु) त्या मर्द मराठ्यांनीं हिंमत सोडली नाहीं. (उलट त्यांनीं आपल्या) पूर्ण पराक्रमाची शर्थ करून दाखविली. (ह्या वेळेस) तुकोजीराव पवारांनीं सारा उत्साह निर्माण केला (व) लढाई करून दुप्पट शौर्य प्रकट केलें ! एकाच हल्ल्यांत तारापुर किल्ला पडला. (नरु कवि म्हणतो) माझ्या मालकानें (तुकोजीराव पवारांनीं ह्यावेळीं) पेशव्यांस विजय–प्राप्ति करून दिली.

१८ तारापुर फत्ते करून (मराठे) वीर वसईकडे वळले. येथील तो किल्ला फार मजबूत होता. मराठे वीर (तेथें जाऊन) पोहोंचले.

वसई किला बलवान थो, और फिरँग बलवान।
रटक उड़ी त्रय मास तक, घटी न कोउन कान ॥१९॥

मनहरण

दाद नहीं दीन्हीं थी फिरँगन ने मराठन को,
आखिर में एक बात भई पूर्ण भारी है।
वसई किलेदार फिरँग जँग जूटन में,
शत्रुन ने मार लीन्हों देकर दगारी है॥
आसपास रेत पानी होवन के कारन सों,
सुदृढ़ समस्त फिरँग बड़े भारी है।
एवज में एक रण-पण्डित फिरँग आयो,
रच्छक तहाँ को वह गौरव को धारी है॥२०॥

१९ वसईचा किल्ला मजबूत होता व फिरंगीही [पण तसेच] बलढय होते [म्हणून] तीन महिन्यांपर्यंत [तेथें] लढाई झाली; [परंतु] कोणाच्याही [पराक्रमाचा] लौकिक कमी झाला नाहीं [अर्थात् कोणीही हरले नाहीं].

२० फिरंग्यांनीं मराठ्यांना दाद दिली नव्हती; [परंतु] शेवटीं एक मोठी गोष्ट घडून आली कीं, वसईचा फिरंगी किल्लेदार लढाईची तयारी करीत असतांना [त्याच्या] शत्रूंनीं [मराठ्यांनीं] तोफ डागून त्यांस ठार केलें.× आजूबाजूंस रेती

× वसईचा सेनापति मर्तिन सिरवेल एप्रिलच्या ४ थ्या तारखेस रात्रीं ९ वाजतां तटावर पाहणी करीत असतां मराठ्यांचा गोळा लागून मरण पावला. (केळकरः वसईची मोहिम भा. २ पृ. १९८.)

दोहा

भयो अधिक त्रय मास के, नहिं टूट्यो आखेर ।
सफल हुई नहिं शक्ति को, दीखन लागी देर ॥२१॥

एक दिन बैठे यों कह्यो, चीमा आपा बात ।
किलय विजय कर हूँ नही, तोडो गर्दन हाथ ॥२२॥

बात व्यंग की यह हती, यामें आशय गूढ ।
सुघड़ सुभट समझे तुरत, पडे भरम में मूढ ॥२३॥

[व] पाणी असल्याकारणानें अगोदरच बलिष्ट असलेले फिरंगी आणखी भारी झाले होते. [मृत किल्लेदाराच्या] जागीं [आतां] एक युद्धविद्याविशारद फिरंगी [तेथें] आला. तो येथील [वसई किल्ल्यावरील] संरक्षक [अर्थात् किल्लेदार] झाला व फिरंग्यांची बाजू राखूं लागला.

२१ तीन महिने होऊन गेले [तरी] किल्ला पडला नाहीं. [मराठ्यांची शक्ति सफळ झाली नाहीं.] [ती सफळ व्हावयाला अवधि दिसूं लागला.

२२ [तेव्हां] एके दिवशीं चिमाजी अप्पांनी [सहज] बसले असतांना असें म्हटलें की, 'किल्ला फत्ते होत नसला [तर] माझें शिर [तरी किल्ल्यांत जाऊन पडेल असें] उडयून टांका'.

२३ हें [त्यांचें] भाषण गर्भितार्थाचे होतें. त्यांत खोल अर्थ होता. सुज्ञ वीरवरांना तो [अर्थ] तेव्हांच उमगला; [मात्र] मूढ [होते ते] बुचकळ्यांत पडले.

हार खाय हम नहिं हटें, यह नहिं वीरन धर्म।
चीमा आपा को यहाँ, भाषण बेधक मर्म ॥२४॥

मनहरण

सुनो सब सुभट मम सेन के यहाँ खड़े,
हार कर घर जानो महा वंश-हानि है।
तीन मास बीत चले जीत हूँ की आशा नाहीं,
मरहठ मर्यादा भंग आज हम जानी है ॥
मरना अवश्य हमें जग में परेगा वीरों,
क्यों न मरते हो कर झेल के भवानी है।
सारयुत भाषण को सुनि के सचेत भये,
आज ही किले को कुल तोड़ने की ठानी है ॥२५॥

२४ चिमाजी अप्पांनीं ह्यावेळीं जें मार्मिक भाषण केलें तें असें होतें कीं, 'हार खाऊन आम्हीं मागें हटणार नाहीं. हा वीरांचा धर्म नव्हे!'

२५ 'येथें उभे असलेल्या माझ्या सैन्यांतील वीरांनो, ऐका. हार खाऊन घरीं जाणें ही कुळाला मोठी कमीपणां आणणारी [गोष्ट] होय. तीन महिने होत आले [अजून] जयाची आशा नाहीं. [काय,] मराठ्यांचा लौकिक आतां नष्ट होणार [असें] आम्ही समजावें? बहाद्दरांनो, जगांत आपणा [सर्वांना] मरावयाचें तर आहेच [मग] भवानी [तलवार] हातांत धारण करून कां मरत नाहीं?' [चिमाजी अप्पांचें तें] सारयुक्त भाषण ऐकून

रेत में सुरंग उन देवन की ठानी मन,
आखिर में होत अंत जग की कहानी है।
ढाई हाति एक बुर्ज लागत सुरंग हू सों,
भई कछु राह ऐसी वीर उन जानी है॥
सैनिक सशस्त्र तब भीतर में गाँस कीन्हों,
फिरंग्यों ने तोप अग्नि झारी बेप्रमानी है।
मेघनाद अगनि बरषा-सी दिखाई मानों,
हिम्मत न हारी पर भई बहु हानि है॥२६॥

दोहा

केते मरहठ जरि गये, बरखा आगनि माँहि।
मर के हिम्मत नहिं तजी, जनु बाढ़ तरु छाँहिं॥२७॥

[मराठ्यांना] आवेश आला व त्यांनीं आजच किल्ला सर्व उध्वस्त करून टाकण्याचा निश्चय केला.

२६ रेतींतून सुरुंग उडवावयाचे [असें] त्यांनीं मनांत पक्कें ठरविलें. अंत हा शेवटीं [सर्वांना] असतो, असा जगाचा नियम आहे. सुरुंग लागून [किल्ल्याचा] एक बुरुज ढांसळला [व तेथून आंत जाण्यास] थोडासा मार्ग झाला आहे, असें त्या [मराठा] वीरांना दिसून आलें. तेव्हां सारे सशस्त्र सैनिक [तेथून] आंत शिरूं लागले तों फिरंग्यांनीं तोफा डागून अमर्याद अग्निवर्षाव केला. जणूं काय [त्यावेळीं प्रत्यक्ष] मेघनाथ अग्निवर्षाव करीत असल्याचें दिसूं लागलें ! [मराठ्यांची] पुष्कळ हानि झाली तरीही ते हिंमत हरले नाहींत.

२७ कित्येक मराठे अग्निवर्षावांत जळून गेले; [परंतु] प्राण-

बसई किलो बढ़कर लियो, फतह कियो रणधीर।
फहरा कर भगवाँ दियो, झँडो मरहठ वीर ॥२८॥

मनहरण

प्रबल प्रतापी चीमा आपा की सलाह हूँ तें,
वसई भयंकर के किले को तुड़ाई है।
अग्नि बरषा हुँ से आपत्ति को झेल झेल,
मराठन मर्जाद हूँ की सीमा डलवाई है॥
अचल सह्याचल को फेटन उड़ाय कर,
धर्म-ध्वजा दण्डन की शोभा फहराई है।
मानौं दिव्य अग्नि हूँ की साहस सौं जीत कर,
सिद्ध कर दीन्हों जग जाहिर कराई है ॥२९॥

हानि होऊनही) ते धैर्यच्युत झाले नाहींत. वृक्ष कांपला तरी अधिकच वाढत असतो (तसे त्यांचें धैर्य) जणूं काय वाढतच गेलें!

२८ पुढें होऊन त्या रणवीरांनीं वसई किल्ला फत्ते करून घेतला. (व तेथें आपला) भगवा (झेंडा) त्या मराठे वीरांनीं फडकावून दिला.

२९ प्रबल प्रतापी चिमाजी अप्पांच्या सल्ल्यामुळें भयंकर असा वसईचा किल्ला भग्न करतां आला. अग्निवर्षावाचें संकट सोशीत सोशीत मराठ्यांनीं आपल्या (पराक्रमाच्या) लौकिकाची परा-काष्टा करून दाखविली! सह्याद्रि पर्वतावर (अर्थात् सह्याद्रीवरील वसईवर) मारा करून (तेथें) आपल्या अधिकाराचा शोभाशाली

समता करे न जग जग में विदित करी,
अपने पराक्रम की हद करवाई है।
बाजीराव पेशवा ने धर्म के रखन काज,
कर में कृपान वीर हाथ में लिवाई है॥
ध्येय एक धर्म हूँ को हृदय धराय कर,
कहे कवि नरु इन राज को बढाई है।
बसई के युद्ध में मराठन अमर नाम,
जग में करायो काम अमर दिखाई है॥३०॥

दोहा

शिखर-बन्द मन्दिर मिल्यो, बसई किले घुस जान।
नत मस्तक आपा भयो, शिव मन्दिर पहिचान॥२१॥

धर्मध्वज फडकावून दिला! जणू काय, (त्यांनीं) साहसानें अग्नि-दिव्यच यशस्वी करून दाखवून त्याची सिद्धि जगजाहीर केली.

३० जग (सारखें) एकाच स्थितींत चालत नाहीं, (हें त्यांनीं) जगाला विदित करून दिलें (व) आपल्या पराक्रमाची शर्थ करून दाखविली. बाजीराव पेशव्यांनी धर्मकार्यरक्षणासाठीं वीराचें खड्ग हातीं धारण केलें आहे. नरू कवि म्हणतो, धर्माचें एक ध्येय अंतःकरणांत बाळगून त्यांनी मराठी राज्याची वृद्धि केली आहे. वसईच्या युद्धांत मराठ्यांचें नांव अमर झालें. त्यांनी (तेथें) जें कार्य केलें तेंही जगांत अमर झालेलें दिसून येतें.

३१ वसई किल्ल्यांत शिरल्यावर एक शिखरबंद मंदिर लागलें.

मनहरण

किले में प्रवेश करि शिव को झुकायो शीश,
जय को मनाय निज भुज पै धराई है।
बार बार गायो गुण हृदय लिवायो नाम,
महादेव मन्दिर की प्रतिष्ठा कराई है॥
हीरे को मुकुट लाय शीश पै चढ़ाय कर,
प्रभु को मनाय जग कीरत लिवाई है।
बाजीराव भ्रात हूँ ने गुरु श्री ब्रम्हेंद्र हूँ को,
पत्र द्वारा हाल सब प्रगट कराई है॥३२॥

(तें) शिवमंदिर * आहे, असें ओळखतांच (चिमाजी) अप्पांनीं त्यास प्रणाम केला.

३२ किल्ल्यांत प्रवेश करून (चिमाजी अप्पांनी) महादेवापुढें शिर नमविलें (व) आपल्या बाहूनें त्यास कवटाळून जयजयकार केला. पुन्हांपुन्हां (महादेवाचे) गुणानुवाद गाइले (व) अंतः-करणांत त्याच्या नांवाचें चिंतन केलें. (नंतर त्या) महादेवाच्या मंदिराची त्यांनीं (मध्यंतरीं भ्रष्ट झाल्यामुळें पुन्हां) प्रतिष्ठा करविली * हिऱ्याचा मुकुट आणून (तो महादेवाच्या) मस्तकावर चढवून (व) प्रभूला आळवून (त्यांनीं) जगांत कीर्ति संपादिली. बाजीरावांचे बंधु (चिमाजी) ह्यांनी गुरू श्रीब्रम्हेंद्रस्वामि ह्यांस पत्रद्वारें (ही) सर्व हकीगत कळविली.

---

* असा उल्लेख बेहरेकृत 'पहिले बाजीराव' ह्या पुस्तकाशिवाय आणखी कोठें आमच्या पाहण्यांत नाहीं.

पत्र माहिं हाल यह लिखि के पठायो वीर,
 पराक्रम तकूजी हूँ को जाहिर कराई है।
याके रण कौशल से मराठन की मोंछें उग्र,
 तरागढ़ टूट्यो हाथ आपने धरायो है॥
कहाँ लौं प्रशंसा करूँ पुँवार वर वीर हूँ की,
 ठाम ठाम संगर में साथ मो दिवायो है।
और हूँ अनेक वीर लड़े सब मोह त्याग,
 झंडा पेशवा को, आज इनने उड़ायो है॥३३॥

दोहा

आये पुनि सब जीत कर हृदय माहिं हुलसाय।
नगर-द्वार पै सबन को, लिये बधाय बधाय॥३४॥

३३ त्या वीरानें (चिमाजीनीं) सदर पत्रांत अशी हकीगत लिहून पाठविली होतीं कीं, जींत तुकोजीरावांचा पराक्रम श्रुत केला होता. (त्यांत म्हटलें होतें कीं,) ह्याच्या (तुकोजीरावांच्या) रणकौशल्यामुळें मराठयांची मिशी वर राहिली! (त्यांनींच) तारापुरचा किल्ला फत्ते करून आपणांस हस्तगत करून दिला आहे. (त्या) पवार वीरश्रेष्ठाची कोठवर प्रशंसा करूं! लढाईंत ठिकठिकाणीं (त्यांनीं) मला साथ दिलेली आहे. सारा मोह सोडून आणखीही अनेक वीर लढलें; (परंतु) पेशव्यांचा झेंडा आज ह्यांनींच फडकावून दिला आहे.

३४ (वसईची मोहीम) जिंकून सर्व (मराठे) मनांत

सब सुभटन के सहित मैं, शाहु कियो दरबार।
राव तुका पुँव्वार को, प्रगट कियो मुख सार ॥ ३५ ॥

मुग्ध भयो सुनि वीरता, छितिपति शाहू राज।
'सप्तसहस्त्री'* की दई, पदवी वाको आज ॥ ३६ ॥

धर्म-युद्ध मरहठ कऱ्यो, भयो अमर उन नाम।
नरू कवी वर्णन कऱ्यो, समझ आपनो काम ॥ ३७ ॥

प्रफुल्लित होत [पुण्यास] परत आले [तेव्हां] नगरद्वाराशीं त्या सर्वांचें प्रशंसापूर्वक स्वागत करण्यांत आलें.

३५ शाहू महाराजांनीं सर्व वीरांसह दरबार भरविला [व त्या दरबारांत त्यांनीं] तुकोजीराव पवारांची प्रशंसा केली.

३६ [तसें तुकोजीरावांचा] पराक्रम ऐकून छत्रपति शाहू महाराज [पूर्वींच] मुग्ध झाले [होते] आज [त्यांनीं] त्यांस ['सेना] सप्तसहस्त्री 'ची पदवी बहाल केली.

३७ मराठ्यांनीं हें धर्मयुद्ध केलें [व त्यामुळें] त्यांचें नांव अमर झालें. आपलें कर्तव्य समजून नरु कवीनें [हें] त्याचें वर्णन केलें आहे.

---

* पृष्ठ ९५ वरील टीप पहा.

६ वसई-संग्राम

[वसई-संग्रामासंबंधीं एक आणखी स्फुट गीत उपलब्ध झालें तें खालीं दिलें आहे.]

पद्धरी

फिरंगान वसई माँहि फौज । तनि शंक नहिं मानत मन मौज ॥
जल माँहि किलो बहु जोरदार । तीन तरफ नीर पावै न पार ॥१॥
मिल सभी भूप फौज के माँह । एक एक अडर पराक्रम अथाह ॥
तहाँ कालुजी सुत तकूजी राव । जुद्ध विजय वीर सभी मनाव ॥२॥
सिंधिया राणु बहादुर विशेश । जिन नाम सुनत डरे दशु देश ॥
जशवन्त राव पुँव्वार जान । महा तेजवंत सूर्य समान ॥३॥

१ वसईमधील फिरंग्यांचीं फौज मुळींच कशाची काळजी न बाळगतां मनांत आनंद (मानीत होती). तीन्हीं बाजूंनीं अपरंपार पाणी असलेला (हा) समुद्रामधील किल्ला फार मजबूत (होता).

२ एकापेक्षां एक धीट व भीषण पराक्रम (गाजविणारे) सर्व सरदार फौजेंत एकत्र झाले. त्यांत काळोजीचे पुत्र तुकोजी-रावही (होते) (हा) वीर युद्धांत विजय (मिळवून देणारा आहे, असें) सर्व मानीत होते.

३ ज्याचें नांव ऐकून दाही दिशा भयभीत होतात (ते) विशेष पराक्रमी राणोजी शिंदेही (होते). सूर्यासमान महान् तेजस्वी वाटत (असलेले) यशवंतराव पवारही (होते).

मल्हार राव होल्कर महीप। दशु दिशा विजय करि जंबुद्वीप॥
बाजी बहु बलनिधि भीमराव। जिन देख सबै नित त्रास खाव॥४॥
पटवेश्वर गोविंद ज्ञानवान। जिन नाम सुनत कंपे जहान॥
सरकार पेशवे लघु भ्रात। हणे हिन्दु मुसलमान एक हात॥५॥
चिमाजि राव चातुर विशेश। और जणूं भीम करण महेश॥
सरदार पण करी सबै पूर। बसई फते करणी जरूर॥६॥
चिमाजी राव कहे फते आज। नहीं करूँ शिर समर्पू आज॥
सुनिवात अहो राजनसमाज। शिर काटि करा सब दधिमें आज॥७॥

४ भारतवर्षांत दाही दिशांत विजय मिळविणारे सरदार मल्हारराव होळकरही (होते). ज्यांना पाहून नेहमीं सर्व भीत, (ते) थोर बलसंपन्न बाजी भिवराव ही (होते).

५ ज्याचें नांव ऐकून पृथ्वी (थरथर) कांपे (ते) ज्ञानवंत गोविंदराव पटवर्धनही (होते). पेशवे सरकारांचे कनिष्ठ बंधु (चिमाजी अप्पाही (होते ते शत्रुपक्षीय) हिंदु-मुसलमानांना एका हातानें निर्दाळीत. [अर्थात् शत्रु मग तो स्वजातीय असो अथवा परजातीय असो त्याला समान समजून त्याचें तें निर्दालन करीत].

६ चिमाजीराव (अप्पा) विशेष चतुर व (पराक्रमांत) जणूं काय भीम, कर्ण, महेशच! वसई जरुर फत्ते करावयाची (असा) सर्व सरदारांनीं पुरता पण केला.

७ चिमाजी (अप्पा) म्हणूं लागले (कीं वसई) आज फत्ते केली नाहीं (तर) आज शिर अर्पण करीन. (ही) गोष्ट ऐकून

दोहा

तीन तरफ पानी तटे, रास्तो एक हि रेत।
सुरंग लगायो उन बखत, किलो उड गयो केत ॥ ८ ॥

चटाचटी तोपाँ चली, गोला रही गिराई।
किलो थेल्यो उनहिं बखत, झटपट चढियाँ जाई ॥ ९ ॥

रंग मरेठा रावताँ, सभी शूर सरदार।
फिरंगि फौज कीन्ही फते, जय बँका जूझार ॥१०॥

(कोणी सरदार म्हणूं लागले) अहो सरदार वृंद, (आपण वसई फत्ते करूं शकलों नाहींत; तर आपल्या) हातांनीं शिरे कांपून सागराला (अर्पण) करूं.

८ तिन्ही बाजूंनी (किल्ल्याच्या) तटांना पाणी (लागलेलें) होतें (व त्यास जावयास) मार्ग एकच (होता व तो) रेतींतून! मराठ्यांनीं त्यावेळीं सुरुंग डागले, त्याबरोबर किल्ल्याचा तट उडून गेला.

९ चटाचट [धूमधडाड] तोफा चालल्या. गोळे (किल्ल्याला) भग्न करूं लागले. हां हां म्हणतां किल्ला (अर्थात् किल्ल्याचे तट) पडून (दगडविटांचा) ढेर झाला! (व ते) झपाट्यानें (किल्ल्या) वर चढून गेले.

१० (ते) सर्व शूर मराठे सरदार प्रभावशाली योद्धे होते! (त्यांनीं) फिरंग्यांची फौज फत्ते केली! पराक्रमी वीरांचा जयजयकार असो!

नरू कवि कहे सुन नरपति, राजन तो बहु रंग।
धन्न धन्न पितु-मातु धन्न, जब्बर कीन्हों जंग ॥११॥

११ नरू कवि म्हणतो (हे) राजा (तुकोजीराव), ऐक, पुष्कळ सरदारांनीं पराक्रम गाजविला (खरा पण त्यांत तूं) जबरदस्त पराक्रम गाजविलास. (तुझे) माता – पिता त्रिवार धन्य (होत) !

७ ‘ सेनासप्तसहस्री ’

(सन १७३९ इ.)

दोहा

सुनत तुका को साहु ने, हिय महँ भयो गुमान ।
‘ सप्तसहस्री ’ की दई, पदवी प्रबल प्रमान ॥ १ ॥

मनहरण

प्रबल पराक्रमी है पुँवार तकूजी राव,
केते घमसान कीन्हें जाहिर जनाय के ।
बसई बुँदेलखंड पालखेड दिल्ली और,
और हूँ अनेक वीर शत्रु दलवाय के ॥

१ तुकोजीराव [पवार] ह्यांची कीर्ति ऐकून [छत्रपति] शाहू महाराजांना अभिमान वाटला [व त्यांनीं त्यास] वीरतेला प्रमाणभूत अशी ‘ [सेना] सप्तसहस्री ’ची पदवी बहाल केली.

२ तुकोजीराव पवार हे प्रबल पराक्रमी आहेत. [त्यांनीं] पुष्कळ लढाया करून नांव मिळविलें. पालखेड, बुंदेलखंड, दिल्ली आणि वसई येथें [व] आणखींही [ठिकाणीं] शत्रूंचे अनेक वीर निर्दाळून आणि आपल्या प्रखर खड्गाचा दरार पसरवून आजपर्यंत

सेल जिमि सालत है आज लग शत्रुन के,
प्रखर कृपानन की धाक पड़वाय के।
शाहू छत्रपति हूँ ने आपको बढ़ायो मान,
'सप्तसहस्त्री' को खिताब दिलवाय के ॥ २॥

दोहा

नरू कवी कर छंद में, दियो तुका बहु मान।
'सप्तसहस्त्री' * की सुनी, हिय महँ आनंद मान ॥ ३॥

ते भाल्याप्रमाणें शत्रूंना सलत आहेत. छत्रपति शाहू महाराजांनीं '[सेना] सप्तसहस्त्री' ची पदवी देऊन त्यांचा मान वाढविला.

३ [आपल्या मालकास] '[सेना] सप्तसहस्त्री'ची [पदवी मिळाल्याची बातमी] ऐकून नरु कवि अंतःकरणांत आनंद मानून तुकोजीरावांना मिळालेला तो बहुमान कवितेंत ग्रथित करीत आहे.

* टीप:— 'सप्त सहस्त्री" चे ऐवजी "हप्त सहस्त्री" असे शब्द कांहीं लिखाणांत आढळतात. वास्तविक दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. उत्तर हिंदुस्थानांत 'सप्त'चा 'हप्त' म्हणून उच्चार बरेच लोक करतात. सदर गीत नरू कवी यानें केलें असून तो मूळचा सोंदवाडयांतला राहणारा असल्यानें सदर कवनांत 'सप्त' शब्दाचे ठिकाणीं 'हप्त' हा शब्द लिहीला आहे. परंतु सप्त हा संस्कृत रूप प्रचलित असल्यामुळें ते येथें वापरले आहे.

८ मेडता–संग्राम

[सन १७५४ इ.]

दोहा

रामसिंह थो क्लीव मन, बिजैसिंह बलवान।
इन दोउन में नहिं पटत, घटत गयो मनमान ॥ १ ॥

मनहरण

मरु देश जोधपुर गादी को विषय यहाँ,
रामसिंह बिजैसिंह दोन्हों झगड़ावे हैं।
अभैसिंह-सुत रामसिंह कहलावे यह,
बिजैसिंह बखतसिंह-पुत्र बजवावे है ॥

१ रामसिंह हा भित्र्या मनाचा असून बिजेसिंह हा बलाढ्य आहे. त्या दोघांचें [आपसांत] पटत नसल्यानें ते दोघेही मनास येईल त्याप्रमाणें वागूं लागले आहेत.

२ रामसिंह [व] बिजेसिंह ह्या दोघांतील भांडणाचा विषय म्हणजे मारवाड देशची जोधपुरची गादी होय. रामसिंह हा अभेसिंहाचा मुलगा असल्याचें जाहीर असून बख्तसिंहाचा मुलगा बिजेसिंह म्हणून प्रसिद्ध आहे. [त्या] उभयतांत [पूर्वींपासून]

दोउन में द्वेष पूर्ण आवत चलत यहाँ,
रामसिंह हकू हूँ की रार रचवावे है।
वर्तमान स्वामी है बिजैसिंह बलशाली यों,
या सों रामसिंह हूँ की कछू ना पटावे है ॥२॥
रामसिंह हूँ को पक्ष पेशवा ने लीन्हों पूर्ण,
पूरो विशवास दीन्हों राज के दिलावे को।
सेना देय साथ कीन्हैं जयप्पारु सैंधिया को,
लेकर प्रबल फौज चल्यो बीर धावे को ॥

आतांपर्यंत पुरतें वैर चालत आलें आहे.* रामसिंह आपल्या हक्काचा लढा लढवित आहे. मारवाडचा विद्यमान अधिपति बिजेसिंह हा तसा बलाढ्य आहे म्हणूनच रामसिंहाचें कांहींही तो चालूं देत नाहीं.

३ रामसिंहाचा पुरता पक्ष पेशव्यांनीं घेतला (व) त्यास राज्य मिळवून देण्याचें पूर्ण आश्वासन दिलें. × जयाप्पा शिंद्यास फौज देऊन त्याच्याबरोबर पाठविलें. प्रबल फौज घेऊन (तो) वीर

* वास्तविक मारवाडचा राणा अभेसिंह मरण पावल्यावर त्याचा औरस पुत्र ह्या नात्यानें मारवाडच्या गादीचा वारस रामसिंह हा होता व त्याप्रमाणें त्यानें कांहीं दिवस राज्य केलेंही; पण त्याच्या बालिश स्वभावामुळें तो प्रजेच्या मर्जीतून उतरल्या कारणानें त्याचा सख्खा चुलता बख्तसिंह हा मारवाडचा राणा बनला. तेव्हांपासून रामसिंहाचें बख्तसिंहाशीं व बख्तसिंहाच्या पश्चात् त्याचा पुत्र बिजेसिंह ह्याच्याशीं वैर चालूं राहिलें.

× भाऊसाहेबांची बखर पृ. ८-५

रामसिंह साथ रह्यो स्वारथ समेटवे को,
लीन्हो प्रण पूर्ण मरु देश के मिटावे को ।
कमर कसाय हुलसाय ढिग आयो यहाँ,
बर्तमान स्वामी बिजैसिंह को हटावे को ॥३॥
राह में चलत याने कुंभेरी फतह कीन्ही,
तीस लाख खरनी ले जाट को हरायो है ।
सूरजमल याको नाम करन संग्राम चह्यो,
जयप्पा हटायो और आगे बढ़ि धायो है ॥
साथ में तकूजी औ जीवाजी पुँवार हते,
जोधपुर पंथ चलें पत्र एक पायो है ।

(बिजेसिंहावर) स्वारी करण्यास निघाला. (आपला) स्वार्थ साधण्यासाठीं रामसिंह त्यांच्याबरोबर होता. (जणूं काय) सर्व मारवाड देशच उध्वस्त करून टांकण्याचा (त्यानें) पण केला होता. (मारवाडचा) विद्यमान स्वामी बिजेसिंह ह्यास पदच्युत करण्यासाठीं (तो) कटिबद्ध होऊन उत्साहानें (मारवाडांत) जवळ आला आहे.

४ मार्गांत जातांना त्यांनीं (मराठ्यांनीं) कुंभेरी जिंकली (व तेथील) जाट (राजा) स हरवून त्याच्यापासून ३० लाख रुपये खंडणी वसूल केली. * त्याचें (त्या जाट राजाचें) नांव सूरजमल होय. त्यानें लढण्याची इच्छा प्रदर्शित केली, (तेव्हां) जयाप्पांनीं त्यास हरवून (ते) पुढें निघाले. त्यांच्याबरोबर तुकोजीराव व जिवाजीराव पवारही होते.

* गुजर : सं. देवास थो. पा. पवार घ. इ., पृ. १३०.

दूतन संदेश दीन्हों मेडते में बिजैसिंह,
सेना के समेत पर्‍यो आज ही में आयो है ॥४॥
लागत खबर वीर मेडता की ओर चल्यो,
कृष्णगढ़ राह पर लूट वाको लीन्हो है ।
सागर समान दल हिलोरन करत हल्यो,
खड्ग झकोरन को छार जल पीन्हो है ॥
डाल के पडाव यहाँ जयप्पारु सैंधिया ने,
मेडता नगर तहाँ जाय घेर लीन्हो है ।
चतुरंगिनी मराठन की मेदिनी हिलात चली,
शेष सकुचात चली शत्रु दावँ दीन्हों है ॥५॥

जोधपुर मार्गें जातांना (त्यांना) एक पत्र मिळालें. दूतांनीं बातमी दिली कीं, बिजेसिंह आजच मेडत्यांत येऊन सैन्यासह तळ देऊन राहिला आहे.

५ बातमी समजतांच वीर (जयाप्पा शिंदे) मेडत्याकडे निघाले. मार्गांत कृष्णगड (लागलें) तें लुटलें. * समुद्रवत् (त्यांची) सेना हलत डुलत चालली. (त्यांच्या) डोलणाऱ्या खड्गांना (जणूं काय शत्रुरक्तरूपी) खारें पाणी प्यावयाचें आहे. जयाप्पा शिंद्यांनीं तेथें (कृष्णगडास) तळ देऊन (ठरविलें कीं) मेडतें नगरास जावें (व) त्यास वेढा घालावा. शत्रूला पेंचांत घेण्याकरितां मराठ्यांची चतुरंगिनी सेना (आपल्या भारानें) पृथ्वीला हलवित चालली (व तिचा भार सहन न होऊन) शेषही अंग चोरूं लागला.

* गुजर : सं. देवास थो. पा. पवार घ. इ., पृ. १३१.

दोहा

लियो घेरि गढ़ मेडता, जय-आपा तहँ जाय।
बिजैसिंह जब यह सुनी, हृदय गयो झुंझलाय ॥६॥

बिजैसिंह वर वीर ने, धर धीरज हिय धार।
कमर कसी संगर करन, मरहठ अग्र मँझार ॥७॥

आठ मिसल उमराव सब, अखिल मिले तहँ आय।
रण बँका साबित करन, जुड़े स्वामि ढिग जाय ॥८॥

मनहरण

मेडता में बिजैसिंह कीन्हो दरबार तहाँ,
बीर उमरावन पै जाहिर करायो है।

६ जयाप्पांनीं तेथें जाऊन मेडत्याच्या किल्ल्याला वेढा घातला. बिजेसिंहानें जेव्हां हें ऐकलें तेव्हां त्याचें अंतःकरण खवळून गेलें.

७ मराठ्यांना पुढें जाऊन तोंड देण्याचें वीरश्रेष्ठ बिजेसिंहानें मनांत योजून (त्याप्रमाणें) लढाईसाठीं कंबर बांधली.

८ (त्याचे) सर्व आठही मोठमोठे सरदार तेथें गोळा झाले. (आपलें) रणशौंडत्व सिद्ध करण्यासाठीं (ते) आपल्या मालका-जवळ आले.

९ मेडत्यास बिजेसिंहानें दरबार भरविला (व) तेथें

रामसिंह काका आज आयो लेन बदले को,
मराठन को मदद पै मेडते चढ़ायो है ॥
कैसे इस जंग में जुटावे औ बढ़ावे मान,
जयप्पारु सैंधिया विशाल सेन लायो है।
आऊवा आसोप औ पोखरन निमाज आदि,
आपके पराक्रम पै भार धरवायो है॥९॥

दोहा

आप कहें तो केसरिया, तुरत बटावे आज।
रण बँका राठोर की, प्रबल बनावे पाज॥१०॥

[आपल्या शूर उमरावांपुढें जाहीर केलें कीं,] 'रामसिंह काका* आज उट्टं घेण्याकरितां आला आहे [व] सहाय्य करण्याच्या [हेतूनें त्यानें] मराठ्यांकडून मेडत्यावर स्वारी करविली आहे. [पाहूं या] ह्या लढाईंत तो कसा लढतो [व] आपला मान वाढवितो. जयाप्पा शिंद्यांनीं मोठी फौज आणली आहे. आऊवा, आसोप, पोखरण व निमाज आदि¶ [माझ्या सरदारांनो,] आपल्या पराक्रमावरच मी भिस्त ठेविलेली आहे.

१० 'आपण म्हणत असाल तर आजच ताबडतोब [मी]

* येथें 'काका' म्हटलें आहे; परंतु नात्यानें तो चुलत भाऊ होता. कदाचित् काकाच्या वंशांतला म्हणून त्यास काका म्हटलें असावें.

¶ ज्याच्या त्याच्या जहागिरीच्या नांवानें प्रत्येक सरदारास येथें उल्लेखिलें आहे.

तुरत वीर रण बँक सब, बोलि उठे इक बात ।
स्वामि संग संग्राम पै, हम सेवक सब साथ ॥११॥

हार जीत प्रभु हाथ है, कर बीरन यह काम ।
लड़ैं अड़ैं तिल तिल कटैं, सब जावे सुरधाम ॥१२॥

सुनत बिजय ह्वै फिर अजय, बोल उठ्यो ततकाल ।
सजग करो सब सेन को, ह्वैकर आज उताल ॥१३॥

केसऱ्या [केसरी रंगाचा पोषाख] वांटून देतो [व] रणशूर राठोडांची भक्कम तटबंदीच [मराठ्यांपुढें] उभी करतो. '

११ त्याबरोबर सर्व रणबहाद्दर वीरांनीं गर्जून एकच घोषणा केली कीं, 'युद्धांत स्वामींजवळ आम्हीं सर्व सेवक एकजुटीनें राहूं.

१२ 'यशापयश ईश्वराच्या हातीं आहे. वीरांचें कर्तव्य एवढेंच होय कीं, [युद्धांत] लढावें, [शत्रूशीं] अडावें, तिळतिळ कटावें [व शेवटीं] सर्वांनीं स्वर्गास जावें.' *

१३ [आपल्या वीरांचें तें भाषण] ऐकून बिजेसिंहाला पुन्हां [धीर येऊन] अजिंक्य [झाल्यासारखें वाटलें. तो] तत्काळ गर्जून म्हणाला 'आजच त्वरा करून सर्व सैन्य [लढाईसाठीं] तयार करा.'

---

* कर्नल टॉडनें ह्या लढाईला तोंड लागण्यापूर्वीं बिजेसिंहानें जो दरबार भरविला होता व त्यांत त्याच्या वीरांचे जे उद्गार निघाले होते त्याचें जें वर्णन केलें आहे तें वर्णनाशीं ताडून पा या हण्यासारखें आहे.

तुरत बटाये केसरियाँ, अरु सैनिक हथियार।
अखिल आनि हाजिर खड़े, होवन आज जुझार ॥१४॥

तोटक

अब बाजन बाज जुझाउ लगे,
अब साजन साज सजाउ लगे।
अब सिंधुन गान कि तान लगी,
अब किन्नर याचक ध्यान पगी ॥१५॥

अब राग बडाउन के उचरैं,
अब आसव प्यालन के मुजरैं।
रण बँक अबै मुँछ तानत हैं,
जय जीतन की मन मानत हैं ॥१६॥

१४ आजच लढाई होण्यासाठीं [सैनिक मंडळी] हाजर होऊन पुढें उभी राहिली. लागलेच त्यांना केशरिया व शिपायाचीं हत्यारें वांटून देण्यांत आलीं.

१५ आतां [शत्रूकडील रण] वाद्यांवर वाद्यें वाजूं लागलीं. आतां रणवेषांवर रणवेष चढविले जाऊं लागले. आतां सिंधुरागाच्या ताना ऐकूं येऊं लागल्या [व] आतां किन्नरांकडून [अर्थात् चारणां] कडून [वीरगीतें ऐकण्याकडे सगळयांचें] लक्ष वेधलें जाऊं लागलें.

१६ आतां त्यांना वाढता रंग येऊं लागला. आतां मद्याच्या प्याल्यांचे मुजरे होऊं लागले. रणबहाद्दर आतां मिशांवर तांव देऊं लागले [व] मनांत जयप्राप्तीचा अहंकार बाळगूं लागले.

मरु देश–पती सुख मानत है,
अपने भुज पान बखानत है।
पति आउब और असोपन की,
मन जानत है भुज पानन की ॥१७॥

इहि भाँति मची बहु मैफल है,
बहु दारुन तैं आति गैफल है।
चलवैं कर चालत सोवन को,
मन मत्तक बीर बिछोवन को ॥१८॥

दिन प्रात भयो सब बीर कढ़ैं,
खग झाटन को सब अस्व चढ़ैं।

१७ हें पाहून मारवाडचा राणा [बिजेसिंह] मनांत आनंद मानूं लागला [व] आपल्या बाहु [बला] ची स्तुति करूं लागला. [तसेंच] आऊब व आसोप [ह्या] सरदारांच्याही बाहु [बला] ची थोरवी तो मनांत जाणूं लागला.

१८ ह्याप्रमाणें [ती] बैठक अशी चांगली रंगली आहे कीं, त्यावेळीं [सर्वजण] अति मद्यपानामुळें धुंद झाले आहेत. [मग] मनसोक्त वागणाऱ्या [त्या] वीरांना [ज्याच्या त्याच्या] शय्येकडे झोंपण्यासाठीं चालवत न्यावें लागलें.

१९ [दुसऱ्या] दिवशीं पहांट झाली [तेव्हां] सारे वीर बाहेर पडले. तलवार चालविण्यासाठीं [ते] सगळे घोड्यांवर स्वार

विरुदावलि किन्नर गान करें,
अरु सिंधुन गानन को उचरें ॥१९॥

पुनि नौबत और निसान बजे,
पुनि स्वामिय पै सब सैन सजे।
मरुदेश–पती लख भट्टन को,
निमअंत्रन दीन्ह मरट्ठन को ॥२०॥

हम हाजिर हैं अगवानिन को,
मरहट्ठन की मिजवानिन को।
पट द्वारन के अब खोल दिये,
सब संग हि स्वामिय के चढ़िये ॥२१॥

झाले. (त्यावेळीं) किन्नर (अर्थात् चारण) कीर्तिगाथा गाऊं लागले व सिंधु राग आळविला जाऊं लागला.

२० पुन्हां डंके वाजूं लागले व निशाण फडफडूं लागलें. सारी सेना पुनः (आपल्या) स्वामीपाशीं (बिजेसिंहापाशीं) सज्ज होऊन आली. (त्या) मारवाडाधिपतीनें आपल्या वीरांकडे पाहून मराठ्यांना (लढाईचें) आव्हान दिलें.

२१ गडाचीं दारें आतां उघडून दिलीं गेलीं व सर्वजण (आपल्या) स्वामीबरोबर लढाईस निघाले (व) म्हणाले मराठ्यांना रणांगणावर (रक्ताची) मेजवानी करण्यांस आम्हीं तयार झालों आहोंत.

उत बीर मराठन फौज सजी,
सब ओरन में सहनाइ बजी ।
अब हाँक नकीबन कीन्ह अबैं,
चतुरंगिनि सैन सजग्ग सबैं ॥२२॥

पुनि राव तुका तलवार लई,
जयप्पा अरु सैंधिय भी सजई ।
पुनि राम रठोरन सैन सजी,
निज स्वारथ को अब मोह तजी ॥२३॥

दुव सैनन को अब ठट्ट भयो,
दुव ओरन धूल गरट्ट थयो ।
दुव ओरन सैन सजग्ग भई,
दुव ओरन तोपन दग्ग गई ॥२४॥

२२ तिकडे शूर मराठ्यांची फौजही सज्ज झाली. सर्वदूर (सनई) शिंगें फुंकलीं गेलीं. सर्व चतुरंग सेनेनें हुषार व्हावें म्हणून नकीबानें आतां ललकाऱ्या दिल्या.

२३ पुन्हां तुकोजीरावांनीं तलवार धारण केली व जयाप्पा शिंदेही तयार झाले. (इतर) मोह सोडून (राज्य मिळविण्याच्या) स्वार्थासाठीं रामसिंहाची राठोड सेनाहि पुन्हा सिद्ध झाली.

२४ दोन्हींकडील फौजांची आतां गर्दी उडाली (त्याबरोबर) दोन्हींकडे धुळीचे लोट उसळले. दोन्हींकडील फौजा तयार झाल्या. दोन्हींकडून तोफा डागल्या गेल्या.

दुव ओरन तैं गजराज लड़े,
दुव ओरन तैं हयराज भिड़े।
दुव ओरन भाल झलक्कत हैं,
दुव ओर कृपान चलक्कत हैं ॥२५॥

दुव ओरन तैं दुव सैन भिड़ी,
दुव ओरन तैं अब झाट उड़ी।
दुव ओरन तैं अब मत्थ पड़ी,
दुव ओरन संगर सैन गड़ी ॥२६॥

अब जुत्थन पै बहु जुत्थ जुड़ी,
अब लुत्थन पै बहु लुत्थ पड़ी।
मरहट्ठन की नहिं झाट झली,
अब सैन रठोरन भाग चली ॥२७॥

२५ दोन्हींकडील हत्तींचें (दळ) लढूं लागलें. दोन्हींकडील घोडयांचें (दळ) भिडूं लागलें. दोन्हींकडील भाले झळकूं लागले. दोन्हींकडील तलवारी चमकूं लागल्या.

२६ तेव्हां दोन्हीकडील सैन्य एकमेकांवर तुटून पडलें. दोन्हींकडे आतां जोरांत चकमक उडाली. दोन्हींकडील वीरांचीं आतां शिरें पडूं लागलीं. दोन्हींकडील सैन्य लढाईंत मग्न झालें.

२७ आतां झुंडीवर झुंडी पुष्कळ आदळूं लागल्या. आतां प्रेतांवर प्रेतें पुष्कळ पडूं लागलीं. मराठ्यांचा मारा सहन होईनासा झाला. (त्यामुळें) आतां राठोड सेना पळूं लागली.

अब राह नगोर कि ओर हली,
मरहट्टन ने पुनि और दली।
पुनि आउव और असोप हलैं,
दुम दाब के वे सब भाग चलैं ॥२८॥

दोहा

नग्र मेडत्यो लूट नृप, हद्द बताये हाथ।
बलबंत हकारी बावनी, सांप्रत चाढ़ियो साथ ॥२९॥

रस्ते जाते राज रे, बधि पूरण तन व्याध।
तकूराव बोल्यो तबे, अकलमंद करि याद ॥३०॥

२८ आतां नागोरच्या मार्गाकडे (राठोड सेनेनें) पळ काढला.* मराठ्यांनीं आणखी पुन: हल्ला चढविला. नंतर आऊवा व असोप शेंपूट दाबून (रणांगणांतून) पळून गेले.

२९ राजे (तुकोजीरावांनीं) मेडता शहर लुटून (आपल्या) बाहु (बला)ची सीमा दाखविली. (नंतर) बलवान अशा आपल्या निवडक बहाद्दर वीरांचें पथक बरोबर घेऊन (ते) आतां पुढें चालले.

३० मार्गानें जातांना राजे (तुकोजीराव) ह्यांच्या शरीराला पूर्ण व्याधि झाली तेव्हां समंजस तुकोजीरावांनीं स्मरण करून सर्वांना जवळ बोलावून म्हटलें:-

* गुजर : सं. देवास था. पा. पवार घ. इ. पृ. १३१.

ईश्वर-गति लखि नहिं परत, नहिं जीवन की आस।
बीराँ रखजो बीरता, बसियो सुरपुर वास ॥३१॥

बिजय हाथ मरहठ रही, भाग चले राठोर।
घटी एक घटना प्रबल, सुभट लुट्यो सिरमौर ॥३२॥

नहिं जानत कैसे भई, यह घटना तिणवार।
इस असार संसार को, छोड चल्यो पुँव्वार ॥३३॥

वर भट मरहठ को प्रबल, राव तुका पुँव्वार।
खग झाटत वह भड़ पर्‍यो, छोड़ चल्यो संसार ॥३४॥

३१ मृत्यु लिहिला आहे तो टळणार नाहीं. [मला आतां] जगण्याची आशा राहिली नाहीं. वीरांनो, क्षत्रियबाणा राखा व त्या मार्गें स्वर्गांतील वास्तव्यास पात्र व्हा.'

३२ जय मराठ्यांच्या हातीं राहिला. राठोड पळूं लागले. [अशा वेळीं] एक मोठी घटना घडून आली. मराठ्यांच्या सैन्यांतील मुकुटमणि [तुकोजीराव यांना देवानें] हिरावून नेलें!

३३–३४ * तुकोजीराव पवार हे मराठ्यांचे प्रतापी श्रेष्ठ वीर होते. तलवार चालवित [तो वीर] धराशायी झाला [व] जगास सोडून गेला. [कवि म्हणतो] ही घटना त्यावेळीं कशी काय घडून आली, हें कळत नाहीं. ह्या असार संसाराला सोडून [तुकोजीराव] पवार निघून गेले.

* अर्थाच्या सोईसाठीं येथें ३३ व ३४ कविता एक करून ३४ चा अर्थ प्रथम व ३३ चा अर्थ नंतर केला आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

रवि अस्त पुँवार कुल, गिरियो आज गरूर।
राव जिवाजी उन बखत, करियो रंज करूर ॥३५॥

लछिमन को ज्यों राम पै, प्रेम रह्यो भर नेम।
त्यों जीवाजी राव को, रह्यो तुका पर प्रेम ॥३६॥

राव जिवाजी कहत है, टूट गयो भुज मोर।
हाय! कहाँ वह भ्रात है, मिलने को अब और ॥३७॥

मत्तगयन्द

राव तुका तुम आव अबै,
हिलके मिलके अब कंठ लगावौं।
मम भ्रात को गात कहाँ अब है,
कर चुंबन के मन प्यास बुझावौं।

३५ [ज्यांच्याविषयीं मराठ्यांना] अभिमान वाटत होता असे तुकोजीराव गेले. [त्याबरोबर] पवार कुळाचा सूर्य अस्तंगत झाला! त्यावेळीं जिवाजीराव [पवार] ह्यांनीं मोठा शोक केला.

३६ ज्याप्रमाणें लक्ष्मणाचें रामावर अतिशय प्रेम राहिलें त्याप्रमाणें जिवाजीरावांचें तुकोजीरावांवर प्रेम राहिलें.

३७ जिवाजीराव म्हणू लागले 'माझा हात [आज] तुटून पडला. हाय! आतां मला माझा भाऊ ह्यापुढें कोठून भेटणार!

३८ 'तुकोजीराव, तुम्हीं आतां याहो. कुरवाळून [मला] आतां गळ्याशीं लावाहो. माझ्या बंधूचा देह [अर्थात बंधु] आतां कोठें आहे

हाय ! अबै यह जीवन मों,
प्रभु कैसे कहो कर काम बिताओं ।
भर्त समान मों बन्धुन की,
घर जाय के बात को कैसे सुनाओं ॥३८॥

मनहरण

तकूजी पुँवार हूँ के प्राण के पयान होत,
सारे वर वीरन पै आसमान टूट्यो है ।
विजय निनाद हूँ पै बजत कुनाद नाद,
जिवाजी पुँवार हूँ को भ्रात अब छूट्यो है ॥
कहे कवि नरू तहाँ रंग महँ भंग भयो,
पीलियो हलाहल को एकदम घूँट्यो है ।

कीं ज्याच्या हाताचा मुका घेऊन माझी [प्रेमाची] तहान [मी] भागवून घेईन. हाय ! देवा, आतां ह्या आयुष्यांत सांगा कसा [मी] पराक्रम करून दाखवूं ? भरताप्रमाणें [एकाकी] घरीं जाऊन माझ्या बंधूची हकीगत मी कशी सांगूं ?

३९ तुकोजीराव पवारांचें प्राणोत्क्रमण झाल्यामुळें साऱ्या वीरवरांवर जणूं काय आकाशच कोसळल्यासारखें झालें. विजयध्वनि करणाऱ्या [मराठ्यांच्या] वाद्यांवर शोकसूचक ध्वनीचे नाद होऊं लागले. जिवाजीराव पवारांचे बंधु [तुकोजीराव] आतां सोडून गेले. नरु कवि म्हणतो, तेथें एकदम रंगाचा भंग होऊन गेला. [जणूं काय दुःखरूपी] हलाहल विषाचा घोंटच घेतल्यासारखें झालें !

जयप्पा रु सेंधिया हूँ बोल उठे मौर मनि,
सर्वस्व मराठन को मेडते में लूट्यो है ॥३९॥

शत्रुन को शाल थो रु मराठन को ढाल थो रु,
हिन्दुन दिवाल थो रु काल तुरकान को।
दीन प्रतिपाल थो रु वैभव विशाल थो रु,
जंगल को ज्वाला थो रु पाल सनमान को॥
क्रोध को प्रजाल थो रु धैर्य को ध्रुवाल थो रु,
चालन सुचाल थो रु पालन इमान को।
अंग में उजाल थो रु दंग में उताल थो रु,
रंग में रमाल थो कमाल थो गुमान को ॥४०॥

जयाप्पा शिंदे म्हणाले ' ह्या मेडत्यांत ईश्वरानें [मराठ्यांचा एक] मुकुटमणि [असे तुकोजीराव ह्यांस नेल्यामुळें जणू काय] मराठे लुटले गेले आहेत.

४० [तो वीर तुकोजीराव] शत्रूंना सलणारा होता व मराठ्यांची ढाल होता. हिंदूंची मजबूत भिंत होता व यवनांचा काळ होता. दीनांचा प्रतिपाळ करणारा होता व [त्याचें] वैभवही मोठें होतें. [शत्रूंना तो] वडवाग्नीसारखा होता व सज्जनांचा पालनकर्ता होता. क्रोधाची [तो] ज्वाला होता व धैर्याचा ध्रुव होता. आणि [त्याची] वागणूक चांगली होती. सत्त्वाचा [तो] पालनकर्ता होता. [त्याची] अंगकांति तेजस्वी होती व [लढाईंत तो] मागेंपुढें पाहणारा नव्हता. [रण] रंगांत [तो] रमणारा होता व कमालीचा निधडा होता.

दोहा

शाहू-पुत्तय राज ने, कियो प्रगट दुख आज।
सुनत तकूजी राव की, फूट गई दुख पाज ॥४१॥

संमत अठारह ग्यार सौ, मार्गसीर्स सुदि बीज।
राव तुका पुर अमर गो, खग झाटत कर खीज ॥४२॥

४१ मराठ्यांचें छत्रपति व शाहू महाराजांचे पुत्र [रामराजा] ह्यांनीं आज दुःख प्रगट केलें. तुकोजीरावांच्या [मृत्यूची] वार्ता ऐकतांच [त्यांच्या] दुःखाचा पाट फुटला.

४२ संवत् १८११ * मार्गशीर्ष शु. २ रोजीं [शत्रूवर] आवेशानें तलवार चालवित असतांना तुकोजीरावांनीं स्वर्गी प्रयाण केलें !

* श्रीयुत मा. वि. गुजर, बी. ए., ह्यांनीं " संस्थान देवास-थोरली पाती-पवार घराण्याचा इतिहास " ह्या आपल्या ग्रंथांत तुकोजीरावांची मृत्युतिथि पौष शु. ३ शके १६७६ दिली आहे (पहा, त्या ग्रंथांतील श्रीमंत पहिले तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्री, ह्यांचें छायाचित्र). ती चुकीची होय व ह्या चुकीचें वास्तविक कारण तो ग्रंथ लिहितेवेळीं ता. १६ ११-१७५४ च्या ऐवजीं ता. १६-१२-१७५४ (पहा, पृ. १३२) असा हस्तदोष होणें हेंच होय. ह्याचा खुलासा श्री. गुजर ह्यांनीं आपल्या " संस्थान देवास (थोरली पाती) पवार घराण्याच्या इतिहासाचीं साधनें " ह्या ग्रंथांत केलेलाच आहे (पहा, पृ ४०१). कागदपत्रांतून तुकोजीरावांची निधन तिथी मार्गशीर्ष शु. २ शके १६७६ (सं. १८११) आढळते व तीच ह्या वीर-गीतांतही दिलेली आहे.

हाय ! गयो वह स्वर्ग में, हम दीनन को आस ।
राव तुका के जात तें, नरु कवि भयो निरास ॥४३॥

४३ हाय ! आमच्या दीनांची [ती] आशा [असे तुकोजीराव] स्वर्गीं गेले. तुकोजीरावांच्या [इहलोक] सोडण्यानें नरु कवि निराश झाला आहे.

प्रथम कृष्णाजीराव पवार,

सेनासप्तसहस्त्री,

ह्यांचीं

वीर-गीतें



श्रीमंत प्रथम कृष्णाजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री.

९ पत्थरगढ़-संग्राम

(सन १७७२ इ०)

दोहा

बदलो लियो नजीब को, लड़ें झबेत सां डट्ट ।
पत्थरगढ़ संग्राम में महा मर्द मरहट्ट ॥ १ ॥

मनहरण

रोहिल नजीब खाँ मराठन को पूरो शत्रु,
पानीपत युद्ध माहिं याही सो हरायो है ।
याके इस दंगल में दुअन अनेक बार,
तुर्कन ने तान तोर हियन तलायो है ॥

१ महान शूर मराठ्यांनीं पत्थरगडच्या लढाईंत झाबतेखानाशीं निकरानें लढून नजीबखानाचा बदला घेतला.

२ नजीबखान रोहिला मराठ्यांचा पुरता शत्रु होता. पानिपतच्या युद्धांत ह्याच्याचमुळें [मराठ्यांचा] पराभव झाला. ह्या दंगलींत ह्याच्याबरोबरच्या [मराठ्यांचे] शत्रु [अशा] यवनांनींही अनेक वेळां चिडून जाऊन अंतःकरणाचा जळफळाट करून घेतला होता. महादजी शिंद्यांनीं [त्याच्याविषयीं] अंतःकरणांत वैर बांधून घेतलें [व] त्याचा बदला घेण्यास [आपण]

महादजी सेंधिया ने ठानी मन वैर हू की,
लेन चल्यो बदले को जाहिर करायो है ।
बिनी वाले बिसाजी पंत होकर सहाय आये,
हुल्कर तकूजी वीर संग में सिधायो है ॥ २ ॥

दोहा

आँबा-कुल शिवराम थो, कृष्णा पती-पुँवार ।
यह सब वीर सहाय पै, चले तहाँ तिणवार ॥ ३ ॥
नजीब खाँ को पुत्र थो, नाम झबेता खान ।
प्रथम हि यासों परि गयो, तुरत वहाँ घमसान ॥ ४ ॥

चाललों आहोंत, असें जाहीर केलें. विसाजीपंत बिनीवाले आपण होऊन सहाय्यास आले [व] वीर तुकोजीराव होळकरही [त्यांच्या] समागमें निघाले.

३ तसेंच आंबा कुलांतील शिवराम $ व पवारेश्वर कृष्णाजीराव हेही सर्व वीर त्यावेळीं मदतीसाठीं निघाले.

४ नजीबखानाचा पुत्र झाबतेखान म्हणून होता. सुरूवातीलाच त्याच्याशीं गांठ पडून तेथें ताबडतोब भयंकर लढाई झाली.

$ ही व्यक्ति कोण ह्याचा शोध आम्हांस लागला नाहीं. बहुधा आंबाकुल हा हस्तदोष असून ओढाकुल असें येथें असण्याचा संभव आहे. तसें असल्यास धारच्या ओढेकर घराण्यांतील शिवराम ओढेकर ह्यांचा हा उल्लेख असावा. कारण त्याकाळीं धारचे खंडेराव पवार वयानें लहान असल्यामुळें ओढेकर हे त्यांची फौज लढाईवर घेऊन जात असत, असा इतिहासांत उल्लेख आहे.

सुक्रताल किल्लय सबल, मरहठ दीन्हों तोड़ ।
लगी झबेता खान के, अब जिय दोड़ा दोड़ ॥५॥

मनहरण

प्रथम मराठन की फेंट में परत वही,
सुक्रताल किल्लन की कॉंकरी उड़ाई है ।
बालक झबेता खान याही के सरन पऱ्यो,
भाग गयो रात ही में प्रान को बचाई है ॥
पकरन को पीछो कऱ्यो सेंधिया ने पर,
नजीबगढ़ भाग गयो खाय भय पाई है ।

५ शुक्रतालचा सुदृढ किल्ला मराठ्यांनीं उध्वस्त केला. * (तेव्हां) आतां झाबेतेखानाच्या जीवाची धांवपळ सुरूं झाली.

६ मराठ्यांचा पहिला हल्ला तेथेंच झाला. (त्यांतच) शुक्रताल किल्ल्याचे कणकण उडविले गेले. (नजीबखानाचा) पुत्र झाबेतखान ह्यांना [मराठ्यांना] शरण आला (व) रात्रींच पळून जाऊन (त्यानें आपले) प्राण वांचविले; परंतु (त्याला) पकडण्याकरितां शिंद्यांनीं पाठलाग केला (तेव्हां) भिऊन जाऊन (तो) नजीबगडाकडे ¶ पळून गेला. नजीबगड किल्ला मजबूत

---

* मराठी रियासत, म. वि. ४, पृ. २२३

¶ ह्या किल्ला नजीबउद्दौल्यानें सन १७५५ मध्यें आपलें नांव देऊन बांधला. तो नजीबउद्दौल्याची राजधानी नजीबाबाद येथून पूर्वेस दीड मैलांवर आहे. (Bijnor Gazetteer, para 277)

नजीबगढ़ किल्लो थो सुदृढ सुथान पर,
धरी थी मराठन की लूट की सुनाई है ॥६॥

बाबूराव राम अत्रे ने खोज के निकाली बात,
सारो धन माल इस स्थान पर धरायो है।
तुर्कन की सारी सैन यहाँ पै सजग खरी,
जाय सेंधिया पै अब जाहिर करायो है ॥
मालूम परत भेद मरहठ सजग भये,
हियन उछाह हू को सोरन करायो है।
नजीबगढ़ किल्लन पै हल्लन करत आज,
डंकन घुकार ही में सेन को सजायो है ॥७॥

(व) मोकेशीर होता. (तेथेंच पानिपतावरील) मराठ्यांची लूट ठेवलेली असत्याचें (मराठ्यांनीं) ऐकलें होतें.

७ (मराठ्यांच्या लुटींतील) सारी संपत्ति ह्याच ठिकाणीं ठेवलेली आहे (ही) बातमी बाबूराव राम अत्रे ह्यांनीं शोध करून काढली (व त्याबरोबर तुर्कांची सारी फौज येथें सुसज्ज होऊन राहिली आहे (व ती) आतां शिंद्यांवर चाल करून येणार आहे (हीही बातमी काढून त्यांनीं) जाहीर केली. ही (शत्रूची) चाल कळतांच मराठे जागृत झाले. अंतःकरणांतील उत्साह (ते) गर्जना करून प्रगट करूं लागले. नजीबगड किल्ल्यावर आज हल्ला करण्याकरितां (त्यांनीं) नगाऱ्याच्या निनादांत सैन्य तयार केलें आहे.

नजीबगढ़ किल्लन पै रोहिल अचेत परे,
टूटि परे वीर सब एकदम आय के।
तोपन तड़ाकन तें काँकरी उड़न लागी,
फेंटन पड़न लागी भारी भरराय के॥
कम्पित भूकम्प भयो ऐसो ही दरस भयो,
जाहिर जगत कऱ्यो सूरन जनाय के।
एक ही हमल्लन पै किल्लन फतह कियो,
सारो धन माल पऱ्यो पानि निज आय के॥८॥

दोहा

झिली झबेता खान सों, नहिं सँधिय संग्राम।
सरन पऱ्यो अब आय के, जानि आपनो काम॥९॥

८ नजीबगड किल्ल्यांत रोहिले असावध पडले होते (तोंच) सर्व (मराठे) वीर (त्यांच्यावर) एकदम धांवून जाऊन तुटून पडले. तोफांच्या माऱ्यांनीं (किल्ल्याचे) दगड उडूं लागले (व गोळ्यांचा) मारा मोठा भरवून होऊं लागला. (त्यामुळें जणूं काय) भूकंपानेंच (भूमि) कंपित होत आहे, असें दिसूं लागलें. (मराठ्यांनीं शौर्यानें लढून आपण) शूर असल्याचें जगजाहीर केलें. एकाच हल्ल्यांत (त्यांनीं) किल्ला फत्ते केला (त्यामुळें) सारी संपत्ति त्यांच्या हातीं आली.

९ झाबतेखानाला शिंद्यांशीं लढणें दुरापास्त झालें (व तो) आपल्या हिताची गोष्ट समजून आतां आपण होऊन (मराठ्यांना) शरण आला.

औरत बच्चे अखिल तब, आय गये तिहि ठाम।
रोहिलखंड सारो मुलक, कियो हस्तगत जान ॥१०॥

रोहिल खान नजीब पर, मरहठ थे नाराज।
नजर परी उस कबर पर, तोड़ दई तहँ आज ॥११॥

नाम बदल नजीबगढ़, पत्थरगढ़ पटकाय।
बदलो लीन्ह नजीब सों, जग जाहिर करवाय ॥१२॥

धन्न धन्न मरहट्ठ नृप, हिंदू पद पतशाह।
भाखन नारू भट्ट कवि, पूरण कियो निबाह ॥१३॥

१० (मराठ्यांचीं पानिपत युद्धांत कैद झालेलीं) सर्व बायकां. पोरें त्या ठिकाणीं मिळालीं. (कवि म्हणतो कीं,) जणूं सारा रोहिलखंड मुलुखच (आतां मराठ्यांनीं) हस्तगत केला.

११ नजीबखान रोहिल्यावर मराठे संतापलेले होते (त्यामुळें किल्ल्यांत असलेल्या त्याच्या) त्या कबरेवर नजर पडतांच (मराठ्यांनीं) ती तात्काळ उध्वस्त करून टांकली. *

१२ (इतकेंच नव्हें तर) नजीबगड (हें किल्ल्याचें) नांव (देखील) बदलून पत्थरगड असें ठेविलें * (व त्याद्वारें) नजीबखानाचा बदला घेतल्याचें जगजाहीर केलें.

१३ धन्य धन्य मराठे सरदार (व धन्य धन्य त्यांचा) हिंदु–

* मराठी रियासत, म. वि. ४ पृ. २२३–२२४.

नरू कवी वर्णन कऱ्यो, पत्थरगढ़ संग्राम।
कृष्णराव सुनि रीझ कें, दई अनेक इनाम ॥१४॥

पदपादशाह [अर्थात् छत्रपति] ! भाट–कवि नरू म्हणतो त्यांनीं आपले ब्रीद पुरतें राखिलें !

१४ नरू कवीनें पत्थरगडच्या लढाईचें [हें] वर्णन केलें आहे. [तें] ऐकून प्रसन्न होत कृष्णाजीराव [पवारां] नीं त्यास अनेक बक्षिसें दिलीं.

१० सिप्री-सिरोंज संग्राम

(सन १७८१ इ.)

दोहा

पाटिल बाबा के सकल, छीन्ह लिये जब साज।
अंगरेजन की नीति को, सब कुछ जान्यो आज ॥ १ ॥

मनहरण

बाज गजराज औ निशान सैन संगर में,
छीन्है अंगरेज बाबा पाटिल के सारे हैं।
पाँच सो मराठन को जंग में विध्वंस कीन्हों,
लीन्हों उन माल मत्त राज को पसारे हैं।

१ पाटीलबाबा [महादजी शिंदे] ह्यांचें सर्व वैभव जेव्हां हिरावून घेतलें [गेलें तेव्हां] आज [कोठें] इंग्रजांची नीति पुरती लक्षांत आली !

२ लढाईंत इंग्रजांनीं पाटीलबाबांचे घोडे, हत्ती व निशाण हे सारे हिरावून घेतले.* पांचशें मराठ्यांचा त्यांनीं लढाईंत नायनाट केला [व त्यांची मालमत्ता हस्तगत केली; [आपली] राज [सत्ता ते] पसरवित आहेत, अशी जेव्हां कानावर गुणगुण आली [तेव्हां] सर्व सरदार वीर मनांत विचार करूं लागले [कीं,]

---

* गुजर : सं. देवास थो. पा. घ. इ. पृ. २१४–२१५.

ऐसी जब आनकर कान पै भनक परी,
सारे सरदार बीर हिय में विचारे हैं।
आज अंगरेजन ने पाटिल बिघाऱ्यो पर,
कौन जाने कल कैसी कौनसु गुजारे हैं ॥ २ ॥

दोहा

महादजी सैन्ध्या मरद, अरु कृष्णा पुँव्वार।
सीवाजी विठ्ठल अरू, ढोंढे बलवन्तराव ॥ ३ ॥
काशी को महिपाल थो, कठिण महा करवाल।
मदद चढ्यो यह भी मरद, बनिकर संगर ढाल ॥ ४ ॥
और साथ वजीर थो, अजब अजुध्या राज।
याके संग सैना हती, यो वाको सिरताज ॥ ५ ॥

आज इंग्रजांनीं पाटिलबावांचा मोड केला तर उद्यां कोण जाणें कोणावर कशी पाळी येणार आहे !

३ मर्द महादजी शिंदे व कृष्णाजी पवार, शिवाजी विठ्ठल [विंचूरकर] व बळवंतराव धोंडदेव [ही सर्व एकपक्षीय मंडळी इंग्रजांच्या विरुद्ध झाली].

४ [त्यावेळीं] काशीचा राजा [चेतसिंग] होता. त्याची तलवार मोठी कणखर. लढाईंत [सर्वांची] ढाल [अर्थात् पुढें] होण्यासाठीं तो बहाद्दरही [इंग्रजांविरुद्ध] साह्य करण्यास सिद्ध झाला.

५ आणखी अजब अशा अयोध्या प्रांताचा वजीर

दिल्ली पति पतशाह भी, सैना देइ सजाय।
भेजि देइ यानै भिडन, गोरन मारि गिराय ॥ ६ ॥
इन सब नामन की अलग, घिरि घिरि आवै सैन।
छंद बद्ध याको करै, पढ कर लाहो लैन ॥ ७ ॥

मनहरण

सिप्री सिरौंज हूँ को सरदारन की सैन चली,
अंगरेज अकेल सों संगर की ठानी है !
केते नरपाल महिपाल की प्रबल फौज,
ओज भरे रोज तहाँ बोलन की तानी है ॥

[असफउद्दौला हाही] बरोबर होता. त्याच्याजवळ फौज होती व तो तिचा सिरताज होता.

६ दिल्लीपति बादशहा [शहाअलम] नेंही सैन्य तयार केलें व इंग्रजांचा पाडाव करण्याकरितां तें त्यानें लढाईसाठीं पाठवून दिलें.

७ ह्या सर्व नांवें दिलेल्यांच्या फौजा [निरनिराळ्या ठिकाणांहून] गोळा होत आल्या. त्यांचें वर्णन [मीं एकत्र] कवितेंत केलें आहे [तें वाचकांनीं] वाचून संदर्भ जुळवून घ्यावा.

८ सिप्री-सिरोंजकडे सरदारांच्या फौजा निघाल्या [इंग्रजांच्या पक्षास असलेल्या गोहदचा राणा वगैरे देशी शत्रूंना सोडून] एकटया इंग्रजांशींच लढण्याचा त्यांनीं मनसुबा केला आहे. कित्येक राजे रजवाडयांच्या बलिष्ठ सेनांना वीरश्री चढूं लागली तेव्हां [त्या]

पाटिल पछाऱ्यो औ मराठन सँहाऱ्यो इन,
राज को पसाऱ्यो इन जाहिर ही जाणी है।
ऊपरी मधुर औ भीतरी हलाहल को,
आज इन गोरन की कूटता पिचाणी है ॥ ८ ॥

दोहा

पग पग पर पाटिल करत, जाहिर बात जनाय।
जंग जीतन यासौं कठिन, हर दम सन्देह लाय ॥ ९ ॥
मदद मराठन की यहाँ, मिली तहाँ भरपूर।
पाटिल को सन्देह हऱ्यो, देखि मराठा सूर ॥१०॥

तोटक

सरदारन की सब सैन चली,
बढ एकन सो अब एक बली।

गर्जून म्हणूं लागल्या 'ह्या (इंग्रजांनीं) पाटिलबाबांचा पराभव केला आणि मराठ्यांचा संहार केला. (आपलें) राज्य हे पसरत आहेत (ही गोष्ट) जाहीर दिसून येत आहे.'

९ पावलापावलावर पाटिलबाबा (हताश होऊन ही) गोष्ट जाहीर करूं लागले कीं, ह्यांच्याशीं (इंग्रजांशीं) लढाई जिंकणें कठीण. (आणि ह्याचीच) चिंता (ते) नेहमींनेहमीं करूं लागले.

१० येथें (जेव्हां) मराठ्यांची भरपूर मदत मिळाली तेव्हां (कोठें त्या) शूर मराठ्यांकडे पाहून पाटिलबाबांची चिंता दूर झाली.

११ सर्व सरदारांच्या सेना निघाल्या. एकापेक्षां एक अधिक

सब साज समानन संग मिली,
यहँ पाटिल के घर आन मिली ॥११॥

इण पाटिल को अंगरेज हण्यो,
इहिं कारण संगर आज तण्यो ।
मत ओ सरदार सबैं करियो,
अंगरेजन आतंक तो भरियो ॥१२॥

सबने अब एक उपाय कऱ्यो,
अब आपस में मिलिबो धिरियो ।
मिली के सबने यह ठान लई,
बिन एकत के यह ना हणई ॥१३॥

बलवान आतां (त्यांत) होते. सर्व सामान (आणि) वैभव (अर्थात् सर्व शस्त्रास्त्रें व निशाण वगैरे त्यांनीं) बरोबर घेतलेलें होतें. येथें ते पाटिलबाबांच्या तळांत येऊन गोळा झाले.

१२ ह्या पाटिलबाबांचा इंग्रजांनीं पराभव केला होता म्हणून आज लढाईची तयारी झाली आहे. सर्व सरदारांनीं मनसुबा केला (कीं,) इंग्रजांना (आपला) दरारा तर दाखवूंया.

१३ सर्वांनीं आतां एक उपाय योजिला (कीं,) आपसांत आतां एक होऊन (इंग्रजांना) वेढा घालूं. एकीशिवाय हे (इंग्रज) पराजित होणार नाहींत, (हें) सर्वांना पक्कें कळून चुकलें.

इनमें मुख भूपति थे इतने,
लखिये यह आय यहाँ कितने।
बड़ भागि बली कृशनाजि पुँवार,
यह बीर यहाँ इनमें जुँझयार ॥१४॥

महदाजि सुभट्ट बडो बरबंड,
इन धाक जमी अवनी में अखंड।
इक ओरन ते सिवदेव हतें,
यह आन मिले अपने हि मते ॥१५॥

बलवंत धोंढय वीर बली,
इनकी सब आनन सैन मिली।

१४ ह्या (मनसुब्यांत) जितके राजे होते (त्यांतील) येथें हे किती आले आहेत पहा. महाभाग्यवान् (व) शूर कृष्णाजी पवार. हा वीर ह्यांच्यांत उत्तम लढवय्या (म्हणून) होता.

१५ वीरश्रेष्ठ महादजी (शिंदे) मोठे रणशूर. त्यांनीं (आपला) दरारा जगांत अखंड पसरलेला आहे. एका बाजूनें शिवाजी (विठ्ठल) होते. ते आपल्या इच्छेनें येऊन मिळाले होते.

१६ बलवान वीर बळवंतराव धोंडदेव ह्यांचीही सर्व सेना (तेथें) येऊन सामील झाली. काशीचा राजा (चेतसिंगही) एक होता. तो युद्धकार्यांत पूर्ण तत्पर होता.

इक काशिय के नरपाल हते,
घमसानन कारज पूर रते ॥१६॥

चेतसिंग बली इन बीर सुनाम,
यह हो मिलिये लडवे को सुकाम।

इक बीर अजोध्या के हि वजीर,
यह भी मिलिये लै तूपक तीर ॥१७॥

संग सैन हती इनके हि बिशाल,
इनने रचियो रिपु पूरन जाल।

अब फौज मिली इक ओरन आय,
पतशाह दिलीं भेजि देइ सहाय ॥१८॥

सब सैन मिली पाटील मुकाम,
जनु गंग मिली नदियाँ हि तमाम।

१७ त्या बलवान वीराचें नांव चेतसिंग. तो लढण्याच्या खास उद्देशानें येऊन मिळाला होता. अयोध्येचा बहाद्दर वजीर (असफउद्दौलाही) एक होता. तो तीर, बंदुका घेऊन येऊन मिळाला.

१८ त्याच्याबरोबर अफाट फौज होती. त्यानें शत्रूला (पराजित करण्याचा) पूर्ण व्यूह रचिला. आतां दिल्लीच्या बादशहानें सहाय्यार्थ पाठविलेली सेनाही एका बाजूनें आली.

११ सर्व सेना पाटिलबाबांच्या तळांत येऊन मिळाल्या. जणूं काय गंगेला तमाम नद्याच येऊन मिळाल्या. दोन कोसपर्यंत हा तळ

बेहुँ कोस हि बीच परीयो पराव,
जनु राम सिंधू तीरन को जमाव ॥१९॥

इहि भाँतिय सेन दिन्हो है मुकाम,
अंगरेजन सो लडिबे को सुकाम।
चहुँ ओरन सैन सुथट्ट सुघट्ट,
अटपट्ट बड़ी पूरन्न बिकट्ट ॥२०॥

कहुँ अस्व करैं हिननाट तहाँ,
गजराज चिंघारत औंर वहाँ।
कहुँ नौबत को बहु शोरन है,
कहुँ शूरन को बहु रौरन है ॥२१॥

पसरलेला होता. जणुं काय समुद्रकांठीं रामाची फौजच पडलेली आहे.

२० ह्या प्रकारें फौजांनीं तळ दिला आहे. इंग्रजांशीं लढणें हीच त्यांची मोठी इच्छा आहे. चाऱ्ही बाजूंनीं फौजा घनदाट पसरलेल्या आहेत. त्या मोठ्या चाणाक्ष [व] बिकट आहेत.

२१ तेथें कोठें घोडे खिकाळत आहेत व कोठें गजराज चित्कार करीत आहेत. कोठें नौबतीचा मोठा दणदणाट होत आहे [तर] कोठें वीरांचा प्रचंड कोलाहल चालला आहे.

घननाद तहाँ घनघोर भयो,
सब सैनन एक मुकाम दियो।
मिलि मीर वजीरन राह करी,
कल कूँच करे जलदी सिपरी ॥२२॥

सब सैन चली सरदारन की,
मनसा करि गोरन मारन की।
हलचल कऱ्यो पहुँची सिपरी,
अंगरेजन आँख अबै उघरी ॥२३॥

चहुँ ओरन सो सिपरी घिरई,
कमअक$ अबै इण जाण लई।

२२ सर्व फौजांचा एकत्र तळ असल्यानें तेथें महा भयंकर असा कलकलाट माजला. सरदार, वजीरांनीं मिळून विचार केला [कीं] उद्यां लौकर सिप्रीकडे * चाल करूं.

२३ सर्व सरदारांच्या फोजा निघाल्या. इंग्रजांचा पराभव करण्याचा त्यांनीं इरादा केला. हलकल्लोळ माजवीत [त्या] सिप्रीस येऊन थडकल्या तेव्हां कोठें इंग्रजांचे डोळे उघडले.

२४ चाऱ्ही बाजूंनीं सिप्रीला वेढा दिला गेला आहे हें [कर्नल] कॅमक ह्यानें ओळखलें. त्यानें सर्व फौजा तयार केल्या व शत्रूशीं लढण्याचा [त्यांस] हुकूम दिला.

$ कर्नल कॅमक.

* सिप्री (शिवपुरी-ग्वाल्हेर संस्थान).

इनने सब सैन सजाय दई,
अरु शत्रुन सौं लडिबो कहई ॥२४॥
अब गोरन फौज सजोर चली,
अरु फौज मरट्ठन पै हमली।
नहिं कर्नैल की इत दाल गली,
मरहट्ठन ने सब फौज रली ॥२५॥

दोहा

छिन्न भिन्न सेना करी, मरहठ कृष्णा बीर।
शूर सिपहसालार यो बण लड़ियो रणधीर ॥२६॥
कोकन की मोहिम मुखी, सेनापति अंगरेज।
गारड याको नाम थो, बढ़ आयो बढ़ तेज ॥२७॥

२५ आतां इंग्रजांची फौज वेगानें निघाली व [तिनें] मराठ्यांच्या फौजेवर हल्ला चढविला. [लढाईंत] तेथें कर्नल [म्यूर]चें कांहीं चाललें नाहीं. मराठ्यांनीं सर्व फौजेनिशी रणरंग माजविला.

२६ मराठा वीर कृष्णाजी [पवार] ह्यांनीं [शत्रूच्या] सेनेची दाणादाण करून टाकली. [हा] लढवय्या वीर सैन्याचा पुढारी होऊन लढला.

२७ [इकडे दक्षिणेंतील] कोंकणामधील मोहिमेचा [जो] मुख्य इंग्रज सेनापति होता त्याचें नांव गाडर्ड होय. तो वेगानें पुण्याकडे चालून आला. *

* सरदेसाई: महादजी शिंदे ह्यांची कागदपत्रें, ले. १७२, १७४

मनहरण

कर्नेल केमक हूँ की हार सुन आयो दोर,
भारी भयकारी सैन लैकर सिधायो है ।
बोरघाट राह आके पूना पै प्रहार कर्‍यो,
हुलकर तकूजी तहाँ भरदोर आयो है ॥

हड़पंत फडके औ पटर्धवन भाऊ राव,
बणके सहाय पूना सहर सिधायो है ।
भारी मूठभेड़ कर गारड हराय दीन्हो,
हार्‍यो अंगरेज पै मराठन जस छायो है ॥२८॥

२८ [उत्तरेंत] कर्नल कॅमकचा पराभव झाल्याचें ऐकून [गाडर्ड] मोठी प्रचंड सेना घेऊन धांऊन आला. बोरघाटाच्या मार्गानें [वर] येऊन पुण्यावर हल्ला करावा [असा त्याचा हेतु होता तोंच] तेथें तुकोजीराव होळकर भरधांव दौडून आले. हरिपंत [तात्या] फडके व [परशराम] भाऊ पटवर्धन [हेही] पुणें शहराच्या मदतीसाठीं म्हणून [धांऊन गेले. ह्या सर्व वीरांनीं] मोठी हातघाईची लढाई करून गाडर्डचा पराभव केला. पराभव पावलेल्या इंग्रजांवर मराठ्यांच्या यशाची * [चांगली] छाप बसली !

* सरदेसाई : महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें, ले. १७२, १७४.

दोहा

हैदरअली मैसूर के, लिख्यो पत्र ततकाल ।
सुण मान्यो मन हरष है, पूना नगर नृपाल ॥२९॥
हारै सब अंगरेज हैं, जीते मरहठ जंग ।
दखनी दिल कांटो कट्यो, नहिं पीरन मन अंग ॥३०॥

मनहरण

नीति के निपुन अंगरेजन निहारी बात,
सुलह करिबे में या कुशल हमारी है ।
कलकत्ता मेंबर औ मदरास गोरनर ने,
नागपुर भोंसला तें मन की उचारी है ॥

२९ पुणें शहराचे स्वामी (सवाई माधवराव पेशवे) ह्यांना (विजयाची बातमी) ऐकतांच मनांत आनंद झाला. (व मग) म्हैसूरच्या हैदरअलीस ताबडतोब (त्यासंबंधांत) पत्र लिहिलें गेलें.

३० सर्व इंग्रज (अर्थात् उत्तरेंतील व दक्षिणेंतील) पराभव पावले (व) मराठ्यांनीं लढाई जिंकली. दाक्षिणात्यांच्या अंतःकरणांतील (इंग्रजांचा) कांटा कांपला गेला (व आतां त्यांच्या) मनांत पीडा राहिली नाहीं.

३१ (राज) नीतिनिपुण इंग्रजांनीं बारकाईनें विचार केला (कीं,) तह करण्यांतच आपली खैरियत आहे. कलकत्त्याचा (कौन्सिल) सभासद (मॅक्फर्सन) व मद्रासचा गव्हर्नर (मॅकॉटन)

पूना सरकार सौं सुलह करावो आप,
बिनति कराई यह जान लेऊँ सारी है ।
बीच पर वारन हैस्टिंग तें राखी बात,
उलझी सुलझ करी भीर परी भारी है ॥३१॥

दोहा

संधिय में शामिल हते, इनके नाम अनेक ।
फरनवीस नाना बली, अरू पेशवा देख ॥३२॥
साथ लैर सरदार औ, हैदर ते हुशियार ।
और बली बरबंड जों, कृष्णाजी पुँव्वार ॥३३॥
अरु आपा दाभोलकर, यह भी यामें साथ ।
सब मिली कर संधी करी, लिय पूना मन हाथ ॥३४॥

ह्यांनीं नागपूरचे (मुधोजीराव) भोंसले ह्यांच्याजवळ (आपला) मनोदय व्यक्त केला (कीं,) आपण पुणें दरबारशीं (आमचा) तह घडवून आणावा ही (आमची) विनंति आहे, (ती आपण) पूर्ण लक्षांत घ्यावी. वॉरन हेस्टिंग्स मध्यस्थी झाल्यानें (त्यांची) गोष्ट राखण्यांत आली (व) मोठी मुर्वत पडून गुंता उलगडला गेला.

३२–३४ (ह्या) तहाच्या (वाटाघाटींत मराठ्यांकडील जी मंडळी) सामिल होती त्यांचीं नांवें पुष्कळच आहेत. (त्यांत) पहा, थोर (सवाई माधवराव) पेशवे व नाना फडणविस (होते. त्यांच्या) बरोबर (मराठे) सरदार व चतुर हैदरअली आणि तसेंच बलवान वीर कृष्णाजीराव पवारही (होते). आणखी

अगवानी करि इन सबन, कीन्ही मनमानीह ।
हँसमुख व्हैं अंगरेज तें, सह लई सब हानीह ॥३५॥
महादजी सैंधिया मुलुक, छीन लियो अंगरेज ।
सुलह कराँ वापिस कऱ्यो, उलटो दियो दहेज ॥३६॥
कवि दीपा रचना करी, सिपरी–सिरौंज रार ।
दीन्हों लिख देख्यो वहाँ, मरहठ मन निरधार ॥३७॥
अठरासो सैंतीस है, बिक्रम सम्मत जान ।
कवि दीपा रचना करी, सिपरी लख घमसान ॥३८॥

आप्पाजी (राम) दाभोळकर हे देखील त्यांत बरोबर होतें. (ह्या) सर्वांनीं मिळून पुणें (दरबारची) मर्जी राखली.

३५ सर्वांनीं पुढें होऊन मनाप्रमाणें घडवून आणलें. इंग्रजांनीं (कसेंबसें) हंसतमुख होऊन सर्व हानि सहन करून घेतली.

३६ महादजी शिंद्यांचा (जो) मुलुख इंग्रजांनीं हिरावून घेतला होता (तो त्यांनीं) तह करून परत केला (व) त्यांत उलट (आणखीही) भर घातली.

३७ कवि दीपानें (ही) सिप्री–सिरोंजची युद्ध (कथा) रचिली. (जो त्यानें) तेथें मराठ्यांच्या मनाचा खंबीरपणा (प्रत्यक्ष) पाहिला (तो त्यानें ह्यांत) लिहून दिला आहे.

३८ विक्रम संवत १८३७ (इ. स. १७८१) चालू आहे (ह्यावेळीं) कवि दीपानें सिप्रीचें युद्ध (प्रत्यक्ष) पाहून ही रचना केलेली आहे.

११ मेरठ-संग्राम

(सन १७७८-८९ इ.)

मनहरण

भारी भय कारी काम मराठन ने लीन्हों हाथ,
ऐसो बरबंड बीर जाहिर जनायो है ।
कादर गुलाम थो शैतान तहँ भारत में,
ताके मान मर्दन को कारज उठायो है ॥
केते जन मारे अरु नगर उजारे केते,
केते मन चाह्यो कियो ताहि को सुनायो है ।

१ भारतवर्षांत त्यावेळीं गुलामकादर सैतान (बनला) होता. त्याचा गर्व जिरविण्याचें कार्य मराठ्यांनीं उचललें.* उद्दाम म्हणून तो वीर प्रसिद्ध झाला ह्यासाठीं मराठ्यांनीं (त्याचा नायनाट करण्याचें) भयंकर काम हातीं घेतलें. (त्यानें) कित्येक लोक ठार केले व शहरें उजाड केलीं. कित्येक मनसोक्त (गोष्टी) केल्या (त्या तुम्हांस) ऐकवितों. त्या दुष्टानें (दिल्लीचें बादशाही) तख्त उलटून शहाअलम (बादशहा) चे डोळे फोडले (व) दिल्ली स्वर्ग (होती) तिला नरक बनविली.

---

* ही कामगिरी मराठ्याच्या वतीनें महादजी शिंदे ह्यांनीं बादशहाच्या विनंतीवरून अंगिकारली होती (शिंदेशाहीचीं राजकारणें, ले. १५०)

तखत उलेट शाह आलम की आँख फोड़ी,
दिल्ली स्वर्ग जाको दुष्ट नरक बनायो है ॥१॥
वीरन के वीर महादजी सेंधिया महान,
मर्दन करन वाको कमर कसाई है ।
सिवाजी विठ्ठल अली बहादुर राणेखान,
कृष्णाजी पुँवार हूँ ने धीरज बँधाई है ॥
भगवंत पुँवार औ महिपत बाजीराव,
आदि वर वीरन ने साहस दिलाई है ।
होकर सजग साथ सैनिक समूहन के,
निकल परे जंग में सेंधिया सवाई है ॥२॥

दोहा

चली सेन चतुरंगिनी, दल बादल ले साथ ।
धरनी धूजत धँस गई, शेष सकुच सौं जात ॥३॥

२ महान् वीरश्रेष्ठ महादजी शिंदे (ह्यांनीं) त्याचा मोड करण्याकरितां कंबर बांधली. शिवाजी विठ्ठल, अलिबहादर, राणेखान (व) कृष्णाजीराव पवार हेही त्यासाठीं तयार झाले. भगवंतराव पवार व महिपत बाजीराव (अत्रे) आदि वीरवरांनींही हिंमत बांधली. बहाद्दर (महादजी शिंदे) तयार होऊन दळभारासह लढाईसाठीं निघाले.

३ मराठ्यांची चतुरंगिनी सेना दळबादलानिशी निघाली. (त्यावेळीं) शेष (भार सहन न झाल्यामुळें कीं काय,) अंग चोरूं लागल्याकारणानें धरणी डळमळूं लागली.

तोटक

अब सेन मराठन की निकली,
जितनी कितनी अगली पिछली ।
सब सेन चली दल दिल्लिय पै,
मनु सागर आज उझालिय पै ॥४॥
चतुरंगिनि सेन चमंकत है,
बिजरी मनु आज झमंकत हैं ।
अवली गजराजन की निकसी,
जनु यों भ्रमरावलि के बिकसी ॥५॥

४ आतां मराठ्यांची आघाडी *, पिछाडीवरील होती तेवढी सेना निघाली. (ही) सर्व सेना दिल्लीवर (हल्ला करण्यास) चालली. (त्या सेनासागराकडे पाहून वाटत होतें कीं,) जणूं काय समुद्राला आज भरतीच आली आहे.

५ (ती) चतुरंगिनी सेना (अशी) चमकूं लागली (कीं) जणूं काय आज विजाच चमकत आहेत ! गजराजांच्या पंक्ति (अशा) निघाल्या (कीं) जणूं काय भुंग्यांचे थवेच लोटून राहिले आहेत.

---

* आघाडीवरील सेना म्हणजे रवळोजी शिंदे, भगीरथराव शिंदे हिंमतबहाद्दर गोसावी वगैरे मंडळीबरोबरची फौज होय. ह्यांस महादजी शिंद्यांनीं अगोदर दिल्लीस रवाना केले होते. (पहा सरदेसाई : महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें, ले. ५३० व ५३७).

हयराज चलैं कितने उझलैं,
हिरनानन झुंडन ज्यों उछलैं ।
चलि पैदल सेन कतारन यों,
मनु रावन सेन पै राम हि जों ॥६॥

कति नालिक की सकटा-धरि के,
तुपकावलि गोलन की भरि के ।
चलि फौजन यों बहु ओजन में,
अब कादर खोज कु खोवन में ॥७॥

उड़ि जात ध्वजा पच रंग भरी,
थिरकान चलीं रस रंग धरी ।
उड़ि धूहर घोर कि पोरन सों,
सकटावलि आदिय ओरन सों ॥८॥

६ पाणीदार असे कित्येक उत्तम घोडे असें निघाले कीं जणू काय, हरणांच्या झुंडीच उडचा मारीत चालल्या आहेत. पायदळ सैन्याच्या रांगाही अशा निघाल्या कीं जणू काय रावणाच्या फौजेवर राम (चालून जात आहे.)

७ कित्येक तोफा (व) गोळचा भरलेल्या असंख्य बंदुका घेऊन (मराठचांची) फौज आतां गुलामकादराला धुंडून काढून त्याचें पारिपत्य करण्यासाठीं मोठचा उत्साहानें चालली.

८ पंचरंगी (अर्थात् निरनिराळचा) ध्वजा उडत होत्या (जणू काय) आनंदानें त्या ठुमकतच चालल्या होत्या. (रण) गाडचांमुळें भयंकर धुराळा उडून राहिला होता.

दल बादल दिल्लिय ओर चल्यो,
सजि सैंधिय मान गुमान रल्यो ।
कछु दूरन आन पड़ाव दयो,
मनु इन्दर आज अखाड़ भयो ॥ ९ ॥
जनु रावन लङ्कन पै सजियो,
दधि तीरन राम मुकाय दियो ।
अब कादर भी मन जान गयो,
उनने अपने दल को सजियो ॥१०॥
अब कादर भी सजि सेन लई,
अब बाहर आनि मुकाम दई ।

९ शिंद्यांचा मानाभिमान राखण्यासाठीं सर्व फौजफाटा सज्ज होऊन दिल्लीकडे चालला. (पुढें) कांहीं दूर चालून गेल्यावर त्यानें तळ दिला (त्याकडे पाहून वाटत होतें कीं) जणूं काय इंद्राच्या (सैन्याचाच) तळ आज (येथें) पडलेला आहे.

१० (किंवा) जणूं काय रावणाच्या लंकेवर चालून जाण्यासाठीं रामाच्या सेनेनें समुद्राच्या कांठीं तळ दिला आहे. गुलामकादरही मनांत समजून गेला (व) त्यांनेंही आपलें सैन्य तयार केलें.

११ आतां गुलामकादरानें देखील (आपली) सेना सज्ज करून घेतली (व शहरा) बाहेर पडून तळ दिला. दोन्ही पक्षांच्या चतुरंगिनी सेना तयार झाल्या. (त्यांच्या छावणीकडे पाहून पुढें

चतुरंगिनि दोउन की सजई,
नहिं जानत है किसकी बिजई ॥११॥
दुहुं ओरन तें रण-भेरि बजैं,
दुहुँ ओरन तैं वर वीर गजैं।
अब प्रात भयो दुहुं ओर सजैं,
दुहुँ ओरन सेनन बाद्य बजैं ॥१२॥
दुहुँ ओरन फौज सजग्ग भई,
मरहट्ठन सेनन अग्र भई।
तुरकानन पै वह टूट गई,
अब कादर ओर कि ऊठ भई ॥१३
दुहुँ ओरन अब्ब रटक्क उड़ी,
दुहुँ ओरन में खग झाट उड़ी।

लढाईंत) कोणाचा विजय होणार (हें बरोबर) कळत नव्हतें.

१२ दोन्हींकडील रणभेरी वाजूं लागल्या. दोन्हींकडील वीरवर गर्जना करूं लागले. आतां सकाळ झाली. दोन्हींकडील सैन्य सज्ज झालें [व] दोन्हींकडील रणवाद्यें वाजूं लागलीं.

१३ दोन्हींकडील फौजा सज्ज झाल्या. [प्रथम] मराठ्यांची फौज पुढें चाल करून जाऊन तुर्कांवर तुटून पडली. [त्याबरोबर] आतां गुलामकादराकडील फौज [तिला तोंड देण्यास] सिद्ध झाली.

१४ दोन्हींकडून आतां भडिमार उडाला. दोन्हींकडून तलवारींचा

तुरकानन के तन टूट पड़े,
अब कादर मेरठ भाग खड़े ॥१४॥
अब ठौरन ठौरन झाट उड़ी,
सब ओरन में उस हार पड़ी ।
अब जीतन को नहिं दावँ भयो,
तब मेरठ किल्लन में घुसियो ॥१५॥
गढ़ मेरठ को मजबूत मिल्यो,
तब सैंधिय को नहिं डाव चल्यो ।
उनने अब किल्लय घेर लियो,
तब तोपन को उन बार कियो ॥१६॥

मारा चालू झाला. तुर्कांचे मुडदे पडूं लागलें [त्यामुळें घाबरून] गुलामकादरानें मीरतकडे पळ काढला.

१५ आतां ठिकठिकाणीं चकमकी उडूं लागल्या [व] सर्व ठिकाणीं त्याचा [गुलामकादराचा] पराभव होऊं लागला. आतां जिंकण्याचा रंग दिसेनासा झाला तेव्हां [गुलामकादर] मिरतच्या किल्ल्यांत शिरला.

१६ मीरतचा किल्ला मजबूत होता त्यामुळें शिंद्यांचा तेथें उपाय चालला नाहीं.* [म्हणून] त्यांनीं आतां किल्ल्याला वेढा घातला तेव्हां ह्यानें [गुलामकादरानें] त्यांच्यावर तोफांचा मारा केला.

* सरदेसाईः महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें, नं. ५४०, ५४३, ५४९

सब खानन पानन बंद कियो,
सब राह मुकाम कु रोक दियो ।
इक अर्ध भयो अब मास उसे,
अब कादर क्लीब पऱ्यो विलसै ॥१७॥

अब कादर पूर्ण गयो घबरा,
अब खावन लाल पड़े जबरा ।
भग जावन को इन भाव कियो,
गढ़ घौंसय जावन को सजियो ॥१८॥

वह हिम्मत बाँधि क भाग चल्यो,
मरहट्टन ने पल में पकड़्यो ।

१७ [गुलामकादराकडे किल्ल्यांत जाणारी] खाण्यापिण्याची रसद [मराठ्यांनीं] बंद केली * [व] किल्ल्याकडे जाणारे सर्व मार्गही रोंखले. त्याला आतां दीड महिना लोटला [त्यामुळें] भ्याड गुलामकादर आतां कष्टी झाला.

१८ आतां गुलामकादर पूर्ण घाबरून गेला. आतां खाण्यापिण्याचे भयंकर हाल होऊं लागले [तेव्हां] पळून जाण्याचा त्यानें इरादा केला [व] घोसगडाकडे जाण्याची तयारी केली.

१९ हिंमत बांधून त्यानें पळ काढला; [परंतु] मराठ्यांनीं लागलेच [त्यास] ताबडतोब गांठले. [तेव्हां] दोन्हीं पक्षांत पुन्हां

* महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें, नं. ५४०, ५४३, ५४९

दुहुँ ओरन में पुनि झाट उड़ी,
दुहुँ ओरन बाग अबै उपड़ी ॥१९॥

घमसान मची दुहुँ ओरन में,
मरहट्ठन में तुरकानन में !
मरहट्ठन झाट न झेल सक्यो,
भग जावन को उन भाव कियो ॥२०॥

दोहा

दिन भर में दुहु ओर उड़ी, खड्ग झाट अति बंक ।
चल्यो खसक तब घौंसगढ़, कादर कर मन संक ॥२१॥

झटापट उडाली. दोन्हीं पक्षांकडील [घोड्यांच्या] लगामा आतां आंवळल्या जाऊं लागल्या.

२० दोन्ही पक्षांत खडाजंगी माजली. मराठ्यांत आणि तुर्कांत [झालेल्या ह्या माऱ्यांत] मराठ्यांचा मारा [गुलामकादर] सहन करूं शकला नाहीं [म्हणून] त्यानें [पुन्हां] पळून जाण्याचा बेत केला.

२१ दोन्ही पक्षांत दिवसभर महाभयंकर असा तलवारीचा मारा झाला. [नंतर] गुलामकादर मनांत साशंक होऊन घोसगडाकडे चुपचाप निघून जाऊं लागला. $

$ ता. १६ व ता. १७ डिसेंबर १७८८ रोजीं. पहा, सरदेसाई: महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें, नं. ७७१

वीर अली पीछो कियो, अरु कृष्णा पुँवार।
करत संग संगर चले, पंच कोस के पार ॥२२॥

आखिर थक कादर गयो, लड़त लड़त रण बीर।
शामलि ग्राम नजीक के, आय गये बहु बीर ॥२३॥

मनहरण

कादर गुलाम बीर पूरन थकित भयो,
जैसे सिंह घायल की होत जात गति है।
बहादुर अली एक ओर कृष्णाजी एक ओर,
एक ओर आन पड़ी देखिये विपत्ति है॥

२२ (त्याबरोबर) वीर अलीबहादर व कृष्णाजीराव पवार हे त्याचा पाठलाग करीत लढतलढत पांच कोस पार निघून गेले.

२३ लढतलढत चालला असतांना शेवटीं रणवीर कादर थकून गेला (तों) शामली गांवाजवळ थोर (मराठे) वीरांनीं त्यास गांठलें.

२४ गुलामकादर पुरा वीर खरा; पण घायाळ सिंहाची जशी अवस्था व्हावी (तशी आतां त्याची अवस्था झाली). एकीकडून अलीबहादर व दुसरीकडून कृष्णाजीराव (पवार) आणि तिसरीकडून पहा (आणखी एक) आपत्ति (त्याच्यावर) येऊन कोसळली ! जिवबादादा बक्षी (व) राणेखान तेथें येऊन पोहोंचले. (नंतर त्या सर्वांनीं) योग्य विचार करून (त्या) जखमी सिंहावर (गुलामकादरावर) ते तुटुन पडले. (उभय

जीवबा दादा बक्षी राणेखां तहाँ आन खड़े,
टूट पड़े घायल पै करके सुमति है।
सेना मुठभेड़ भई भाग की भचेड़ भई,
गिरिगो गुलाम अश्व पर से कुगति है ॥२४॥

दोहा

छिपिगो बम्मन झोपडी, लड़त लड़त अध कोस।
लगी खबर फिर अरिन को, हली अली की धौंस ॥२५॥
अली बहादुर खान औ, अरु कृष्णा पुँवार।
कादर को खोजन लगे, पहुँचे बम्मन द्वार ॥२६॥

पक्षांकडील) सैन्याची हातघाईची लढाई झाली. पळापळीची दंगल उडाली (व तींत) गुलामकादर दुर्दैवानें घोडयावरून खालीं पडला.

२५ (तरी पण) अर्धा कोसपर्यंत लढत लढत जाऊन (गुलामकादर एका) ब्राम्हणाच्या झोंपडींत जाऊन लपला.¶ नंतर ही बातमी शत्रूला (मराठ्यांना) समजली (त्याबरोबर) अलिबहादरानें आपला मोर्चा तिकडे वळविला.

२६ अलिबहादर व कृष्णाजीराव पवार $ गुलामकादरचा सुगावा काढीत (त्या) ब्राम्हणाच्या दाराशीं पोहोंचले.

¶ सरदेसाई: मराठी रियासत उत्तर वि. २ पृ. १८०

$ मराठी रियासत उ. वि. २ पृ. १८१ मध्यें 'धारकर पवारां'चें नांव दिलें आहे तें चुकीचें असून तेथें वास्तविक 'देवासकर कृष्णाजीराव पवारां'चें नांव पाहिजे होतें. कारण ह्यावेळीं धारचे आनंदराव पवार अवघे ४-५ वर्षांचे होते.

लियो पकड़ ललकार के, घेरो डारि गुलाम।
कान पकड़ गेले कन्यां, कंठन डारि कमान ॥२७॥

सैंधिय के ढिग लाय के, खडे किये ततकाल।
मणियारसिंग नाजरअरु, औ बिलास संग डाल ॥२८॥

जान गयो मन सैंधिया, कादर को पहचान।
पकड़ जेर पटक्यो वहाँ, लेवन बदलो जान ॥२९॥

मनहरण

मेरठ से सेन राह मथुरा के हाथ चली,
दिल्ली सब लाये गये कैदी पकड़ाय कै।

२७ (त्यांनीं) गुलामकादरास वेढा घालून जोरानें आवाज दिला (व) त्याच्या गळचांत धनुष्य अडकवून कान धरून त्यास बाहेर काढले.

२८ (त्याबरोबरच) मणियारसिंग, (नबाब) नाझर व (कारभारी) विलासराय ह्यांनाही धरून (त्या सर्वांना) बरोबर घेऊन शिंद्यांच्याजवळ आणून उभें केलें. *

२९ शिंद्यांनीं पाहिल्याबरोबर गुलामकादरास ओळखलें व (त्यानें केलेल्या घोर कृत्यांचा) बदला घेण्यासाठीं म्हणून मानगुटी धरून (त्यास खालीं) आदळलें.

३० मीरतहून (मराठचांची) सेना मथुरेच्या रोंखानें मार्ग

* सरदेसाई: महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें नं. ५५५. मराठी रि. म. वि. २ पृ. १८०–८१


महादजी सेंधिया यो मराठन को मौरमनि,
दीन्हो उन हुक्म अब जाहिर जनाय कै ॥
लावो अब कादर गुलाम वो शैतान यहाँ,
आलम की आँख इन कैसे लीं खिंचाय कै ।
कैसे इन दिल्लिय स्वर्ग को नरक बना,
कैसे पातशाही तख्त दीन्हों उलटाय कै ॥३०॥

दोहा

जेरबंद लगै पडन, बदन वार प्रतिवार ।
लग्यो रक्त पडने वहाँ, तन ऊपर तिणवार ॥३१॥

चालू लागली. (पुढें) सारे कैदी धरून दिल्लीला आणले गेले. मराठ्यांचे मुकुटमणि महादजी शिंदे ह्यांनीं आतां जाहीर रीतीनें हुकूम दिला कीं, त्या सैतान गुलामकादराला आतां इकडे (माझ्यासमोर) आणा. त्यानें शहाअलम (बादशहा) चे डोळे कसे ओढून काढले, त्यानें दिल्लीला स्वर्गाचा नरक कसें बनविलें (व) बादशाही तख्त (त्यानें) कसें उलटून टाकलें (तें आतां मी पाहतों !)

३१ (गुलामकादराच्या) अंगावर (जेव्हां) जेरबंदाचे फटकाऱ्यांवर फटकारे बसूं लागले तेव्हां (त्याच्या) अंगांतून तेथें (एकसारखें) रक्त गळूं लागलें.



शहाअलम बादशहाकडून श्रीमंत प्रथम कृष्णाजीराव पवार,
सेनासप्तसहस्त्री, ह्यांस मिळालेली तलवार.

एक रोज फिर एकठौ, लियो प्राण इम जान ।
अलग अलग टुकडे किये, काटि काटि किरपान ॥३२॥

महादजी सेंधियो हन्यो, रिपु कादर पतशाह ।
'अलीजा बहादुर' दई, पदवी आलम शाह ॥३३॥

आलम ने अरपण करी, इक जरियन पोषाक ।
और भेंट तलवार दी, सुनि कृष्णा की धाक ॥३४॥

३२ नंतर एके दिवशीं त्याचे अशा रीतीनें प्राण घेतले गेले कीं, तलवारीनें कांपून कांपून (त्याच्या शरीराचे) अलग अलग तुकडे केले गेले.

३३ महादजी शिंद्यांनीं बादशहाचा शत्रु गुलामकादर ह्यास ठार केलें (तेव्हां त्या कामगिरीबद्दल) शहाअलम बादशहानें त्यांस ' अलिजाबहादुर ' हा किताब दिला.

३४ (त्याबरोबरच) कृष्णाजीराव (पवार) ह्यांचाही पराक्रम ऐकून शहाअलम बादशहानें त्यांस तलवार* भेट केली व भरजरी पोषाख नजर केला.

---

* ही तलवार देवास थोरल्या पातीच्या शिलेखान्यांत ठेविलेली आहे.

नरू कवि वर्णन कऱ्यो, मेरठ को घमसान ।
कृष्णराव करि के कृपा, दियो वहुत सन्मान ॥३५॥

३५ नरू कवीनें (ही) मीरतची लढाई वर्णन केली आहे. (ती ऐकून) कृष्णाजीराव (पवार) ह्यांनीं कृपा करून त्याचा पुष्कळ सन्मान केला.

द्वितीय तुकोजीराव पवार,

सेनासप्तसहस्री,

ह्यांचीं

वीर-गीतें



श्रीमंत द्वितीय तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्त्री.

१२ खरडा–संग्राम

(सन १७९५ इ.)

दोहा

इक म्यान में नहीं रह सकत, चन्द्रहास दुव संग।
जों निजाम मरहठ रहत, दक्खिन के अंग भंग॥१॥

मनहरण

चाहत मरहठ यह मुगल विध्वंस कों,
मुगल मरहठन को ऐसे ही चाहत थे।
रहत हमेश यहाँ स्वारथ संग्राम बहु,
दक्खिनी दिलों में नित साल से बहत थे॥
कहे कवि कान्ह वहाँ खेल सों रहत रोज,
दोन्हों दल शोणित के प्यास से दहत थे।

१ एका म्यानेंत दोन तलवारी एकत्र राहूं शकत नाहींत. (तसें) निजाम व मराठे (एकत्र राहणें शक्य नव्हतें) म्हणूनच दक्षिणचे तुकडे होऊं लागले.

२ मोगलांचा विध्वंस करावा असें मराठे इच्छित होतें (व) मोंगलही मराठ्यांविषयीं तशीच इच्छा बाळगत होतें. त्यांच्यांत नेहमींच स्वार्थाचा झगडा खूब चालला होता (त्यामुळें) दाक्षिणात्यांच्या अंतःकरणांत (ते) सदा त्रासदायक होऊन बसले होते. कवि कान्हा म्हणतो तेथें (लढाई) हा रोजचा खेळच झालेला होता. दोन्ही पक्ष (एकमेकांच्या) रक्तप्राशनासाठीं उत्सुक झालेले होते. हे वीरवर कशा प्रकारें युद्ध करीत होते ह्याचाच विषय आज आतां पुढें येत आहे.

याही को विषय अब आवत है आगे आज,
कैसे यह वीर वर संगर करत थे ॥२॥

दोहा

कलह होत नित नित नई, बढ़त गई हिय लाय ।
इन कारण सौं दूसरे, रहत स्वामि अब हाय ॥३॥

मनहरण

संगर में रहत मराठन की मौंछे उग्र,
बार बार मुगलन की हार होति जाती थी ।
तदपि रखत वह त्रुटि को हृदय बीच,
कीन्हों बरबाद नहीं जाहिर लखाती थी ॥
कहे कवि कान्ह पर किस्मत सिकंदर थो,
दादा रघुनाथ हूँ की चाल न चलाती थी ।

३ रोजरोज नवे झगडे होत (त्यामुळें त्यांच्या) हृदयांत (क्रोधाग्नीची) ज्वाला वाढत गेली. हाय! ह्या (अशा आपसांतील द्वेषा) मुळेंच आतां परके आपले धनी होऊन बसले आहेत.

४ लढाईत मराठ्यांची मिशी वरच रहात (होती व) मोगलांची वारंवार हार होत होती; तथापि ते (मराठे) अंतःकरणांत तेढ ठेवूनही (मोंगलांचा) नायनाट करीत नव्हतें, हें स्पष्ट दिसून येत होतें ! कवि कान्हा म्हणतो (मराठ्यांचें) नशीब शिकंदर होतें. (कारण ह्यावेळीं) राघोबादादांचीं कारस्थानें (कितीही चालू असलीं) तरी तीं तडीस जात नव्हती. नारायणरावांचा खून (राघोबादादा) पेशव्यांनीं केला; परंतु त्याचा परिणाम (मराठ्यांच्या सामर्थ्यांत) कोणत्याही प्रकारें घर करूं शकत नव्हता.

नारायन को खून पेशवा ने लीन्हों पर,
याको न असर कोऊ घर कर पाती थी ॥४॥

दोहा

एक और घटना घटी, सेना मरहठ बीच।
हरिपन्त तात्या सेनापति, गयो स्वर्ग कर मीच ॥५॥

मनहरण

नीति को धुरंधर थो अरिन भयंकर थो,
मरहठ को मोड वीर स्वर्ग में सिधा गयो।
याके बद किस्मत को फायदा उठान चह्यो,
अंग्रेजन मदद लै निजाम अग्र आगयो ॥
मरहठ को जोर बहु हिंद पै लगत देख,
गोरन को पूरो यहाँ हृदय हिरा गयो।
मुगलन के साथी बनि सेन को सहाय दीन्ह,
पूरो विसवास हूँ को परचा लिखा दियो ॥६॥

५ (ह्याच वेळीं) मराठ्यांच्या फौजेंत एक आणखी घटना घडून आली. सेनापति हरिपंततात्या (फडके) स्वर्गी गेले.

६ (हरिपंततात्या हे युद्ध) नीतींत निपुण होते. शत्रूचा काळ होते. मराठ्यांचा (हा) वीरशिरोमणि स्वर्गी निघून गेला! ह्या त्यांच्या दुर्दैवाचा फायदा घेण्याच्या इच्छेनें इंग्रजांची मदत घेऊन निजाम चालून आला. हिंदुस्थानावर मराठ्यांचें बरेंच वर्चस्व बसत चाललेलें पाहून इंग्रजांच्या हृदयाचा ह्यावेळीं पूर्ण थरकांप होऊन गेला. मोंगलांचे (अर्थात् निजामाचें) सहाय्यक होऊन (त्यांनीं त्यांस) फौजेची मदत करूं म्हणून पूर्ण आश्वासनाचें पत्र लिहून पाठविलें.

दोहा

सन्धी कर नीजाम ने, दई राड उन मत्थ ।
अपनो स्वारथ जानि के, गोरन लीन्ही हत्थ ॥७॥

मनहरण

राज काज सारो नाना फडनवीस हाथ में,
पूरो वर वीर यह मराठन में भारी थो ।
नीति को विशारद थो बुद्धि हूँ को शारद थो,
कर की कृपाण हूँ को जोर सोर जारी थो ॥
नीजाम हूँ की नीति चाल यासों न सहन भई,
डिमडिम नचावन में यह तो मदारी थो ।
मुगल विनासवे को सेना को सजग करी,
मूल मंत्र मेटिवे में वीर रंगधारी थो ॥८॥

७ निजामानें (इंग्रजांशीं) दोस्ती करून लढाईचें पुरस्कर्तृत्व त्यांच्या शिरीं दिलें (व) आपल्या मतलबासाठीं इंग्रजांनींही (तें) हातीं घेतलें.

८ (मराठ्यांचा) सारा राज्यकारभार नाना फडणविसाच्या हातांत होता. वीरश्रेष्ठ मराठ्यांत हा पूर्ण मातबर होता. (हा राज) नीतिनिपुण होता. बुद्धिमान होता. (ह्याच्या) हातांतील (मनसोबीच्या) तलवारीचें प्राबल्य मोठें गाजत होतें. निजामाच्या (कपट) नीतीचें डांवपेंच ह्याला सहन झाले नाहींत. डुमडुमी वाजवून (प्राण्याला) नाचविण्यांत गारुडी (जसा प्रवीण असतो तसा हा आपल्या बुद्धिबळानें सर्वांना नाचवीत होता.) *

* सूत्रधारी जो पुरुष ज्याच्या गुणास जग भुलत ।
हातांत सगळे दोर पतंगापरि फौजा हालत ॥
हें प्रभाकरानें नाना फडणविसांच्या केलेल्या वर्णनाचें येथें सहज स्मरण होतें.

भाऊ पटवर्धन परशुराम को नियत कर,
सेनापति सेन को बनाय अग्र लायो है।
याके इस प्रबल पराक्रम को देख देख,
हृदय दुवन हूँ को पूरो कुह्मलायो है॥
माधौराव पेशवा रु नाना फडनीस आदि,
लेकर सबल सेन निकलि के आयो है।
बालक तकूजी संग सेन के सहित आये,
अरिन खदेड़न को खरडे में छायो है॥ ९॥

मोंगलांच्या नाशार्थ त्यानें सेना सज्ज केली. [शत्रूची] खासखास कारस्थानें हाणून पाडण्यांत [हा मोठा] बहादर होता.

९ [ह्यानें परशुराम] भाऊ पटवर्धन ह्यांना [मराठी] सैन्याचे [मुख्य] सेनापति बनवून पुढें आणलें. * ह्याचा [परशुरामभाऊचा] हा प्रबळ पराक्रम पाहून दुष्टांचें [शत्रूंचें] हृदय पूर्णपणें हताश होऊन गेलें. माधवराव पेशवे व नाना फडणवीस आदिसह प्रबळ सेना बरोबर घेऊन [तो वीर लढाईसाठीं] चालून आलेला आहे. बाल तुकोजीराव [पवार] हेही आपल्या पथकानिशीं आले. शत्रूंचा मोड करण्याकरितां [मराठ्यांनीं] खर्डे येथें तळ दिला.

* रत्नापुरच्या मुक्कामीं नानानें थोरला डेरा ' दळबादळ ' उभारून त्यांत दरबार भरविला व परशुरामभाऊस सांगितलें " स्वारींचें ओझें तुमचे शिरावर आहे. तुम्हींच साऱ्यांत पोक्त. तुम्हीं डोई दिल्याशिवाय पल्ला येणार नाहीं. " (म. रि. उ. वि. २ पृ. ४७०)

दोहा

यहाँ निजाम सेना सहित, पड़्यो डालि पाड़ाव ।
कब गोरन की सेन इत, आवे लड़न उम्हाव ॥१०॥

सोरठा

जोवत थो वो बाट, अंग्रेजन की आव को ।
मच गई मरहठ हाट, मुगलन के महँ एकठी ॥११॥

दोहा

मरहठ मौको देखि के, पड़े मुगल पर धाय ।
टूट पड़े दिल तोड़ि के, ज्यों दिन बद्दल छाय ॥१२॥

मनहरण

टूटत मुगल्लन पै होवत हमल्ला भारी,
दोन्हों ओर सेनन में होवत लड़ाई है ।

१० इंग्रजांची सेना येथें केव्हां येऊन लढाईला जोर येतो [ह्याची मार्गप्रतीक्षा करीत] निज़ाम तेथें तळ देऊन [अगोदरच] बसला होता.

११ तो इंग्रजांच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत होता [तोंच] मोंगल सेनेवर [निजामाच्या सेनेवर] मराठ्यांनीं एकदम [हल्ला केल्यामुळें] मोठी धुमश्चक्री उडाली.

१२ मराठ्यांनीं संधि पाहून मोंगलांवर जोरांत जीव तोडून हल्ला चढविला. त्या दिवशीं आकाश आभ्राच्छादित होतें.

१३ मोंगलांवर तुटून पडतांच जोराची हमरीतुमरी माजली. दोन्हीं पक्षांच्या सैन्यांत [आतां] लढाई जुंपली आहे. दोन्हींकडील

दोन्हों ओर वीरन की चन्द्रहास चाली अब,
दोन्हों ओर सूरन की माथन लुनाई है ॥
कहे कवि कान्ह यहाँ एक संग चाली इत,
तुपक तोप तीरन की झड़ी-सी लगाई है !
मानों दीप मालिका दिखाई इन दोउन ने,
दोउन दलों में आज लड़-सी लगाई है ॥१३॥

मुगल मराठन में घोर घमसान भयो,
दोन्हों ओर वीरन में झाट झड़ने लगी ।
छुटत तुपक तोप तीर तलवार आदि,
मानों आज भादव की बुटक पड़ने लगी ॥

वीरांच्या तलवारी आतां चालल्या आहेत. दोन्हींकडील वीरांचीं शिरें [खालीं पडून] गडगडत जाऊं लागलीं आहेत. कवि कान्हा म्हणतो, एकसारख्या चाललेल्या बंदुका, तोफा, तीर ह्यांची नुसती झडच लागून गेलली आहे! जणूं काय त्या दोघांनीं [तोफा व बंदुका ह्यांच्या फैरींतून निघणाऱ्या ठिणग्यांच्याद्वारें दिवाळींतील] दीपमालिकाच [लावून दिलेल्या] दिसत आहेत! दोन्ही दळांना [आज] लढण्याची जशी काय हिरीरीच वाटूं लागली आहे.

१४ मोंगल–मराठ्यांत भयंकर लढाई झाली. दोन्हींकडील वीरांमध्यें सारखा मारा होऊं लागला. भाद्रपदांतील पर्जन्य–वृष्टीप्रमाणेंच जणूं काय आज बंदुका, तोफा, तीर, तलवारी आदींच्या माऱ्याचा वर्षाव होऊं लागला! दोन्हींकडील सैन्यांत

दोन्हों ओर सेनन में रटक भटक भई,
दोउन दलों की देह शीघ्र गुड़ने लगी।
मानों सेन संगर में उथल पुथल भई,
स्थान खरड़े में खड्ग खड़खड़ने लगी ॥१४॥

जाके बल मुगल खरडे में लड़न आये,
मदद अंग्रेजन की आज नहीं पाई है।
मराठन पराक्रम को साहस बिचित्र देख,
निज़ाम सेन हूँ को दिल दुखदाई है॥
प्रबल विध्वंस भयो मुगलन के व्यूह को,
झाट नहिं झेल सक्यो मराठन लड़ाई है।

जोराची हाणामारी होऊं लागली. दोन्हींकडील सैन्यांतले शिपाई एकामागून एक पडूं लागले. जणू काय, लढाईत सैन्याची [सारखी] उलथापालथच होऊं लागली! खडर्यांच्या स्थानावर तलवारींचा खडखडाट होऊं लागला!

१५ ज्यांच्या बळावर मोंगल [निजाम] खडर्यांस लढण्याकरितां आला [होता त्या] इंग्रजांची मदत आज [त्याला] मिळाली नाहीं. [आणि त्यांतून] मराठ्यांचें शौर्य–साहस आश्चर्यकारक दिसून आलें. त्यामुळें निजामांच्या सैन्याच्या अंत:करणास [तें] कष्टप्रद झालें. मोंगलांच्या व्यूहाचा भयंकर विध्वंस झाला. [शत्रूचा] मारा [ते] सहन करूं शकले नाहींत. मराठ्यांशींच ती गांठ होती! जणू काय, हरणांच्या कळपाला उधळून सिंह [जसा डौलानें] उभा राहावा [तसें मराठे] तुर्कांच्या सेनेला उधळून [उभे राहिले]!

तुर्कन की सेनन को तितर बितर कीन्ही,
मानों मृग झुंडन को केहरी खड़ई है ॥१५॥

सुघर सलाहकार मुगल मुकुट हतो,
पूरो नय-नीतिकारी भारी सुखकारी थो।
अरिन विच्छेदवे में भूल मंत्र खोदिवे में,
मराठन सुशासन में देन दुखकारी थो॥
नाना फडनीस जान्यो मन हाथ लेनवे को,
मश्शुलमुल्क को मिलायो जाल रचिकारी थो।
तीस लाख आमद को मुलक झपेट लीन्हों,
राष्ट्र-कार्य अपनायो निज रक्षाकारी थो ॥१६॥

१६ मोंगलांच्या निपुण सल्लागारांत (मश्रुलमुल्क) शिरोमणि होता. (तसेंच तो) पूर्ण नयनीतिज्ञ (व) मोठा आनंदी (मनुष्य) होता. शत्रुंचा नायनाट करण्यांत, (शत्रुंचीं) खोल कारस्थानें बाहेर काढण्यांत (व) मराठ्यांच्या उत्तम राज्यनियंत्रणांत बाधा आणण्यांत (तो प्रवीण) होता. नाना फडणविसानें (त्याला आपल्या हातीं घेण्याचा विचार केला (व कपट) जाल रचणाऱ्या (त्या) मश्रुलमुल्काला (त्यानें शेवटीं) आपल्या ताब्यांत घेतलेही! (शिवाय आणखी) ३० लक्ष उत्पन्नाचा मुलुखही लुबाडला. (ह्याप्रमाणें) नाना फडणविसानें राष्ट्र-कार्य साधलें. (तो) आपल्या (राष्ट्राचा) रक्षणकर्ता होता.

दोहा

कृष्णराव के पुत्र थे, तकूराव बलवान।
छोटे थे पर वीर बहु, करन चले घमसान ॥१७॥
तीस लाख को परगनो, कब्जो कियो तमाम।
और लियो आसेर को, दौलत बाद हि नाम ॥१८॥

मनहरण

संधी प्रस्ताव पेश खाय भय पाय पूरो,
कीन्हों है निजाम अब जान दुखदाई है।
हाय ! मम मोंछें आज ऊँची नहीं होन पाई,
गोरन मदद बिन ऐसी गति पाई है ॥

१७ तुकोजीराव हे वीर कृष्णाजीराव (पवार) ह्यांचे पुत्र होते. (वयानें) लहान होते तरी (ते) लढण्यासाठीं निघाले.

१८ तीस लक्षांचा तमाम परगणा (मराठ्यांनीं) ताब्यांत घेतला व दौलताबाद नामक किल्लाही हस्तगत केला.

१९ आतां (पुढें लढणें) अहितावह आहे असें समजून पूर्ण भयभीत होऊन निजामानें तहाचें बोलणें लाविलें.* 'हाय! माझी मिशी आज ऊंच होऊं पावली नाहीं; 'इंग्रजांच्या सहाय्याभावीं अशी दुर्दशा झाली आहे' (असा तो मनांत खेद करूं लागला

* ता. ३१ मार्च शुक्रवारीं प्रातःकाळीं भाऊ (परशरामभाऊ) कडे नबाबाचा हलकारा निरोप घेऊन आला "आम्हीं बोलणें बोलतों. तोफा बंद कराव्या." (खरे : इचलकरंजी इतिहास, पृ. १९१).

करि के खुशामद खूब पायन पलोटन के,
अरिन की नीति यह पूरन दिखाई है ।
स्वारथ को चुंबक मराठन पै डाल कर,
भयो है निश्चिन्त अब सुलह कराई है ॥१९॥

गोरन को दावँ नहीं फडनीस जान सक्यो,
जान सक्यो नहीं मुगलन बड़ाई है ।
अंग्रेजन अकल हूँ को भेद नहीं लॅन्हों को,
दोउन दलों में झाट पूरन उड़ाई है ॥
स्वारथ में आय मश्रुलमुल्क भी बदलि गयो,
जाको फल तुर्कन को जाहिर दिखाई है ।

व प्रसंगानुसार मराठ्यांपुढें त्यानें) लोटांगण घालून (आणि) खूब खुशामद करून शत्रु-नीति पूर्ण प्रगट केली ! मराठ्यांवर स्वार्थाचा मोहपाश टांकून (तो) आतां तह करून निश्चित झाला आहे.

२० इंग्रजांचा डांव × (नाना) फडणविस ओळखूं शकला नाहीं. (तसेंच) मोंगलांनीं (निजामानें) केलेली (वृथा) बढाईही त्याला उमगली नाहीं. मराठे व मोंगल ह्या दोघांच्या सैन्यांत पुरती चकमक उडवून देणें ह्या इंग्रजांच्या धूर्ततेचा छडाही (त्यानें) लाविला नाहीं. स्वार्थांत सांपडून मश्रुलमुल्कही वेळेवर बदलला.

× हा डांव म्हणजे निजाम व मराठे ह्यांपैकीं कोणालाही मदत न करतां त्यांना आपसांत लढवून बलहीन करणें हा होय.

दोन्हों दल शक्तिन को पूरन अशक्त कीन्ह,
मराठन बिजय हूँ की अन्तिम लड़ाई है ॥२०॥

दोहा

मश्रुल्मुल्क को मन अगर, जो न बिगड़तो आज,
संभव है तुर्कन तुरत, मरहठ ढहते पाज ॥२१॥
मश्रुल्मुल्क दीवान थो, अलि निजाम को एक।
नीती गुन सागर हतो, तुर्कन राखन टेक ॥२२॥

त्याचें फळ तुर्कांना (मिळालें तें सर्वांना) जाहीर दिसून आलेंच.* दोन्ही दळांच्या शक्तींना पूर्ण निःशक्त करण्यांत आलें. मराठ्यांच्या विजयाची ही शेवटची लढाई होय.

२१ मश्रुल्मुल्काचें मन जर आज बदललें नसतें तर संभव होता कीं, तुर्कांनीं तेव्हांच मराठ्यांचा नाश केला असता.

२२ मश्रुल्मुल्क हा निजाम अलीचा एक दिवाण होता. (तो) तुर्कांची बाजू राखण्याच्या कामीं नीतिगुणाचा (केवळ) सागरच होता.

---

* बारकाईनें पहातांना कवीनें जें येथें म्हटलें आहे, त्यांत बराच अर्थ आहे. निजाम व मश्रुल्मुल्क हे दोघेही सुरुवातीलाच मराठ्यांच्या तोफांच्या भयंकर मारामारीला भिऊन गेले व त्यामुळें मश्रुल्मुल्क स्वतः होऊन मराठ्यांना शरण जाण्यास निघाला (मराठी रियासत उ वि २ पृ. ४७३) ह्याचाच परिणाम निजामाच्या मनावर जास्त होऊन मराठ्यांचा सडकून समाचार घ्यावा अशी निजामाकडील रेमंड ह्याची इच्छा असतांही निजामानें त्याला तसें करूं दिलें नाहीं (Mallenson's Final French Struggles) हें इतिहासतज्ञांस विदित आहेच.

बहकाया निशि दिन करत, अलि निजाम को जान।
मरहठ मूल उखारनो, करि मूँछन इन तान ॥२३॥
इस कारण फडनीस ने, लियो मरु मन हाथ।
मनमुटाव मुगलन लियो, कियो आपने साथ ॥२४॥

मनहरण

कृष्णाजी पुँवार हूँ के पुत्र थे तकूजी राव,
बालक थे छोटे पर अग्र घमसान के।
साहस विचित्र अभिमन्यु सौं दिखायो यहाँ,
जीत को बजायो बाद्य निज भुज पान के॥

२३ मराठ्यांचें मूळ उखडून काढावें [ह्याच] विचारानें [तो] निजामअलीला दररोज बहकावित होता [व] मिशीवर पीळ देत होता.

२४ ह्यासाठीं [नाना] फडणविसानें मोंगलांकडे वैमनस्य उत्पन्न करणाऱ्या मश्रुलमुल्काला हस्तगत केलें [व] आपल्या बरोबर घेतलें.

२५ तुकोजीराव हे कृष्णाजीराव पवारांचे पुत्र होते. [ते] लहान बालक होते; परंतु रणधुमाळींत [ते] आघाडीस होते.* येथें [त्यांनीं] अभिमन्यूसारखें विस्मयजनक साहस प्रकट करून आपलें बाहुबल व्यक्त केलें. जयवाद्य वाजविलें. [हे] राजे [तुकोजीराव पुढें] भावी भारतवर्षाच्या भुजांतील ढाल [अर्थात् संरक्षक] बनले ! [हे] बालक तुर्कांचे पुरते काळ झालें !

* खडर्याच्या संग्रामांत तुकोजीराव पवार हे जिवबादादा बक्षी यांच्या समवेत आघाडीस होते. (पहा; गुजर: सं. देवास थो. पा. पवार घ. इ. पृ. २८०)

भारत के भावी भुज ढाल महिपाल भये,
काल भये लाल यह पूरे तुरकान के ।
माधौराव पेशवा रु नाना फडनीस आदि,
बार बार कीन्हीं थी बडाई यों बखान के ॥२५॥

अमृतधुनि (?)

खरडे के संग्राम में, लडे तकूजी राव ।
लडे सिंह को पूत जो, खूब खच्चक करि घाव ।
खूब खच्चक करी, ऊब अच्चक करी ।
दूब मच्चक करी, सेन लच्चक करी ।
बाज धच्चक करी, नाग हच्चक करी ।
नाग हच्चक करि जुद्ध में, क्रुद्ध बुद्ध धरि ताव ।
खरडे के संग्राम में, लडे तकूजी राव ॥२६॥

[सवाई] माधवराव पेशवे आणि नाना फडणविस आदींनीं त्यांची कीर्ति वारंवार गाइली होती.

२६ खडर्याच्या लढाईंत तुकोजीराव लढले. सिंहाचा तो छावा लढला ! [त्यानें] खूब जोरानें [शत्रूवर तलवारीचे] घांव घातले. खूब प्रताप गाजविला. उसळती तडफ दाखविली. शेंपूट दाबून पळ काढणाऱ्या [शत्रु] सेनेचे लचके तोडले. बाज [पक्षाची] झडप दाखविली. नागाची फटकार प्रगट केली. क्रुद्धबद्ध होऊन फटकार मारणाऱ्या नागाप्रमाणें तुकोजीराव [पवार] खडर्याच्या लडाईंत [मोठ्या तडफेनें] लढलें !

१३ भोपाल-संग्राम

(सन १८१२ इ.)

दोहा

बानी रानी बिनय है, करहु बुद्धि बिसतार।
करहुँ काव्य संग्राम को, मम इच्छा कर पार ॥ १ ॥

मरहट्टन मर्दानगी, फैली देश विदेश।
पर नवाब भोपाल के, हिय बिच बाढ़यो क्लेश ॥ २ ॥

मरहट्टन निरमूल को, मन में करत विचार।
सहर सितारा-स्वामि सब, जान गयो व्यवहार ॥ ३ ॥

१ वागीश्वरी सरस्वतीला प्रार्थना आहे कीं, [मी] युद्धाचें गीत रचित आहे [त्यासाठीं] बुद्धि विस्तार करून माझी इच्छा पूर्ण कर.

२ मराठ्यांच्या मर्दुमकीची [कीर्ति] देशदेशांतरांत पसरली; परंतु [त्यामुळें] भोपाळच्या नवाबाच्या अंतःकरणांत क्लेश वाढले [अर्थात् त्याला ती दुःसह झाली].

३ मराठ्यांचा बींमोड करण्याचा [त्यानें] मनांत बेत केला. [ही त्याची] सर्व वर्तणुक छत्रपतींना कळून चुकली.

दई खबर यह त्रय नृपन, करहु नवाब विनास ।
दुशमन देश निकारनो, मरहट्टन मत खास ॥ ४ ॥

मनहरण

दौलतराव सेंधिया रु नागपुर भोसले रु,
तक्कूजी पुँवार पर मंत्रना कराई है ।
भूपति भूपाल हू के नवाब षडयंत्र रचिं,
मराठन पै जाल को पूरन रचाई है ॥
बाजीराव पेशवा को बाचत ही ऐसो पत्र,
स्वामिभक्त राजन की मूँछ फहराई है ।
तीन्हों ही नरेश आज तजी के बिलास साज,
आय के ससैन्य ठाड़े जूटन लड़ाई है ॥ ५ ॥

४ [म्हणून] त्यांनीं तिघां सरदारांना कळविलें कीं, नबाबाचा नाश करावयाचा आहे. [ह्या] दुश्मनाला देशांतून काढणें [हा मराठ्यांचा] खास मनसुबा आहे.

५ दौलतराव शिंदे, नागपुर [कर] भोसले व तुकोजीराव पवार ह्यांना [छत्रपतींनीं त्याबद्दलची] मसलत दिली. भोपाळच्या नबाबानें षड्यंत्र रचून मराठ्यांवर पूर्ण जाळें पसरलें आहे, असें [दुसरे] बाजीराव पेशवे ह्यांचें पत्र वाचतांच [वरील] स्वामिभक्त सरदारांनीं [आपल्या] मिशांना पीळ दिला. तिन्ही सरदार विलासभोग सोडून लढाई जुंपविणें आहे [म्हणून आपल्या] फौजांसह येऊन ठाकले.

तीन्हों ही नरेशन की फौजें हैं विशाल क्षेत्र,
मानों हरिद्वार कुंभ आज ही दिखायो है।
बाजि-गजराजन के जुत्थन के जुत्थ जुत्थ,
मावत न मेदिनी पै शेष सकुचायो है॥
धरनी धसत देख फौजन के फैल लेख,
सेनापति हिय में हुलास बढ़ि आयो है।
मन में सलाह राव तकूजी उपाव कर,
तीन्हों सेना नायक पै भाव दरसायो है॥६॥

दोहा

सेना के त्रय भाग करि, रहहु अलग सचेत।
यह सब के हिय में जची, यहीं उचित फल देत॥७॥

६ तिन्ही सरदारांच्या फौजांनीं विशाल क्षेत्र (व्यापिलें) आहे. जणूं काय आज हरिद्वारचा कुंभ (मेळाच तेथें भरलेला दिसत आहे! हत्ती घोडयांच्या झुंडींच्या झुंडी धरणीवर मावत नव्हत्या. [जणूं काय त्यांच्या भारामुळें] शेषानें [अंगच] जखडून घेतलें आहे! धरणी [खालीं] खचत चाललेली पाहून [व] फौजांच्या हालचाली लक्षांत घेऊन सेनापतींच्या अंतःकरणांत उल्हास वृद्धिगत झाला आहे. तुकोजीरावांनीं मनांत [पुढील] उपायाची मसलत रचिली [व] तीन्ही सेनापतींच्या पुढें तिचा आशय प्रकट केला.

७ [तुकोजीरावांनीं सांगितलें कीं,] सैन्याचे तीन विभाग

सुनी खबर नवाब ने, आये तीन नरेश।
प्रथमहिं सुभट सचेट थो, छाँडि आपनो ऐश ॥८॥

मनहरण

पाकर खबर यह भूपति भूपाल हूँ ने,
सेना अपनी को सारी सूचित कराई है।
औसर अपार आयो आज घर बैठे यह,
मराठन मुलक मेटैं अपनी भलाई है॥
रात दिन सोचते थे आज लग जाके काज,
वही बात देखो यह प्रत्यच्छ दिखाई है।

करून [आपण] निरनिराळे [लढाईसाठीं] तयार राहूं. हीच युक्ति शेवटीं) योग्य फलदायी होईल असें सर्वांना पटलें.

८ तीन सरदार आले आहेत (ही) बातमी नबाबानें ऐकिली. तो वीर अगोदरच भोगविलास सोडून देऊन (युद्धासाठीं) तयार झालेला होता.

१ ही बातमी भोपाळच्या नबाबाला कळतांच त्यानें आपल्या साऱ्या सैन्याला कळविलें (कीं,) आज घर बसल्याच ही पारावार नसलेली संधि आलेली आहे. मराठ्यांचा मुलुख (आपण) नेस्त-नाबूत करूं. ह्यांतच आपलें हित आहे. आजपर्यन्त रात्रंदिवस ज्या कार्यासाठीं आपण विचार करीत होतो पहा, तीच गोष्ट प्रत्यक्ष पहावयास मिळाली आहे. माझ्या सर्व सैनिकांनो, तयार होऊन येथें

होकर तयार मेरे आवो सब सैनिक ह्याँ,
निर्णय करेंगे अब अन्तिम लड़ाई है ॥९॥

दोहा

सबल सेन नवाब की, आई तजि घर मोह ।
मुगल शेख पठान सब, अखिल मिले हनि द्रोह ॥१०॥

मनहरण

नायक नवाब यामें परम प्रसिद्ध वीर,
मध्य देश भारत में रुजक भोपाल है ।
याको थो विचार दृढ़ मरठन मिटानवे को,
आपनो बढ़ानवे को राज यों विशाल है ॥

या. (ही) आतां शेवटची लढाई आहे (हिच्यांत आपण) सोक्षमोक्षच लावून घेऊं.

१० घरादारांचा मोह सोडून नबाबाची बलिष्ठ सेना आली. मोंगल, शेख, पठाण सगळे आपसांतील वैर विसरून एकत्र आले.

११ ह्यांच्यांत परम प्रसिद्ध वीर (असा) नबाब प्रमुख होता (त्याचें) भारत वर्षाच्या मध्यदेशांतील (मध्य हिंदुस्थानांतील) भोपाळ (शहर) सुंदर आहे. मराठ्यांना नेस्तनाबूत करण्याचा (व) त्यायोगें आपलें राज्य खूब वाढविण्याचा ह्याचा पक्का विचार होता. (छत्रपतींनीं) त्याचें हें इंगित ओळखलें (व म्हणूनच) त्याच्या त्या नशीबाचें नाटक रचून देण्यांत आलें

सितारा-पति जान गयो याके इस मर्म हू को,
नाटक रचाय दियो याके इस भाल है ।
बाजीराव पेशवा के विजयश्री हाथ धरी,
पुँवार-पति राव तकूजी नरपाल है ॥११॥

दोहा

दोउन की सेना सबल खड़ी अड़ी मैदान ।
हार जीत निर्णय करन, अवसर मिलियो आन ॥१२॥
आय दिये डेरा दुअन, कछुक दूर मैदान ।
दोन्हों फौज मसालची, खडे रहे जनु ध्यान ॥१३॥

मनहरण

केते शूर सामंत सो रात भर चैन सोये,
कायर न सोये जहाँ दिल धडकान सों ।

आहे. बाजीराव पेशव्यांचा हात विजयश्रीनें धरलाच आहे व तुकोजीराव पवार हे थोर सरदार आहेत.

१२ (जणूं काय) जयापजयाचा निर्णय करण्यासाठीं (आज) अवसर मिळालेला आहे (असें समजून) दोन्ही (पक्षांकडील बलवान सेना (रण) मैदानावर अडून उभ्या राहिल्या.

१३ दोन्ही (पक्षांच्या) फौजांनीं (तेथें) येऊन थोडच्या अंतरानें मैदानावर तळ दिले होते. (रात्रीचा वेळ असल्याचें) पाहून दोन्ही (पक्षाच्या) फौजांतील मशालजी खबरदारीनें उभे राहिले.

३४ कित्येक शूर वीर तर रात्रभर निश्चित झोंपले; (परंतु)

केते जहँ बीर निज प्रेमी सों मिलन लागे,
तांडव करन लागे बल के बखान सों ॥
ऐसे अभिमानी वीर दोउन के सोये जहाँ,
होवत प्रभात वहीं ठाड़े अकड़ान सों ।
दुंदुभी नगारन पै ठोकन परत वंही,
बीरन करन लागे बातें असमान सों ॥१४॥

दोहा

काल सिसिर प्रस्थान भो, रितु फागुन अवसान ।
मन मानी लागे करन, मरहठ मूसलमान ॥१५॥
तुरकन को त्रय ओर सों, लियउ त्रिपुर नरनाह ।
सागर मझ नाविक पर्यो, त्यों नवाब हिय दाह ॥१६॥

जेथें हृदयांत धडकी [भरलेली होती] असे भित्रे [मात्र] झोंपले नाहींत. कित्येक वीर [ठिक] ठिकाणीं [आपापल्या] प्रेमी मंडळींना भेटूं लागले [व आपल्या] सामर्थ्याची प्रशंसा करित तांडव नृत्य करूं लागले ! दोन्ही [पक्षांकडील] असे अभिमानी वीर जे झोंपले ते पहांट होतांच ऐटीनें उभे राहिले. डंके, नगारे वाजूं लागले. त्याबरोबर [सारे] शूर [शिपाई] आकाशाशीं गोष्टी करूं लागले [अर्थात् गगनव्यापी गर्जना करूं लागले].

१५ [तो] समय, फाल्गुन महिन्याचा अखेर, असल्यानें शिशिरॠतूनें प्रस्थान ठेविलेलें होतें [अर्थात् शिशिरॠतूही जाण्याच्या तयारींत होता.] मराठे [व] मुसलमान मनसोक्त वागूं लागले.

१६ त्या तीन नगरच्या [अर्थात् नागपूर, ग्वाल्हेर व देवासच्या]

तोटक

दुहुँ ओरन फौज सचेत खड़ी,
पट केसरिया पहने अकड़ी ।
दुहुँ ओर के टोप सनाह सजे,
दुहुँ ओर पै दुँदुभिं डक्क बजे ॥१७॥
दुहुँ ओर से किन्नर गान करें,
दुहुँ ओर के बीर उछाह धरें ।

तिघां सरदारांनीं तुर्कांना तिन्ही बाजूंनीं वेढिलें त्यामुळें समुद्राच्या मध्यभागीं नाविक सांपडावा तसा सांपडला गेल्यामुळें नबाबाच्या अंतःकरणाला आग लागली!

१७ दोन्हींकडील फौजा अभिमानानें केशरी वस्त्रें * धारण करून तयार होऊन उभ्या राहिल्या. दोन्हींकडील (वीरांनीं) शिरस्त्राणें (व) कवच चढविले. दोन्हींकडे डंके, नगारे झडूं लागले.

१८ दोन्हींकडील किन्नर (अर्थात् भाटचारण वीरश्रीचीं) गीतें गाऊं लागले. दोन्हींकडील वीर उत्साहभरित झाले. दोन्हींकडील (वीर) खाऊनपिऊन मस्त झाले. दोन्हींकडील (वीर) मनोराज्य रचूं लागलें.

---

* ही पद्धत मूळ रजपुतांची. ह्याचा अर्थ येथें एवढाच कीं, वीर आतां रणांत मरूं–मारूं ह्या उद्देशानें लढावयास सिद्ध झाले.

दुहुँ ओर छके भट छोहन में,
दुहुँ ओर विचार विमोहन में ॥१८॥

दुहुँ ओरन सेन सँकेत भयो,
दुहुँ ओरन तें उन दावँ दियो।
दुहुँ ओरन तें भट भेंट भई,
दुहुँ ओरन इष्ट प्रनाम लई ॥१९॥

दुहुँ ओरन सेनन सैन भई,
दुहुँ ओरन वाग उपाड़ दई।
दुहुँ ओरन तें फिर तोप दगी,
दुहुँ ओरन पैदल आँख जगी ॥२०॥

अब प्रानन को नहिं मोह रह्यो,
उन स्वर्ग सिधावन मार्ग गह्यो।

१९ दोन्हींकडील फौजांना [लढाईचे] इशारे मिळाले तेव्हां दोन्ही [पक्षांनीं] एकमेकांवर चाल केली. दोन्हींकडील वीर [एकमेकांवर] तुटून पडले. दोन्हींकडील [वीर आपापल्या] इष्ट [देवतांचे] जयघोष करूं लागले.

२० दोन्हींकडील सैन्यांना हुकुम झाले [त्याप्रमाणें] दोन्हींकडल्यांनीं घोड्यांच्या लगामा ढिल्या केल्या. नंतर दोन्हीं-कडून तोफा डागल्या गेल्या [त्याबरोबर] दोन्हींकडील पायदळांनीं एकमेकांवर दृष्टि रोंखली.

२१ आतां प्राणांचा मोह [कोणाला] राहिला नाहीं. स्वर्गगमन

भिड़िगे रण मल्ल अखाड़न ज्यों,
झड़िगे पतझाड़ झखाड़न ज्यों ॥२१॥

खग झाटन की बहु झाट उड़ी,
तुरकानन के तन ताप पड़ी।
त्रय ओरन सों त्रय भूप धर्‍यो,
मझधार में आज नवाब पर्‍यो ॥२२॥

इक ओर पुँवार–पती पकर्‍यो,
इक ओरन भोंसल भी जकर्‍यो।
इक ओरन में सजि सेंधिय थो,
वह द्वार तो पूर्ण अभेदिय थो ॥२३॥

[हाच काय तो आतां आपणांला एक] मार्ग [उरला] आहे, असें त्यांनीं ठरविलें. फाल्गुनांत शिशिरऋतूमध्यें झाडाचीं पानें झडून पडावींत तसें आखाड्यांत [अर्थात् रणक्षेत्रांत] निकरानें लढणारे वीर [सारखे धारातीर्थीं पतन पावूं लागले].

२२ तलवारींचे मार्‍यांवर मारे होऊं लागले [त्यामुळें] तुर्कांचे देह छिन्नविच्छिन्न होऊन पडूं लागले. [त्यांना मराठ्यांच्या] तिन्ही सरदारांनीं तिन्ही बाजूंनीं घेरिले. आज नबाब [त्यांच्या] मध्यभागीं अडकला गेला!

२३ एका बाजूनें पवारेश्वर [तुकोजीराव] ह्यांनीं घेरलें. एका बाजूनें भोसल्यांनींहीं जखडलें. एका बाजूनें शिंदे [अर्थात् शिंद्यांची

जगु बापु सेनापति सैंधिय थो,
पर कायर थो यह खेदिय थो ।
पुर नाग-पती भिड़िगो पल में,
जिमि केहरि ज्यों अजिया दल में ॥२४॥

अरु राव तकूजी पुँवार पती,
अड़िगो जिमि पारथ भारत ती ।
इततैं उतयों उततैं इतयों,
जिमि सागर मंथन में सुर ज्यों ॥२५॥

फौज) सज्ज होती. (राहिलेलें) तें दार (अर्थात् भोजसागर तलावाकडची * बाजू) पूर्ण अभेद्यच होतें.

२४ जगो बापू (हा) शिंद्यांचा सेनापति होता; परंतु तो भित्रा (व) मेंगरूळ होता. जसा शेळयांच्या कळपावर वाघ तुटून पडावा तसें नागपुर(सेना)पति $ पळभरांत (शत्रूवर) तुटून पडला !

२५ आणि पवारेश्वर तुकोजीराव (हे) भारतीय (युद्धांतील) अर्जुनाप्रमाणें दटून (लढूं लागले). इकडून तिकडे (व) तिकडून इकडे असें (ते) सागर मंथनाच्या (वेळच्या) देवांप्रमाणें (धांवूं लागले)!

* ह्या तलावाबद्दल " ताल में ताल भोपाल ताल और सब तलैया है " ही उक्ति सुप्रसिद्धच आहे. हा सागरतुल्य तलाव परमारवंशमणि भोजदेवानें बांधलेला असल्यानें तो भोजसागर ह्या नांवानें प्रसिद्ध आहे.

$ नबाब महंमद सिदक अल्ली-खान.

गुड़िगे गजराज किते छण में,
हयराज किते हटिगे रण में।
तुरकानन की सब सेन मुरी,
जहँ दौलत सैंधिय सेन खरी ॥२६॥

कितने पड़ि पैदल फेटन में,
कितनेक गयंद चपेटन में।
निज साहस को नहिं रोक सके,
जगु नायक सैंधिय जी खसके ॥२७॥

जिमि गीदर भागत कूकर ते,
इमि भग्गिय तुर्कन धूकर ते।
यह देखि नवाब के हर्ष छयो,
दुरजोधन के सम दर्प भयो ॥२८॥

२६ कित्येक गजराज क्षणांत खालीं पडले. (रणांगणांतून) कित्येक अश्वराजांनीं माघार घेतली. जिकडे दौलतराव शिंद्यांची फौज उभी होती तिकडे तुर्कांची सारी फौज वळली.

२७ माऱ्यांत कित्येक पायदळ (सैनिक) पडले. कित्येक हत्तीच्या झपाट्यांत सांपडले. शिंद्यांचे सेनापति जगोबा (बापू) स्वत: धीर धरूं शकले नाहींत. (त्यांनीं शेवटीं तेथून) चुपचाप पळ काढला.

२८ ज्याप्रमाणें कुत्र्यानें (पाठलाग करतां) कोल्हा पळत (सुटतो) तसें तुर्कांच्या धुत्कारानें (जगोबा बापू) पळत सुटले. हें पाहून नबाबाला आनंद झाला (व) दुर्योधनासारखा गर्व चढला.

दोहा

जगु बापू जँग छोड़ के, भाग गयो भय पाय ।
सुनत खबर पुँवार-पति, हियउ गयो झुँझलाय ॥२९॥

मनहरण

सेनापति सैंधिया को जगो बापू नाम हतो,
झाट नहिं झेल सक्यो तुर्कन कृपान की ।
भाग गयो भय पाय दूतन खबर दीन्हीं,
पुँवार-पति जान लीन्ही बापू के पयान की ॥
सेनापति महिपति को तक्कूजी संदेश दीन्हों,
जावत हूँ चीर कर फौजें इसलाम की ।
ऐसे कह बीर चल्यो म्लेच्छन पै गर्ज कर,
रावन की लंक पर हँक हनुमान की ॥३०॥

२९ जगोबा बापू भिऊन लढाई सोडून पळून गेला. (ही) बातमी पवारेश्वर (तुकोजीराव) ह्यांनीं ऐकतांच (त्यांचें) अंतःकरण संतप्त झालें.

३० शिंद्यांच्या सेनापतीचें नांव जगोबापू होतें. (ते) तुर्कांच्या तलवारीचा मारा सहन करूं शकले नाहींत. भीति वाटून (ते) पळून गेले, (ही) बातमी दूतांनीं सांगितली (त्यावरून) जगो-बापूचें पलायन पवारेश्वर (तुकोजीराव ह्यांना समजलें. (तेव्हां आपले) सेनापति महिपतराव (अत्रे) ह्यांना तुकोजीरावांनीं कळविलें (कीं), मुसलमानांच्या फौजेची फळी फोडून (मी) जात आहे. असें म्हणून (तो) वीर म्लेंच्छांवर गर्जून चाल करून

दोहा

राव तकूजी तुरक पर, तडिता जिमि टूट्योह ।
खानाखान नवाब को, मन मोदक लूट्योह ॥३१॥
याको वर्णन करत मैं, रचि तोटक में सार ।
किहि कारन कैसे लड़े, जाने अखिल संसार ॥३२॥

तोटक

उड़ि फौज में फेर फटक्क अबैं,
मचि भीषण फेर रटक्क तबैं ।
दुहुँ ओरन में कटि सेन रही,
दुहुँ ओरन में नहिं जीत रही ॥३३॥

गेला. (जणूं काय) हनुमानानें रावणाच्या लंकेवरच उड्डाण घेतलें!

३१ तुकोजीराव विजेप्रमाणें तुर्कांवर तुटून पडले (व) त्यांनीं खानखाना नबाबाच्या सैन्याला मनसोक्त मारहाण केली.

३२ ह्याचें वर्णन मीं सार (रूपानें) तोटक (वृत्तांत) सांगतों (ज्यामुळें ते) कोणत्या कारणासाठीं कसें लढलें (हें) सर्व जगाला माहित होईल.

३३ आतां फौजांत धुमश्चक्री उडाली. तेव्हां पुन: भीषण लढाई माजली. दोन्हींकडील सेना कांपली जाऊं लागली. दोन्हींकडे जय राहिला नाहीं (अर्थात् जय अनिश्चित दिसूं लागला).

दुहुँ ओरन में तपि तेज रह्यो,
दुहुँ ओरन में नहिं भेद गह्यो ।
नहिं म्लेच्छन मर्द हटें रण में,
नहिं राव तकूजी घटे उन मे ॥३४॥

अब भीषण घोर संग्राम मच्यो,
तुरकानन में टुक पाव लच्यो ।
जयनाद कु सोर पुँवार कऱ्यो,
नव साहस सेनन और भऱ्यो ॥३५॥

अब म्लेच्छन के पग फौज हटे,
तुरकानन के तप तेज घटे ।

३४ दोन्हींकडील [सैनिक] तेजोत्साहित झाले. त्या उभयतांत कांहीं फरक आढळून येत नव्हता [अर्थात् ते तुल्यबल होते]! मर्द मुसलमान लढाईंत [मागें] हटेनात [व] तुकोजीरावही त्यांत [कांहीं] मागें घेईनात!

३५ आतां भयंकर तुमुळ युद्ध माजलें. [त्यांत] तुर्कांचा पाय थोडा [मागें] हटूं लागला [तों तुकोजीराव] पवारांनीं जयध्वनीचा प्रचंड घोष केला [त्यामुळें] सैन्याला आणखी नवीन उत्साह प्राप्त झाला.

३६ आतां म्लेंच्छांच्या फौजेचा पाय [मागें] हटला. तुर्कांचा तेजोत्साह मावळला. तेथें जिकडे तिकडे (त्यांची) घडी वळावयाला

कहुँ जत्रय तत्रय होय घरी,
गठरी जनु बोरन की बिखरी ॥३६॥
झपटी कहुँ चक्रमुखी जिनकी,
मुगलानन बात मिटी मनकी ।
अब याद अलाह कि आन करी,
मम बात बिगारिय तें सगरी ॥३७॥
जय जानत थो जिय में जबरी,
उस बात पे तो अब बीज परी ।
तुरकानन सेनन भग्ग गई,
अरु राव तकूजी कि जीत भई ॥३८॥
धनवाद मिले सब ओरन तें,
पर पेशव से बहु शोरन तें ।

लागली [अर्थात् ते अस्ताव्यस्त झाले]. जणू बोरांनीं [भरलेली] गठडीच [एकदम सुटून] विखरली.

३७ कोठें त्यांची सेना तुटून पडली [तरी शेवटीं] मोंगलांच्या मनांतील गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. आतां [नबाबाला] अल्लाची आठवण आली [व तो म्हणूं लागला कीं,] 'माझी सर्व गोष्ट बिघडली [अर्थात् पूर्ण नाचक्की झाली]!

३८ [मला] मनांत जयाची जबर [उमेद] वाटत होती [परंतु] त्या गोष्टीवर तर आतां वीजच कोसळली!' तुर्कांची सेना पळून गेली व तुकोजीरावांचा जय झाला.

३९ तेव्हां सगळीकडून [तुकोजीरावांना] धन्यवाद मिळालेच;

मन मान लियो वर वीरन ने,
गुण सागर भोसल धीरन ने ॥३९॥

दोहा

रटक उड़ी इक पहर तक, हट्यो न पति-पुँव्वार ।
आखिर हारि नव्वाब गो, जीत गयो रिझवार ॥४०॥
हय गज डेरा लीन्ह सब, लीन्ह नवाब न शीश ।
राव तकूजी रहम कर, दियउ प्रान बखशीश ॥४१॥

सोरठा

कवि कान्हा कर ठीक, रार रची भोपाल री ।
राव तुका करनीक, दई रीझ पुहुमी प्रगट ॥४२॥

परंतु पेशव्यांकडून त्यांस अधिक धन्यवाद मिळाले. [सर्व] वीरवरांच्या मनांत [त्यांच्याविषयीं आदर] उत्पन्न झाला [व] शूर भोसले ह्यांनीं गुणसागर [म्हणून त्यांना मानलें] !

४० एक प्रहरपर्यंत दंगल उडाली; [परंतु त्यांत] पवारेश्वर [तुकोजीराव] मागें हटले नाहींत. शेवटीं नबाब पराजित झाला [व तुकोजीरावांनीं] आनंददायी [असा] जय मिळविला.

४१ नबाबाचे हत्ती, घोडे, डेरे सर्व घेतलें [पण त्यांचें] डोकें उडविलें नाहीं. ! तुकोजीरावांनीं [त्याच्यावर] दया करून [त्यास] प्राणदान दिलें.

४२ कवि कान्हानें हें भोपाळच्या लढाईचें यथार्थ [कवन] रचिलें [व तें त्यानें] कर्तृत्वशाली [अशा] तुकोजीरावांना अर्पण केलें [तेव्हां] संतुष्ट होऊन [त्यांनीं त्यास] जमीन बक्षिस दिली.

१४ जयसिंग खीचीवर आक्रमण

(सन १८१८ इ.)

ओवी (?)

रजपूती बीर धारी, करी पाटन की खुआरी ।
जुद्ध भोपाल में भारी, करी रार छारी खारी ते ।
सजी सेन बहु खारी, गज अश्व हूँ की सवारी ।
बीर बावनी हकारी, तुपक तोपाँ लई खारी ते ।

१ रजपूती बाणा धारण करणाऱ्या [पवार] वीरांनीं पाटण-वर * स्वारी केली, भोपाळमध्यें भयंकर युद्ध केलें (आणि ह्या) लढाया लढून (शत्रूंचा) धुव्वा उडविला. (त्यांची) सेना उत्तम सजलेली आहे. (तींत) मोठेमोठे रणधुरंधर असे गजारोही (व) अश्वारोही वीर आहेत. बहाद्दर वीरांना चाल करण्याची आज्ञा झाली. (त्यांनीं) तोफा बंदुका घेतल्या. (तसेंच) भाले, तलवारी, कटचारी, कालचक्र (व) धनुष्यें धारण केलीं. (त्यांच्या) घोड्यांवर लोखंडी झुली घातलेल्या आहेत (व ते स्वतः) शिरस्त्राणें घालून स्वार झाले आहेत. (तसेंच) कोठें गदा (तर) कोठें दुधारी तलवारी (कोणी कोणी घेतलेल्या आहेत व अशा प्रकारें) तुकोजीराव

---

* गुजर : सं. देवास थो. पा. पवार घ. इति. पृ. २७३

कुंत तेग औ कटारी, काल-चक्र धनुर्धारी ।
पाखर उडंड़ा पै डारी, टोप बख्तर सवारी ते ।
कहीं गुर्ज कहीं दुधारी, तक्कूराव की सवारी ।
चलि शत्रु पुहुमि पछारी, टूक टूक करि डारी ते ॥१॥

पद्धरी

चढ़ि चल्यो भूप जैसिंग राज । राघोगढ़-पति सेना समाज ॥
हय दशहजार लिए टारटार। सोवन कच्छ विजय करि विचार ॥२॥
दोही शेष कुरंभ ध्वज लीन्ह । पैदल हजार पच्चीस कीन्ह ॥
दौलतराव यह सुनी बात । खिची सोवनकच्छ लेन जात ॥३॥

(पवारां) चा सेनासंभार (जणूं काय,) शत्रूला धराशायी करून त्याचा पूर्ण नायनाट करून टांकण्यासाठीं चालला आहे.

२ राघोगडचा स्वामी राजा जयसिंग (खीची) दळभार घेऊन स्वारीवर निघाला. (त्यानें) निवडक असे १० हजार घोड-दळ बरोबर घेतलें (व) सोनकछ × फते करण्याचा विचार केला.

३ नागद्वयानें (चिन्हांकित असलेलें आपलें) निशाण हत्तीवर घेऊन (व) पंचवीस हजार पायदळ बरोबर घेऊन जयसिंग खीची सोनकछ घेण्यास जात आहे, ही बातमी दौलतराव (शिंदे) ह्यांना समजली.

× देवास शहरापासून १८ मैलांवर हें गांव आहे.

करि कोप हुकुम तब दियो । बीर आनन्दराव भीम ते धीर ॥
तुम बेगी चढ़्यो सिंधू बजाय । जैसिंग राय को पकड़ि लाय ॥४॥

यह हुकुम पाय चढ़ि चल्यो धीर । ज्यौं लंकपुरी हणुमंत बीर ॥
भयो उभय सेन संग्राम घोर । जैसिंग जीति लियो प्रबल जोर ॥५॥

आनन्दराव देवास आय । करि विनय सभी अर्जी सुनाय ॥
सुनी अरज करी कोप राई । काकडे इमाम तुम बेगि धाई ॥६॥

सेना समेत रिपु मारो बेग । तलवार बहादुर धारो तेग ॥

४ तेव्हां (त्या) वीरांनें संतापून शूर आनंदराव भीमास हुकुम दिला कीं, तुम्ही सिंधु राग वाजवून वेगानें धांवून जावें (व) राजा जयसिंगास धरून आणावें.

५ हा हुकुम मिळतांच जसा हनुमंत वीरानें लंकेवर (हल्ला केला तसा तो) शूर (आनंदराव भीम जयसिंगावर) हल्ला करावयास निघाला. उभय सैन्यांत घोर लढाई झाली (व) जयसिंगानें (आनंदराव भीमास) जिंकून घेतलें. (त्याची) शक्ति अचाट होती.

६ आनंदराव देवासला आला (व त्यानें) विनंति करून आपली सर्व प्रार्थना (तुकोजीरावांस) श्रुत केली. (ती) प्रार्थना ऐकून (तुकोजीरावांना) संताप आला (व त्यांनीं) काकडे व (शेख) इमाम (ह्यांना जयसिंगावर) तुम्ही लौकर धांवून जावें (म्हणून आज्ञा केली).

७ “(हे) तलवार बहादरांनो, तलवारी हातांत घ्या (व)

सुनि वचन भुपाल काकडे एम* । ईमाम शेख पूछि केम*॥७॥

मरना है सब को एक बार । इज्जत गमाय जीनो धिक्कार ॥
दोहुँ वीर चढ़े दइ मूछ ताव । जैसिंग खीची से कह्यो आव ॥८॥

दोहुँ भिड़े शूर संगर जुझार । नहिं हटे दोहुँ माने न हार
तलवार तुपक चले तीर तेग । कहे उभय मार मारो सुवेग ॥९॥

बहु कियो जुद्ध संग्राम घोर । बहु काल रूप अतोल जोर ॥
दोहुँ इष्ट मित्र दोहुँ जैत सम्भ । करलिय मार तो हुँ खडी रम्भ ॥१०॥

शत्रूस सैन्यासह जल्दी गारद करा. (आपल्या) राजाची आज्ञा ऐकून काकडे व शेख इमाम (हे आपसांत) कोणी कोणीकडे जावयाचें ह्याचा विचार करूं लागले.

८ सर्वांना मरण (हें) एकदां आहेच (तेव्हां) लौकिक गमावून जगणें धिक्काराचें होय ! (असें समजून ते) दोन्ही वीर मिशीला ताव देऊन निघाले (व त्यांनीं) जयसिंग खीचीला (लढाईसाठीं) आव्हान दिलें.

९ दोन्हींकडील लढवय्ये वीर एकमेकांवर तुटून पडले. दोन्ही मागें हटेनात (व) हार खाईनात. तलवार, बंदुका, तीर (व) तेग चालल्या (व) उभय (पक्षांकडील वीर) लौकर हाणामारा (असें) म्हणूं लागले.

१० (काकडे व शेख इमाम ह्यांनीं) खूब घनघोर लढाई

* 'एम केम'चा प्रयोग 'पृथ्वीराजरासो' मध्येंही केलेला आढळतो,
उदाहरणार्थः– चंदेलराय उच्चारत एम ।
मोह राज महँ कहो कह केम ।

जैसिंग तीर तुपक चलाई । काकडे ढाल ते लई बचाई ॥
उण हन्यो कुंत उण गदा मारी । जैसिंग कट्यार आर पारी ॥११॥

बरछी बिनोट शस्त्र मार । इमाम शेख लोह लगे पार ॥
करिके बेहाल दियो भूमि डार । सुरलोक काकडे कन्यो सिधार ॥१२॥

तकूजीराव यह सुने हाल । करि कोप अरि पै चले भुआल ॥१३॥

केली. (त्यांच्या ठिकाणीं त्यावेळीं) काळासारखी अतुल्य शक्ति (संचारलेली होती. ते) दोघे इष्ट मित्र, (ते) दोघे जयस्तंभ (शत्रूला म्हणूं लागले हे पहा,) तुला मारले, (ही पहा) जयश्री (आमच्यासमोर) उभी आहे.

११ जयसिंगानें तीर, बंदुका चालविल्या. काकड्यांनीं ढालीवर (त्याचे) पुष्कळ (नेम) झेलले. (नंतर) त्यानें भाला मारला व ह्यानें गदा हाणली. जयसिंगाची कटचार आरपार (गेली).

१२–१३ बरछी, बिनोट (वगैरे) शस्त्रांचा मारा झाला. शेख इमामच्या (अंगांतून) शस्त्र (आर) पार गेले. (त्याची) दुर्दशा करून (त्याला) जमीनीवर पटकलें (तों तिकडे) काकडे ह्यानीं स्वर्गलोकीं प्रयाण केलें. * तुकोजीरावांनीं ही बातमी ऐकिली

* फाळके : शिंदेशाही इतिहासाचीं साधनें, भा. ४ ले. १२९.

गुजर : सं. दे. थो पा. पवार घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, ले. ३८७ व ३९३.

अशी अख्यायिका आहे कीं, ह्या चकमकींत शेख इमामच्या पोटांतून आरपार भाला निघाला असतांना तशाच स्थितींत तो देवासला आला व

दोहा

गयो दूत जैसिंग पै, अब तुम ठैरहु येम ।
तकूराव अब आवत है, कहो अब जावत केम ॥१४॥

तकूराव की सुनत ही, कोप्यो तब जैसिंग ।
पारख करहुँ पुँवार की, धवल मचावहुँ धींग ॥१५॥

छप्पय

बीरभद्र अजारि पै, चक्रव्यूह अभिमन्यु आयो ।
कंस उपर श्रीकृष्ण, लंक दाहिन कपि धायो ।

[त्याबरोबर तो राजा संतप्त होऊन [स्वतःच] शत्रूवर चाल करण्यास निघाला.

१४ [तुकोजीरावांचा दूत जयसिंगाकडे गेला [व म्हणाला] आतां तुम्हीं येथेंच थांबा. तुकोजीराव आतां येत आहेत. बोला [त्यांच्या भीतीनें] कोठें निघालात ?

१५ तुकोजीराव [येत असल्याचें] ऐकतांच जयसिंग तत्काळ संतापला [व] निकराची लढाई करून पवाराची परीक्षा पहातो [असें म्हणाला].

१६ दक्षावर वीरभद्र [किंवा] चक्रव्यूहांत अभिमन्यु क्रोधायमान

त्यानें लढाईची हकीगत आपल्या मालकास निवेदन केली. त्याच्या पोटांतील भाला बाहेर काढण्याची हिंमत कोणासही होईना तेव्हां त्यानें तो स्वतःच आपल्या हातानें खेंचून बाहेर काढला ! ह्यानंतर दोन तीन दिवसांनीं त्याचा अंत झाला.

रावण उपर श्रीराम, द्रोण पाँडव की सेना ।
छत्री पै रेणु-कुंअर, रति पति क्रोध त्रिनेना ।
तकुराव तेम कोप्यो तबै, सहस बाजि पर चढ़ि चल्यो ।
बावनी साथ बहु बीर ले, जैसिंग भूप तें जा मिल्यो ॥१६॥

दोहा

मृग झुंड ते चीत्यो मिल्यो, दीठे सिंह गज डाल ।
पड़्यो शिचाणा चिडियन पै, वाहि तेग बिकराल ॥१७॥

देखत जैसिंग सेन कू, कहत तकू इणबार ।
रण में पग पाछे धरे, लाजे गोत पुँवार ॥१८॥

होऊन [चालून गेले]. कंसावर श्रीकृष्ण [किंवा] लंकादहनासाठीं मारुती [रागानें] धांवून गेले. रावणावर श्रीराम, द्रोणावर पांडवांची सेना, क्षत्रियांवर रेणुका-पुत्र [परशुराम किंवा] रतिपति [मदना] वर त्रिनेत्र [धारी] क्रोध [भरित शंकर] त्याप्रमाणें [जयसिंगावर] तुकोजीराव त्यावेळीं क्रोधायमान होऊन एक हजार घोडदळासह चालून गेले. निवडक शूर योद्धे बरोबर घेऊन [त्यांनीं] जयसिंग राजास गांठलें.

१७ हरणांच्या कळपाला चित्ता भेटला [किंवा] हत्तींच्या झुंडीला सिंह दिसला [अथवा] पक्षांवर ससाण्याची [झडप] पडली [त्याप्रमाणें तुकोजीरावांची] विक्राळ तलवार [जयसिंगावर चालली].

१८ जयसिंगाची सेना [अफाट असलेली] पाहूनही [हिंमत

मनहरण

अरे जैसिंग खीची अब ठैर जात किते तू,
पौरुष पुँवार हूँ को जरा सो तू पेखले।
करि के किलकार बिकराल बावनी फौज,
मारि डाल्हूं पुहुमी पछारि सेना एकले।
किते गज बाज हणे कुरम्भ वीर काटे किते,
दाटे शत्रु सेना तक्कूराव हाथ देख ले।
बावनी बेहाल देख न्हाटो जैसिंग भुआल,
बचे हैं बिचारे सो तो भागि चले जीव ले ॥१९॥

खचूं न देतां] तुकोजीराव तेव्हां म्हणाले "लढाईंत पाय मागें घेतला तर पवारांच्या कुळाला लांच्छन लागेल" [अर्थात मी लढाईंत केव्हांही मागें पाय घेणार नाहीं] !

१९ "अरे जयसिंग खीची, थांब आतां तूं जातोस कोठें ? पवारांच्या पराक्रमाची थोडी तरी तूं परीक्षा पहा. [मी] एकटाच गर्जना करून [तुझी] अक्राळविक्राळ [अशी] शूर सेना जमिनीवर लोळवून ठार करतो. [मी आतांपर्यंत] कित्येक हत्ती, घोडे ठार केले, [व] कित्येक हत्तीप्रमाणें [धिप्पाड] वीर कांपून काढले." शत्रुसेनेला दटावून [ते] म्हणाले "आतां तुकोजीरावांचा हात पहा." [तुकोजीरावांच्या नुसत्या जबरेनेंच आपली] शूर सेना बेहाल झालेली पाहून जयसिंग राजा घाबरला. [त्याच्या सैन्यांतील जे] बापडे वांचले ते जीव घेऊन पळूं लागले !

दोहा

जैसिंग भाग्यो ले जीव, खबर न तन की खोज ।
तक्कूराव जीत्यो तुरत फते करी सब फौज ॥२०॥

दौलतराव कुँ खबर दी, सोवनकच्छ करि साय ।
टपे ग्राम पै सेन कटि, सो तकूजि करि साय ॥२१॥

दौलत नृप प्रसन्न भये, हिय में बंहु हर्षाय ।
प्रेम बढ्यो पूरण प्रबल, खरिता तुरत भिजाय ॥२२॥

२० जयसिंग जीव घेऊन पळाला. [त्याला] देह सांवरण्याची [सुद्धां] शुद्ध राहिली नव्हती. तुकोजीरावांनीं तेव्हांच जय मिळविला. [त्यांची] सर्व सेना विजयी झाली.

२१ दौलतरावांस बातमी कळविली [गेली कीं,तुकोजीरावांनीं] सोनकछ [वांचविण्यांत] सहाय्य [केलें.] तुकोजीरावांनीं मदत केली म्हणूनच टप्पे गांवीं [शत्रूची] सेना कांपतां आली.

२२ राजे दौलतराव प्रसन्न झाले. अंतःकरणांत [त्यांना] मोठा आनंद झाला. [ते व तुकोजीराव ह्यांच्यांत अगोदरच असलेलें] प्रेम पूर्ण दृढतेनें वृद्धिगत झालें [व त्यांनीं तुकोजीरावांस] लागलेंच [अभिनंदनपर] पत्र पाठविलें.

परिशिष्ट (अ)

वीर-गीतांचें विषय-विवरण

भाग १ व २

वीर-गीतांचें विषय-विवरण.

(भाग १)

१ पवार-वंश

ह्या वीर-गीताचा कर्ता कनिराम होय. त्यानें ह्या वीर-गीतांत पवार घराण्याच्या ५ पिढ्यांचा परिचय करून दिला आहे व तो परिचय करून देतांना आरंभीं म्हटलें आहे कीं, पवार हे पुरुरायाचें वंशज असून त्यांच्यांत पूर्वीं विक्रम, भर्तृहरि, मुंज, भोज, जगदेव आदि महान् प्रतापी, विद्वान्, दानी व भगवद्भक्त राजे होऊन गेले व ते माळव्यांत उज्जयिनी आणि धार राजधानींचे चक्रवर्ति राजे म्हणून गाजले. आजच्या समस्त मराठा पवार राजघराण्यांचे मूळ पुरुष साबूसिंह होत. ह्याच्या वेळीं माळव्यांत मोंगलांची सत्ता बरीच बळावली, त्यामुळें तिला प्रतिरोध करणें अशक्य झालें. तेव्हां साबूसिंहांनीं धार सोडून दक्षिणेंत प्रयाण केलें. तेथें श्रीशिवछत्रपतींनीं त्यांस आदरानें आपल्या पदरीं ठेवून घेतलें व सुपें गांव जहागीर दिलें. ह्यामुळें साबूसिंहांचें घराणें सुप्यास स्थिर झालें. तेव्हांपासून छत्रपतींच्या स्वराज्य-कार्यांत साबूसिंहांनीं व त्यांच्या वंशजांनीं उत्तरोत्तर अधिकाधिक पराक्रम गाजविला. त्यापैकीं पहिल्या चार पिढ्यांतील पुरुषांचा प्रस्तुत गीतांतील गुणविशिष्ट परिचय इतिहासज्ञांना मनोज्ञ वाटल्यावांचून राहणार नाहीं. कालानुक्रमानें हें वीर-गीत वास्तविक सर्वांच्या शेवटीं घ्यावयास पाहिजे होतें;

पण पुढील वीर-गीतांतील नायकांचा अगोदर परिचय करून देण्यास हें गीत उपयुक्त असल्यामुळें मुद्दाम त्यास येथें अग्रस्थान दिलेलें आहे.

---

२ साबूसिंह पवार यांचा कल्याणच्या लढाईंतील पराक्रम

ह्या वीर-गीताचा रचयिता पालाजी कवि होय. देवास दरबारच्या भाट घराण्याचा हा मूळ पुरुष असून साबूसिंह पवार यांचा तो समकालीन होता. इ. स. १६५७ च्या ऑक्टोबर-मध्यें कल्याणचा सुभेदार सुलेमान ह्याच्या सैन्याशीं शिवाजी महाराजांच्या सैन्यानें मोठ्या पराक्रमानें लढून त्यास पळावयास लाविलें व त्यांत साबूसिंहानीं आपलें उत्तम वीर्यतेज प्रकट केलें, ही हकीगत ह्या वीर-गीतांत बहारीनें वर्णिली आहे. अनेक शस्त्रांचीं नांवें ह्या गीतांत वाचकांना आढळतील.

---

३ पवारांची कर्नाटकांतील कामगिरी

ह्या वीर-गीताचा कर्ता पालाजीचा पुत्र ठाकुरसी होय. बुबाजी पवार ह्यांचा हा समकालीन होता. छत्रपति संभाजी महाराजांच्या वधानंतर मराठ्यांचें राज्य नेस्तनाबूत करण्याकरितां

मोंगलांनीं जंगजंग पछाडले त्यावेळीं छत्रपति राजाराम महा–राजांनीं स्वराज्यांतील राजनिष्ठ, मुत्सद्दी व पराक्रमी सरदारांना एकत्र केलें व प्रसंगानुसार कर्नाटकांत जाऊन अत्यंत मुत्सद्दीपणानें स्वराज्याची घडी पुनः बसविली. ह्या प्रसंगीं साबूसिंगांचें नातू बुबाजी, रायाजी व केरोजी ह्या त्रिवर्ग बंधूंनीं राजाराम महाराजांच्या आज्ञेनुरूप योग्य कामगिरी बजावली व आपल्या–विषयीं असलेला राजाराम महाराजांचा विश्वास व अपेक्षा सार्थ करून दाखवून बुबाजींनीं 'विश्वासराऊ' व केरोजींनीं 'सेनाबारासहस्री' हे यथार्थ मानाचें किताब विशेषेंकरून प्राप्त करून घेतले. ह्या एकंदर गोष्टीचें वर्णन प्रस्तुत वीर–गीतांत उत्तम प्रकारें करण्यांत आलेलें आहे. राजाराम महाराजांचें ह्या त्रिवर्ग बंधूंस अगत्यपूर्वक बोलावणें, त्यांच्या पिढीजात सेवेचें व छत्रपतींच्या त्यांच्यावर असलेल्या विश्वासाचें गौरव–पूर्वक उल्लेख करणें व त्यांनींही उलट 'आम्हीं जिवंत आहोत तोंपावेतों दक्षिण काबीज करण्याची कोणाची प्राज्ञा आहे ? दक्षिणेंत मराठ्यांचाच विजयदुंदुभि सदोदित वाजत राहील, यासाठीं प्रसंग पडल्यास शत्रूचे घांव खुशाल आम्हीं छातीवर झेलूं' अशा आशयाचे वीरोद्गार काढणें वगैरेबद्दलचें ह्या गीतांतील वर्णन अत्यंत सरस आहे. एकदां मोंगलांची रसद लुटतांना संताजी घोरपडे शत्रूकडून घेरला गेला त्यावेळीं बुबाजींनीं धांवून जाऊन त्यास सोडवून आणल्याचाही एक प्रसंग ह्या गीतांत निवेदिलेला आहे.

४ बुबाजी पवार यांचा पराक्रम

(१)

हेंही वीर–गीत ठाकुरसीनेंच रचिलेलें आहे. बुबाजी पवारांचे वडील कृष्णाजी ह्यांची हकीगत प्रारंभीं देऊन नंतर त्यांच्या बुबाजी, रायाजी व केरोजी ह्या त्रिवर्ग पुत्रांनीं कर्नाटकांत व खानदेशांत ज्या लढाया मारल्या त्याचें वर्णन केलें आहे. छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत बुबाजींनीं खानदेशांत पुष्कळ पराक्रम गाजविला व तेथील एका लढाईंत ते मोंगलांच्या हातीं सांपडलें तेव्हां मोंगलांनीं त्यांस 'दक्षिणचा दरवाजा' म्हणून इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या आशिरगडावर नेऊन तेथें भिंतींत जिवंत चिणून ठार मारलें. ही घटना इ. स. १६९९ च्या सुमारची होय. स्वतः ठाकुरसीचा बुबाजींनीं बराच सत्कार केला होता, हें ह्या गीताच्या शेवटच्या दोह्यांत निर्देशिलेलें आहे.

---

५ बुबाजी पवार यांचा पराक्रम

(२)

हेंही वीर–गीत ठाकुरसीचेंच होय. ह्यांत त्यानें बुबाजी पवार ह्यांचें यशोगान मुख्यतः गाइलें आहे. औरंगजेबानें दक्षिण देश पादाक्रांत करण्याकरितां पुष्कळ लढाया केल्या; परंतु पवारांनीं पेंडभरही जमीन त्यास मिळूं दिली नाहीं व त्याच्या फौजा परतवून लावल्या, असें पवारांच्या मातबर बहाद्दरीच्या वर्णनानें ह्या

वीर–गीताला सुरवात केलेली आहे. संताजी घोरपडयांच्या सांगण्याप्रमाणें छत्रपति संभाजी महाराजांच्या वधानंतर मोंगल फौजांस हैराण करून सोडण्यासाठीं मराठी फौजा गोदापार लढत होत्या, त्यांत बुबाजी, रायाजी व केरोजी हे त्रिवर्ग बंधु, परसोजी भोसले, धनाजी जाधव ही सर्व संताजीच्या बरोबरची मंडळी प्रामुख्यानें होती. बुबाजी पवार ह्यांनीं वऱ्हाड–खानदेशांत आपला विलक्षण जरब बसविला होता, त्यामुळें मोंगल त्यांच्यावर चिडून होते. एका लढाईंत बुबाजी मोंगलाच्या हातीं सांपडले तेव्हां त्यांस आशिरगडावर नेऊन तेथें त्यांस भिंतींत जीवंत चिणून ठार मारलें व अशा रीतीनें त्यांचा त्यांनीं पुरता सूड उगविला; परंतु त्यांनीं आपलें वीराचें ब्रीद सोडलें नाहीं ! ठाकुरसीनें ह्या वीर–गीताच्या शेवटीं आपल्या धन्याचे हें आत्मोत्सर्गाचें केलेलें वर्णन हृदयस्पर्शी आहे.

---

६ काळोजी पवार यांचें यशोवर्णन

हें वीर–गीत जेवढें मिळालें तेवढें येथें दिलेलें आहे. त्यांत त्याच्या कर्त्याचें नांव कोठेंही आलेलें नाहीं. कदाचित् कर्त्याला ह्या गीताचा शेवट करावयाचा राहिला असावा; तथापि एकंदर गीताची भाषा व वर्णनशैली ह्यांवरून हें गीत ठाकुरसीचा निपणतु कनिराम ह्यानें रचिलें असावें, असें वाटतें. ह्या गीतांत बुबाजी पवारांचे ज्येष्ठ पुत्र काळोजी पवार यांचें यशोवर्णन कवीनें केलेलें आहे. वऱ्हाडांत काळोजींनीं अनेक लढायांत मोंग-

लांच्या फौजांचा पराभव केला. तेथें त्यांचे कनिष्ठ बंधु संभाजी पवार ह्यांनींहीं उत्तम पराक्रम गाजविला. पुढें काळोजींनीं संभाजी पवारांचे ज्येष्ठ पुत्र उदाजी पवार ह्यांच्यासह नर्मदा घाट उतरून नालछाच्या वाटेनें मांडवगडावर हल्ला केला व तेथील बादशाही सुभेदार शाहदुल्ला अब्दुल्लाखान ह्यास पराभूत करून तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा फडकावून दिला. काळोजींच्या ह्या प्रखर पराक्रमाबद्दल छत्रपति शाहू महाराजांनीं त्यांस स्वतंत्र पथक राखण्याचा सन्मान दिला. अशी हकीगत ह्या वीर-गीतांत कवीनें निवेदन करून गीताचा शेवट काळोजींच्या कीर्तीच्या अत्यंत सरस उपमाभरित भाषेंतील वर्णनानें केलेला आहे.

७ छत्रपति शाहू महाराजांचें सेना-वर्णन.

हें वीर-गीत ठाकुरसीचा पुत्र भावसिंग ह्यानें रचिलेलें आहे. ह्यांत केवळ छत्रपति शाहू महाराजांच्या, त्यांच्या रणशूर सेनानींच्या व बहाद्दर फौजेच्या प्रतापाचें सामान्य वर्णन आहे. ह्या गीताचें वृत्त कोणतें हें कळत नसून त्याच्या पांचव्या ओळींत आलेल्या ‘बाणेतरावा’ विषयींही कांहीं माहिती मिळत नाहीं.

(भाग २ रा)

१ जरीपटका

संस्थान देवास थोरल्या पातीच्या पवार राजघराण्याचे मूळपुरुष पहिले तुकोजीराव पवार ह्यांनीं इ. स. १७२९ पर्यंत गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यांस छत्रपति शाहू महाराजांकडून जरीपटका, चौघडा व इतर आणखीही बहुमान प्राप्त झाले त्याचें वर्णन ह्या वीर-गीतांत नरु कवीनें केलेलें आहे. ह्याच्या प्राक्कथनांत परमार घराण्यांतील विक्रम, भर्तृहरि, भोज, जगदेव आदि पुरुषांचे गुणानुवाद गातांना सुरुवातीसच ह्या घराण्याला सूर्यवंशी असें म्हटलेलें आहे. गीताच्या विषयाला खरा आरंभ इ. स. १७२६ मधील मराठ्यांच्या माळव्यावरील स्वारीपासून करण्यांत आला आहे. ह्या स्वारींत पवार मंडळीनें बराच पुढाकार घेतला होता. माळव्याचा मोंगल सुभेदार गिरिधर-बहादर ह्याच्या सैन्याबरोबर पवारांची सारंगपुर येथें मोठी लढाई झाली. तींत पवारांचा विजय होऊन सारंगपुरवर खंडणी निश्चित केली गेली. ह्याच वेळीं इतर मराठे सरदारांनींही माळव्यांत निरनिराळ्या ठिकाणीं बादशाही फौजांबरोबर लढून विजय मिळविले. शेवटीं तुकोजीराव पवार हे एकटेच मागें राहून बाकीची पवार मंडळी व सर्व मराठे सरदार दक्षिणेंत परत गेले. नंतर तुकोजीरावांनीं खंडणी वसूल करण्यासाठीं कोटाकडे मोर्चा वळविला, तों मार्गांत चंदेल्याशीं गांठ पडून निकराची लढाई झाली. तींत तुकोजीरावांनीं चंदेल्याचा पराभव केला आणि हत्ती, घोडे व इतर वस्तूंबरोबर त्याचीं जरीपटका, चौघडा आदि

राजचिन्हेंही लुटून घेतलीं. ह्यावेळीं तुकोजीरावांच्या मदती-साठीं पेशव्यांनीं यशवंतराव पवारांस पाठविलें होतें. त्यांच्याबरोबर ती सर्व लूट तुकोजीरावांनीं छत्रपतींना नजर करण्यासाठीं सातान्यास पाठवून दिली.

इ. स. १७२९ मध्यें पेशव्यांबरोबर तुकोजीराव पवार हे राजा छत्रसालाच्या सहाय्यार्थ बुंदेलखंडांत गेले. तेथें विजयी झाल्यावर सर्व मराठे सरदारांना छत्रसालानें भेटींत अनेक वस्तु दिल्या. त्यांत तुकोजीरावांना एक हत्ती मिळाला.

बुंदेलखंडांतून मराठ्यांची फौज परत आल्यावर इ. स. १७३१ च्या सुमारास छत्रपति शाहू महाराजांनीं बाबुराव राम अत्रे ह्यांस तुकोजीरावांकडे पाठवून त्यांस सातान्यास बोलावून आणलें आणि त्यांच्या पराक्रमाची प्रशंसा करित त्यांस जरीपटका, चौघडा, जहागीर व अन्य मानमरातब देऊन त्यांचा योग्य सत्कार केला. ह्याच वेळीं तुकोजीरावांची पत्नी सावित्रीबाई ह्यांनाही बहीण मानून छत्रपतींनीं त्यांस चोळी-बांगडीसाठीं जहागीर दिली.

नरु कवीची वाणी वीररसप्रधान आहे. तिची चुणूक ह्या वीर-गीतांत वाचकांना ठिकठिकाणीं आढळून येईल.

विशिष्ट व्यक्ति-परिचय

कालू [पद्यांक ९]–काळोजी पवार, विश्वासराऊ. संस्थान देवास थोरल्या पतीचे संस्थापक प्रथम तुकोजीराव पवार सेनासप्त-सहस्री, ह्यांचे वडील व सुप्याच्या पवार 'विश्वासराऊ'

घराण्यांतील बुबाजी पवारांचे ज्येष्ठ पुत्र. माळव्यांतील व खानदेशांतील मराठ्यांच्या सुरुवातीच्या स्वाऱ्यांत इतर मोठमोठ्या सरदारांबरोबर हेही होते. देवासला प्रथम पदार्पण करणारे पवार घराण्यांतील हेच मुख्य पुरुष होत, असें म्हणतात.

संभ [पद्यांक ९]–संभाजी पवार. हे काळोजी पवार ह्यांचे सहोदर कनिष्ठ बंधु व उदाजीराव (मलठणकर), आनंदराव (धारकर), आणि जगदेवराव (चितेगांवकर) ह्यांचे तीर्थरूप होत.

आनंद [पद्यांक १०]– संभाजी पवारांचे पुत्र. धार राज्याचे संस्थापक.

बाबुराव [पद्यांक २९]–बाबुराव राम अत्रे. देवास थोरल्या पातीचे सरदार शंकरराव रामराव अत्रे ह्यांचे पूर्वज.

---

२ पालखेड–संग्राम

प्रस्तुर वीर–गीतांत, निजाम व मराठे ह्यांच्यामध्यें दक्षिणेंतील चौथवसूलीच्या व स्वसत्तावृद्धीच्या बाबतींत इ. स. १७२८ मध्यें जो मोठा रणसंग्राम झाला, त्याचें वर्णन नरू कवीनें केलेलें आहे. ह्या संग्रामांत मराठ्यांनीं अगोदर निजामास सामिल होणारे कोल्हापुरचे संभाजी महाराज व चंद्रसेन जाधव ह्यांचा मोड केला व नंतर निजामाचे सरदार कुंवरबहादर व ऐवजखान ह्यांना हरवून स्वतः निजामाला पालखेडच्या रणभूमीवर दांती तृण धरून शरण यावयास लाविलें ! तुकोजीराव पवार, कृष्णाजीराव पवार विश्वासराऊ (सुपें) व मालोजी पवार (वाघाळें) ह्यांनीं सदर युद्धांत उत्तम शौर्य गाजविलें, तेव्हां बाजीराव पेशव्यांनीं खुष होऊन तुकोजीरावांच्या शौर्याची प्रशंसा

केली. नरु कवीची वीररसपरिप्लुत वाणी ह्या गीतांत वर्ण्य विषयाशीं ठिकठिकाणीं तादात्म्य पावलेली वाचकांस आढळून येईल.

विशिष्ट व्यक्ति-परिचय

मालूजी पुंवार [पद्यांक १३] – वाघाळच्याच्या रायाजी पवारांचे पुत्र व काळोजी पवार ह्यांचे सख्खे चुलत बंधु.

---

३ बुंदेलखंड–संग्राम

अलाहाबादचा मोंगल सुभेदार महंमदखान बंगष ह्यानें इ. स. १७२९ मध्यें बुंदेलखंडावर स्वारी केली असतांना तेथील वयोवृद्ध राजा छत्रसाल ह्यानें आपणांस ह्या संकटांतून सोडविण्यासाठीं बाजीराव पेशवे ह्यांस कांकुळतीनें विनंति केली, म्हणून बाजीराव एकदम बुंदेलखंडांत धांऊन गेले. त्यावेळीं बाजीरावांच्या बोलण्यावरून तुकोजीराव पवारही आपल्या पथकानिशीं त्यांच्याबरोबर गेले होते. लढाईंत मराठ्यांनीं बंगषाची चांगली रग जिरविली व त्यास पळावयास लाविलें. त्यामुळें छत्रसालावरील संकट टळलें. ह्या लढाईंत तुकोजीरावांनीं उत्तम पराक्रम गाजविला. आनंदित झालेल्या छत्रसालानें बाजीरावांना व त्यांच्याबरोबर असलेल्या मराठे सरदारांना देणग्या व भेटी देऊन सर्वांचा यथोचित गौरव केला. त्यांत तुकोजीरावांचाही गौरव करण्यांत येऊन त्यांस एक सुंदर हत्ती भेट म्हणून मिळाला. सदर प्रसंग नरू कवीनें ह्या वीर-गीतांत यथार्थ रीतीनें वर्णिलेला आहे.

---

४ दिल्लीवर स्वारी

इ. स. १७३७ मध्यें मराठ्यांची फौज उत्तर हिंदुस्थानांत खंडणी वसुलीसाठीं निघाली. आग्रा जिंकण्याच्या हेतूनें तिनें प्रथम दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां बादशहाच्या मदतीसाठीं अयोद्धेचा वजीर सादतखान, दिल्लीचा वजीर कमरुद्दीन, शाही तोपखान्यावरील सर सेनापति साहउद्दीन, सरदार मीर हुसेन कोका, जयपूरचा राजा सवाई जयसिंग, मारवाडचा अभयसिंग वगैरे शूर योद्धे धांऊन आले; परंतु मराठ्यांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं ! दिल्लीजवळ असलेल्या झील तलावाच्याकांठीं मराठ्यांचा तळ पडला होता. तेथें एके दिवशीं पहांटेच वजीर कमरुद्दिनानें अचानक हल्ला केला, तरीही मराठे घाबरले नाहींत. त्यांनीं लागलेच सज्ज होऊन शत्रूस चांगला हात दाखविला ! ह्या चकमकींत तुकोजीरावांनीं खूबच तलवार गाजविली म्हणून त्याबद्दल त्यांस एक हत्ती बक्षिस मिळाला. ह्या घटनेचें वर्णन सदर वीर-गीतांत नरू कवीनें चांगलें केलें आहे. तोटक छंदांत लढाईचें चित्र रंगविण्यामध्यें नरूचा अगदीं हातखंडा होता, ही गोष्ट 'पालखेड–संग्रामा' प्रमाणेंच ह्या वीर–गीतांतीलही १७ ते २५ पावेतोंच्या पद्यांवरून कोणासही सहज कळून येईल. ह्या वीर–गीताच्या २६ व्या पद्यांत ' भयभीत होऊन दिल्लीपति बादशहा पळून गेला ' असें म्हटलें आहे; परंतु वास्तविक बादशहा कोठेंही पळून गेलेला नाहीं. त्याची फौज लढाईंतून पळून गेली, असाच अर्थ येथें अभिप्रेत आहे. थोरांच्या नांवावर संकेतार्थी लिहिण्याचा जो कविसंप्रदाय आहे त्याचेंच पालन नरूनें येथें केलेलें आहे, हें सांगावयास नकोच.

विशिष्ट व्यक्ति-परिचय

पटवेश्वर गोविंदराव [पद्यांक ४]- गोविंदराव पटवर्धन. मिरज [सीनियर व ज्यूनियर] येथील राजघराण्यांचे मूळ पुरुष.

जिवाजी [पद्यांक ५]-प्रथम तुकोजीराव पवार ह्यांचे सख्खे धाकटे बंधु व देवास [धाकटी पाती] राजघराण्याचे मूळ पुरुष.

---

५ व ६ वसई संग्राम

वसई प्रांतांत फिरंग्यांनीं धर्माच्या बाबतींत मनस्वी जुलूम करून हिंदूंना अतिशय छळले. तेव्हां मराठ्यांनीं आपल्या धर्मबांधवांकरितां चिमाजीअप्पांच्या नेतृत्वाखालीं फिरंग्यांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला. मोठ्या तुमुल युद्धाचे व निकराच्या हल्ल्यांचे अनेक प्रसंग मराठ्यांच्या इतिहासांत आहेत; पण त्या सर्वांत वसईचा रण-संग्राम अद्वितीय होय ! ह्या संग्रामांत शत्रूकडून हुक्के, गरनाळा व रेजगिरी ह्यांच्याद्वारें ठिकठिकाणीं ओतली जाणारी भयंकर आग अक्षरशः पिऊन मराठ्यांनीं 'अग्निदिव्य' केलें व अपरंपार रणोत्साहानें 'एल्गार' यशस्वी करून दाखविला! फिरंग्यांचीं ठाणें, माहीम, अशेरी, धारावी, तारापूर वगैरे ठिकाणें जिंकीत शेवटीं मराठ्यांनीं वसई फत्ते केली व आपली ही सुविख्यात मोहीम शेवटास नेली ! ह्या मोहिमेचें वर्णन प्रस्तुत वीर-गीतांत करण्यांत आलें आहे. तुकोजीराव पवार ह्या मोहिमेंत अव्वलपासून अखेरपर्यंत होते ता. २४ जानेवारी १७३९ रोजीं मराठ्यांनीं तारापुर किल्ल्यावर जोराचा हल्ला केला. त्या प्रसंगीं

तुकोजीरावांनीं पुढाकार घेऊन अतुल वीर्यतेज प्रकट केलें! त्यांनीं किल्ल्याच्या तटाला सुरुंग लावून तट पार उडवून दिला, त्यामुळें पहिल्या हल्ल्यासरशींच किल्ला एकदम सर झाला. ह्या यशाचें श्रेय वास्तविक तुकोजीरावांनाच होतें! धारावी व वसई येथील किल्ले जिंकतांनाही तुकोजीरावांनीं अद्‌भुत रणकौशल्य प्रगट केलें होतें. फिरंग्यांशीं झालेल्या ह्या संग्रामाविषयींच्या मराठ्यांच्या पत्रव्यवहारांत तुकोजीरावांच्या पराक्रमाचें वर्णन बरेच ठिकाणीं आढळतें.

फिरंग्यांवरील मोहीम फत्ते करून मराठ्यांची सेना विजयानंदानें परत आली, तेव्हां छत्रपति शाहू महाराजांनीं त्या सेनेचें थाटानें स्वागत केलें. ह्याचवेळीं शाहू महाराजांनीं तुकोजीरावांच्या शौर्यावर खुष होऊन त्यांस 'सेनासप्तसहस्त्री' ही पदवी बहाल केली.

नरू कवीनें, ह्या मोहिमेचें वर्णन व त्यांत आपल्या मालकानें (तुकोजीरावांनीं) गाजविलेल्या पराक्रमाची विशेष हकीगत ह्या वीर-गीतांत सुंदर रीतीनें देऊन उपमालंकारांनीं रसाची उठावणी उत्तम रीतीनें केलेली आहे. ह्या वीर-गीताचा एक आणखीही विशेष इतिहासज्ञांस आढळून येण्यासारखा आहे, तो म्हणजे सदर गीतांतील ओळन् ओळ इतिहासाच्या बारीक सारीक माहितीनें भरलेली आहे, हा होय! रसानुकूल भरदार भाषा, पराक्रमाचा उत्कर्ष दाखविणारे प्रसंग व इत्थंभूत इतिहास सांगणारें वर्णन ह्यामुळें नरू कवीचें हें वीर–गीत एक उत्कृष्ट ऐतिहासिक काव्य म्हणून सर्वथा मानतां येण्यासारखें आहे!

विशिष्ट व्यक्ति–परिचय

रामचंद्र पटवर्धन [पद्यांक ५]– गोविंदराव पटवर्धनांचे ज्येष्ठ बंधु व जमखिंडीच्या राजघराण्याचे मूळ पुरुष.

खण्डु मानकर [पद्यांक ५]– खंडोजी माणकर. कोंकणचा सुभेदार.

वाघवजी खानविलकर [पद्यांक ५]– कोंकण व गोंवा प्रांतांतील एक मराठा अधिकारी.

बीवलकर [पद्यांक ५]– रामाजी महादेव बिवलकर. साष्टी–कल्याणचे सुभेदार.

चिमना भीम्रराव [पद्यांक ६]- चिमणाजी भिवराव रेटरेकर. पेशव्यांचे सरदार.

बाजीराव [पद्यांक १६]– बाजी भिवराव रेटरेकर. पेशव्यांचे ऋणानुबंधी सरदार. चिमणाजी भिवरावाचे हे ज्येष्ठ बंधु. बाजी भिवराव तारापुरच्या वेढयांत ठार झाले तेव्हां त्यांच्या मातुश्रीस व बंधूस बाजीराव पेशव्यांनी लिहिलेलीं पत्रें त्यांच्या ऋणानुबंधाची उत्तम साक्ष देणारीं आहेत.

---

७ 'सेनासप्तसहस्री'

हें स्फुट लघु वीर-गीत आहे. पालखेड, बुंदेलखंड, दिल्ली, वसई आदि ठिकाणच्या संग्रामांत पहिले तुकोजीराव पवार ह्यांनीं अपूर्व पराक्रम गाजविल्यामुळें छत्रपति शाहू महाराजांनीं प्रसन्न

होऊन त्यांस इ. स. १७३९ च्या सुमारास 'सेनासप्तसहस्री' ह्या पदवीनें विभूषित केलें, ही गोष्ट स्वामिभक्त नरु कवीला समजतांच त्यास आनंद होऊन त्या आनंदाच्या भरांत त्यानें हें वीर-गीत रचिलेलें आहे, हें गीताच्या अंतिम दोह्यांत त्यानें स्वतःच स्पष्टपणें निर्दिष्ट केलें आहे.

---

८ मेडता-संग्राम

हें वीर-गीत नरु कवीच्या रचनाकौशल्याचें उत्तम परिचायक होय. ह्यांत त्यानें आपले स्वामी पहिले तुकोजीराव पवार ह्यांच्या आकस्मिक स्वर्गारोहणाचें वर्णन अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत केलेलें आहे. मारवाडच्या राजसिंहासनासाठीं रामसिंह आणि बिजेसिंह ह्या दोघांत कलह उत्पन्न झाला. तेव्हां रामसिंहानें मराठ्यांची मदत घेतली व मेडता येथें बिजेसिंहावर स्वारी केली. लढाईंत बिजेसिंहाचा पराभव झाला तेव्हां तो तेथून नागोरकडे पळून गेला. ही गोष्ट इ. स. १७५४ मध्यें घडली. या लढाईंत तुकोजीरावांनीं चांगलें शौर्य गाजविलें. बिजेसिंहानें पळ काढतांच मराठ्यांची सेनाही त्याचा पाठलाग करीत नागोर-कडे निघाली. मार्गांत तुकोजीरावांची प्रकृति बिघडली, तरीही जीवाची पर्वा न बाळगतां त्यांनीं रणांगणाला पाठ दिली नाहीं! ते आपलें वीरोचित कर्तव्य बजावितच राहिलें. त्यामुळें लौकरच त्यांच्या प्रकृतीचें मान विकोपास जाऊं लागलें. हें पाहून त्यांची फौज घाबरूं लागली. तेव्हां त्यांनीं घाबरलेल्या आपल्या फौजेला

शांतपणें धीर देऊन क्षात्रधर्मांचा सदुपदेश केला आणि शेवटीं लढतांलढतांच रणांगणावर मोक्ष मिळविला! हा हृदयस्पर्शी प्रसंग व तत्संभूत असे, त्यांचे कनिष्ठ बंधु जिवाजीराव पवार यांचा करुणालाप आणि शिंदे व छत्रपति ह्यांचें दुःखप्रदर्शन वगैरेचें वर्णन या वीर-गीतांत इतकें यथोचित केलेलें आहे कीं, तें वाचून किंवा ऐकून अंतःकरण गग्ददल्याशिवाय रहात नाहीं! समर्पक उपमालंकार योजून गीतें प्रभावान्वित करण्यांत नरूचें बुद्धिचातुर्य उत्तम रीतीनें व्यक्त होतें. याही गीतांत तें तसें व्यक्त होत आहे. मात्र या गीताच्या ३९ व्या पद्यांत 'भरता-प्रमाणें (एकाकी) घरीं जाऊन माझ्या बंधूची हकीगत मी कशी सांगू?' असें म्हटलें आहे, तेथें उपमा चुकली आहे. कारण भरतावर बंधुनिधनवार्ता ऐकविण्याचा प्रसंग आलेला नव्हता अस्तु. वर्णनौघांत सावधानता सुटून नरूच्या हातून हा दोष सहज घडून आलेला दिसतो. प्रसंगवर्णनांतही एक ऐतिहासिक दोष असाच नजरेस पडतो. पद्यांक ४ मध्यें कुंभेरीस खंडणी वसूल केल्याची हकीगत देऊन पुढें लागलेंच जोधपुरकडे अर्थात् मारवाडकडे मराठे निघाले असल्याचें म्हटलें आहे, परंतु कुंभेरीस खंडणी वसूली इ. स. १७५४ ज्या जानेवारींत होऊन त्यानंतर सुमारें ६ महिन्यांनीं मारवाडांत मराठ्यांचा प्रवेश झालेला आहे.

विशिष्ट व्यक्ति- परिचय

आऊवा, आसोप, पोखरन, निमाज [पद्यांक ९]- मारवा-डांतील प्रतिष्ठित जहागीरदार.

९ पत्थरगड–संग्राम

ह्या वीर-गीतांत मराठ्यांनीं इ. स. १७७२ मध्यें नजीबगड ऊर्फ पत्थरगड किल्ल्यावर केलेल्या स्वारीचें वर्णन थोडक्यांत नरु कवीनें केलेलें आहे. रोहिल्यांचा सरदार नजीबखान हा मराठ्यांचा मोठा शत्रु. पानिपतच्या युद्धाला हाच वास्तविक कारणीभूत झाला होता व ह्यानेंच पुढें निर्दयपणानें पानिपताहून मराठ्यांची बायकापोरें व संपत्ति लुटून आणून आपल्या नजीबगड किल्ल्यांत मोठ्या बंदोबस्तानें ठेविलीं होतीं. ह्या गोष्टीचा सुगावा बाबुराव राम अत्रे यांनीं युक्तीनें लाविला. त्यावेळीं नजीबखान मरण पावला होता व त्याचा मुलगा झावतेखान हा नजीबगडचा स्वामी होता. म्हणून मराठ्यांनीं झाबतेखानाशीं युद्ध आरंभिलें. झाबतेखान हा शुक्रताल किल्ल्यांत रहात होता. यासाठीं मराठ्यांनीं अगोदर शुक्रताल किल्ल्यावरच हल्ला केला व किल्ला तोडला त्यामुळें घाबरून जाऊन झाबतेखान तेथून पळून गेला व मजबूत अशा आपल्या नजीबगड किल्ल्यांतच सरळ येऊन लपला. मराठ्यांनीं लागलेंच त्याही किल्ल्यावर हल्ला करून तो किल्ला सर केला, तेव्हां झाबतेखान शरण आला. मराठ्यांनीं त्या किल्ल्यांतील आपलीं बायकापोरें व सर्व संपत्ति परत मिळवून नजीबखानाचा सूड उगविल्याचें समाधान मानण्यासाठीं किल्ल्यांतील त्याचें थडगें नेस्तनाबूत केलें व किल्ल्याचें नजीबगड हें नांवही बदलून पत्थरगड असें नवें नांव ठेविलें ! या संग्रामांत प्रथम कृष्णाजीराव पवार, सेनासप्तसहस्री, हे उपस्थित होते व त्यांनीं त्यांत चांगला पराक्रम गाजविला. नरु कवीनें हें वीर-गीत

अगदीं साधें, कथनपर रचिलेलें आहे त्यामुळें त्याचे सर्व काव्यगुण यांत प्रकट होऊं शकले नाहींत.

---

१० सिप्री-सिरोंज-संग्राम

हें वीर-गीत नरू कवीचा पुत्र दीपाजी ह्यानें रचिलेलें आहे. इ. स. १७८१ च्या मार्चमध्यें इंग्रजांनीं चंदेरीच्या वाटेवर पाटील बाबा महादजी शिंदे यांच्या फौजेवर अचानक हल्ला करून त्यांचें निशाण व हत्ती, घोडे, तोफा वगैरे सर्व हिरावून घेतले, त्यामुळें सर्व मराठे सरदारांच्या फौजांत एकदम क्षोभ उत्पन्न झाला. तसेंच यावेळीं इंग्रजांची वाढती सत्ताही न खपून उत्तर हिंदुस्थानांतील दिल्लीचा बादशाह शहाअलम, काशीचा राजा चेतसिंग, अयोध्येचा वजीर असफउद्दौला वगैरे मंडळी आणि दक्षिणेंतील म्हैसूरचा हैदरअल्ली या सर्वांनीं इंग्रजांवर एकदम उठून त्यांचा पुरता पाडाव करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष घटनाही घडवून आणून इंग्रजांस शेवटीं तहाचें बोलणें करावयास भाग पाडलें. दीपाजीनें याच प्रसंगावर प्रस्तुत वीर-गीताची उभारणी केली असून त्यांत सिप्री-सिरोंज-जवळ मराठ्यांच्या फौजेनें इंग्रजांशीं निकरानें लढून जो विजय मिळविला त्याचें अधिक वर्णन केलें आहे. कारण या लढाईंत प्रथम कृष्णाजीराव पवार यांनीं उत्तम पराक्रम गाजवून नांव मिळविलें असल्यामुळें साहजिकच दीपाजीला हा प्रसंग स्फूर्ति-दायक झाला. या गीतांतील वर्णनावरून दीपाजीही या युद्धाच्या

वेळीं प्रत्यक्ष हजर होता असें दिसतें व गीताच्या शेवटच्या दोन दोह्यांत त्यानें तसा स्पष्ट खुलासाही केला आहे. दीपाजीच्या या रचनेकडे पाहतां त्याच्या ठिकाणीं आपल्या वडिलाप्रमाणेंच उत्तम कवित्वशक्ति वास करीत असल्याचें दिसून येतें.

विशिष्ट व्यक्ति–परिचय

ढोंढे बलवन्तराव (पद्यांक ३)–बळवंतराव धोंडदेव नायगांवकर. पेशव्यांचा सरदार.

---

११ मेरठ–संग्राम

इ. स. १७८८–८९ मध्यें दिल्लीचा बादशहा शहाअलम व त्याच्या बेगमा आणि शहाजादे यांचा अनन्वित छळ करणाऱ्या गुलामकादराला मराठ्यांनीं पकडून प्राणदंड दिला, त्याचें वर्णन प्रस्तुत वीर-गीतांत केलेलें आहे. प्राण वांचविण्याकरितां घोसगडाकडे पळत सुटलेल्या गुलामकादरास, त्याचे साथीदार मणियारसिंग, नबाब नाझर व कारभारी विलासराय यांच्यासह, अलिबहादर, कृष्णाजीराव पवार सेनासप्तसहस्री व राणेखानभाई यांनीं सारखा पाठलाग करून शामली नामक गांवाजवळ एका ब्राम्हणाच्या झोंपडींत पकडले आणि त्या सर्वांस मथुरेस महादजी शिंद्याकडे पाठवून दिलें. या प्रसंगीं कृष्णाजीरावांनीं उत्तम साहस व शौर्य दाखविल्यामुळें प्रसन्न होऊन बादशहानें त्यांस भरजरी पोषाख व तलवार देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. तसेंच शिंद्यांना

'अलिजाहबहादर'ची पदवीही याच वेळीं बादशहानें दिली, असें या वीर-गीतांत वर्णिलें आहे. नरु कवीच्या आजपर्यंतच्या उपलब्ध गीतांतील हें शेवटलें वीर-गीत होय. वीररसाला योग्य उठावणी देणारा असा प्रसंग व त्यांत आपल्या मालकानें [कृष्णाजीरावांनीं] पराक्रम गाजवून बादशहाकडून मिळविलेला अपूर्व बहुमान, यामुळें साहजिकच आनंदाभिमानें प्रफुल्लित झालेली नरू कवीची परिपक्व रसवंती या वीर-गीतांतून पूर्णाविर्भूत झालेली दिसून येते. यांतील मराठ्यांच्या 'चतुरंगिनी'चें व तिनें गुलामकादराशीं केलेल्या झटापटीचें वर्णन वाचतांना कोणीही वाचक मुग्ध झाल्यावांचून राहणार नाहीं! या गीताच्याशेवटीं २ ऱ्या पद्यांत बहाद्दर शिंदे तयार होऊन दळ-भारासह लढाईसाठीं निघाले असें म्हटलें आहे; परंतु इतिहास असा आहे कीं, गुलामकादराचें सबंध प्रकरण आटोपेपावेतों महादजी स्वतः मथुरेसच मुक्काम करून होते. तेव्हां या गीतांत महादजींच्या हालचालीचें जेथें वर्णन आहे तेथें तें त्यांच्या फौजेसंबंधींचें आहे, असें समजावें. पूर्वीं पालखेड-संग्रामांत पद्यांक २५ मध्यें निजाम व पेशवे यांच्यांत लढाई जुंपल्याचें म्हटलें आहे; परंतु तेथें प्रत्यक्ष निजाम व पेशवे हे लढले अस-ल्याचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसून त्यांच्या फौजा लढल्या असा अर्थ घ्यावयाचा आहे, तसाच अर्थ वर उल्लेखिल्याप्रमाणें येथेंही घ्यावयाचा आहे. या गीतांत पद्यांक २७ मध्यें गुलामकादरास गळ्यांत धनुष्य अडकवून झोंपडींतून बाहेर ओढून काढल्याचें म्हटलें आहे. शत्रूस अशा प्रकारें गळ्यांत धनुष्य अडकवून ओढून

काढण्याची युक्ति पूर्वीपासून महशूर होती. 'पृथ्वीराजरासा' ग्रंथांतही खालीलप्रमाणें तशा प्रकारचें वर्णन आढळतें:–

गर गत्ती कंमान, लियौ गौरीय उच्छंग्गिय ।

विशिष्ट व्यक्ति–परिचय

सिवाजी विठ्ठल [पद्यांक २]– विठ्ठल शिवदेव दाणी. विंचूरकरांचे ज्येष्ठ पुत्र.

भगवंतराव पुंवार [पद्यांक २]– देवास थोरल्या पातीचे सरदार शंकरराव अप्पासाहेब पवार यांचे पूर्वज.

महिपत बाजीराव [पद्यांक २]– देवास थोरल्या पातीच्या जुन्या अत्रे दिवाण घराण्यांतील पुरुष. द्वितीय तुकोजीराव पवार, सेनासप्तहस्री, यांच्या कारकीर्दींत हे दिवाण होते.

---

१२ खरडा–संग्राम

इ. स. १७९५ मध्यें मराठ्यांनीं निजाम व त्याचा दिवाण मुश्रुल्मुल्क ह्यांचा गर्व जिरविण्याच्या हेतूनें लढाई पुकारली. या लढाईंत देवास थोरल्या पातीचे द्वितीय तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्री, हे अवघे १२ वर्षांचें असतांही जातीनें हजर होते ! नरू कवीचा नातु कान्हा (कनिराम) ह्यानें या लढाईचें व बाळ तुकोजीरावांच्या कुतुहलपूर्ण वीरत्वाचें उठावदार वर्णन प्रस्तुत वीर–गीतांत केलेलें आहे. या गीतांत १७ व्या व २५ व्या पद्यांत तुकोजीराव हे कृष्णाजीरावांचे पुत्र होते असें स्पष्ट म्हटल्यावरून हें गीत तुकोजीरावांच्या निधनोत्तर लिहिलें गेलें

आहे, हें उघड दिसून येतें. या गोष्टीला ३ ऱ्या पद्यांतील 'या (अशा आपसांतील द्वेषा) मुळेंच आतां परके आपले धनी होऊन बसले आहेत' हे उद्‌गार, १६ व्या पद्यांतील 'राष्ट्र' हा गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत विशेषतः प्रचारांत आलेला शब्द आणि २० व्या पद्यांतील 'मराठ्यांच्या विजयाची ही शेवटची लढाई होय' हें कथन, आणखी प्रमाणभूत म्हणून दाखवितां येण्यासारखे आहेत.

---

१३ भोपाळ–संग्राम

भोपाळचा नबाब वजीर महंमदखान यांचें अंतःकरण पहिल्यापासूनच मराठ्यांच्या विरुद्ध ईर्षेनें धगधगत होतें. यामुळें इ. स. १८१२ मध्यें छत्रपतींच्या आज्ञेनुसार नागपुरचे रघूजीराव भोसले, देवासचे द्वितीय तुकोजीराव पवार व ग्वाल्हेरच्या दौलतराव शिंद्यांचे सेनापति जगोबा बापू या वीर–त्रयांनीं नबाबावर स्वारी करून भोपाळ शहराला वेढा दिला. हा वेढा कांहीं दिवस राहून शेवटीं निकराची लढाई झाली व तींत मराठ्यांचा मारा असह्य झाल्यानें अखेरीस नबाबाला शरण येणें भाग पडलें, वगैरे वर्णन प्रस्तुत वीर–गीतांत कनिरामानें करून त्यांत आपले मालक द्वितीय तुकोजीराव पवार यांनीं गाजविलेला पराक्रम विशेषतः वर्णिला आहे. आपल्या आजाप्रमाणें तोटक छंदांत वीर रस निर्माण करण्याचा जो प्रयत्न या वीर-गीतांमध्यें कनिरामानें केलेला आहे तो खरोखर पहाण्यासारखा आहे. या गीताच्या पद्यांक ३ व ५ मध्यें सदर संग्रामाचे

प्रोत्साहक छत्रपति व पेशवे असल्याचें कनिरामानें दाखविलें आहे; परंतु तें केवळ त्या व्यक्ति अनुक्रमें मराठ्यांचे स्वामी व अध्वर्यू असल्यामुळेंच दाखविलें असावें. कारण कवितेंत थोर पुरुषाला अलंकारिक भाषेंत थोरपणा देणें हा कविसंप्रदाय आहे. वास्तविक छत्रपति व पेशवे यांचा भोपाळ–संग्रामाशीं प्रत्यक्ष कांहींच संबंध नव्हता. नागपुरकर भोसल्यांचीं कांहीं ठाणीं भोपाळच्या नबाबानें काबिज केल्यामुळें नागपुरकर भोंसले हे नबाबाशीं लढण्यास उठले व त्यांस शिंदे व पवार यांनीं मदत केली. पुढें त्यांची लढाई चालू असतांनाच नबाबाचा पक्ष उचलून इंग्रज हें प्रकरण तडीस लावित असल्याचें त्यांना समजलें. त्याबरोबर ते तसेंच भोपाळहून परत गेले, असा वास्तविक इतिहास आहे. कनिरामानें या वीर-गीताच्या शेवटीं मराठ्यांचा जय होऊन त्यांनीं शरणांगत नबाबास प्राणदान दिलें असें जें वर्णन केलें आहे तें केवळ कविकल्पनाप्रसूत आलंकारिक होय, हें सांगावयास नकोच.

विशिष्ट व्यक्ति–परिचय

जगु बापु [पद्यांक २९]– जगन्नाथ रामकृष्ण केरकर. शिंद्यांचे प्रसिद्ध सेनापति जिवबादादा बक्षी यांचे चुलत बंधु.

---

१४ जयसिंग खीचीवर स्वारी

प्रस्तुत वीर-गीतांत दौलतराव शिंद्यांचा शत्रु राघोगड [जि.गुणा] चा जयसिंग खीची ह्यास दुसरे तुकोजीराव पवार सेनासप्त-सहस्री, ह्यांनीं पराजित केल्याचें वर्णन केलेलें आहे. इ.स.१८१८त

जयसिंग खीची शिंद्यांच्या सोनकछ महालावर हल्ला करण्यास निघाला, तेव्हां त्याच्याशीं सामना करण्याकरितां शिंद्यांनीं आपला सरदार आनंद भीमाजी ह्यास फौजेनिशी पाठविलें. मार्गांत जयसिंगानें आनंद भीमाजीचा पराभव केला तेव्हां आनंद भीमाजीनें देवासला येऊन तुकोजीरावांस सहाय्य करण्याविषयीं विनंति केली. त्याबरोबर तुकोजीरावांनीं निशाणदार काकडे व शेख इमाम ह्यांना आपली कांहीं फौज देऊन आनंद भीमाजीच्या बरोबर पाठविलें. त्यांची जयसिंगाशीं देवासपासून जवळच असलेल्या पाळनगर व नागदा ह्या गांवाच्या दरम्यान गांठ पडून चकमक उडाली. तींत काकडे मारला जाऊन शेख इमाम घायाळ झाला आणि जयसिंग विजयानंदानें पुढें निघाला. ही बातमी तुकोजीरावांस समजतांच ते अत्यंत संतापले व लागलेच जातीनें जयसिंगाबरोबर लढण्यास निघाले. सोनकछजवळील टप्पा गांवीं तुकोजीरावांनीं जयसिंगास गांठलें व त्यास परास्त करून जीव घेऊन पळावयास लाविलें.

दौलतराव शिंद्यांनीं तुकोजीरावांच्या ह्या विजयाबद्दल अभिनंदनार्थ खलिता पाठवून आपले प्रेमसंबंध अधिक दृढ केले.

ह्या सर्व गोष्टींचें वर्णन प्रस्तुत वीर-गीतांत आलेलें आहे. हें वीर–गीत अपूर्ण आहे, हें पूर्वसंप्रदायानुसार शेवटीं कवीचें नांव त्यांत आलें नसल्यावरून उघड दिसून येत आहे.

विशिष्ट व्यक्ति-परिचय

काकडे [पद्यांक ७]– मानसिंगराव काकडे. देवास थोरल्या पातींतील मानकरी काकडे ह्यांचे पूर्वज.

शेख इमाम [पद्यांक ७] देवास थोरल्या पातींतील मानकरी शेख कल्लूमियां यांचे पूर्वज.

परिशिष्ट (ब)

छंद - परिचय

छंद-परिचय

दोहा:– ह्याचें दुसरें नांव दोहरा. हा चार चरणांचा पण लिहिण्यांत आर्या वृत्ताप्रमाणें दोन पंक्तींचा अर्धसम मात्रिक छंद. ह्या छंदाचे कमी अधिक मात्राभेदाअन्वयें २३ जाती आहेत; परंतु विशेष प्रचारांत असलेला दोहा विषम चरणांत १३ व सम चरणांत ११ मात्रांचा असतो आणि त्याच्या द्वितीय व चतुर्थ चरणान्तीं यमक साधण्यांत येतें. मात्र ह्या दोन्ही चरणांचें अन्त्याक्षर नेहमीं लघु असावें लागतें.

उदाहरण :–

बनना चाहे वीर जो, करना गौरव त्राण।
या कर धारो लेखनी, या बिकराल कृपाण ॥ १ ॥

– रामनरेश त्रिपाठी.

दोही :– हा दोह्याच्या गोत्रांतील चार चरणांचा पण लिहिण्यांत द्विपंक्त असा अर्धसम मात्रिक छंद. ह्याच्या विषम चरणांत १४ मात्रा असून सम चरणांत ११ मात्रा असतात आणि लघ्वान्त्याक्षरयुक्त अनुप्रास किंवा यमक ह्याच सम चरणान्तीं असते.

उदाहरण :–

बिरद सुमिरि सुधि करत नितहि, हरि तव चरन निहार।
यह भव जलनिधि तें तरत मुहिं, कब प्रभु करिरहुँ पार ॥१॥

सोरठा :– हा छंद म्हणजे केवळ उलट लिहिलेला दोहाच होय. दोह्याच्या ११ मात्रांच्या सम चरणान्तीं लघु अन्त्याक्षराचें यमक असतें तसेंच यमक याच्या ११ मात्रांच्या विषम चरणान्तीं असतें आणि १३ मात्रांचे सम चरण निवळ निर्यमक असतात. लिहिण्यांत हा छंद अर्थातच द्विपंक्त आहे.

उदाहरण :–

फूले फले न बेत, यदपि सुधा वर्षहिं जलद।
मूरख हृदय न चेत, जो गुरु मिलहिं बिरंचि सम ।। १ ।।

– तुलसीदास.

रोला :– दोह्याप्रमाणें हाही चार चरणांचा पण लिहिण्यांत द्विपंक्त असा अर्धसम मात्रिक छंद. विषम चरणांत ११ आणि सम चरणांत १३ याप्रमाणें प्रचलित दोह्याच्या अगदीं उलट मात्रा या छंदांत असतात. मात्र यमक दोह्याप्रमाणेंच द्वितीय व चतुर्थ चरणान्तीं असतें व त्या चरणांचीं अन्त्याक्षरें तेवढीं लघु न ठेवितां तीं प्राय: गुरु ठेवण्याचा आणि उलट विषम चरणांचीं अन्त्याक्षरें लघु ठेवण्याचा प्रघात आहे.

उदाहरण :–

ससि बिन सूनी रैन, ज्ञान बिन हिरदै सूनो।
कुल सूनो बिन पुत्र, पत्र बिन तरु सूनो ।। १ ।।

– बैताल.

उल्लाला :– हाही दोह्याप्रमाणेंच चार चरणांचा पण लिहिण्यांत द्विपंक्त असा अर्धसम मात्रिक छंद. विषम चरणांत १५ व

सम चरणांत १३ ह्याप्रमाणें सदर छंदांत मात्रा असतात व यमक सम चरणान्तीं असतें.

उदाहरणः-

हे शरणदायनी देवि तू, करती सबका त्राण है।
हे मातृभूमि! सन्तान हम, तू जननी तू प्राण है ॥१॥

– मैथिलीशरण गुप्त.

छप्पय (षट्पदी):- छः म्हणजे सहा व पय म्हणजे पद (पंक्ति). ह्या शब्दशः अर्थाप्रमाणें हा सहा पंक्तीचा मात्रिक छंद होय; परंतु हा स्वतंत्र छंद नाहीं. दोन रोला व एक उल्लाला मिळून हा छंद तयार होतो.

उदाहरणः-

प्रथम वेग उद्धार, बंभ मछहत्तन किन्नो।
दुतिय बीर बाराह, धरनि उद्धरि जस लिन्नो॥
कौमारक नभ देस, धरम उद्धरि सुर सष्पिय।
कूरम सूर नरेस, हिंद हद उद्धरिय रष्पिय॥
रघुनाथ चरित हनुमंत कृत, भूप भोज उद्धरिय जिमि।
पृथिराज सुजस कवि चंद कृत, चंद नंद उद्धरिय तिमि ॥१॥

– जल्हण.

कुंडलियाः- छप्पयाप्रमाणें हा सहा पंक्तींचा अस्वतंत्र मात्रिक छंद. ह्यांतील पहिल्या दोन पंक्ति दोह्याच्या व बाकीच्या चार पंक्ति रोल्याच्या असतात. आणि दोह्याचें अन्तिम चरण

रोल्याच्या आरम्भिक चरणांत नेहमीं द्विरुक्त होत असते. [श्रीगोस्वामी तुलसीदासजींनीं स्वरचित कित्येक कुंडलियांत दोह्याचे अन्तिम चरण पहिल्या रोल्याच्या आरम्भिक चरणांत व त्या रोल्याचें अन्तिम चरण दुसऱ्या रोल्याच्या आरम्भिक चरणांत द्विरुक्त करून आणखी शेवटीं सुरुवातीच्या दोह्याचें आरम्भिक चरण या दुसऱ्या रोल्याचें अन्तिम चरणांत द्विरुक्त केलें आहे व याप्रमाणें सुंदर यमक–चमत्कृति प्रकट केली आहे]

उदाहरण:–

मेरी भव बाधा हरौ, राधा नागरि सोय।
जातन की झांई परे, श्याम हरित दुति होय ।।
श्याम हरित दुति होय, कटै सब कलुष कलेसा।
मिटै चित्त को भरम, रहैं नहिं कछुक अंदेसा ।।
कह पठान सुलतान, काटु यम दुख की बेरी ।
राधा बाधा हरहुं, यही बिनती सुन मेरी ।।१।।

– सुलतान

मनहरण:- हा आठ चरणांचा अर्धसमाक्षर छंद. यांत प्रत्येक विषम चरण १६ अक्षरांचा व सम चरण १५ अक्षरांचा असतो आणि त्यांत लघुगुरूचा मुळींच क्रम नसतो. मात्र प्रत्येक चरणाचें अन्त्याक्षर तेवढें गुरु व सम चरणाच्या शेवटीं यमक असावें लागतें.

उदाहरण:–

परिगो निजाम फंद तक्कूजी पुँवार हूँ के।
लेन बदले में आज देन पऱ्यो भारी है।

भाग चल्यो भय पाय पालखेड घायल ज्यों ।
पालखेड ग्राम हूँ में घटना घटारी है ।।
बाजीराव पेशवा सो भई मुठभेड आज ।
दोन्हों वरवीरन ने वीरता निकारी है ।।
दोन्हों दल सागर में गागर गरक भई ।
गागर गरक भई तुर्कन की गारी है ।।१।।

– नरू.

पद्धरीः– द्विचरणात्मक सम मात्रिक छंद. याच्या दोन्ही चरणांत १६ मात्रा असून चरणान्तीं ज गणांत यमक असतें. (ज गण=मध्याक्षर गुरु आणि आदिअन्ताचीं अक्षरें लघु.)

उदाहरणः–

घमसान घान सब बीर खेत, घन श्रोत बहत अरु रुकत रेत ।।१।।
उलटी जु राज प्रथिराज बाग, थकि सूर गगन धर धसत नाग ।।२।।

– चंदबरदाई.

अमृतधुनिः– हा एक अस्वतंत्र मात्रा छंद होय. याचीं जीं लक्षणें छंद शास्त्रासंबंधींच्या ग्रंथांत सांगितलीं आहेत तीं लक्षणें आम्ही कल्पित असलेल्या या पुस्तकांतील अमृतधुनि छंदामधील रचनेंत थोडीफार आढळतात व इतर छंदाच्या लक्षणाशीं ती रचना मुळींच जुळत नाहीं म्हणून अल्पस्वल्प साम्यवादावरून अमृतधुनि हें नांव आम्ही 'खरडा–संग्राम'च्या अन्तिम पद्यावर प्रश्नांकित केलें आहे.

ओवी:– हा चार चरणांचा पण लिहिण्यांत द्विपंक्त असा अक्षर छंद. या छंदाचे प्रथम तीन चरण अष्टाक्षरयुक्त व अन्तिम चरण सप्ताक्षरयुक्त असावें असा मुख्य नियम सांगितला आहे; परंतु हा नियम सार्वत्रिक रीतीनें पाळण्यांत आलेला नाहीं. अर्थावकाशासाठीं त्यांत न्यूनाधिक अक्षरांचाही समावेश कवींकडून करण्यांत येतो. हिंदींत हा छंद विशेष उपयोगिलेला आढळत नाहीं. या पुस्तकांत 'जयसिंग खीचीवर आक्रमण' या वीर–गीताच्या प्रारंभिक पद्यावर जी ओवी छंदाची रचना आम्ही कल्पिली आहे तीही नियमबद्ध नाहीं, हें त्यांतील अक्षरगणनेवरून स्पष्ट दिसून येईल.

तोटक:– हा चार चरणांचा समाक्षर छंद. याचा प्रत्येक चरण चार स गणांनीं तयार होतो, अर्थात् याच्या प्रत्येक चरणामध्यें १२ अक्षरें असतात व यमक प्रथम आणि द्वितीय चरणान्तीं एक व तृतीय आणि चतुर्थ चरणान्तीं एक या प्रमाणें असतात. (स गण=पहिलीं दोन अक्षरें लघु व तिसरें अक्षर गुरु.)

उदाहरण:–

जय राम सदा सुखधाम हरे,
रघुनायक सायक चाप धरे ।
भव वारण दारण सिंह प्रभो,
गुण सागर नागर नाथ विभो ॥१॥

भुजंगप्रयात:– हा चार चरणांचा समाक्षर छंद. याचा प्रत्येक चरण चार य गणांनीं तयार होतो, अर्थात् याच्या प्रत्येक

चरणामध्यें १२ अक्षरें असतात व यमक प्रथम आणि द्वितीय चरणान्तीं एक व तृतीय आणि चतुर्थ चरणान्तीं एक ह्याप्रमाणें असतात. (य गण=पहिलें अक्षर लघु व बाकीचीं दोन अक्षरें गुरु)

उदाहरण:–

कहूँ शोभना दुंदभी दीह बाजैं,
कहूँ भीम भंकार कर्नाल साजैं।
कहूँ सुंदरी बेनु बीना बजावैं,
कहूँ किन्नरी किन्नरी लय सुनावैं ॥१॥

मोतियदाम:– ह्याचें दुसरें नांव मौक्तिकदाम. हा चार चरणांचा समाक्षर छंद. ह्याच्या प्रत्येक चरणांत चार ज गण असतात, अर्थात् १२ अक्षरांचा प्रत्येक चरण असतो. यमक प्रथम आणि द्वितीय व तृतीय आणि चतुर्थ अशा जोडी जोडीच्या चरणान्तीं असतें. (ज गण=मध्याक्षर गुरु आणि आदिअन्ताचीं अक्षरें लघु.)

उदाहरण:–

जँचौ रघुनाथ धरे धनु हाथ, बिराजत सानुज जानकि साथ।
सदा जिनके सुठि आठहुँ याम, बिराजत कण्ठ सु मोतियदाम ॥१॥

मत्तगयंद:– ह्याचीं दुसरीं नांवें मालती व इंदव. हा चार चरणांचा समाक्षर छंद. ह्याचा प्रत्येक चरण सात भ गणांचीं २१ व अन्तिम २ गुरु मिळून एकंदर २३ अक्षरांनीं युक्त असतो आणि चाऱ्ही चरण एकाच यमकानें निबद्ध असतात. (भ गण=पहिलें अक्षर गुरु व बाकीचीं दोन अक्षरें लघु.)

उदाहरण:-

या लकुटी अरु कामरिया पर
राज तिहूँ पुर को तजि डारौं
आठहुँ सिद्धि नवो निधि को सुख
नन्द कि गाय चराय बिसारौं।
नैवन सों रसखान जबै ब्रज
के बन बाग तडाग निहारौं।
काटिन वे कनधौत के धाम-
करील के कुंजन ऊपर वारौं॥१॥

- रसखान.

दुर्मिळ सवैया :- चार चरणांचा समाक्षर छंद. याचा प्रत्येक चरण आठ स गणांनीं तयार होतो, अर्थात् याचा प्रत्येक चरण २५ अक्षरांचा असतो, तसेंच त्याच्या १२ व्या अक्षरावर नेहमीं यति असतो. याचे चाऱ्ही चरण एकाच यमकानें बद्ध असतात.

उदाहरण :-

सब सों करि नेह भजौ रघुनन्दन दुर्मिल भक्ति सदा लहिये ।
सब सों करि नेह भजौ रघुनन्दन राजत हीरन माल हिये ।
नव नील वपू कल पीत झँगा झलकैं अलकैं घुंघरारि लिये ।
अरविन्द समानन रूप मरन्द अनन्दित लोचन भृंग पिये ।
हिय में न बस्यो अस दुर्मिल बालक तो जग में फल कौन जिये ॥१॥

परिशिष्ट (क)

शब्द – कोश

शब्द-कोश

अक्ल - अक्कल. बुद्धि. विचार.
अगर - जर.
अगवानी - पुढाकार.
अ[आ]तंक - दरारा.
अनि - अग्र. टोंक.
अपनाना - आपलेसें करणें.
अरु - आणि.
असमा[स्मा]न. - आकाश.
अहसान - उपकार.
आतब - तोफखान्यावरील अधिकारी.
आसेर - किल्ला (अशिरगढ).
इण - हें, अशा प्रकारचें.
इत - येथें. अलीकडे.
इमि - ह्या प्रकारें.
उडंडा - घोडा.
उत - तेथें.
उबार - रक्षण.
उमगाना - प्रफुल्लित होणें.
उमडना - आवेश चढणें.
उमाव - उत्साह.
एम - असें. ह्या प्रकारें.
कछु - कांहीं.
कढना - बाहेर पडणें.
कतार - पंक्ति. ओळ. रांग.
कति - कोठें. कित्येक.
कन्हे - जवळ.
कमबख्ती - दुर्दैव. वाईट प्रसंग.
कमान - धनुष्य.
करनीक - कर्तृत्ववान.
करूर - तीव्र. अतिशय.
कान - मर्यादा.
कालचत्र - एक अस्त्रविशेष.
किलकार - गर्जना. हर्षध्वनि.
किस्मत - नशीब.
किहि - काय. कोणतें.
कुंजर हत्ती.
कुंत - भाला.
कुरंभ - हत्ती.
कूकई - हाहाकार.
कूकर - कुत्रा.
केहर केसरी. सिंह.
कोऊ - कोणी.
खट षट्. सहा
खत - पत्र.
खननंकत - खणखणत.
खप्पर - मातीचें पात्र.
खरनी - खंडणी.

खागा- खड्ग. तलवार.
खाँत- साथ. बरोबर.
खारी- कडवी.
खिराज खंडणी. नजराणा.
खीज- संताप. त्वेष.
खुआरी- स्वारी.
खोदिय- शिथिल. मेंगरूळ.
खोज- शोध.
गयंद- गजेंद्र. हत्ती.
गरट्ट- लोट. समूह.
गर्द- धूळ. धूळधाण.
गहना- अलंकार.
गाज- राशि. ढीग.
गाढ़ा- प्रबळ.
गात- शरीर.
गारी- नामुष्की.
गाँस- प्रतिरोध.
गिरद्द(द)- (फार्शी गर्द शद्बाचा अपभ्रंश) धूळ.
गीदड (र)- कोल्हा.
गुमान- अहंकार. अभिमान
गुरज(र्ज)- गदा.
गेफल- धुंदी.
गैल- मार्ग.
गंज- कोठार. ढीग.
ग्यानि- ज्ञानी.
ग्राह- मगर.
चक्रमुखी- सेना.
चिंघारना- चित्कार करणें.
चोट- आघात.
चंद्रहास- खड्ग. तलवार.
छकना- खाऊन पिऊन तृप्त होणें.
छांडना- सोडणें. त्याग करणें.
छारखार करना- धुव्वा उडविणें.
छिति- क्षिति. पृथ्वी.
छोहन- आनंदानें मस्त होणें.
जनाना- जाहीर करणें.
जस- यश.
जहान- जग.
जिमि- ज्या प्रकारें.
जुत्थ- झुंड.
जुदाई- वियोग.
जूटना- कार्यरत होणें.
जेरबंद- घोड्याला बांधण्यांत येणारा बंद.
जोवना(बाट)- (वाट) पहाणें.
जंग- लढाई.
झाट- फटकारा.
झुलसी- होरपळून निघाले.
झंखा(का)ड- निष्पर्ण होणें.
टार- घोडा.
टुक- थोडा.
टेक- आधार. बाजू.
टोप- शिरस्त्राण.
ठट्ट- समूह. गर्दी. झुंड.

ठेल– टक्कर.
डकर– ढेंकर.
डार(ल)– पंक्ति. ओळ. समूह.
ढहाना– विध्वंस करणें.
ढिग– जवळ.
तनिक– थोडा. किंचित्.
तमाम– सर्व.
ताकना– संधि पाहणें.
तासों– त्याकरितां.
तिन– तेथें.
तिया– स्त्रिया.
तुपक– छोटी तोफ. बंदुक. कडाबीन.
तूर– नगारा. दुंदुभि.
तेग– तलवार.
थयो– झालें.
दधि– उदधि. समुद्र.
दमामा– लहान नगारा.
दरपेश– चाल करून येणें.
दहल– कंप. थरकांप.
दहेज– अंदण.
दावा– बदला.
दाह– दुःख.
दिवार(ल)– भिंत.
दुलह– नवरा मूल.
दुवन– दुष्मन. शत्रु.
देर– विलंब.
धाय– धांऊन जाणें.
धावा– हल्ला.
धींग– लढाई.
धूहर– धुराळा.
नकीब– ललकारी देणारा भालदार.
नयनागर– नीतिनिपुण
नरनाह– नरपति राजे.
नवल– नवीन.
नालि– बंदुक.
निसान– नगारा.
नूर– तेज.
नैक– उत्तम.
नैन– नयन. डोळा.
न्हाटो– नकारा करून पळ काढणें.
पग– पाय.
पठायो– पाठविलें.
पडपड़– पटापट.
पतझाड– शिशिरऋतूंत झाडांचीं पानें झडणें.
पर– परंतु.
प[पु]हुमी– पृथ्वी.
पाखर– अश्वकवच.
पाज– पाळ.
पि[पेह]चाणी– ओळखली.
पीर– दुःख. सहानुभूति.
पेखना– पाहणें. परीक्षा करणें.
पेल– पैल. पार.
प्रण– पण. प्रतिज्ञा.
फरकना– फडफडणें.

फिरंगाण- फिरंगी राज्य.

फे[फैं]ल- काम.

बखत- समय.

बख्तर- चिलखत.

बखान- वर्णन.

बद्दल- ढग.

बधाई- धन्यवाद.

बधी- वृद्धि. वाढ.

बरबागर- जाळें.

बर[ल]बंड- बलवंत. शूर.

बाँका- बिकट.

बाग- लगाम.

बाज- घोडा.

बाज आना- आटोक्यांत येणें.

बाजि- घोडा.

बाजी- बाजू.

बादल- मेघ.

बावनी बीर- बहाद्दर वीर. (बावन वेळां कसास उतरलेलें सोनें उत्तम मानलें जातें त्यावरून उत्तमार्थी बावन अथवा बावनी शब्द प्रचारांत आला आहे. हिंदींत बावन उमराव हा शब्द जेवढा महशूर आहे तेवढाच बावनी वीर हाही शब्द महशूर आहे व त्याचा अर्थ निवडक असे उत्तम किंवा बहाद्दर वीर असा आहे).

बाँह- बाहु.

बिचोट- मधला.

बिदा- निरोप.

बिदि- वद्य.

बुटक- थेंब. वृष्टि.

बँका- बांका. बळकट. बिकट.

भट्ट- भाट.

भड- योद्धा. वीर.

भनक- गुणगुण.

भाँति- प्रकार.

भुजपान- बाहुबलाची प्रशंसा.

भूरि- प्रचुर.

भोत- बहुत. जास्त. अधिक.

मझ- मध्यें.

मनमुटाव- वैमनस्य.

मर्दानकी- मर्दुमकी. बहादुरी.

महँ- मध्यें.

महमान पाहुणा.

मिसल- दर्जा. दर्ज्याची जागा.

मुठभेड- हातघाईची लढाई.

मुरझाना- कोमेजणें. उदास होणें.

मेटन- नाश.

मोहक- मोका. संधि.

मोरमनि- शिरोमणि.
मोहिं- मला.
मौर- मुख्य.
मंजिल- घर.
मंत्र[णा]- खलबत. कारस्थान.
रच्छक- रक्षक.
रमाल- रमणारा.
रलना- राखणें.
रसद्- दारूगोळा.
रहम- दया.
राड, रार- लढाई. युद्ध.
राय- सल्ला.
राह- रस्ता. मार्ग.
रांधना- खेद करणें.
रिझना- प्रसन्न होणें.
रु. अरु- आणि.
रुजक- सुंदर.
लहना- घेणें.
लाय- लपट. ज्वाला.
लाल- लाडका पुत्र.
लिराना- घेणें.
लीधो- घेतलें.
लुकमा- ग्रास. घास.
लुत्थ- लाश. प्रेत.
लोह[हा]- शस्त्र.
लौं- पर्यंत.
वाको- त्याला.
वाही- चालविणें.
विनय- विनंति. प्रार्थना.
विभोर- आनंद.
शतरंज बुद्धिबळाचा खेळ.
शा[सा]ल- सलणारा.
शिचाणा- ससाणा.
सनाह- कवच.
सराहना- प्रशंसा करणें.
सर्द- थंड.
सहनाई- सनई. शिंग.
सहम- भय. धोका.
साल- त्रास. घाव.
सिधावन- गमन.
सिरताज शिरोमणी.
सिरमौर- शिरोमणी.
सुघर- सुग्रण.
सुबर सूर- श्रेष्ठ वीर.
सुबह- सकाळ.
सुलह- संधि. तह.
सेल- भाला.
सौं- म्हणून.
सो[शो]र- हल्ला. गोंगाट.
संसार- जग.
हकारे- लल्कारी देणें.
हचक्क- धक्यानें डोलणें. हलणें.
हत्थ- हात.
हथनालि- हत्ती जोडून वाहून नेली जाणारी तोफ.
हननंकत खिकाळत.

हमदर्दी– सहानुभूति.

हयंद– हयेंद्र. घोडा.

हराम– अनुचित.

हाँक-धाक– हलकल्लोळ.

हाथ– हात.

हाल– हकीकत.

हिननाट– खिकाळणें.

हिय– हृदय.

हुलसै– हर्षभरित होणें.

हूक– हाहाकार.

होसले– जोर. हिंमत.

हँक– हुंकार.

परिशिष्ट (ड)

प्रमाणोपलब्ध ग्रंथाची सूची

प्रमाणोपलब्ध ग्रंथांची सूचि

श्रीब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार
(रा. ब. द. ब. पारसनीस)

इचलकरंजीकरांचा इतिहास (वा. वा. खरेशास्त्री)

गणेगांवकर पवार घराण्याची बखर (संपादक र. कृ. अत्रे)

गोविंदपंत बुंदेल्यांची बखर

छत्रपति शाहू महाराज यांची रोजनिशी (संपादक रा. ब. ग. चि. वाड)

पहिले बाजीराव पेशवे (प्रो. ना. के. बेहरे)

पुरंदरे दप्तर भाग ३ (संपादक कृ. वा. पुरंदरे)

पेशवे दप्तर पु. १० (संपादक गो. स. सरदेसाई)

भाऊसाहेबांची बखर (संपादक रा. ब. का. ना. साने)

महादजी शिंदे ह्यांचीं कागदपत्रें (सं. गोविंद सखाराम सरदेसाई)

मराठी रियासत–मध्य विभाग १ (गो. स. सरदेसाई)

,, ,, ,, ४ (,, ,,)

,, ,, –उत्तर विभाग २ (,, ,,)

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खं. ३
(संपादक इतिहासाचार्य वि. का. राजवाडे)

मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा (वि. गो. दिघे)

मराठ्यांची बखर (कॅ. ग्रांट डफ ह्यांच्या ग्रंथाचें भाषांतर–कॅ. डेव्हिड केपन)

मराठ्यांचे पराक्रम–बुंदेलखंड प्रकरण (रा. ब. द. ब. पारसनीस)

मालवा में युगान्तर (राजकुमार डॉ. रघुवीरसिंह)

वसईची मोहीम (य. न. केळकर

शिंदेशाही इतिहासाचीं साधनें भा. ४
(संपादक प्रो. अ. वा. वाकणकर)

शिंदेशाहीचीं राजकारणें (सातारा इतिहास संशोधक मंडळ)

संस्थान देवास थोरली पाती - पवार घराण्याचा इतिहास
(मा. वि. गुजर)

संस्थान देवास थोरली पाती - पवार घराण्याच्या इ. साधनें
(संपादक मा. वि. गुजर)

Asiatic Annual Register 1806

Bungash Nawab of Farukkabad (Irvine)

Final French Struggles (Malleson)

——०——

परिशिष्ट (फ)

भाट घराण्याची वंशावळ व कागदपत्रें

संस्थान देवास थोरल्या पातीच्या पवार राजघराण्याच्या पदरच्या

भाट घराण्याची वंशावळ

पालाजी

ठाकुरसी

भगवानजी ऊर्फ भावसिंग

- गंगाराम (नकल)
- तुलसीराम (नकल)
- नरूजी
  - दीपाजी
    - पेमजी
    - तुळाराम
    - खुशालजी
    - कनिराम ऊर्फ कान्हा
      - ऊंकारजी
        - भेरुसिंग ऊर्फ कालूजी
          - किसनलाल
            - झुंजारसिंग
    - अमराजी (वंश चालू)
    - चतुर्भुज (वंश चालू)
- खेताजी (नकल)

लेखांक १ ता. ५ नोव्हेंबर १७१८

श्री

राजश्री नरू व खेता भाट

बडावे गोत छाछर यांसी

राजश्री कालोजी पवार मो सुपें पा. पारनेर रामराम उपरी. लेहून दिल्हे ऐसे जे. तुम्हीं कुलीचे पोथीवाले आमचे वंसीचे. त्यास तुमचे भावांस गलासुरी जाली. हें जाणोन हालींही तुम्हांस लेहून दिल्हें असे. आमचे वंसीचे जे कोन्ही आसतील ते दानें देतील. तुमचे वंसीचे आसतील ते दानें घेतील. जाणिजे. मिा कार्तिक वा ९ सके १६४० छ २२ माहे जिल्हेज.

मोर्तब
सुद

लेखांक २ ता. १३ ऑक्टोबर १७२७

श्री गजानन

राजश्री नरू बिा भावसिंग

पोथीवाले गो यांसी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रो तुकोजी पवार रामराम उपरी. तुम्हीं आमचे कुलीचे बडावे वडिलोपार्जित. येविसी तुम्हीं लेख व प्राचीन आमचे कुलीची वौंशावली दाखविली, तरी आम्ही आगर आमचे वौंशीचे जे कोन्ही आसतील ते तुम्हांस आगर तुमचे वौंशज्यांस देसबिदेस मानीत जातील. जाणिजे. आश्विन शुा १० शके १६४९ छ ८ माहे जलूस. बहुत काय लिहिणें.

मोर्तब
सुद

लेखांक ३ ता. २६ मे १८३५

श्रीगजानन मार्तंड

राजश्री वर्तमान भावी का। दार

पो। आलोट गोसावी यांसी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये स्नो। रूक्मांगदराव पवार दंडवत आ। रामराम सु। खमस सलासन मयातैन व आलफ. राजश्री खुशाल व आमरसिंग व काना व चतुरभुज भाट गोत्र छाछर. रहिवास मौजे पाडल्या प्रो। उदेपुर प्रांत मेवाड यांणीं विदित केलें कीं, आम्हीं आपले कुलीचे भाट. आमचा निर्वाहा चालला पाहिजे. मनास आणितां आपले कुलीचे भाट जाणोन यांजला इनामी धरती मौजे तालोद प्रो। मजकूर येथील बंजड मालोत्रा बिघे ५० सुमार. सदरहु पंन्नास बिघे जमीन वंशपरंपरा देऊन ही सनद सादर केली आसे. तरी मौजे मजकूरची धरती चेतुसीमा मापोन चकबंदी करुन देणें. या सनदेची नकल घेऊन आसल खुद भाट मजकुरास भीगवटीयांस देणें. साल दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न करणें. मिति वैशाख वा। १४ शके १७५७ मालवी सन १२४२ जाणीजे. छ २७ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें.

० श्री ०
श्री शिव चरणी दृढ भाव तुकोजी सुत रुक्मांगद पवार राव

मोर्तब सुद

लेखांक ४

श्री गजानन

राजश्री खंडेराव पांडुरंग गो

सावी यांसी

स्नो रुक्मांगदराव पवार दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें विशेष. कान्हा ठाकुर याच्या पोथ्या व कागदपत्र भोपा व [वा] सवाई भाट मारवाडांत राहणार हा चोरून घेऊन गेला. त्याचा पता हालीं लागल्यावरून त्याचे शोधाकरितां कान्हा ठाकुर याचा चिरंजीव वोंकार अला अहे. हा त्याचा पता लाऊन तुम्हांस सांगेल. ज्या ठिकाणीं पता लागेल त्या ठिकाणचे अमलदारास लिहून त्याजला अणऊन याचा त्याचा मजकुर समजून घेऊन तंटा तोडून समजूत करून द्यावी. कदाचित् समजूत न जाहल्यास उभयेतांस इकडे रवाना करून देणें. रा छ१६ माहे रबिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंति.

श्री
मोर्तब
सुद

लेखांक ५ ता. १२ नोव्हेंबर १८५४

श्रीशंकर

० श्री ०
श्री भवानीशंकर
चरणीं तत्पर राम
चंद्रराव सुत यश
वंतराव पवार नि
रंतर शके १७७६

आज सुभा सरकार श्रीमंत राजश्री यशवंत राव पवार संवस्थान धार कान्हाराव दिपराज सुत वोंकार व पिर्थीराज व केशरीसिंग भाट गोत्र छाछर राहणार

मौजे जावळ प्रांत मेवाड हलीं वस्ती कसबे आलोट इलाखे देवास सुा खमस खमसेन मयातेन व आलफ. हुजूर धार मुकामीं येऊन विदीत केलें कीं मी पवार कुळीचा भाट. मजजवळ कैलासवासी संभाजी पवार यांची सनंद होती ती चोरीस गेली सबब नवीन सनंद करून देविली पाहिजे. त्याजवरून अर्ज ध्यानास अणोन तुम्हांजवळ पवार कुळीची वौंषावळ आवलपासून आहे ती पाहण्यांत आली. यास्तव हें सनंद पत्र तुम्हांस करून दिल्हें असे. तरी पवार परमार साख पस्तीस धारा देवी पूजणारे देसीं पर-देसीं आमचे वौंषीचे जे कोन्ही असतील ते तुम्हांस मान्य करतील. मिती कार्तिक वद्य ७ रोज रविवार सन १२६२ फसली. संवत १९११ जाणिजे छ२१ माहे सफर. मोर्तब सुद.

मोर्तब सुद

श्री

लेखांक ६

ता. १७ नोव्हेंबर १८३९

राजश्री आमरसिंग व खुशाल
व काना व तुळाराम व गज्या
आमरसिंगाचा लेक उमेद व
पिरथीराज काना ठाकुरचा लेक
वोंकार बडावे गोत्र छाछर
गोसावी यांस

छ. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो रामचंद्रराव पवार विश्वासराव संस्तान नगरदेवले प्रांत खानदेश. रामराम

विनंती. उपरि येसीजे, तुम्हीं आमचे समस्त पवार यांचे कुळीचे भाट. वडिलोपार्जित तुमचा सत्कार पालग्रहण करित आले आहेत त्याप्रों आम्ही व आमचे वंसींचे तुम्हास व तुमचे वंशास मानित जातील व पूजीत जातील. मिति कार्तिक शुा ११ शके ७१६१ मालवी सन १२४७. हें लेहून दिल्हें सही. दस्तुर खुद. बहुत काय लेहिनें हें विनंति.

श्री

लेखांक ७

ता. १४ नोव्हेंबर १८४७

राजश्री काणा ठाकुर गोत्र
छाचर गोसावी यासी

इनो माधवराव पवार विश्वासराव रामराम. उपरि येथील क्षेम ता शके १७६९ माहे कार्तिक शुा ६ प्रों प्रांत दक्षण नगर जिल्हा प्रगणे पारनेर मौजे सुपे सुखरूप आसो विशेष. आमचे कुळीचे भाट बडावा तुम्ही आहात. आमचे वंषांतील तुम्हास कोन्ही नाहीं म्हणनार नाहीं. कलावें बहुत काय लिहिणें हे विनंति.

[देवास थोरल्या पातीच्या पवार राजघराण्याच्या भाटाच्या पोथींतील दानांसंबंधाचें इ. स. १६५८ ते इ. स. १८३२ च्या दरम्यानचे कालांतील कांहीं उतारे.]

१ तारीख १-१०-१६५८

संभुसिंगजी ऊर्फे साबूसिंगजी * रुपया सो, पोशाक दीन्हों.

---

* साबूसिंग पवार.

गाम सूपा. भाट पालाजी ने. सम्मत सतरासो पंधरा के साल मिति कुँवार सुदि पूनम के दिन.

२ तारीख १५-९-१६५९

क्रिश्नाजी × रुपया पचास, घोडा लाल दीन्हों. गाम सूपा. भाट पालाजी ने. सम्मत सतरासो सोला के साल. मिति कुँवार सुदि दसमी दसवारा के दिन.

३ तारीख १९-९-१६८९

बुवाजी $ रुपया पिचोतर, पोशाक दीन्हों. गाम सूपा भाट ठाकुरसी ने सम्मत सतरासो छियालीस के साल. मिति कुँवार सुदि पूनम के दिन.

४ तारीख २४-९-१७०२

कालूजी * रुपया सो, पोशाक घोडो सुफेद दीन्हों. गाम सूपा. भाट भावसिंग ऊर्फे भगवानजी ने. सम्मत सतरासो गुनसाठ के साल. मिति कुँवार सुदि पूनम के दिन.

५ तारीख १३-१०-१७२७

तकूजी † रुपया सो, पोशाक, घोडो चंपो दीन्हों. गाम सूपा. भाट नरूजी ने. सम्मत सतरासो चौरासी के साल. मिति कुँवार सुदि दसमी दसवारा के दिन.

× कृष्णाजी पवार. $ बुबाजी पवार, विश्वासराऊ. * काळोजी पवार, विश्वासराऊ. † पहिले तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्री.

६ तारीख २४-१० १७६०

क्रिश्नाजी ‡ रुपया सो, पोशाक, घोडो कालो दीन्हों. गाम देवास. भाट दीपाजी ने सम्मत अठरासो सतरा के साल. मिति कुँवार सुदि पुन्नम.

७ तारीख २८-९-१७८९

तकूजी * रुपया सो, पोशाक, घोडो कुम्मेद दीन्हों. गाम देवास. भाट कान्हाजी ने. सम्मत अठारासो छियालीस के साल. मिति कुँवार सुदि दसमी दसवारा के दिन.

८ तारीख ४-३-१८४६

राव रुक्मांगदजी § रुपया सो, पोशाक, घोडो रामबान दीन्हों. गाम देवास. भाट ऊंकारजी ने. सम्मत ओगणीसो दो के साल. मिति फागण सुदि सातम.

९ तारीख १३-१०-१८५३

राव रुक्मांगदजी घोडी कुम्मेद, सरपाव, शेलो, पाग दीन्हों. गाम देवास. भाट कनीराम ने. सम्मत ओगणीसो दस के साल. मिति कुँवार सुदि इग्यारस. वार बसपतवार के दिन.

१० तारीख ६-५-१८५४

राव रुक्मांगदजी पायगा बंधावी नयी. पायगा में कुड़ो खुदायो. जीके नामे घोडो ताजण्यो पच कल्याण चोटी को दीन्हों.

‡ पहिले कृष्णाजीराव पवार, सेनासप्तसहस्री. * दुसरे तुकोजीराव पवार, सेनासप्तसहस्री. § रुक्मांगदराव पवार, सेनासप्तसहस्री.

सम्मत ओगणीसो इग्यारे के साल. मिति वैसाक सुदि नोमी. वार थावर के दिन. भाट कान्हाजी ने गाम देवास.

११ तारीख ६-१०-१८५९

राव रुक्मांगदजी कडा सुन्ना का, मोती चौकडा, मंदील, दुशालो रुपया सो को जरियानी, रुपया पचीस, घोडो कटारमल दीन्हों. भाट कान्हाजी ने. गाम देवास. सम्मत ओगणीसो सोळे के साल. मिति कुँवार सुदि दसमी दसवारा के दिन. फरनवेस तात्यासाहब का हाथ सुं रामरावजी, बाळूजी दीवान खासगी † का हाथ सुं.

१२ तारीख ७-४-१८६२

राव किश्नाजी ‡ रुपया पोणादोसो दीन्हों. चेत सुदि आठम के दिन. सम्मत [ओगणीसो] ओगणीस के साल. बडवा कान्हाजी ने. गाम देवास.

---

† ह्यांचें उपनांव कवचाळे. प्रस्तुत पुस्तकाच्या संपादकाचे हे पणजे होत. ‡ दुसरे कृष्णाजीराव पवार, सेनासप्तसहस्री.

शुद्धि – पत्र

पृ. ५ ओळ ६ 'हंसियत' च्या ऐवजी 'हसियत' वाचावें.

पृ. १३ ओळ १ 'सुबौ' च्या ऐवजी 'सुबो' वाचावें.

भाग २ आत्मनिवेदन पृ. ६ ओळ खालून ३ री 'विद्यमाप' च्या ऐवजी 'विद्यमान' वाचावें.

भाग २ आत्मनिवेदन पृष्ठ ११ ओळ ६ 'चनुरंगिनियों' च्या ऐवजीं 'चतुरंगिनियों' वाचावें.

भाग २ आत्मनिवेदन पृष्ठ १२ ओळ २ 'दोटा' च्या ऐवजीं 'दोहा' वाचावें,

भाग २ वीर–गीतें पृ. १० ओळ ११ 'दहा' च्या ऐवजीं 'आठ' वाचावें.

भाग २ पृ. २९ ओळ १ 'भज्यो' च्या ऐवजीं 'भेज्यो' वाचावें.

भाग २ पृ. ३४ ओळ ७ 'में' च्या ऐवजीं 'मैं' व त्यानंतर 'मैं' च्या ऐवजीं 'में' वाचावें.

भाग २ पृ. ४० टीप ओळ २ 'कतिकारंभा' च्या ऐवजीं 'कार्तिकारंभा' वाचावें.

भाग २ पृ. ५४ ओळ ११ 'और' च्या ऐवजीं 'ओर' वाचावें.

भाग २ पृ. ६२ ओळ ६ 'बोला' च्या ऐवजीं 'बोल' वाचावें.

भाग २ पृ. ६३ ओळ खालून २ 'अशा' च्या ऐवजीं 'आशा' वाचावें.

भाग २ पृ. ७८ ओळ ३ 'पयो' च्या ऐवजीं 'पऱ्यो' वाचावें.

भाग २ पृ. ८८ ओळ ४ 'तरागढ़' च्या ऐवजीं 'तारागढ़' वाचावें.

भाग २ पृ. ९६ ओळ ४ 'क्लीव' च्या ऐवजी 'क्लीब' वाचावें.

भाग २ पृ. ११८ ओळ १२ 'असत्याचे' च्या ऐवजी 'असह्याचे' वाचावें.

भाग २ पृ. ११९ ओळ खालून ३ '१' च्या ऐवजीं '९' वाचावें.

भाग २ पृ. १२५ ओळ १६ '१' च्या ऐवजीं '९' वाचावें.

भाग २ पृ. १२८ ओळ खालून २ '११' च्या ऐवजीं '१९' वाचावें.

भाग २ पृ. १३१ ओळ ११ 'बढ़तेज' च्या ऐवजी 'बड़तेज' वाचावें.

भाग २ पृ. १३२ ओळ ६ 'पटर्धवन' च्या ऐवजीं 'पटवर्धन' वाचावें.

भाग २ पृ. १३८ ओळ ८ 'अबली' च्या ऐवजीं 'अवली' वाचावें.

भाग ५ पृ. १४० ओळ ६ 'मुकाय' च्या ऐवजीं 'मुकाम' वाचावें.

भाग २ पृ. १४१ ओळ १२ 'उड़ी' च्या ऐवजीं 'झड़ी' वाचावें.

भाग २ परिशिष्ट अ पान ८ खालून २ री ओळ 'पतीचे' ऐवजीं 'पातीचे' वाचावें.

सेनासप्तसहस्त्री

पवार - विजय

पुस्तकावरील हिंदी विद्वानांचे अभिप्राय.

रायबहादुर श्यामविहारी मिश्र, बी. ए.

...... Thanks for your book entitled "Pawar-Vijaya" containing an interesting account of the great personages of the famous Pawar Raj-House of Dewas Senior I have gone through the book with great insterest here and there, and found it very interesting and useful. The verses composed by the poets Naruji and Kani Ram are quite attractive ....
Lucknow, 25-2-1941.

डॉ. अमरनाथ झा, एम्. ए.,
व्हाइस चान्सलर, अलाहाबाद युनिव्हर्सिटी.

.... 'पवार-विजय' के लिये बहुत धन्यवाद । मैं यथावकाश इसे पढूंगा । अभी यत्र तत्र देखने का अवसर मिला है । कविता बड़ी सरस है और वीर रस के पद्य विशेष कर उत्तम हैं । ....
ता. २२-११-४१ ई०

प्रो. दयाशंकर दुबे, एम् ए., एल्एल्. बी.,
प्रयाग.

.... आपका भेजा हुआ 'पवार - विजय' ग्रंथ मिला । मुझे वह बहुत पसंद आया । आपका प्रयत्न स्तुत्य है । ....
ता. २३-११-४१ ई०

वीणा (ऑक्टोबर १९४२)

.... देवास-सीनियर नरेश हिज हाईनेस श्रीमंत विक्रमसिंहराव पवार, बी. ए. सुशिक्षित और विचारशील नवयुवक हैं। ....सैनिक प्रकृति के होते हुए भी श्रीमंत कला और साहित्य से प्रेम रखते हैं। कुछ समय पूर्व आपने 'पवार-विजय' नामक एक हिन्दी-काव्य ग्रंथ का प्रकाशन देवास-राज्य की ओर से कराया था। इस पुस्तक के सम्पादक देवास-राज्य के सुप्रसिद्ध विद्वान श्री कृष्णाजी गंगाधरजी कवचाले ने किया है। भूमिका-लेखक महाराजकुमार डॉ. रघुवीरसिंहजी और परिचय-लेखक स्वर्गीय प्रोफेसर श्रीनिवास चतुर्वेदी हैं। पुस्तक में तालोद ग्रामनिवासी भाट किशनलाल के पूर्वजोंद्वारा लिखी वे रचनाएँ संग्रहीत हैं, जो समय-समय पर देवास-सिनियर नरेशों के संबंध में लिखी गयीं।

मार्तंड (१ ऑक्टोबर १९४३)

··· इसमें देवास बडी पाती के ऐतिहासिक राजपुरुषों के भाटों ने गाये हुए गीत संग्रहीत किये हैं। सम्बन्धित पुरुषों के परिचय, गीतों का विशेष विवरण, छंद-परिचय, शब्द-कोश आदि देकर पुस्तक उपयोगी बना दिया है। मराठों के इतिहास पर भी अधिक प्रकाश डालनेवाली पुस्तक में पायी जाती है। पुस्तक के सम्पादक कवचालेजी इतिहासके पंडित हैं। प्रयत्न सफल और सराहनीय है।

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, बी. ए.

व्हाइस चान्सलर, पूना युनिव्हर्सिटी.

"पवारांचे पराक्रम" हें मराठी इतिहासांतील एक रोमांचकारक पर्व आहे. या प्राचीन आणि शूर घराण्याचा अज्ञात इतिहास श्री गुजर प्रभृतीच्या प्रयत्नानें पुढें येत आहे ही संतोषाची गोष्ट होय. श्री. कवचाळे यांनीं भाटांचीं कवनें प्रसिद्ध करून माहितीचें एक अभिनव दालन उघडलें आहे.

ता. २३-४-४६ इ.

डा० प्रभाकर माचवे, एम्. ए.

.... यद्यपि वैसे ऊपरी-ऊपरी देखने से यह जान पडेगा कि राज्य के आश्रित समकालीन भाटोंने रचा हुआ स्तुतिपाठ इसमें हो। ... इसमें सन् १७२९ से सन् १८१८ तक के मराठा-मुँगल और मराठा-फिरंगी युद्धों की संक्षिप्त काव्यमय गाथा है। (भूमिका-लेखक) डा० रघुवीरसिंह ने 'पवार-विजय' की भाषा मिश्रित बतलाते हुए उसकी कारण-मीमांसा भी दी है। .... यही नहीं कि केवल ओजपूर्ण शब्द योजना से वीर-रस का परिपोष मात्र इस ग्रन्थ में हो, कई जगह राज-नीतिक चालों का सुन्दर वर्णन है। .... बसई और खरडे के संग्राम के चित्र मुझे अत्यधिक पसंद आये। श्री. कवचाले ऐसी उपयोगी पुस्तक के सम्पादन के लिये धन्यवाद के पात्र हैं।